# महाभारत

## खंड १३ : वनपर्व ५

मराठी अनुवाद : श्री. अशोक कोठारे



ई साहित्य प्रतिष्ठान

# महाभारत

## महाभारत खंड तेरावा (वनपर्व)

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

# महाभारत

## मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्याप्पूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० फेब्रुवारी २०१९**

# – अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसापेक्षां

जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा तेरावा खंड आपण आता वाचणार अहात, त्यात अजगर पर्व आणि मार्कंडेय समस्या पर्व आपण पहाणार आहोत.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका

करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –
ashokkothare@gmail.com
ashokkothare@yahoo.co.in
ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories
I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy
Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते

## - वनपर्व पुढे चालू -

## - महाभारत खंड तेरावा –

ह्या तेराव्या खंडात तुम्ही अजगर पर्व आणि मार्कंडेय समस्या पर्व वाचणार अहात.

## अजगर पर्व

## भाग तेविसावा

वैशंपायन पुढे सांगतात, गंधमादन पर्वतातील त्यांचे आनंद देणारे घर पांडव सोडून जातात तेव्हां त्यांना दुःख होते. त्यांच्या जीवनातील अनेक सुखाच्या आठवणी त्या कुबेराने दिलेल्या घराशी जोडलेल्या होत्या. परंतु, त्यांना कांहीं निश्चित कर्तव्य होते व म्हणून तेथून निघणे अपरिहार्य होते. त्या पर्वतात निसर्ग उदंड होता. भौतिक आणि आदिभौतिक अशा दोनही प्रकारच्या गोष्टींचा त्याना तेथे अनुभव आला होता. तेथील धबधबे, झरे, नद्या, तेथील पशु, पक्षी असे भौतिक तसेंच कुबेराचे यक्ष, राक्षस, गंधर्व, अप्सरा, तेथील विलक्षण सुगंध देणारी कमळं व इतर फुलं असे आदिभौतिक त्याने जवळून अनुभवले होते. त्यामुळें त्यांना जो आनंद मिळाला होता त्याचे वर्णन करता येणार नाही. सर्वात जास्त सुख त्याना मिळाले होते जेव्हां ते कैलासाचे दर्शन घेतात. ते ढगांनी वेढलेले शिखर त्यांची दृष्टी पकडून ठेवते. जसें दुसरे कांहीं पाहूच नये. आता ते त्यांच्या अंतिम उद्देशासाठी तेथून निघाले होते त्याची सगळी शस्त्र अस्त्र घेऊन चालले होते. जातांना ते, पुन्हा ते नैसर्गिक सौंदर्य पहात होते. त्या दर्या खोर्या, ती पहाडातील शिखरं, जंगलं, त्यातील स्वच्छंदपणे फिरणारे प्राणी, नद्या, तलाव, गुहा त्यात तपस्या करणारे जोगी लोक असें बरेच कांहीं ते पहात परतीच्या मार्गाने घटोत्कचाच्या मित्रांच्या खांद्यावर बसून जात असतात. असें प्रवास करत ते वृषपर्वाच्या राज्यात येतात. तेथे उतरल्यावर त्यांचा प्रवासाचा क्षीण उतरतो. तेथे ते विश्रांती घेतात आणि वृषपर्वाला त्यांच्या प्रवासाचा इतिवृतांत सांगतात. त्यामध्ये त्यांचे त्या पहाडी प्रदेशातील अनुभव त्याला सांगतात. त्या जागी ते एक रात्र आराम करतात. तेथे इतर ऋषी, सिद्ध त्यांना भेटतात. त्यांच्याशी युधिष्ठीराच्या वार्तालाप होतात. त्या जागेतून ते त्या प्रसिद्ध बोराच्या विशाल नांवाच्या वृक्षाकडे पोहोचतात. तेथे रहातात. ते कृपा कनवाळू पंडुचे पुत्र त्यानंतर नारायणाच्या बद्री कडील आश्रमाकडे जातात. तेथे

वस्ती करतात. तेथे कुबेराचा प्रसिद्ध तलाव ते पहातात. जेथे सिद्ध व देव वेळोवेळी जात असतात. पांडव त्या तलावाला फेरफटका मारतात, त्यांच्या सगळ्या चिंता, विवंचना ते तेथे विसरून जातात जसें, पवित्र ब्राह्मण नंदनवनात गेल्यावर करतात. ते शूरयोद्धे अशारितीने बद्री आश्रमात एक महिना श्रमपरिहार करतात. त्यांचा परतीचा प्रवास त्यांच्या आधीच्या प्रवासा प्रमाणेच असतो म्हणजे, ज्या मार्गाने ते गंधमादनाकडे गेले त्याच मार्गाने ते परतत असतात. हिमालयाचा डोंगराळ प्रदेश उतरत ते चीन, तुखर, दरद आणि कुलिंद अशा मौल्यवान रत्नांसाठी प्रसिद्ध असलेल्या प्रदेशातून जातात. त्यानंतर ते सुवाहूच्या राज्यात येतात जो किराटांचा राजा आहे. ते आल्याची  वार्ता समजल्यावर राजाला फार आनंद होतो. तो वृद्ध राजा त्यांना भेटतो. त्यांचे स्वागत राजा इंद्रसेन मोठ्या आत्मीयतेने करतो. त्याचे रथ चालवणारे ज्यांचा नेता होता विसुक पांडवांना इंद्रसेनाच्या कडे नेतात. ते तेथे एक रात्र काढतात. तेथे त्यांचे बाकीचे तीर्थयात्री पाहुणे म्हणून होते ते सगळे त्यांना मिळतात. त्यात रथचालक, स्वैपाकी, असें सगळे होते. इंद्रसेनाला फार आनंद झालेला असतो. युधिष्ठीर त्याचे आभार मानतो कारण त्यांने त्यांच्या यात्रींची व्यवस्था इतके दिवस केली होती. तेथे भिम त्याचा मुलगा घटोत्कच ह्याला सुटी देतो. त्यामुळें ते मित्र राक्षस त्यांना सोडून जातात. आता तो अवघड प्रवास संपलेला असतो. ते ठरवतात कीं, ते यमुना नदीच्या किनारी असलेल्या पहाडी प्रदेशाच्या राजाला मिळावे. तेथे लहान मोठे डोंगर असतात ज्यांची माती नारंगी आणि करड्या रंगाची होती. तेथे असंख्य झरे व धबधबे होते. सभोवारचे डोंगर हिमाच्छादित होते. त्यानंतर ते एका जंगलात शिरतात त्याचे नांव होते विषाख्युप. चित्ररथाच्या वना सारखेच ते होते. तेथे डुक्करं, हरणं आणि विविध प्रकारचे पक्षी स्वच्छंदपणे बागडत होते. तेथे शिकार करण्याची सोय होती बर्याच दिवसांनंतर ते ताजे शिकारीचे मांस खाणार असतात म्हणून त्यांना बरे वाटते. म्हणून ते तेथे जास्त काळ रहाण्याचा निर्णय घेतात. त्या शांत वनात ते एक वर्ष रहातात. त्या निवांत काळात एक प्रसंग घडतो त्यांने वृकोदराचे चित्त बिघडते. तेथे एका घळीत एक भलामोठा अजगर त्याच्यासाठी खाद्य शोधण्यासाठी त्याच्या बिळातून बाहेर येतो. त्याचे स्वरुप असे होते कीं, जणू तो साक्षात यम होता. तो अजगर भिमाला त्याच्या विळख्यात पकडून गिळू लागतो. भिम त्याच्या सगळ्या ताकदीनिशी त्या अजगराच्या पकडीतून सुटू

शकत नाही. युधिष्ठीर मोठ्या मुष्किलीने त्या विळख्याला उकलून भिमाला मोकळे करण्यात यशस्वी होतो. त्यासाठी युधिष्ठीर त्या आजगराला दुसरे आमिष, मारलेल्या रेड्याचे, दाखववून ते साध्य करतो. बारावे वर्ष सुरू झालेले होते. पांडव त्याचे व्रतस्थ तपस्यापूर्ण दिनकर्म चालू ठेवून रहात असतात. त्याशिवाय आपल्या शस्त्रांचा सराव ते करत असतात. शिकारी करतांना त्या त्यांना उपयुक्त असतात. त्या चित्ररथा सारख्या वनाला सोडून ते सरस्वती नदीच्या किनारी रहावयास जातात. त्या नदीच्या किनार्याने चालत ते द्वैतवनाला पोहोचतात. तेथे रहाणारे तपस्वी जे कठोर तपस्या करत व संपूर्ण संयमाने तेथे रहात होते. ते वृद्ध होते. म्हणून आपले खाद्य ते दगडाने ठेचून बारीक करून नंतर खात होते. त्यांचे स्वागत करण्यासाठी ते कुशाच्या चटया व पाण्याची मडकी घेऊन त्यांना समोर जातात. ते बैरागी पांडवांना भेटतात. तेथे पवित्र वृक्ष होते. त्यात औदुंबर, रुद्राक्ष, रोहीतक, उस, बोर, शिरीष. बेल, पिलू वगैरे वृक्ष मोठ्या प्रमाणात वाढलेले होते. सरस्वती नदीच्या तटावर ते फेरफटका मारत त्यांचा वेळ घालवत होते. त्या ठिकाणी देव व सिद्ध येतात असे समजले जात होते. यक्ष, गंधर्व, महर्षी त्या ठिकाणी येत जात होते. त्या सरस्वतीच्या तटावर ते विसावले होते.

अशारितीने अजगर पर्वाचा भाग तेविसावा संपला.

# अजगर पर्व

## भाग चोविसावा

जनमेजय वैशंपायनांना विचारतो, "हे कसे शक्य आहे कीं, एक अजगर भिमसेनाला पकडतो ज्याच्या अंगात दहा हजार हत्तींचे बळ आहे? भिम त्या अजगराला पाहून घाबरतो असें कसे शक्य आहे"? ज्यांने कमळं आणण्यासाठी यक्षांचा बिमोड केला असें सगळे त्याच्या धाडसा बद्दल व हिम्मतीबद्दल तुम्ही वेळोवेळी सांगत अहात असा माझा पूर्वज एका अजगराला घाबरेल हे मनाला पटत नाही. तरी त्याबद्दल कांही सांगा, कीं असें काय झाले म्हणून तो घाबरला. अहो पुलस्त्याचे आपण पुत्र अहात मला सगळे नीट समजावून सांगा कारण माझे कान ते ऐकावयास तयार नाहीत कीं, भिमाने कोणापुढे हर मानली.

वैशंपायन त्यावर जनमेजयाला उत्तर देतात, "अहो राजे, पांडव राजा वृषपर्वाकडे गेल्यानंतर तेथे इतर पांडव त्या आश्रमात आराम करत असतांना वृकोदर मात्र तेथील जंगलात भटकंती करण्यासाठी निघाला होता. त्याच्या हातात त्याचे धनुष्य व बाण होते. कमरेला तलवार लटकत होती. त्याला ते प्रेक्षणिय अरण्य फार आवडले. जेथे गंधर्व नेहमी फेरफटका मारण्यासाठी जात असतं. त्या हिमालयातील जंगलात भटकत असतांना त्याला एक जागा विशेष पसंत पडली. तेथे देवर्षी आणि सिद्ध ऋषी वास करत असतं. त्याशिवाय अनेक अप्सरा तेथे रहात होत्या. त्या वनात चकोर, चक्रबक, कोकीळ आणि जिव्हाबक, भृंगराज असें विविध पक्षी स्वच्छंदपणे बागडत होते, त्यांच्या ओरडण्याने तो परिसर जास्त आल्हाददायक वाटत होता. तेथे मोठ्या वाढलेल्या झाडांची सावली सगळीकडे पसरलेली होती त्यामुळें सूर्याच्या उन्हाचा त्रास होत नव्हता. झाडांच्या शिखरावर हिम शिंपडल्या सारखे पडलेले दिसत होते. ते दृष्य प्रेक्षणीय होते. दूरवर असलेल्या पहाडाच्या कड्यावरून वहाणारे धबधबे विलोभनीय होते. ते पाणी सूर्याच्या उन्हामुळे चमकत होते. तेथे असलेले खडक नीलमण्यासारखे झाक मारत होते. तेथे असलेल्या सरोवरात शुभ्र राजहंस आणि बदकं पोहोत होती. त्या वनात देवदारूची झाडे होती. त्यांच्या उंच माथ्याला ढगे स्पर्श करत होती. त्याशिवाय तुंग्र, कालिकेय अशा वृक्षाची सुद्धा बरीच वाढ झालेली होती. त्यामध्ये अधून मधून चंदनाचे वृक्ष दिसत होते.

अशा मनाला प्रसंन्न करणार्या अरण्यात भिम स्वच्छंदपणे फेरफटका मारत होता. त्यातील उतारांवर व सपाट भागावर तो शिकार शोधण्यासाठी फिरत होता. त्याच्याकडे जहर न लावलेले बाण होते. तो बलशाली ज्याच्या मध्ये शेकडो हत्तींची ताकद आहे, शिकार करतांना मोठे रानडुक्कर केवळ स्वताच्या हाताने मारत होता. त्याने कित्येक सांबर, रेडे बाणांने नेम धरून मारले. केवळ गंमत म्हणून कांहीं झाडे तो मुळासकट उपटून फेकत होता. कांहींच्या फांद्या मोडून टाकत होता विनाकारण, केवळ मस्तीमुळे तो हे कृत्य करत होता. माज आल्यासारखा तो त्या डोंगराच्या माथ्यावर जाऊन जोरांने ओरडून आपली शक्ती दाखवत होता. त्याच्या त्या ओरडण्यामुळें धरणी कांपत होती. तो एकटाच स्वताचे दंड थोपटत कोणाला तरी आव्हान देत होता. दंड व मांड्यांवर जोराने हात मारून तो मोठे आवाज काढत होता. जसें कांहीं तो कोणाला तरी आव्हान देत आहे. मधूनच तो उंच उडी मारत होता त्याचा माज कमालीचा वाढलेला होता. त्याच्या आव्हान देण्याच्या हालचालीमुळें तेथे फिरणारे सिंह व हत्ती दूर निघून गेले होते. ते पाहून भिमाचा जोर आणखीन वाढत होता. त्या जंगलावर त्याने जणू काय त्याचे आधिपत्य स्थापन केले होते. तो त्या वनाचा स्वामी झाला होता कारण त्याला कोणी जाब विचारत नव्हते. तो त्या अरण्यातील खोल आतल्या भागात अशारितीने भटकत होता. त्याला पाहून व त्याच्या ओरडण्यामुळें बरेच प्राणी त्याला येत आहे हे पाहून त्याच्या पासून दूर पळत होते व तो त्यांच्या पाठी जाऊन त्यांना आणखीन घाबरवत असें असा त्याचा विरंगुळा होत असतांना त्याला एका घळीत एक भलामोठा अजगर निवांतपणे झोपलेला दिसला. त्या अजगराचा आकार पाहून तो स्तिमित झाला. ज्या घळीत तो पहूडला होता ती सगळी त्यांने व्यापली होती. त्याचा आकार विलक्षण होता. भिम त्याला पहात राहीला. त्याचा रंग पिवळा होता. कांही भागात लालसर होता. त्या सापाला एकाद्या गुहेसारखे मोठे तोंड होते व त्यात दांत होते. त्याला पाहून कोणाच्याही हृदयाचे ठोके बंद होतील असा तो होता. जणू काय यम असें त्याचे स्वरुप भयावह होते. अधून मधून तो फुत्कार टाकत होता. त्याचा फुत्कार चौफेर ऐकू येत होता इतका मोठा होता. भिमाला त्याच्या जवळ आलेले पहातच तो चटकन फुरफुरू लागला व अचानकपणे त्याने भिमाला त्याच्या विळख्यात घेतले. ते इतके झपकन झाले कीं, भिमाला कांहीं अंदाज आला नाही. आता तो महाबली त्या अजस्त्र

अजगराच्या विळख्यात अडकलेला होता. त्या सापाने भिमाला आवळावयाला सुरूवात केली व त्यामुळें भिमाचा जीव गुदमरू लागला. तो थोड्याच क्षणात बेहोष झाला. तो महाबली बेशुद्ध झाल्यामुळें त्या सापाच्या पुढे हतबल झाला होता. त्यानंतर तो अजस्त्र साप त्याला आणखीन दाबू लागला. त्यावेळी देवांच्या आशिर्वादाने अजिक्य असलेला तो पांडव शुद्धीवर आला व त्या सापाकडे पाहू लागला.

अशारितीने अजगर पर्वाचा चोविसावा भाग संपला.

# अजगर पर्व

## भाग पंचविसावा

वैशंपायन सांगतात, त्या प्रचंड अजगराच्या तावडीत सापडलेला व नामोहरम झालेला भिम त्या अजगराला विचारतो, "अरे अजगरा, तू खरा कोण आहेस, मला अशारितीने तू कां पकडून ठेवले आहेस"? त्यानंतर भिम स्वताची ओळख त्या अजगराला सांगतो कीं, "मी भिम, पंडूराजाचा दुसरा मुलगा, मला देवांच्या कृपेने हजार हत्तींचे बळ प्राप्त झाले आहे, असे असतांना तू मला कसा काय आवळू शकतोस. मी आतापर्यंत असंख्य सिंहांना, वाघांना, रेड्यांना, हत्तींना मारले आहे. बलशाली राक्षस, यक्ष, पिशाच्च, नाग, मला हरवू शकत नाहीत. तुझ्याकडे कांहीं जादू अथवा विलक्षण दुवा आहे कीं तू मला अशारितीने हतबल करू शकतोस. मला आता समजले कीं, माझे बळ तुझ्यापुढे कुचकामी आहे. तुझे हे बळ पाहून कोणीही गोंधळून जाईल".

वैशंपायन पुढे सांगतात, तसें तो बलवान भिम त्याच्या कमजोरीची कबुली देतो, त्यानंतर तो साप कांहींही न बोलता भिमाला आणखीन आवळू लागतो. त्यानंतर जसा भिम श्वास घेऊ लागतो, तो बलाढ्य साप भिमाला सांगतो, "मी फार भुकेला आहे व मला बरेच दिवस कांहीं चांगले खाण्यासाठी मिळाले नव्हते, देवाच्या कृपेने तू मला सापडला आहेस हे माझे भाग्य आहे, आता मी तुला खाऊन टाकतो व माझी भूक मिटवतो. जीव सगळ्यांना प्रिय असतो. मी तुला सांगतो माझी कथा. अरे पवित्र माणसा ऐक, माझी अशी गत झाली आहे कारण, एका महर्षीने मला शाप दिला आहे. त्या शापातून मुक्त होण्यासाठी

मी तुला माझी सगळी कहाणी सांगतो, तू त्या राजर्षीचे नांव ऐकले असशिल कदाचित, ज्याला सगळे नहुष नांवांने ओळखतात. तो आयूचा मुलगा. त्या वंशाचा वारस होता. मीसुद्धा त्याच वंशाचा आहे. म्हणून मीसुद्धा नहुष आहे. ब्रह्मणांना मी विरोध केला होता म्हणून मला अगस्त्यांनी शापा दिला, त्यामुळें माझी अशी अवस्था झाला आहे. तू मला वाचवणारा आहेस हे मला माहीत आहे म्हणून मी तुला खायला नाही पाहिजे. तू दिसायलासुद्धा फार छान आहेस. परंतु, आज मला तुला नाईलाजास्तव खावे लागणार आहे. कारण मला प्रचंड भूक लागली आहे. जगण्यासाठी सगळे माफ असते हे तुला

माहीत असेलच. भाग्य तुझे काय आहे ते मला माहीत नाही पण जर ह्या दिवसाच्या सहाव्या प्रहरापर्यंत कोणी इतर मोठा प्राणी जसें रेडा, हत्ती, माझ्यापर्यंत आले नाही तर मी तुला खाणार आहे. तो अजगर त्याला सांत्वन करण्याच्या इराद्याने बोलतो, तुला कोणी मामुली श्वापदाने पकडलेले नाही म्हणून जर तू मेलास तर त्याबद्दल नामुष्की वाटण्याचे कारण नाही कारण, मी एक स्वर्गात रहाणारा देव होतो, माझी नेमणूक इंद्राच्या जागी झाली होती. असा मी अगस्त्यांच्या शापामुळें अजगर झालो आहे. तू मला त्या शापापासून मुक्त करू शकतोस जर तू मी सांगतो ते केलेस तर. कारण, मला शाप दिल्यानंतर अगस्त्य मुनींना फार वाईट वाटले व त्यांनी मला एक उःशाप दिला. त्याप्रमाणे, कांहीं काळानंतर मी त्या शापाच्या प्रभावातून मुक्त होणार आहे, त्यावेळी तो माणूस मी विचारलेल्या तीन प्रश्नांची अचूक उत्तरे देईल. ते सांगितल्या नंतर मी स्वर्गातून पृथ्वीवर फेकला गेलो आणि ह्या अवस्थेत येथे घाणीत पडलो आहे. अगस्त्य मला उःशाप दिल्यांवर अंतर्धान पावले. मी सर्प झाल्या पासून पापकर्म करत असतो. अशा घाणेरड्या जागी रहात आहे. ती उःशापाची वेळ येण्याची मी वाट पहात आहे". ते ऐकल्यावर महाबली भिम त्याला म्हणाला, "मला तुझ्याबद्दल संताप वाटत नाही. कारण तू जे करत आहेस ते क्रमप्राप्त आहे. त्यात तुझा कांहीं दोष नाही. मी मलासुद्धा दोष देत नाही. कारण माझे येथे येणेसुद्धा विधीलिखीत असावे. मला एवढेच वाईट वाटते कीं, जर मी तुझ्याकडून खाल्लो गेलो तर आमच्या पुढच्या योजनेचे काय होणार त्याची चिंता आहे. माणसें कधी फार विचार करतात, आपले सुख व दुःख आपल्या हातात नसते हे मी समजलो आहे. ते विधीलिखीता प्रमाणे ठरलेले असते. त्यात फेरफार करणे माणसाच्या हातात नसते. आपले भाग्य आपल्या पूर्व कर्माने घडत असते म्हणजे आपल्या चांगल्या व वाईट भाग्याचे कर्ते आपणच असतो फक्त त्याची कारणमिमांसा आपल्या आकलना पलिकडली असते. म्हणून जे घडते त्याचे कारण आपण समजू शकत नाही परंतु, जर आपण हे समजून विचार करत असलो किं. जे घडले त्याला मीच जबाबदार आहे तर त्याचे परिणाम स्वीकारायला आपण तयार होतो. मला माझ्या कर्माचे वाईट वाटत नाही परंतु, त्यामुळें इतरांच्या जीवनावर जो परिणाम होतो त्याचे वाईट वाटते. माझ्या भावाचे राज्य त्याच्या कर्मामुळे गेले ते त्याला माझ्या मदतीने मिळवावयाचे आहे पण जर मी माझ्या कर्मामुळें

तुझ्याकडून खाल्ला गेलो तर त्याचे काम राहून जाईल त्याचे वाईट वाटते. ते आता मला शोधत असतील कारण, मी त्यांना न सांगता येथे भटकत आलो आहे. मी मेलो असें जर त्यांना समजले तर ते काय करतील त्याचा मी विचार करत आहे. मला माझी फिकीर नाही मला माझ्या परिवाराची फिकीर आहे. मी नेहमीच फार वाईट प्रकारे त्यांच्याशी वागत आलो आहे. माझा भाऊ अर्जुन मोठा कर्तबगार आसामी आहे. तो सगळ्या शस्त्रविद्या शिकण्यासाठी इंद्राकडे गेला होता तो नुकताच आला आहे त्याच्या बद्दल मला वाईट वाटते. तो राक्षस, गंधर्व आणि देव अशा कोणालाही आटपता येणारा नाही असा योद्धा आहे. तो असा आहे कीं, येथून तो देवांना खेचून आणू शकतो. मला ते सगळे आता आठवते, जेव्हां माझ्या मोठ्या भावाला फसवून द्युत खेळावयाला लावले व त्यात तो हरला व आमचे सगळे राज्य आमच्या ताब्यातून गेले. त्यामुळें त्यांच्याशी आमचे वैर झाले. त्यांना हरवून आम्हाला आमचे राज्य परत मिळवावयाचे आहे, ते आता माझ्या मरण्यामुळे शक्य कसे होणार त्याची मला फिकीर आहे. मला माझ्या आईची आठवण येते, तिचा काय दोष कीं, मी येथे तुझ्याकडे अडमडलो. माझ्या जाण्यामुळें तिला जे दुःख होणार आहे त्याचे मला वाईट वाटते. माझ्या एकट्याच्या मरण्यामुळें अनेक गोष्टी होणार नाहीत व त्यामुळें पुष्कळांचे नुकसान होणार आहे त्याचे मला वाईट वाटते. माझे दोन लहान भाऊ आहेत त्यांचे सगळे मीच करत असतो. माझ्या जाण्याने त्यांचे जीवन उध्वस्त होईल त्याचे मला वाईट वाटते. असें विचार माझ्या मनात येत आहेत". भिम त्याला सांगतो. तो अजगर त्याला सोडत नाही व त्यामुळें भिमाचा त्याच्या ताकदीबाबतचा गर्व संपुष्टात येतो. त्या वनात त्यांने जी विनाकारण निष्पाप जीवांची हत्या केली त्यामुळें त्या वनाच्या देवतेने त्याला शिक्षा केलेली होती असें तो समजतो. भिम त्या वनदेवतेची क्षमा मागतो पण त्याचा कांहीं उपयोग होत नाही, तो भुकेला अजगर त्याला आणखीन जास्त आवळतो.

येथे आश्रमात युधिष्ठीराला कांहीं अशुभ चिन्ह दिसू लागतात. कोल्हे जोरा जोराने ओरडू लागतात. कांहीतरी भयंकर घडणार हे त्याच्या ध्यानात येते. जोरांने वारे वाहू लागतात. त्यामुळें सगळीकडे धूळ पसरते. सगळें प्राणी रडू लागतात त्या आवाजानें तो व्याकुळ होतो व उठतो, तो भिम कोठे आहे ते विचारतो व त्याला समजते कीं, तो घरात बराच काळ झाला, आलेला नाही. त्याचा उजवा हातात लचके येऊ लागतात व ते थांबत नाहीत.

अशी बरीच अशुभ लक्षणं त्याला जाणवू लागतात. तो द्रौपदीला विचारतो भिम कोठे गेला आहे? ती सांगते बराच काळ तो घरात नाही. युधिष्ठीर धौम्यना विचारतो, त्यांना सुद्धा तो कांहीं न सांगता गेला आहे असे समजते. त्याला समजते कीं, जर कांहीं बिघाड झाला आहे तर तो भिमाच्या बद्दलचाच असावा तेव्हां नकुल व सहदेवांला घरात लक्ष द्यावयाला सांगून तो भिमाच्या शोधात निघतो. थोड्या वेळांनी धौम्यसुद्धा युधिष्ठीरा पाठून निघतात. त्या निबीड जंगलात भिमाला त्याच्या पायांच्या खुणांवरून तो शोधण्यास सुरूवात करतो. त्यानंतर पुढे असंख्य प्राणी मरून पडलेले तो पहातो त्यातील कांहीं हाताच्या फटक्याने मार खाऊन मेलेले त्याला दिसतात. त्यावरून तो भिमाचा मागोवा घेत पुढे जात असतो. झाडे उपटलेली, कांहीं झाडांच्या फांद्या तोडलेल्या असें सगळा विध्वंस पहात तो भिमाचा मार्ग शोधत असतो. अखेरीस तो पांडव त्या घळीत येऊन पोहोचतो व पहातो कीं, त्याचा बलदंड भाऊ त्या प्रचंड अजगराच्या विळख्यात करकचून बांधल्यासारखा मान खाली घालून निपचित पडला आहे.

अशारितीने अजगर पर्वाचा भाग पंचविसावा संपला.

# अजगर पर्व

## भाग सव्विसावा

वैशंपायन पुढे सांगतात, भिमाला अशाप्रकारे असहाय अवस्थेत एका अजगराच्या वेटोळ्यात अडकलेला पाहून तो कनवाळू राजा स्वतःशी बोलतो, अरे कुंतीच्या मुला , तू अशा प्रकारे दुर्दैव स्वतःवर कसे ओढवून घेतलेस रे, आणि हा प्रचंड अजगर कोण, ज्याचे शरीर एकाद्या डोंगरा सारखे आहे. ते आपल्या मोठ्या भावाचे स्वगत परंतु प्रकट उद्‌गार भिमाला ऐकावयाला मिळतात. तो त्याला सांगतो, "अहो पुज्य ज्येष्ठ बंधू, हा अजगर मला खाण्याच्या गोष्टी करत आहे. हा पुज्य साधू नहुष ह्यांच्या कुळातील देव आहे परंतु, अगस्त्यांच्या शापामुळें अजगर बनून रहात आहे. जर त्याला दुसरे कांहीं मोठे खाद्य वेळीच मिळाले नाही तर तो मला खाणार आहे, असें तो म्हणत आहे".

ते ऐकून युधिष्ठीर त्याला बोलतो, "प्रिय बंधू, तुला दीर्घ आयुष्य लाभो, आपण त्याला दुसरे कांहीं खाद्य आणून देऊ ज्याने त्याची भूक शमेल म्हणजे तो तुला सोडून देईल, माझा त्यावर विश्वास आहे. तो अजगर युधिष्ठीराला बोलतो, "तूर्त हा राजपुत्र माझ्या तावडीत आहे व जर मला चांगले भरपूर खाद्य वेळीच मिळाले नाही तर मी ह्याला खाणार आहे. तू येथून निघून जा, येथे तुझे कांही काम नाही. जर तू येथे तुझ्या भावासाठी थांबलास तर मी तुलासुद्धा उद्या खाऊन टाकीन. अशी विधीची रचना आहे किं जो कोणी माझ्या कह्यात येतो तो माझे खाद्य असेल व त्याप्रमाणे तुझा भाऊ येथे स्वताच्या पायांनी आला व माझ्या विळख्यात अडकला आहे. म्हणून मला तुझ्या भावाला खाण्याचा हक्क आहे हे तू समजू शकतोस. लक्षात घे कीं, तूसुद्धा आता माझ्या कह्यात आला आहेस तरी विचार कर व येथून निघून जा. मी तुझ्या भावाला सोडणार नाही कारण, मला त्याला खावयाला आवडेल. एका राजपुत्राचे मांस मला खाण्यास खचितच आवडेल".

युधिष्ठीर त्या अजगराला बोलतो, "अरे जो कोणी तू आहेस, देव किंवा, राक्षस नाहीतर उरूग, मला सत्य काय ते सांग. मी युधिष्ठीर आहे, ह्याचा मोठा भाऊ व पुंडु राजाचा ज्येष्ठ पुत्र. मला सांग कोणते पर्यायी खाद्य तुला मिळाले किं तू माझ्या भावास सोडशिल"?

नहुष वंशाचा तो देव जो सांप्रत काळी एक अजगर बनून त्याचा शाप भोगत आहे, तो युधिष्ठीराला सांगतो, "अरे निष्पाप माणसा, मी तुझा एक पूर्वज आहे, आयूचा मुलगा, चंद्रवंशातील पांचव्या पिढीतील आहे. मी एकेकाळी नहुष नांवाचा राजा होतो. सन्यस्थ जीवन जगून व व्रतस्थ राहून आणि विविध यज्ञ करून, वेदांचा व्यासंग करून माझ्यासाठी स्वर्गात नित्य स्थान प्राप्त केले होते. मला ते अलभ्य स्थान मिळाल्यावर मात्र माझी बुद्धी भ्रष्ट झाली व मी ब्राह्मणांचा उपमर्द करू लागलो. मी त्या तपस्वी ब्राह्मणांना त्यांच्या डोक्यावर उचलून मला माझ्या आसनासकट घेऊन जाण्याची आज्ञा करू लागलो व ते ऋषी त्याप्रमाणे माझे ओझे वाहू लागले होते. त्यांच्या त्या असहायतेची मला मजा वाटत होती. त्यात मी माझे श्रेष्ठत्व पहात होतो. त्या माजात मी एकदा प्रजापतिचा मुलगा अगस्त्य आला असता त्याला तसे करावयाची आज्ञा केली. त्यामुळें त्यांनी चिडून मला शाप दिला व माझी अशी गत करून ठेवली आहे. स्वर्गातून मी एकदम पृथ्वीवर फेकला गेलो व येथे जो अवतरलो ते अशा अजगराच्या अवतारात. मला पश्चात्ताप झाला आहे हे लक्षात आल्यावर त्यांना माझी दया आली व त्यांने मला एक उःशाप दिला. त्यानुसार मी कांही काळ ही शिक्षा स्वरुप योनी अनुभवल्यावर पुनः स्वर्गात जाऊ शकतो. हे सगळें मला आठवते म्हणून मी तुला सांगू शकतो. त्या उःशापाप्रमाणें जर तू माझ्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं दिलीस तर मी तुझ्या भावाला पर्यायी खाद्याच्या बदल्यात सोडण्यास तयार आहे. जर तू उत्तर देण्यात अक्षम ठरलास तर मी तुझ्या भावाला खाणार आहे".

युधिष्ठीर त्याला बोलतो, "अहो उरूगा, तुला जो प्रश्न विचारावयाचा आहे तो विचार, मी त्याचे उत्तर तुला देईन. तुला माहीत असेलच कीं, ब्राह्मणांचे ज्ञान जितके असते त्यात येणारा प्रश्न असेल तर मी तुझे समाधान करू शकेन". ते ऐकल्यावर तो अजगर बोलतो, "अरे युधिष्ठीरा, मला सांग ब्राह्मण कोणाला समजावयाचे?, त्याला काय माहीती असली पाहिजे? त्या तुझ्या बोलण्यावरून मी समजतो कीं, तू फार बुद्धीमान आहेस.

त्यावर युधिष्ठीर त्याला बोलतो, "अहो सर्पश्री, ज्याला सत्य, दान, क्षमा, सद्वर्तन, न्यायीपणा, त्याच्या वर्णाचे कार्य कर्तव्य आणि दयाबुद्धी ह्यांच्या मर्यादांचे ज्ञान आहे तो ब्राह्मण असें वेदात सांगितले आहे". त्याशिवाय जो जाणून असतो किं, अंतिम ब्रह्मात

गेलेल्याला सुख व दुःख होत नाही, ज्याला कशाचीच इच्छा उरलेली नसते तो खरा ब्रह्मज्ञानी समजावा, असें मी समजतो". असें बोलून युधिष्ठीर अजगराला विचारतो, "तुला काय वाटते"? तो सर्प बोलतो, "सत्य, दान, क्षमा, सद्वर्तन, न्यायीपणा, दयाबुद्धी व वेदाचे ज्ञान हे सगळ्याच वर्णांसाठी सारखेच लागू आहेत, तोंच तर धर्माचा गाभा आहे. त्यात ब्राह्मणांचे काय विशेष"? ते सगळे शुद्रात सुद्धा असतात. दुसरा मुद्दा तू मांडला आहेस त्यात सुख व दुःखाबद्दल बोलतोस. मला नाही दिसत कांहीं असेल ज्यात ह्या दोन गोष्टींचा समावेश होत नाही. त्यावर घाईने युधिष्ठीर सांगतो, "ब्राह्मणांचे व शुद्राचे मुलभूत गुण वेगळे असतात. जे ब्राह्मणांत असतात ते शुद्रात नसतात. उदाहरणार्थ, ब्राह्मण (द्विज) निर्णय घेण्याच्या क्षमतेचा असावा लागतो, शुद्र निर्णय घेण्याच्या क्षमतेत नसतो हा त्या दोघातील महत्वाचा फरक आहे. शुद्र जन्माने नाही तर कर्माने मानावयाचा असतो. तसेंच ब्राह्मण सुद्धा कर्माने असावा लागतो, जन्माने नाही. असें समजले जाते किं, ते गुण ज्या व्यक्तीत आहेत तो ब्राह्मण समजला जातो. जर जन्माने शुद्र असून त्यात हे गुण असतील तर तो ब्राह्मण समजला गेला पाहिजे. तसेंच जर तो जन्माने ब्राह्मण परंतु त्याच्यात ते गुण नसतील तर तो शुद्र समजला गेला पाहिजे. दुसरा मुद्दा, असें कांहीं नाही ज्यात सुख किंवा दुःख असत नाही. तुम्ही म्हणता असें कांहीं नाही ह्या सृष्टीत ज्यात हे दोनही नाहीत. परंतु, जसें उष्णतेत थंडावा नसतो व थंडाव्यात उष्णता नसते त्याप्रमाणे जेव्हां सुख असते तेथे दुःख नसते व जेथे दुःख असते तेथे सुख असूच शकत नाही. म्हणून अशी परिस्थिती कधीच नसते ज्यात ह्यांपैकी एकही नाही".

सर्प युधिष्ठीराला बोलतो, "अरे जर गुणांवरून तो ब्राह्मण आहे असें मानावयाचे तर मग जन्मावर आधारीत जाती व्यवस्था करण्याचा उद्देश काय? त्या व्यवस्थेत खोटेपणा आहे हे तू मान्य करत आहेस कां"?

युधिष्ठीर त्याला सांगतो, अरे बुद्धीमान सर्पा, सामान्य माणसाच्या समाजात, त्याची खरी जात ठरवणे अवघड असते. कारण, ह्या चार वर्णाच्या लोकांत अनैतिक संबंध होण्याची सदैव शक्यता असते. माझे असे मत आहे. सगळ्या वर्णाचे पुरुष व स्त्रिया त्यांच्या लैंगिक गरजेनुसार अनैतिक संबंध घेत असतात. त्यात कोणा एकच वर्ण तसे करतो असें समजणे उचित होणार नाही. अनैतिक संबंधात पुरुषांप्रमाणे बायकांचा सुद्धा समावेश करावा

लागेल, स्त्रिया त्यांच्या प्रेरणेने बरेच अनैतिक संबंध घडवत असतात, ते सगळे स्वाभाविक असते म्हणून त्यात दोष नाही. म्हणून ऋषी यज्ञ करतांना असें बोलतात, कीं, "ज्या गुणकर्माचा तू असशिल, त्याप्रमाणे यज्ञ करत आहोत". ते ज्या जातीचा असशिल असें बोलत नाहीत. म्हणून वर्ण ठरवण्यासाठी गुणकर्म हेंच खरे धोरण असले पाहिजे. मुलाचा जन्म झाल्यावर नाळ कांपतांना त्याची आई सवितृ समजली जाते व पिता पुरोहित समजला जातो आणि जोपर्यंत त्याचे वेदाचे अध्ययन सुरू होत नाही, तोपर्यंत तो शुद्रच समजला जातो ही परंपरा आहे. ह्याबद्दल कांहीं शंका असल्यास पहा वेदांत शुद्रानेच विधी केले असल्याचे पुरावे आहेत. शुद्राची व्याख्याच अशी आहे कीं, जो स्वतःचे निर्णय घेऊ शकत नाही व त्यासाठी दुसर्यांवर विसंबतो तो शुद्र. तसे पहाता अरे अजगरा, आपण सगळेंच थोडे शुद्र असतो. कारण आपण सगळे जन्माने प्रथम शुद्रच असतो. मनु म्हणतो, समाजाच्या उन्नतीसाठी, मिश्र वर्ण जास्त हितकारक असतो त्यात समाजाला बांधून ठेवण्याची क्षमता असते. मनु एकवर्ण समाज निषिद्ध मानतो. शुद्धीकरण विधीमुळें त्याची ती बांधिलकी संपुष्टात येते. अहो सर्पश्री, म्हणून ज्याच्यात ते गुण आहेत तो ब्राह्मण समजावा असें माझे मत आहे. जाती व्यवस्थेमुळें समाज सदैव विभक्त अवस्थेत रहातो व ते त्या समाजाच्या भल्याचे नसते".

ते ऐकल्यावर तो साप त्याला बोलतो, "तुला सगळे समजते हे माझ्या लक्षात आले आहे तर आता आपले बोलणे संपले आहे तेव्हां मी तुझ्या भावाला खाण्यास घेऊ शकणार नाही, मग माझ्या भूकेचे काय"?

अशारितीने अजगर पर्वाचा सव्विसावा भाग संपला.

## अजगर पर्व (संपले)

## भाग सत्ताविसावा

ते ऐकल्यावर युधिष्ठीर त्या अजगराला सांगतो, "अहो ज्ञानी नहुष, आपले वेदाचे व वेदांगांचे ज्ञान पहाता मी तुम्हाला कांहीं माझ्या शंका विचारू शकतो कां? मला सांगा, माणसाने मोक्ष प्राप्तीसाठी काय केले पाहिजे"? सर्प नहुष त्याला सांगतो, "स्वर्ग आणि मोक्ष ह्या दोन भिन्न अवस्था आहेत. प्रथम सांगतो स्वर्गात जाण्यासाठी माणसांने काय केले पाहिजे. ऐक, योग्य गोष्टी करणे, इतरांशी चांगले वागणे, बोलणे इत्यादि, कोणाचा अपमान न करणे, खरे बोलावे, विनाकारण कोणाला शरीराची अथवा मनाची इजा (हिंसा) करू नये. सर्व प्राण्यांबद्दल भूतदया बाळगणे असें वागणारा माणूस स्वर्गात जातो. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे माणूसकी, चांगुलपणा आणि भूतदया जो चांगल्या लोकांबरोबर प्रामाणिकपणे आचरतो तो स्वर्गात जातो. परंतु, वाईट लोकांशी तो तसा वागला तर त्याचे नुकसान होते. मोक्ष प्राप्तीसाठी माणसाच्या सहादोषांचे (काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर) निराकरण व्हावे लागते.

ते ऐकल्यावर युधिष्ठीर त्याला विचारतो, मला सांगा अहो सर्पश्री, सत्य आणि दान ह्यातील जास्त श्रेष्ठ काय? मला सांगा, दयाळू वर्तणूक आणि कोणालाही दुःख न देणे ह्यातील जास्त महत्वाचे कोणते"?

सर्प त्याला सांगतो, "सत्य व दान हे त्यांच्या योग्यतेनुसार श्रेष्ठ असतात. त्यांची तुलना करणे उचित ठरणार नाही. कारण ते एकमेकांचे पर्यायी नाहीत. सत्य व दान दोनही एकाच वेळी आचरणे शक्य असते. म्हणून ते दोनही आपापल्या परीने श्रेष्ठ असतात. कारण सत्य मानण्यात दानाची प्रेरणा असते. आणखीन एक सांगतो अरे पंडुपुत्रा, बोलण्याने जी हिंसा माणूस करतो त्यापेक्षा अहिंसक बोलणे जास्त श्रेयस्कर असते. ह्या सगळ्या गोष्टी त्यांच्या परिणामावरून ठरवावयाच्या असतात. बोलण्याच्या उद्देशापेक्षा त्या बोलण्याचा जो परिणाम होत असतो तो जास्त महत्वाचा असतो. मुला युधिष्ठीरा, विचार आणखीन काय तुला विचारावयाचे आहे"?

युधिष्ठीर विचारतो, "कृपया अहो सर्पश्री, मला सांगा, मर्त्य मेल्यानंतर स्वर्गात कसा स्वीकारला जातो. त्या नवीन अवस्थेचे तो कशाप्रकारे स्वागत करतो. ते तुम्ही मला सांगू शकाल कां"?

सर्प सांगतो, "माणसाच्या जीवन पद्धती नुसार त्याला गति मिळत असते. जो सात्त्विक जीवन जगतो तो पुण्यवान ठरतो व म्हणून मेल्यानंतर स्वर्गात जाण्यासाठी योग्य ठरतो. रजोगुणी पुनः मनुष्य जन्मात येतो व तमोगुणी मनुष्य किंवा त्यापेक्षा खालच्या योनीत जन्मतो असें समजतात. कांही वेळा असें तमोगुणी पिशाच्च योनीत रखडून पडतात. जे तमोगुणापेक्षा नीच जीवन जगतात ज्याला आपण दुर्जन गुणी म्हणतो ते मनुष्य योनीत परंतु असुर योनीत जन्म घेतात. असुर योनी माणसासारखीच असते. कांहीं सात्त्विक माणसे दैवी योनीत जन्मतात. दैवी योनीसुद्धा माणसा सारखीच असते जशी असुर योनी असते. सत्त्वशिलता, व्रतस्थता, आणि तपस्या ह्यांच्या प्रामाणिक प्रयत्नाने, अरे युधिष्ठीरा, मनुष्य त्याच्या त्या जन्मात सुद्धा दैवी योनीत रुपांतरीत होऊ शकतो. तसेंच पापकर्मात व्यस्थ रहाणारा मनुष्य त्या पापकर्मांच्या प्रभावामुळें असुर योनीत त्याच जन्मात रुपांतरीत होत असतो. माणसाचा देव होणे अथवा असुर होणे त्याच्या विचारसरणी व वागणूकीवर अवलंबून असते. असें होण्याचे कारण अरे युधिष्ठीरा, काय ते सांगतो, दैवी योनी प्राप्त होण्याचे कारण त्या माणसास सृष्टीतील दैवी शक्ती अनुकूल होतात तसेंच असुर योनी प्राप्त होण्याचे कारण सृष्टीतील राक्षसी शक्ती त्याला अनुकूल होतात.

*{सद्‌गुरू रामदासांनी त्यांच्या दासबोधात, सत्त्व, रज आणि तमोगुणांची माहिती दिली आहे ती पहावी}*

असें समजले जाते कीं, जो मनुष्य त्याच्या सहा दोषांत अडकून रहातो व त्यानुसार कृत्ये करत रहातो तो त्याच्या कर्मानुसार त्याचे भोग घेत असतो, त्यालाच आपण आपले भाग्य असे म्हणतो. जरी पशु, पक्षी अथवा मत्स्य योनी मिळाली तरी त्यात आत्म्याचे उद्धार कार्य होत नाही. म्हणजे अरे युधिष्ठीरा, अध्यात्मिक उद्धारासाठी हल्ली आत्म्याला माणसाचाच जन्म घ्यावा लागतो, परंतु, कृत व त्रेतायुगात पशु, पक्षी व मत्स्य योनीत सुद्धा ते शक्य होते. प्रत्येक युगाच्या स्वभावाप्रमाणे हे ठरत असते. त्यावर असें कां, असा प्रश्न नसतो. ते सहा दोष माणसाला पुन्हा पुन्हा जन्म घ्यावयाला लावतात व त्यामुळें

माणसाला अनेक जन्म मरणाच्या फेर्यात रहावे लागते. जेव्हां त्याचे सहा दोष संपुष्टात येतात तो त्या जन्म मरणाच्या फेर्यातून मुक्त होतो. अशी व्यवस्था सध्याच्या व नंतरच्या युगांसाठी (द्वापार आणि कली) आहे.

युधिष्ठीर विचारतो, "मला सांगा, अहो ज्ञानी सर्पश्री, मरणानंतर सुद्धा त्या माणसाला शरीर नसतांना सुद्धा दिसते, ऐकू येते व स्पर्श समजतो ते कसे"?

सर्पराज त्याला सांगतो, अरे कृपाशिल राजा, माणूस म्हणजे त्याचा आत्मा त्याच्या बरोबर त्यांने घेतलेल्या असंख्य जन्मांच्या कृत्यांचा लेखा जोखा घेऊन असतो. त्या लेखा जोखाला लिंगदेह असें म्हणतात. तो एक सुक्ष्म देह असतो व त्याला सगळी ज्ञानेंद्रिये व कर्मेद्रियेसुद्धा असतात. फक्त त्यांची कार्य करण्याची तर्हा निराळी असते. त्या सुक्ष्म देहाच्या म्हणजेच लिंगदेहाच्या मदतीने तो मृत्यूनंतर सुद्धा सगळे पाहू शकतो. त्या लिंगदेहामुळें त्या व्यक्तिचे लिंग ठरत असते.

*{आधुनिक विज्ञानाच्या माहिती नुसार सुक्ष्म लिंगदेहातून अतिनील किरण उत्सर्जित होत असतात. त्यामुळें कांहीं कॅमेरात तो लिंगदेह टिपता येतो म्हणून कांहीवेळा ते कॅमेरा भूतांची छायाचित्र काढू शकतात. कारण लिंगदेह म्हणजेच भूत}*

युधिष्ठीर नहुषाला विचारतो, "अहो सर्पश्री, मला सांगा, मन व बुद्धी ह्यात फरक काय असतो"? ध्यान करण्याच्या कामात ते दोन कसे कार्य करतात".

सर्प सांगतो, मनाच्या क्रियांमुळें माणसाला दुःख व सुख हे भाव अनुभवण्यास येतात. तसें बुद्धीच्या कार्यामुळें होत नाही. मन माणसाच्या अतार्कीक (भावनिक) विचाराचे कारक असते व बुद्धी माणसाच्या तार्कीक (तर्कशुद्ध, हिशोबी) विचाराचे कारक असते. माहिती ही बुद्धीमुळें प्राप्त होते परंतु त्याचे ज्ञानात अनुभवांच्या मदतीने रुपांतर करण्यासाठी पुष्कळ वेळा मनाची गरज असते. मनाचा संबंध प्रत्यक्ष शरीराशी असतो व बुद्धीचा आत्म्याशी असतो. अरे युधिष्ठीरा तुला माहीत आहे कां, माणूस तीन तत्त्वानी बनलेला आहे असें वेद सांगतात, त्यात शरीर, आत्मा, लिंगदेह येतात. त्यातील लिंगदेहाचेसुद्धा एक मन असते म्हणून आपल्याला, माणसाला दोन मनं (एक शरीराचे व दुसरे लिंगदेहाचे) असतात. त्यांच्यात सतत संवाद होत असतो. स्त्रीच्या बाबतीत थोडा फरक असतो, त्यांना दोन शरीरं असतात. एक तिचे स्वतःचे व त्याला चिकटून असते मातृ शरीर. ज्यामुळें ती

प्रजनन करू शकते त्यासाठी मातृशरीरामुळें स्त्री संभोगाची इच्छा तीव्रतेने करत असते. म्हणून त्यांच्या मध्ये सदैव वैचारीक अस्थिरता आढळून येते. म्हणून त्यांना समजणे पुरुषांना अवघड असते. बाईचे मातृशरीर कालांतराने निष्प्रभ होते म्हणून म्हातारपणी बाई व पुरुष सारखेच असतात. अध्यात्म साधनेत त्यामुळें तरुणपणी बायकांना विशेष मेहनत करावी लागते. तरुणपणी त्यांचे मातृशरीर विशेष कार्यरत असते त्याचे कार्य प्रजनन करून घेणे असें असते. ह्या मातृशरीरामुळें त्यांच्यात अनेक विशेष गुण असतात ते पुरुषांत नसतात. त्यामुळें त्या बर्याच बाबतीत पुरुषांपेक्षा उच्च ठरतात. क्षमाशिलता, दयाबुद्धी, दूरधोरणीपणा, ममता, सहनशिलता (दुःख सहन करण्याची श्रमता) असें काहीं उत्तम गुण बायकांत विशेष असतात. त्या गुणांमुळें त्या प्रयत्न करतात तर दैवी योनीत पुरुषांपेक्षा जास्त सहजपणे जाऊ शकतात. मातृ शरीरामुळें कांहीं दोष वाढण्याची शक्यता असते त्यात, आसुया, द्वेष, आहेत. त्यामुळे अशा बाईचा अध्यात्मिक र्हास होण्याची शक्यता असते. अरे युधिष्ठीरा, तू सुद्धा चांगला जाणकार आहेस म्हणून मी तुला विचारतो, तुझी ह्याबाबतची माहीती काय आहे"?

युधिष्ठीर त्याला बोलतो, "अहो सर्पश्री, मी काय तुम्हाला सांगणार, तुमचे ज्ञान माझ्यापेक्षा कितीतरी जास्त आहे. आपल्या जीवनाच्या काळात आपण जे कार्य केले आहे ते सर्वांना माहित आहे, आपण स्वर्गात देवरुपात राहिला आहात, त्यामुळें तुम्हाला काहीं समजले नाही असें होणार नाही. तरी तुम्ही ब्राह्मणांचा उपमर्द करण्याची चुक कशी केली"?

तो अजगर सांगतो, "यश आणि समृद्धी माणसाच्या बुद्धीवर झाकण घालते. तो त्याच्या मर्यादा विसरतो व तेथेच त्याचा अहंकार वृद्धींगत होतो व त्यातून असे प्रमाद माणसाकडून होत असतात. मी माझी मर्यादा जाणून वागलो असतो तर हे दिवस मला पहावे लागले नसते. म्हणून मी तुला सावध करतो किं, तू अशाप्रकारची चूक करू नकोस. अरे पांडवा, तुझ्या बरोबर बातचीत केल्याने माझा शाप संपुष्टात येत आहे. तुला सांगतो, त्या दिवसात मी स्वर्गात माझ्या दैवी रथातून फिरत असतांना माझ्याच घमेंडीत असें, मी तेथे भेटणार्या ब्राह्मणांकडून खंडणी गोळा करत असे, त्याशिवाय देव, यक्ष, गंधर्व, राक्षस, पनंग आणि इतर बरेच स्वर्गस्थ रहिवाशांना मी त्रास देत असें. मला अशी सिद्धी प्राप्त होती किं, ज्यावर मी माझी नजर रोखत असें ते तात्काळ जळून राख होत असें. त्या कारणाने मला घाबरून

अनेक उच्च कोटीचे ज्ञानी ब्राह्मण माझा रथ खेचत असतं. त्या माझ्या गुन्हेगारी वागण्याने अखेरीस माझे पतन झाले. कारण तशा वागण्यामुळें माझे पुण्य संपत होते. त्याचे भान मला राहिले नव्हते. अशात एके दिवशी, त्या ब्राह्मणांत एक होते अगस्त्य ऋषी, प्रजापतिचे पुत्र. ते माझ्या पुण्याचा र्हास होत असल्याचे जाणत होते, माझे पुण्य, संपुष्टात येत असतांना मला दुर्बुद्धी झाली व मी अगस्त्यांना पाय मारला. त्यामुळें माझे उरलेसुरले पुण्य नष्ट झाले व पुरेसा नाश झाल्यावर त्यांने माझ्यावर शाप फेकला. ते बोलले, "तुझा र्हास झाला आहे, तू एक अजगर बनून पृथ्वीवर रहाशिल". माझे सगळे वैभव त्या क्षणी संपुष्टात आले होते. मी पृथ्वीवर अचानक फेकलो गेलो. काय होत आहे ते मला समजलेसुद्धा नाही तरी माझे अधःपतन होत आहे हे मी समजलो व त्यांची मी माफी मागितली, त्यावेळी मी खाली पृथ्वीकडे वेगांने येत होतो. मी त्या सगळ्या ब्राह्मणाची माफी मागतांना माझ्या मूर्खपणाची कबुली दिली परंतु, माझे अधःपतन चालू होते. त्यावेळी अगस्त्य ऋषी मला बोलले तुला तुझी चूक समजली आहे तरी, जो त्रास एवढ्या ब्राह्मणांना आज पर्यंत तू दिला आहेस त्यासाठी पंडुपुत्र युधिष्ठीर येई पर्यंत तू त्या अजगराच्या योनीतच रहाशिल. हजारो वर्षे मी असा खितपत पडलेला आहे ह्या घळीमध्ये. युधिष्ठीर मला वाचवेल असें ते मला बोलले. माझा अहंकार संपुष्टात आला आहे. त्यासाठी मी तुला ब्राह्मणाच्या विशिष्ट गुणांबद्दल प्रश्न विचारत होतो. सत्य (ईश्वरावरील श्रद्धा), दान, संयम, तपस्या, मर्यादा, कोणालाही त्रास न देणे (अहिंसा), पुण्यवंत रहाणे हे खर्या ब्राह्मणाचे गुण असतात, ते तू सांगितलेस. त्यामुळें माझे भयंकर पाप नाहीसे झाले आहे. कोणालाही त्याच्या ह्या गुणांमुळें मुक्ति मिळते, त्याच्या जन्माच्या जातीमुळें मिळत नाही आणि म्हणून ब्राह्मणत्व जन्माने नाही तर गुणकर्माने सिद्ध हो असते. असें अचूक उत्तर तू मला दिलेस.

त्यानंतर तो प्रचंड अजगर भिमाला त्याच्या विळख्यातून बाहेर येऊ देतो व त्याला आशिर्वाद देतो किं तो नेहमी अजिंक्य राहिल. तो शापमुक्त नहुष आता स्वर्गाकडे जाण्याच्या तयारीत जातो.

वैशंपायन पुढे सांगतात, त्यानंतर लवकरच तो राजा नहुष त्याचा अजगराचा अवतार सोडतो व त्याचे दैवी रुप धारण करतो व स्वर्गाकडे प्रयाण करतो. त्या कृत्यामुळें समाधानी झालेले युधिष्ठीर धौम्यांबरोबर व भिमासह त्याच्या निवासस्थानी निघतात. घरी

पोहोचल्यावर युधिष्ठीर तेथे उपस्थित असलेल्या ब्राह्मणांना त्याचा वृतांत सविस्तरपणें निवेदन करतो. ते ऐकल्यावर ते सगळे ब्राह्मण पांडवांच्या भल्यासाठी शुभेच्छा देतात. त्याच प्रमाणे भिमाला त्याच्या उद्दामपणाबद्दल दोष देतात. भिमाच्या त्या जंगलातील अकारण केलेल्या विध्वंसाबद्दल, द्रौपदीसह सगळे पांडव त्याची निर्भत्सना करतात. त्याच प्रमाणे, भिम त्या प्राणावरील संकटातून बचावला म्हणून, विधात्याचे आभार मानतात. त्यानंतर ते पुनः तेथे मजेत राहू लागतात.

अशारितीने अजगर पर्वाचा सत्ताविसावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व (सुरू)

## भाग अठ्ठाविसावा

वैशंपायन पुढे सांगत असतात, पांडव तेथे रहात असतांना पावसाळा सुरू होतो. पावसाळा आला किं हवेतील उष्मा कमी होतो. सर्व जीवांना त्यामुळें अल्हाद वाटतो. त्या मोसमात काळे ढग आणि त्यांचा गडगडाट ही नेहमीचीच गोष्ट असते. त्या गडगडाटाने दाहीदिशा दणाणून निघतात. पावसाची संतत धार अनुभवायला येते, रात्रंदिवस ते चालू असते. आकाशातील ते ढग गोल घुमट केल्यासारखे दिसतात. पृथ्वीवरील सूर्याचे अधिराज्य जणू संपले आहे असे वाटते. सूर्याच्या प्रकाशाची जागा विजेचा चमचमाट घेतो. पृथ्वीत नवजीवन संचारते. सर्वदूर हिरवळ पसरते, त्यात लहान मोठे जीव आनंदाने वावरतांना दिसतात. सर्वकडे पाण्याचे राज्य पसरलेले दिसते. त्या पाण्याखाली जमीन उंच सखल असली तरी ते समजत नाही. सगळे समान पातळी राखून आहे असेच वाटते. उन्हाळा संपला किं एक वेगळेच सौंदर्य निसर्गात अनुभवास येते. जंगलात विविध प्राणी त्या नवजीवनाचा त्यांच्या प्रकारे आनंद लुटत असतात. डुकरं, सांबरं, साप, विविध पक्षी त्यांचा आनंद त्यांच्या आवाजात ओरडून व्यक्त करत असतात त्यामुळें तशा वनांत एकच ओरडा ऐकावयाला येतो त्यात सृष्टीचे जीवंतपण व्यक्त होते. पक्षांमध्ये मोर, चातक, कोकीळ, ह्यांच्या सुमधूर गाण्याबरोबर बेडकाचे ओरडणे डराव डराव एकून कोणाला त्या दोनांतील विरोधाभास जाणवून त्यामुळे हसू येत होते. सगळे लहान मोठे पावसात भिजण्यासाठी उत्सूक होते. पांडव त्यावेळी एका ओसाड वालुकामय प्रदेशातून जात होते. ते आकाशातून झर झर सरकणारी ढगं पहात होते. दूर कोठेतरी पडणार्या पावसामुळें हवेत शिरलेला गारवा मात्र त्यांना सुखावत होता. सूर्याचे तेज ढगांच्या मध्ये येण्यामुळे मंद झालेले होते व त्यामुळें प्रवासाचा क्षीण वाटत नव्हता. त्यानंतर पांडवांचा पायी प्रवास सावकाशपणे प्रगती करत होता, आणि आता पावसानंतरचा शरद ऋतु सुरू झाला. त्यात त्या ऋतुनुसार वेगळे वातावरण निर्माण झाले व त्यात सुद्धा सुखाचा त्या प्रकारचा अनुभव येत होता. पांडव अव्याहतपणे प्रवास करतच होते. पावसाच्या पाण्यामुळें वाढलेली गवत सर्वदूर पसरलेली होती. त्यावर विविध प्रकारचे पक्षी बागडत होते, निसर्गाचे एक वेगळे

सौंदर्य जाणवत होते. आकाशातून ढगे नाहीशी झाल्यामुळे रात्रीच्या प्रहरी चंद्राचे चांदणे लख्ख प्रकाश टाकत असल्यामुळें प्रवास रात्री करण्याचा आनंद ते यात्री घेत होते. रानातील वनपशु खाद्य भरपूर झाल्यामुळें चांगले पुष्ट झालेले दिसत होते. त्यांची मृगया करण्याचा मोह पांडवांना झाला तर त्यात नवल काय. वाटेत दिसणार्या झरे, नद्या तलाव ह्यात स्वच्छंदपणे बागडणारे पक्षी व पशु आणि त्यात वाढत असलेली कमळं व इतर पाणफुलं पाहून एक वेगळा आनंद त्याना मिळत होता. त्यांच्या परिमलाने तेथील वातावरण प्रसन्न झाले होते. सरस्वती नदीतून जातांना त्या पवित्र पाण्याच्या स्पर्शाने जे सुख मिळत होते ते अवर्णनीय होते. सरस्वती नदीच्या दर्शनाने त्या शूरयोद्ध्यांना विशेष आनंद वाटत होता. वैशंपायन ते वर्णन करताना जनमेजयाला बोलले, अरे जनमेजया, राजा, ती कार्तिक महीन्यातील पोर्णिमेची रात्र होती, फार पवित्र रात्र समजली जाते, ते ठरवतात किं, ते ती रात्र त्या नदीच्या तटावर घालवावी. त्या प्रमाणे ते सगळे यात्री ज्यात ज्ञानी ब्रह्मण होते, ज्यांच्या तपोसामर्थ्याचे काय वर्णावे, पांडवां बरोबर ती पवित्र रात्र ध्यान साधना करत घालवतात. त्यानंतर त्यांचे वस्तीस्थान असलेले कम्यक अरण्य येऊन पोहोचले होते. त्यांच्या सगळ्या जामानिम्यासह व अर्जुनासह ते त्या अरण्यात प्रवेश करतात. आपला तीर्थयात्रा उपक्रम, समाधानकारक पणे सिद्ध झाला त्याचे सुख युधिष्ठीराच्या मुखावर दिसत होते.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा अठ्ठाविसावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग एकोण तिसावा

वैशंपायन पुढे जनमेजयाला सांगतात, ते पंडुचे पुत्र त्यांच्या परिवारासह कम्यक वनात येऊन पोहोचतात. तेथे रहात असलेले बरेच संत, ब्राह्मण व बैरागी त्यांचे स्वगत करतात. कांहीं ब्राह्मण बोलतात, अर्जुनाचा परममित्र, कृष्ण तुम्ही येणार अहात ते जाणून आहे व तो तुम्हाला भेटण्यासाठी येत आहे. तो तुमचा मित्र नेहमी तुम्हा सगळ्यांची आठवण करत असे, तो तुमचा हितचिंतक आहे. ते ब्राह्मण पुढे सांगतात कीं, महान ऋषी मार्कंडेय तुम्हाला भेटण्यासाठी येत आहेत. ते अशारितीने पांडवांना सांगत असतांना त्याच वेळी ते पहातात किं, कृष्णाचा रथ त्याच्या आवडत्या दोन घोडे, सैव आणि सुग्रीव खेचून आणत आहेत. त्या रथात दामोदराबरोबर त्याची पत्नी सत्यभामा बसलेली ते पहातात, जशी साची, पुलमनाची कन्या, इंद्राबरोबर बसलेली दिसते. रथातून कृष्ण उतरतो व त्या कुरु घराण्यातील सत्यवादी वंशजांना भेटण्यास उताविळपणे पुढे येतो. रथातून उतरल्यावर तो पांडवांबद्दलचे प्रेम व्यक्त करण्यासाठी त्यांना लवून नमस्कार करतो. त्यानंतर कृष्ण भिमाला वंदन करतो व धौम्यना पाया पडतो. त्यानंतर नकुल व सहदेव कृष्णाच्या पाया पडतात अशारितीने त्यांचे अभिष्टचिंतन पूर्ण होते. त्यानंतर कृष्ण अर्जुनाला घट्ट मिठी मारतो. त्यानंतर द्रौपदीची चौकशी तिच्याकडेच करतो, त्यानंतर अर्जुन पुनः कृष्णाला आलिंगन देतो. बर्याच काळानंतर ते दोस्त भेटत होते. त्याच प्रमाणे सत्यभामा द्रौपदीला आलिंगन देते. त्यानंतर सगळे पांडव आणि त्यांचे पुरोहित व इतर मंडळी जनार्दनाचे स्वागत करतात. त्यानंतर ते सगळे एकत्र जमून अर्जुनाला त्याच्या स्वर्गातील अनुभवाबद्दल विचारणा करतात व तो त्या सांगत असतो. त्यावेळी अर्जुन त्याला स्वर्गात मिळालेला मुकूट डोक्यावर घालून वावरत असतो. गदाचा मोठा भाऊ व अर्जुन विचारतात की, तेथे द्वारकेत सुभद्रा व अभिमन्यू कसे आहेत? सर्व भेटण्याचे प्राथमिक सोपस्कार संपल्यावर कृष्ण युधिष्ठीराला बोलतो. "एकादे राज्य जिंकण्यापेक्षा स्वताची तपस्या कायम ठेवणे जास्त हितकारक असते. तू सदैव सत्याची कास धरली आहेस, तुझ्या कर्तव्याबद्दलचा तुझा परखडपणा तुला ह्या व त्यानंतरच्या जगात मदत करणारा ठरणार

आहे. तुझे धार्मिक कर्मकांड करण्याचे व त्याच बरोबर वेदाचा अभ्यास करण्याचे धोरण तुला भविष्यात सहाय्य करणार आहे. तुझा शस्त्रविद्येचा सराव तुला तुझ्या क्षात्र कार्यात मदतगार ठरणार आहे. तू आतापर्यंत तुझ्या क्षत्रिय वर्णाच्या रिवाजानुसार संपत्ती मिळवली आहेस व यज्ञ केले आहेस, तुला तुझ्या देहाच्या सुखात फारसा रस नसतो, धन मिळवण्यासाठी तू पापकर्माचा आसरा कधी घेतला नाहीस, म्हणूनच तुला सगळे देव, गुणी राजा म्हणून सगळीकडे ओळखतात. अरे पृथाच्या मुला, धन व संपत्ती मिळवण्यापेक्षा ती सत्पात्र दान करण्यात तुझा विशेष रस असतो हे तुझे वैशिष्ट्य आहे हे मी समजून आहे. खर्या राजाला शोभेल असें वैराग्यपूर्ण जीवन तू व्यतीत करत आहेस, शारीरीक सुखाबाबतचे तुझे औदासिन्य वाखाण्यासारखे आहे. भौतिक जगापेक्षा तुझे ध्यान आधिभौतिकाकडे विशेष आहे हे मला माहीत आहे. ह्या तुझ्या गुणांमुळें तू पुन्हा तुझे गेलेले राज्य मिळवशिल हे मला माहीत आहे. लवकरच आपण कौरवांचा समाचार घेण्याच्या तयारीला लागावयाचे आहे".

त्या नंतर कृष्ण धौम्य, भिम व युधिष्ठीर ह्यांना बोलतो, "तुमचे भाग्य थोर कीं, तुमचा अर्जुन सर्व तयारीनिशी स्वर्गात राहून ती शस्त्रविद्या संपादन करून आला आहे. त्याच्या माथ्यावरील तो मुकूट त्याची योग्यता दाखवत आहे". त्यानंतर जनार्दन पांडवांच्या पत्नीकडे, द्रौपदीकडे पहात बोलतो, किती चांगले आहे कीं, तुम्ही सगळे एकजुटीने रहात अहात. ही तुमची एकजूट तुम्हाला सर्व संकटांतून तारून नेणार आहे". द्रौपदीला तो बोलतो, "तुझी सगळी मुलं त्यांच्या जबाबदार्या ओळखून त्यांचा शस्त्रांचा अभ्यास जातीने करत आहेत ह्याचे मला समाधान वाटते. मला माहित आहे, तुझे पिता व तुझा जुळा भाऊ त्यांना त्यांचे राज्य देत आहेत पण तुझी मुलं त्यात स्वारस्य दाखवत नाहीत त्यांना त्यांचे स्वतःचे राज्य हवे आहे, हे पाहून मला खूप आनंद झाला आहे".

"ते अंतरांच्या देशात जाऊन शास्त्रांचे विज्ञान आत्मसात करत आहेत. तुझी मुलं वृश्नींच्या गांवात गेली व तेथे ते सगळ्यांना आवडू लागले. त्यांना सुभद्राचे मार्गदर्शन मिळत आहे जसे कुंतीने तिच्या पांडवांना दिले होते . कदाचित ती जराशी जास्तच काळजी त्यांची घेत आहे असें मला वाटते. अहो कृष्णा, जसा रुक्मिनीचा मुलगा अनिरुद्धला, अभिमन्यूला व सुनिता आणि भानु ह्यांना मार्गदर्शन करतो तसाच तो तुझ्या मुलांना सुद्धा मार्गदर्शन करत

असतो. तो त्यांना गदा, भाले, तिरकमटा व बाण, तलवारी, गोफणी ह्यांच्या वापराचे तंत्र सतत शिकवत असतो. त्याशिवाय ते आता रथ चालवण्यात सुद्धा तयार झाले आहेत. त्याशिवाय घोडस्वारी ते स्वतःहून शिकत आहेत. त्या सगळ्यात ते झपाट्याने तरबेज होतील असें मला वाटते. रुक्मीचा मुलगा त्याने दिलेल्या प्रशिक्षणाने समाधानी आहे कीं, ती सगळी मुलं त्यांच्या प्रशिक्षणात उत्तम ठरली आहेत. अभिमन्यूची प्रशिक्षणातील तयारी वाखाणण्या सारखी आहे. ते जेव्हां बाहेर सरावासाठी जातात तेव्हां त्यांच्या दिमतीला अनेक घोडे, हत्ती, रथ इतर प्रकारच्या गाड्या असतात. त्यामुळें त्यांचा सराव चांगला होत असतो".

नंतर युधिष्ठीराकडे पहात जनार्दन त्याला सांगतो, "दशरथ, अंधक व कुकुर समाजातील शूरयोद्धे तुझ्या आज्ञेत राहून उद्या पांडवांच्या साठी लढणार आहेत हे लक्षात असू दे. त्याच प्रमाणे मधूचे सैनिक व बलरामाचे नांगराने आणि कुर्हाडीने लढणारे सुद्धा तुला मिळणार आहेत. ते त्यांच्या घोडे, हत्ती व गाड्याने युद्धात सामिल होतील. त्याशिवाय मोठे पायदळ आहे तेसुद्धा रणांगण गाजवणार आहेत. अशा तयारीने पंडुच्या मुला, तू त्या दुर्योधनाची सेना उधळून लावशिल. तू जे बोललास त्या सभेत ते तुझे बोल खरे करण्याची वेळ आली आहे. हस्तिनापुर तुझ्यासाठी तयार होईल. दशरथ वंशाचे क्षत्रिय तुझ्या शत्रूंचा नाश करणार आहेत. त्या युद्धात तुझ्या सगळ्या विवंचनांचासुद्धा विनाश होणार आहे".

त्याचे ते आश्वासक बोलणे ऐकल्यावर तो कृपाळू राजा युधिष्ठीर हात जोडून त्याला व इतरांना बोलतो, "अरे केशवा, मला ह्याबद्दल तिळमात्र शंका नाही कीं, तुझे माझ्यावर लक्ष आहे व तुझ्यामुळे मला माझे राज्य पुनः प्राप्त होणार आहे. जेव्हां ती वेळ येईल तेव्हां तू जे आश्वासन देत आहेस ते व त्यापेक्षा कांहीं जास्त तुझ्याकडून होणार आहे हे मला माहित आहे. तूर्त आम्ही आमची बारा वर्षे वनवासात काढली आहेत परंतु, एक वर्ष अज्ञात वासात काढणे बाकी आहे त्याचा मला वाटते आता विचार करणे जास्त श्रेयस्कर आहे. त्या एक वर्षात आम्हाला कसे अज्ञातवासात रहावे लागेल त्याची चर्चा करणे आता आवश्यक आहे असें मला वाटते. मला सांग, आम्ही तुझ्या मदतीने तसे अज्ञातवासात राहू शकू? असें कांहीं सांग ज्यामुळें सत्याचा मार्ग न सोडता आम्ही ते साध्य करू शकू. कारण, आजपर्यंत तुझ्यामुळेंच आम्ही आजवर येथ पर्यंत पोहोचले आहोत. आमच्या

सगळ्या परिवाराचा तूंच संरक्षण कर्ता आहेस म्हणून ह्यावर तू मला सांग कीं, पुढे कसे करावयाचे कारण, त्या धृतराष्ट्राच्या मुलांना एव्हाना समजले असेल कीं आम्ही कम्यक वनात तीर्थयात्रा उरकून आलो आहोत".

वैशंपायन पुढे सांगतात, अरे जनमेजया, अशारितीने कृष्ण व युधिष्ठीर ह्यांची बातचीत होत आहे तेव्हां महान ऋषी मार्कंडेय तेथे अवतरले. त्यांच्या घोर तपस्येने त्यांचे केस सफेत झालेले दिसत होते. त्यांनी अनेक हजार वर्षे पवित्र जीवन जगून बरेच जग पाहिले होते. त्यांचे वय बरेच झाले होते परंतु, ते तसे तितके वृद्ध वाटत नव्हते. एकाद्या पंचविशीतील तरुणासारखे ते दिसत होते. त्यांना आलेले पाहून सगळे ब्राह्मण व इतर उठून उभे राहिले व त्यांचे हात जोडून स्वागत केले. त्यात जनार्दन सुद्धा होता. त्यांना युधिष्ठीराने बसण्यासाठी एक उंचावरील आसन दिले. ते त्यावर बसले, नंतर त्यांनी सगळ्यांना बसण्यास सांगितले. त्यानंतर कृष्ण पांडवांच्या वतीने त्यांना कांहीं सांगू लागला. तेथे जमलेले सगळे त्या ऋषीचे बोल ऐकण्यासाठी उत्सूक होते. त्यामध्ये द्रौपदी, सत्यभामा, स्वतः कृष्ण होते. ते मार्कंडेयांना विनंती करतात कीं, त्यांनी तेथे जमलेल्यांचे प्राचीन काळी घडलेल्या कथा सांगून प्रबोधन करावे. त्यामुळें काय योग्य काय नाही ते आम्हाला समजेल.

वैशंपायन पुढे सांगतात, त्या प्रमाणें तेथे सगळे मार्कंडेयांच्या भोवती जमा झाले असतांना नारदमुनीसुद्धा तेथे अवतरतात. त्या दोघांना रिवाजानुसार पाय धुण्यास पाणी देण्यात आले. त्यांना अर्घ्य दिले (हल्लीच्या भाषेत पिण्यास पाणी दिले) गेले. ते सोपस्कार झाल्यावर ते सगळे एकत्र बसले. नारदांना समजले किं, मार्कंडेय प्राचीन काळी होऊन गेलेल्या गोष्टी सांगून तेथे जमलेल्यांचे प्रबोधन करणार आहेत. नारद बोलले तेसुद्धा त्यात भर घालू इच्छितात.

त्यावर तो अमर ऋषी नारद, स्मित करत बोलतात, "अहो ब्राह्मण जातीचे ऋषी (मार्कंडेय) बोला आपल्याला पंडुच्या मुलांना काय सांगावयाचे आहे ते". ते ऐकल्यावर तो वैराग्यपूर्ण तपस्वी जाब देतात, थोडे थांबा, तसे पहाता पुष्कळ सांगण्यासारखे आहे, असे तो ऋषी त्या पांच पांडवांकडे पहात बोलतो. ऋषी कांहीं बोलण्याच्या मनस्थितीत आहे ते पाहून त्या दुपारच्या सूर्यासारख्या तेजस्वी ऋषीला युधिष्ठीर बोलतो,

वैशंपायन सांगत असतात, युधिष्ठीराला त्यांना कांहीं प्रश्न विचारावयाचे असतात. हि चांगली संधी आहे ते प्रश्न विचारण्याची असे समजून तो बोलतो, "आम्हाला पडणार्या प्रश्नांच्या संदर्भात जर कांहीं सांगितले तर बरे होईल". पुढे तो पंडुचा ज्येष्ठ मुलगा विचारतो, "आपण फार प्राचीन काळापासून ह्या सृष्टीत वावरत अहात, तुम्ही देव, दानव, महान संत, राजश्री असें बरेच जण जवळून पाहिले असतील. त्यामुळे आपण पुजनीय अहात. तुमचा सहवास मिळावा अशी आमची फार दिवसांची कामना होती. त्याच प्रमाणें येथे दैवयोगाने देवकीचा मुलगा, कृष्ण आम्हाला भेटण्यास आल्याने उपस्थित आहे. जेव्हां मी सदैव पुण्यकर्मात गुंतलो आहे, मला पहातो, जो त्याच्या सुखापासून दूर गेला आहे आणि जेव्हां मी धृतराष्ट्राच्या मुलांचा विचार करतो, जे सदैव पापाचरणात गुंतलेले असतात, जे सुखात पडलेले आहेत, मला माहीत आहे, जे होते ते माणूसच करत असतो त्यानुसार, चांगले कर्म व वाईट कर्म त्यांचा फलादेश तो भोगत असतो. मग देव ह्यात कोठे येतात व माणसांने कां देवांना पुजावयाचे? आपण ज्ञानी अहात म्हणून मला सांगा माणसाचे कर्म त्याच्या पाठी कसें लागते"? ह्याच आयुष्यात कां मरणानंतरच्या आयुष्यात ते सांगा. त्या माणसाची कर्मे त्याला कशी व कोठे भोगावी लागतात, आपण ज्ञानी अहात म्हणून मी तुम्हाला विचारत आहे. ते भोग त्याच जन्मात तो भोगतो कां मृत्यूनंतरच्या अवस्थेत (पिशाच्च अवस्था) कां पुढच्या जन्मी ते सांगा. त्यात माणसाचे कर्म कसे त्याच्या मागे येते? आपण भृगुचे वंशज अहात म्हणून तुम्ही ते सगळे जाणत असाल असें मी समजतो. आपण आयुष्यात जे कांहीं भोगतो ते सगळे आपल्याच कर्माचे भोग स्वरुप असते कां आणखीन कांहीं त्यात आहे? मेलेल्या माणसाचे कर्म कोठे साठवलेले असते कारण त्याचे शरीर नष्ट होत असते".

ते प्रश्न ऐकल्यावर मार्कंडेय त्याला सांगतात, हा तुझा प्रश्न तुझ्या सध्याच्या परिस्थितीतून उत्पन्न झाला आहे हे तू चांगलाच जाणत आहेस. मी तुला उत्तर देतो, नीटपणे ऐका, माणूस त्याच्या कर्मामुळें उत्पन्न होणारे सुख अथवा दुःख कसे अनुभवतो. त्यासाठी सृष्टीच्या उगमापासून पहावे लागेल. तो इसिस (परमेश्वर) त्याच्याच इच्छेने उत्पन्न झाला. जेव्हां त्याला इच्छा नव्हती तेव्हां कांहींही नव्हते. कारण इच्छा हे अपूर्णतेचे लक्षण असते. म्हणजे प्रथम अपूर्णता उत्पन्न झाली तिच्या पूर्ततेसाठी इच्छा उत्पन्न झाले ज्याने ते

अपूर्णत्व नष्ट होईल. परंतु, ते झाले नाही. तरी त्या अवस्थेत बरेचशे पूर्णत्वासारखे असल्याने गोष्टी उत्तम अवस्थेत होत्या. त्या सुरूवातीच्या काळात ज्याला आपण आज कृतयुग म्हणतो, सर्व गोष्टी पूर्ण सुखाचा अनुभव देत होत्या. त्या युगात माणसाच्या इच्छा त्वरित पूर्ण होत होत्या. त्यामुळें त्या युगातील जीवन सुखी होते. सगळे सुखी होते, त्यात माणसाबरोबर पशु, पक्षी व मासेसुद्धा सुखी होते. मनुष्य मनात येईल तेव्हां हवेत उडू शके. त्या युगातील माणसाचे मरण त्याच्या हातात होते. म्हातारपण नव्हते. आजारपण नव्हते. भिती नव्हती, तो देवासारखाच असें. सगळी माणसें पुण्यवान असतं. तपस्या करणे सोपे होते. ध्यान आपसुकपणे लागत असें त्यामुळें अध्यात्म साधना स्वाभाविकपणे होत असें त्या करता मुद्दाम प्रयत्न करावा लागत नसे. माणसे एकमेकाशी तुलना करत नव्हती त्यामुळे आसुया, तिरस्कार, मत्सर, गर्व अशा प्रतिक्रीया तो देत नसे. त्यातून उत्पन्न होणारा क्रोधसुद्धा नव्हता. माणसाची मन शांत असतं. तो माणूस हजार वर्षे जगत असें. कालांतराने त्या सर्व कांहीं चांगले असल्याने त्याच्या इच्छा वाढू लागल्या. त्यांचे प्रमाण वाढल्याने इच्छा पूर्ती होण्याचे प्रमाण कमी झाले व त्यातून अपेक्षाभंगा सारखे अनुभव वाढू लागले. इच्छा (काम) अपूर्ण रहाण्याच्या प्रकारामुळें क्रोध आणि दुःख वाढू लागले. कोणाच्या इच्छा पूर्ण होत व कोणाच्या नाही त्यामुळे एकमेकांशी तुलना करण्याचे प्रमाण वाढले, त्याचा परिणाम स्वरुप मद आणि मत्सर हे दोष वाढू लागले. अशारितीने प्रथम काम त्यानंतर क्रोध, त्यानंतर मद व मत्सर असे दोष माणसाला सतावू लागले, परिणामतः तो पहिल्या सारखा पुण्यवंत राहिला नाही. आता तो फक्त जमिनीवर चालू शकत होता. आकाशात उडण्याची श्रमता राहिली नाही. इच्छेतून लोभ दोष उत्पन्न झाला. त्यातून मोह उत्पन्न झाला. अशारितीने सगळे सहा दोष माणसात शिरले व त्यामुळें त्याची अध्यात्मिक योग्यता कमी होत गेली. ज्या उच्च दर्जाच्या अध्यात्मिक योग्यतेमुळें त्याला विविध सिद्धी सहज होत्या त्या तशा राहिल्या नाहीत. त्यावेळापासून त्रेतायुग सुरू झाले. म्हणजे कृतयुगाचे सावकाशपणे त्रेतात स्थित्यंतर होत होते. हा फरक सावकाशपणे होत होता. सहा दोषांच्या आहारी गेलेला माणूस त्याच्या कर्मामुळें अडकत गेला व पुण्यापेक्षा पापाकडे त्याचा कल होऊ लागला. जे फरक माणसात होत होते तसेंच फरक इतर चराचरांत सुद्धा होत होते. आपली इच्छा पूर्ण करण्यासाठी तो वाटेल ते करण्यास उद्युक्त होत होता व

त्यातून पापाचरण सुरू झाले. पापी माणसांची संख्या वाढत होती. माणूस व देव ह्यांत तफावत दिसू लागली. त्यामुळे माणूस जो सहजपणे स्वर्गात जात असे आता त्याला स्वर्ग (स्वर्ग अदृष्य सृष्टीचा भाग आहे) अवघड झाला. पापामुळें त्या लोकांसाठी जी व्यवस्था स्वाभाविकपणे निर्माण झाली त्याला आपण आज नरक म्हणतो. वस्तुतः पृथ्वी, स्वर्ग आणि नरक हे एकाच ठिकाणी असतात पण त्यांचे अनुभव भिन्न होते. माणसाच्या वस्तीतच ते दिसू लागले. कांहीं वस्ती स्वर्गमय होत्या, कांहीं सामान्य (पृथ्वी) होत्या व कांहीं नरकमय होत्या. आता त्रेतायुग संपून द्वापार म्हणजे आजचे युग सुरू झाले होते. आयुष्य खूप कमी झाल्यामुळें मेल्यावर पुन्हा जन्म घेणे क्रमप्राप्त होते व जन्म मरणाची सुरूवात झाली. आजार, पिडा, दुःख देणार्या गोष्टी वाढल्या. ते पापाचरणामुळें होत होते कारण पापामुळें माणसाचा अध्यात्मिक स्थर कमी होत होता व त्याच्यामुळे ते होत होते. म्हणून माणसाने असें जीवन ठेवावे कीं, त्याचा अध्यात्मिक स्तर उच्च राहिल व आणखीन उच्च होत जाईल. तरीसुद्धा आधी केलेल्या पापकर्माचे फल त्याला भोगावेच लागते, त्यापासून सुटका नसते जे तुम्ही अनुभवता ते त्यामुळें होत आहे. जरी माणसांने कितीही पुण्यवंत आचरण ठेवले तरी आधीच्या पापाचरणाचे भोग त्याला चुकत नाहीत. माणूस मनाने व शरीराने अशा दोन प्रकारे पुण्य व पाप करत असतो. शरीराच्या कर्माचे फळ त्याला ह्याच जन्मात भोगावे लागते असे साधारणपणे आहे. मनाने केलेल्या कर्माचे (पाप, पुण्य) भोग तो मृत्यूनंतरच्या अवस्थेत व नंतरच्या जन्मात भोगत असतो. तपस्या, व्रतस्थता, सत्वशिलता अशा आचरणामुळें पुण्य वाढते ते माणसाला चांगले भोग असलेले जीवन नंतरच्या जन्मात देत असते. गेल्या जन्मातील पुण्य व पापाचा भोग ह्या जन्मात तो भोगत असतो. माणसाच्या कर्माचा लेखा जोखा ठेवण्याची व्यवस्था असते त्याला लिंगदेह असें म्हणतात. त्यात त्याच्या सगळ्या कर्माची नोंद असते व ती त्याच्या आत्म्याबरोबर असते. माणूस मेला किं, त्याचा आत्मा शरीर सोडतो त्याबरोबर तो सुक्ष्म देहसुद्धा निघतो. तो कांहीवेळा पिशाच्च रुपाने कांहीं पाहू शकतात. त्या लिंगदेहानुसार त्या आत्म्याचे पुढच्या जन्माचे लिंग ठरत असते कारण, आत्म्याला त्याचे स्वताचे लिंग नसते. मृत्यूनंतर तो प्रेतावस्थेत असतो. त्याला देह नसल्यामुळे त्या अवस्थेत त्याचा लिंगदेह त्याच्या गरजा पुरवत असतो. कारण लिंगदेहाला सुक्ष्म ज्ञानेंद्रीये (कान, नाक, डोळे, त्वचा)

असतात. त्यानुसार तो अनुभव देत असतो, पुढे जर त्याच्या वंशजांनी त्याचे श्राद्ध विधी केले तर तो पिशाच्च अवस्थेत जातो व त्या अवस्थेत तो त्याला दुसरा जन्म मिळे पर्यंत रहात असतो. माणसाच्या त्या जन्मात जे पुण्य अथवा पाप केले असेल त्याप्रमाणें, त्याचे पितर अवस्थेतील जीवन सुखी अथवा दुःखी असते. विधात्याच्या पूर्व नियोजनानुसार ते होत असते. त्यात माणूस फरक करू शकत नाही. म्हणून पुण्यमय जीवन जगणे नेहमी श्रेयस्कर समजले जाते त्यामुळें दुःख भोगावे लागत नाही. पापाचा परिणाम दुःख व पुण्याचा परिणाम सुख असे साधारण असते. जे अध्यात्मिक दृष्ट्या असमंजस असतात ते नरकात जातात. आता तुला मी सांगतो अध्यात्मिक दृष्ट्या कसे जागृत रहावे. असे सज्जन नेहमी लक्षात ठेवतात किं, आपल्या वासना फक्त शरीराच्या संवर्धनासाठी असतात. ज्याला योग शास्त्रात योगक्षेम असें म्हणतात. त्यांना मर्यादित ठेवणे ह्याला औदासिन्य प्रवृत्ती म्हणतात. जे त्या अवस्थेत रहातात त्यांना संन्यासी असें म्हणतात. ज्याच्या वासना अशा रितीने मर्यादित असतात तो त्याच्या सहाही दोषांवर मात करू शकतो. अशा जीवनाला व्रतस्थ जीवन असें म्हणतात. म्हणजे वासना मर्यादित ठेवणे हे झाले व्रत, ते पाळणारा म्हणून असा माणूस व्रतस्थ समजला जातो. असा व्रतस्थ माणूस देवांपर्यंत जाऊ शकतो. तसा माणूस मदतीसाठी देवांना व सिद्धांना आळवू शकतो. तो त्याच्या पूर्वजांचे, पितरांचे श्राद्ध करून त्यांची सुद्धा मदत मिळवू शकतो. अशा माणसाला कांहीं विशेष गरजा नसतात कारण योगक्षेमाच्या गरजा सर्व साधारणपणे किमान असतात. त्यांच्या त्या मर्यादाशिल जीवनाला पवित्र जीवन असे समजले जाते. औदासिन्यामुळें त्यांच्या वासना किमान अवस्थेत असल्यामुळे ते सहा दोष त्याच्यात वाढू शकत नाहीत. अशा माणसाचे शरीर शुद्ध रहाते व म्हणून तो निरोगी जीवन जगत असतो. त्याला भीती, सुख व दुःख ह्यांचा त्रास होत नाही. त्याचे मन निर्विकल्प अवस्थेत नेहमी असते. तरी मनाला कांहीं काम असावे लागते म्हणून तो ध्यान, जप, वेदाभ्यास, वेदांगांचा अभ्यास, संशोधन, कला विकास, साहित्य अशा गोष्टीत ते अडकवतो त्याच्यात तो गुरूच्या मार्गदर्शना खाली असावा अशी अपेक्षा असते. जेव्हां गर्भ धारणा होते तेव्हां त्यात त्या शरीराचा जीव स्वाभाविकपणे उत्पन्न होत असतो. साधारणपणे चार आठवड्या नंतर त्यात त्याचा आत्मा त्याच्या लिंगदेहासह प्रवेश करतो. गर्भाचे लिंग व त्या आत्म्याबरोबर

आलेल्या लिंगदेहाचे लिंग ह्यात मिलाफ होऊन अंतिम लिंग त्या गर्भाचे ठरत असते. ते दोनही (आत्मा व लिंगदेह) त्या अर्भकाच्या जन्मनंतर सुद्धा एक वर्ष, सुप्त अवस्थेत असतात. तेव्हांपासून त्या गर्भाची दखल सृष्टीतील शक्ती ज्यांना देवता म्हणतात त्या घेऊ लागतात. त्या उर्जितावस्थेत त्या गर्भावर त्याच्या मातेच्या कर्मभोगांचाच प्रभाव असतो. जी माणसे व्रतस्थ जीवन जगत नाहीत ते मात्र त्यांच्या वासनांच्या आहारी जातात व पापाचरणाला सुरूवात होते. व्रतस्थ जीवनात लोभ व मोह ह्यांच्यापासून विशेष दक्षता बाळगावयाची असते. त्यांच्या दबावाखाली व्रतस्थता रहात नाही व माणूस चुका करू लागतो. कारण त्याचा अहंकार ते करण्यास त्याला भाग पाडतो. आजुबाजूची परिस्थिती, माणसे, त्याचा लोभ व मोह असे सगळे त्याला भ्रष्ट करू शकतात. आपल्या मनात येणारे विचार कसे आहेत, ते तसे कां आहेत अशा प्रकारच्या सावधगिरीने ते नियंत्रित जो करतो त्याला साधक असें म्हणतात. जो यशस्वीपणे ते साध्य करतो त्याला त्याचा भरपूर फायदा त्याच्या मृत्यूनंतरच्या अवस्थेत (पितर अवस्था, मृत्यूनंतरच्या कांहीं वर्षात ते पिशाच्च अवस्थेत व त्यानंतर पितरावस्था प्राप्त होते) आणि नंतरच्या जन्मात होत असतो, त्याच्या ह्या जन्मात तो होत नाही कारण, ह्या जन्माचे सगळे गेल्या जन्मात निश्चित झालेले असते. एवढे सांगितल्यावर मार्कंडेय ऋषी त्यांना सांगतात, "तुम्ही मात्र ह्या जगात सामान्य माणसासारखे आलेले नाहीत. तुमचे सगळे भोग इसिसने ठरवल्यानुसार आहेत. मानव जन्मानुसार ते तुम्हाला भोगावे लागणार आहेत, कांहीं विशिष्ठ कार्य तुम्हाला नेमून दिले आहे व ते करण्यासाठी तुम्ही पृथ्वीवर आला अहात. हे तुमच्या लक्षात आले असेल कारण ज्या प्रकारे तुम्ही सदेह स्वर्गाच्या द्वारापर्यंत जाऊन आलात व जसा तुमचा बंधू अर्जुन इंद्राकडे पांच वर्षे सदेह रहात होता, ज्या प्रकारे वैश्रावणाने त्याच्या राक्षसांना भिमाने मारले तरी तुम्हाला वागवले त्यावरून तुम्ही सामान्य माणसे नाहीत हे तुमच्या लक्षात आले असेल. मी आता जे विवेचन केले ते सामान्य माणसाबद्दलचे होते. म्हणून तुम्हाला जे सोसावे वागत आहे त्याचा फार विचार करण्याची आवश्यकता नाही". ते सगळे तापदायक अनुभव अंती, तुम्हाला चिरसुखाकडे नेणार आहेत.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा एकोणतिसावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व
## भाग तिसावा

वैशंपायन पुढे सांगतात, पंडुची मुलं त्या श्रेष्ठ मुनीस विचारतात, अहो ब्राह्मण, आम्हाला सांगा ब्राह्मणांचे श्रेष्ठत्व कशात असते. तसेंच जर सगळे आधीच ठरले आहे तर मग माणसें देवांची, पितरांची व प्रसंगी पिशाच्च्यांची आराधना कां करतात? त्यात कांहीं तथ्य आहे कां"? ते सगळे समजून घेण्यासाठी आम्ही फार उत्सूक आहोत. व्रतस्थ संन्यासी जीवन व्यतीत करणारे ते तेजस्वी ऋषी त्यांना सांगू लागतात एक कथा,

फार प्राचीन काळी, हैहय वंशाचा एक धष्टपुष्ट राजपुत्र होता. त्यांने त्याच्याशी वैर करणार्या लोकांची नगरं जिंकली होती. तो एकदा शिकारीला निघाला. तो मोठाली झाडे असलेल्या वनात शिकार धुंडण्यासाठी भटकत होता. त्याला एक हरणाचे राखाडी रंगाचे कातडे परिधान केलेला मुनी दिसतो. त्याला वाटते कीं ते हरण आहे व त्याच्यावर नेम धरून तो बाण मारतो. त्यामुळें तो मुनी मृत्यू पावतो. जवळ गेल्यावर त्याला काय झाले ते समजते, त्याला फार दुःख होते. त्याला पश्चात्ताप होतो व त्यामुळें त्याला लकवा मारतो. त्या अवस्थेत तो त्याच्या पेक्षा उच्च अशा त्याच्याच जातीच्या म्होरक्याकडे जाऊन ते सांगतो. ते ऐकल्यावर आणि त्या मृत मुनीचे कलेवर पाहून तो राजा त्याला म्हणतो, अरे हा मुनी केवळ फळं व कंदमुळांवर राहिलेला साधू आहे, त्याचे नातलग कोण तो कोणाचा पुत्र वगैरे माहीती मिळवली पाहिजे. त्याप्रमाणे ते चौफेर चौकशी करू लागतात. त्या दरम्यान ते ऋषी अरिष्टनेमीच्या आश्रमात येतात जो काश्यपाचा मुलगा होता. तेथे आल्यावर नम्रपणे ते त्या श्रेष्ठ मुनीला हात जोडून अभिवादन करतात. अरिष्टनेमी त्यांच्या साधनेत व्यस्थ होते. नंतर ते पाहुण्यांचे स्वागत करतात व विचारतात, कशासाठी येणे केले? तो हैहय राजा खाली मान घालून त्यांना बोलतो किं त्यांचे स्वागत करावे असें ते योग्य नाहीत कारण, त्यांच्या हातून चुकून त्यांच्या मुलाची हत्या झाली आहे. ते ऐकून अरिष्टनेमी त्यांना विचारतात, "अहो, ब्राह्मणाची हत्या तुम्ही केली? ते कसे शक्य आहे. तो आता कोठे आहे? अरिष्टनेमी बोलतात, "तुम्ही आम्हा ब्राह्मणांची सिद्धी पाहिलेली नाही". ते ऐकल्यावर राजपुत्र तो देह जेथे ठेवला होता तेथे जातो व पहातो किं, तेथे तो नाही.

त्याला आश्चर्य वाटते. पुष्कळ शोध घेऊनही त्यांना तो देह सांपडत नाही. ते परत येतात. ते शरमिंदे झालेले असतात. त्यांना समजत नाही असें कसे झाले. ते अचंबा करत असतात. ते त्या स्थितीत असतांना कोणी त्यांना हाक मारतो, "अहो शत्रूघ्न राजे, कोणाला शोधता अहात? मला शोधत अहात वाटते"? ते वळून पहातात तो त्यांनी ज्याला बाण मारला तो मुनी तेथे जीवंत त्यांच्या समोर उभा असतो, तो बोलतो, "तुम्ही चुकीने मला बाण मारला होता. मी अरिष्टनेमींचा पुत्र तर्ख्य आहे. अहो तुम्ही खर्या ब्राह्मणांला मारु शकत नाही. खरा ब्राह्मण जेव्हां त्याला मरायचे असते तेव्हांच मरतो. त्याला कोणी मारु शकत नाही". ते राजे व त्यांचा राजपुत्र त्याचे पाय धरतात. तो त्याना प्रेमांने उठवतो. अरिष्टनेमी त्या राजाला सांगतो, आम्ही ब्राह्मण सिद्धीच्या सामर्थ्याने जगत असतो. हा पहा माझा मुलगा ज्याला तुम्ही बाण मारला होता अनवधानाने. तो चांगलाच जीवंत आहे. ते आश्चर्य पाहून तो राजा व त्याचा राजपुत्र चकित होतात. ते विचारतात, "आम्ही त्याला पाहिले होते तेव्हां तो खात्रीने मेलेलाच होता मग असा कसा पुन्हा जीवंत झाला? आम्हाला ते समजून घ्यावयाचे आहे". तो ऋषी राजाला सांगतो, "हे अध्यात्मिक साधनेने साध्य होते. शरीराच्या वासनांत न गुतता रहाण्याला अध्यात्मिक जीवन साधना म्हणतात. ती सतत केल्याने तो मनुष्य वासनाविरहीत होतो तसे झाले किं, त्याला आत्म्यात सुप्त असलेल्या सिद्धा उपलब्ध होतात. ते अभ्यास व वैराग्य ह्यांनी साध्य होते. अभ्यास व वैराग्य ही ब्राह्मणाची जीवन पद्धती असावी लागते. जे ब्राह्मण त्या व्रतात रहातात ते असे अचंबा करावयाला लावणारे कृत्य सहजपणे करू शकतात. आत्मा अमर असल्याने वास्तविकतः आपण सगळे अमर असावयास पाहिजे पण आपल्यातील वासनांत रमण्याच्या दोषामुळें ते अमरत्व आपण हरवतो. आपण ते कसे साध्य करता ते ऐकण्यास आम्ही उत्सूक आहोत, ते क्षत्रिय राजे अरिष्टनेमीला सांगतात.

ते ऐकल्यावर अरिष्टनेमी त्याना सांगतो, मृत्यूचे आमच्यावर अधिकार नसतात. त्याचे कारण पुनः तुम्हाला सांगतो, आम्ही सगळ्यांशी प्रेमाने वागतो. त्यांचे आदर सत्कार करतो, त्यामुळे सृष्टीतील दैवी शक्ती ज्या मृत्यूचे काम पहातात त्या संतुष्ट असतात. आमचे स्वताचे जीवन पवित्र ठेवतो. त्यांना दिल्यानंतर राहिलेले आम्ही घेतो. आम्ही व्रतस्थ रहातो, पवित्र तीर्थक्षेत्रांना जातो, सत्पात्र दानं करतो, सत्पात्र सेवा करतो अशा गोष्टी करत

असल्यामुळें आमचे अध्यात्मिक श्रेष्ठत्व सिद्ध होते. म्हणून मृत्यू तेव्हांच आमच्याकडे येतो जेव्हां आम्हाला तो हवा असतो. मी तुम्हाला जेवढे समजण्यासारखे आहे तेवढे सांगितले आता तुम्ही खुशाल तुमच्या घरी जा, तुम्हाला कोणतेही पाप लागलेले नाही कारण, तुम्ही कोणालाही ठार मारलेले नाही. त्यानंतर त्यांना अरिष्टनेमीने आशिर्वाद दिले. ते त्यानंतर निश्चिंत मनाने त्याच्या ठिकाणी निघून गेले.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा तिसावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व
## भाग एकतिसावा

पुढे मार्कंडेय ऋषी विचारतात, "तुम्हाला आणखीन ब्राह्मणाच्या सामर्थ्याचे ऐकावयाचे आहे कां? सांगतो आणखीन एक कथा, एक राजर्षी ज्याचे नांव होते वैन्य एक अश्वयज्ञ करण्याचे ठरवतात. त्यावेळी अत्री ऋषी त्याच्याकडे दान घेण्यासाठी गेले. परंतु, अत्रींनी त्यानंतर दान घेण्याचा विचार सोडून दिला व ते त्यांच्या कुटूंबासह अरण्यात तपस्या करण्यासाठी गेले. ते त्यांच्या परिवारास बोलले, "आपण तपस्या करून आपल्या वासनांचे पूर्ण निर्मुलन करण्याचा प्रयास केला पाहिजे. जर तुम्हाला ते मान्य असेल तर आपण एकत्रपणे अरण्यात जाऊन तपस्या करावी असें मी म्हणतो". त्याची पत्नी त्याला चांगल्या उद्देशाने सांगते, त्यापेक्षा वैन्य कडे जाऊन भरपूर धन आणा. ते यज्ञात गुंतले आहेत त्या निमित्ताने ते तुमची मागणी पूर्ण करतील". पत्नीच्या म्हणण्या प्रमाणे अत्री वैन्या कडे जातात. तेथे त्यांना भरपूर धन दान मिळण्याची सोय होते. वैन्य त्याला सांगतो, "ते धन तू तुझ्या मुलांना देऊन तुला जे पाहिजे ते करावेस. तसे करणे हा एक उत्तम गुण असतो ज्यांना धर्माचे पालन करावयाचे आहे".

ते ऐकून अत्री म्हणाले, "मला गौतम ऋषी सांगत होते, वैन्य एक पवित्र राजा आहे. त्याची सत्याशी असलेली बांधिलकी श्रेष्ठ आहे. परंतु, तेथे कांहीं ब्राह्मण आहेत जे माझा द्वेष करत असतात. मला गौतमानी तसे सांगितले आहे म्हणून मी वैन्याकडे जाऊ इच्छित नाही. मी जर त्यांना पुण्य कमावण्याबद्दल कांहीं सांगितले तर ते माझ्याशी हुज्जत घालून माझा समय व्यर्थ घालवतील. तरीसुद्धा मी वैन्य राजाकडे जाऊन त्याचा सल्ला मात्र घेऊ इच्छितो. वैन्य राजा तरीसुद्धा मला दान करणार (मी न मांगता)".

मार्कंडेय पुढे सांगतात, अत्रीनी तसे ठरवून वैन्य राजाकडे जाण्याचे ठरवले. तेथे यज्ञमंडपात जाऊन तो त्या राजाची स्तुती नेहमी प्रमाणे करतो. त्याला आशिर्वाद देतो, "तू सार्वभौम राजा आहेस", असे व इतर खूप त्याची प्रशंसा करणारे भाषण करतो. "तुला सगळे मुनी मानतात व तुझ्यासारखा दुसरा राजा ह्या पृथ्वीतलावर नसेल जो इतका धर्मिष्ठ आहे", वगैरे. ते ऐकल्यावर ऋषी गौतम अत्रीला रागावून बोलले, "पुन्हा असें वाह्यात बोलू

नकोस. तुझे डोके फिरले आहे कां"? तुला माहीत आहे महेंद्र हा सगळ्या राजांत श्रेष्ठ असतो". ते ऐकल्यावर अत्री त्याला उत्तर देतो किं, "जसे इंद्र सगळ्यांचे भाग्य नियंत्रित करतो त्याप्रमाणें माणसांचा राजासुद्धा त्याच्या प्रजेच्या भाग्याचा कर्ता असतो". गौतम त्याला बोलतात, "तू तुझी अक्कल वापरावयाचे बंद केले आहेस असें दिसते कदाचित तुझे अध्यात्मिक पतन झाले असावे. म्हणून तू असें गैर बोलत आहेस".

अत्री त्याला उत्तर देतो, "मी चूक करत नाही, उलट तू गैरसमजाचा बळी आहेस". त्यावर गौतम त्याला बोलतो, "जास्त दान मिळावे म्हणून तू वैन्याची फाजिल स्तुती करत आहेस. तुला माहीत नाही असे दिसते, पुण्य कशात आहे. किंवा तुला त्याची गरज राहिलेली नाही असें वाटते. मला आता वाटते तू इतकी वर्षे फुकट घालवली आहेस. तुझे पुण्याबद्दलचे ज्ञान लहान मुलासारखे आहे".

मार्कंडेय सांगत असतात पुढे काय झाले, अशारितीने ते दोघे इतर मुनींच्या समक्ष वाद करत होते, जे वैन्याच्या यज्ञासाठी आमंत्रित होते. त्या मुनींपैकी एक विचारतो हे दोघे एकमेकांशी एवढ्या जोरांनी कां भांडत आहेत? यज्ञाच्या प्रसंगी अशारितीने दोन ब्राह्मणांनी भांडणे योग्य नाही असें समजून काश्यप ऋषी ज्यांच्या ज्ञानाबद्दल कोणी शंका घेऊ नये ते पुढे झाले व विचारतात, "कशासाठी भांडत अहात, एकमेकाची अक्कल काढता, असें काय बिघडले आहे"?

गौतम काश्यपांना सांगतात, जे सगळे जमलेले मुनी ऐकत होते, "ऐका ब्रह्मर्षी, आमच्या मतभेदाचे कारण, अत्री समजतो, वैन्य हा लोकांच्या भाग्याचा कर्ता आहे. त्या मुद्यावर वाद आहे. मी समजतो इंद्र लोकांच्या भाग्याचा धनी आहे असा वाद आहे".

मार्कंडेय पुढे सांगतात, ते ऐकल्यावर काश्यप त्वरित सनतकुमारांच्या जवळ जातात ज्यांचा अधिकार अशा विषयात श्रेष्ठ समजला गेला आहे. सनतकुमार त्या वादातील मुद्दे समजून घेतात. सर्व बाजू समजल्यावर सनतकुमार बोलतात, "ज्याप्रमाणे वार्याच्या मदतीने अग्नी सगळे भस्म करू शकतो, त्याच प्रमाणे राजा (अग्नी) ब्राह्मणाच्या (वारा) (येथे ब्राह्मण हा शब्द ज्ञान ह्या अर्थी घ्यावयाचा आहे) मदतीने शत्रूचा विनाश करत असतो. सार्वभौम राजा हा व्यवस्था देणारा असतो. ज्या व्यवस्थेत न्याय (ब्राह्मण) प्रमुख भूमिका बजावत असतो. जसे इंद्र संरक्षक असतांना शुक्र न्याय देतो व बृहस्पती माणसाचे भाग्य

ठरवत असतो. त्यासाठी यज्ञात संरक्षक, राजा, सम्राट अशा संज्ञा कोणा एकाला लावणे उचीत नाही. त्या संज्ञा वापरून स्तुती करणे अप्रस्तुत आहे. माणसात राजा त्या सगळ्या भूमिका बजावत असतो. म्हणून त्याला त्या सगळ्यांचा प्रतिनिधी समजून त्याची प्रशंसा केली जाते. ऋषी त्यांच्या व्रतस्थ, सन्यस्थ, सत्त्वशिल जीवनात गुंतलेले असल्यामुळें ते यथायोग्य क्षत्रियाला ती जबाबदारी देतात. क्षत्रिय त्या जबाबदार्या पार पाडत असतांना अनेक पापकृत्य जाणता अजाणता करत असतात. आपल्या प्रजेची पाप करण्याची प्रवृत्ती नष्ट करणे, जसे सूर्य अंधार नष्ट करतो, हे सच्च्या राजाचे काम असते. राजा जी अपकृत्ये राजकारभाराच्या निमित्ताने एक आपद्धर्म म्हणून करतो त्याचे त्या राजाचे ऋषी (ब्राह्मण) सांभळून घेत निवारण करत असतात. म्हणून राजाला इंद्राची तुलना करतात. जसें इंद्र स्वर्गात तसें राजा माणसात पृथ्वीवर अशी कल्पना असते. कांहीं वेळा राजाची तुलना साक्षात विष्णूशी होत असते जेव्हा चांगल्या राजाची भाट स्तुती करतात". *ब्राह्मण हा शब्द ह्या ठिकाणी विविध अर्थाने वापरलेला आहे.*

मार्कंडेय सांगतात, ते विवरण ऐकल्यावर तो प्रसन्न झालेला राजा वैनी अत्रीला बोलावतो, कारण अत्रीनी त्याची स्तुती केली होती, "अहो ऋषी आपण माझी इंद्राशी तुलना केली म्हणून मी आपल्यावर प्रसन्न होऊन आपल्याला अमाप धन दान करत आहे. आपण माझ्यासाठी सर्वज्ञ अहात. म्हणून मी तुम्हाला दहालक्ष सोन्याची नाणी व दहा भार सोने दान करत आहे. अत्री विरक्त प्रवृत्तीचा असूनही राजाने दिलेले दान रीतसरपणे घेतो व घरी जातो. ती संपत्ती तो त्याच्या मुलाच्या व पत्नीच्या हवाली करतो व स्वतः उच्च प्रतिच्या तपस्येसाठी अरण्यात निघून जातो.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा एकतिसावा भाग संपला.

## मार्कंडेय समस्या पर्व
## भाग बत्तिसावा

मार्कंडेय पुढे सांगतात, अरे राजा युधिष्ठीरा, सरस्वती नदीच्या बाबत असेंच झाले होते. तिला त्या अरिष्टनेमीच्या मुलांने प्रश्न विचारला तेव्हां, तो विचारतो, "अहो देवी सरस्वती, मला सांगा, पुरुषाने अशी कोणती गोष्ट केली पाहिजे ज्यामुळें पुण्यप्रभाव वाढेल व त्याचा उद्धार होईल"? तू जे सांगशिल तसें मी करणार आहे. म्हणजे माझा उद्धार होईल. मला सांग, होमात अर्घ्य केव्हां व कसे अर्पण करावयाचे असते. म्हणजे पुण्याचा र्हास होणार नाही. मी तसेंच करीन म्हणजे माझ्या वासना, इच्छा मर्यादेत रहातील. [होमात अर्घ्य देतांना "माझ्या सगळ्या उर्वरित वासनांचा होम होवो", अशी प्रार्थना करावयाची असते] तो प्रश्न ऐकल्यावर नदी सरस्वती देवी त्याला सांगते, अरे तर्ख्या, तुझे आजवरचे सगळे आयुष्य वेदांचा व वेदांगांचा अभ्यास करण्यात गेले आहे, पावित्र्य आणि संयमीत दृष्टी ह्यांच्यातून तू विधात्याला पहाण्याचा प्रयत्न करणारा आहेस. तू स्वर्गात जातोस आणि देवांत मिसळतोस, तेथे अनेक पवित्र तलाव आहेत. त्यात विविध मांसे, जलफुलं, कमळ, असतात. ती सगळी एकाद्या मंदिरासारखी असतात. त्यांच्या निव्वळ दर्शनाने सगळी दुःख संपुष्टात येतात. त्यांची पुजा पवित्र लोक आणि प्रतिष्ठीत अप्सरा करतात, त्या समाधानाने त्यांच्या तटावर रहातात. जो ब्राह्मणाला गाईचे दान करतो तो उच्च स्थानी जातो. बैल दान केला तर तो दान करणारा सूर्याच्या भागात जातो आणि ब्राह्मणाला वस्त्राचे दान करणारा चंद्राच्या भागात जातो. ब्राह्मणाला सोने दान करणारा अमरत्व प्राप्त करतो. जो दुभती गाय व तिचे वासरू दान करतो तो चिरकाळ जगतो व सगळी सुख त्याला प्राप्त होतात. एक तरुण बैल जो शेतात काम करू शकतो व ओझी वाहू शकतो दान केला तर दहा सामान्य गाई देण्यासारखे फळ मिळते, जो कपिला दान करतो व त्या बरोबर पैसे दान करतो त्याच्या सगळ्या कामना पूर्ण होतात. गोदानाचे लाभ अमाप असतात. त्याच्या सात पिढ्यांचा उद्धार होतो. तीळाची गाय बनवून तिला सोन्याची शिंग लावून ते ब्राह्मणाला दान केले तर तो मृत्यूनंतर वसुंच्या बरोबरीला पोहोचतो. माणूस त्याच्या कृष्ण कृत्यांमुळें नरकाच्या अंधःकारमय जगात जात असतो. जो त्याच्या वासना योगक्षेमाच्या मर्यादेत ठेवू

शकत नाही तो त्याच्या मृत्यू नंतर समुद्रात गटांगळ्या खाणार्या बकरीसारखा लोंबकळत रहातो. परंतु, वेळोवेळी ब्राह्मणाला गाईचे दान करत असेल तर मात्र तो त्या भोगापासून मुक्त होतो. जो ब्राह्मणाला ब्रह्म पद्धतीने त्याची कन्या दान करतो त्याशिवाय भूदान करतो, त्याशिवाय इतर भेटवस्तु देतो तो पुरंदराच्या भागात (इंद्र लोक) मृत्यूनंतर जातो. अरे तर्ख्या, जो होमात पवित्र आहुती नियमितपणे देतो तो त्याच्या आधीच्या व नंतरच्या सात पिढ्यांचा उद्धार करत असतो.

ते ऐकल्यावर तर्ख्य बोलतो, "अहो सौंदर्यवती सरस्वती देवी, पवित्र अग्नी कधीच विझणार नाही अशाप्रकारे कसा सांभाळावा त्याचे नियम मला सांगा. त्याबद्दल वेदात काय दिले आहे ते सांगा. आता मी आपल्या कडून ते सर्वमान्य नियम समजून घेऊ इच्छितो.

*{येथे जे विविध भाग सांगितले आहेत, जसे सूर्याचा, वसुंचा, इंद्राचा, चंद्राचा वगैरे ते स्वर्गातील विविध प्रदेश आहेत, म्हणजे ती दानं केल्याने दानकर्ता त्या भागात त्याच्या मृत्यूनंतर जातो असें आहे.}*

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा बत्तिसावा भाग संपला.

## मार्कंडेय समस्या पर्व

## भाग तेहतिसावा

ते ऐकल्यावर युधिष्ठीर मार्कंडेयांना नम्रपणे विचारतो, "आपल्याला वैवस्वात मनुची काय माहिती आहे, ती आम्हाला ऐकावयाची आहे.

मार्कंडेय त्याला उत्तर देतात, ऐक मी ती सांगतो, फार पूर्वी एक महान ऋषी होऊन गेले. त्यांचे नांव होते मनु. तो वैवस्वातचा मुलगा होता व तो ब्राह्मासारखा तेजस्वी होता. त्याच्या तपोसामर्थाने तो त्याच्या आजोबा व पित्यापेक्षा जास्त प्रबळ झालेला होता. बोराच्या त्या ख्यातनाम विशाल वृक्षाच्या जवळ वहाणार्या चिरीनी नदीच्या तटावर तो एका पायावर उभा राहून आणि दोनही हात वर करून तपस्या करत असें. तसा तो दहा हजार वर्षे तपस्या (ध्यान) करत होता. त्याचे कपडे भिजलेले आणि केसाच्या जटा झालेल्या असा तो ध्यान करत असतांना एकदा त्या चिरीनी नदीत रहाणार्या एका माशाने त्याला विचारले, "अहो ध्यान करणारे, मी एक असहाय मांसा आहे, मी आकाराने खूप लहान आहे व मला मोठ्या माशांची भिती वाटते, म्हणून तुम्ही मला त्यांपासून संरक्षण द्याल कां"? मी असें विचारतो कारण वेदांत सांगितले आहे किं निरपराध कमजोरांचे बलवंताने संरक्षण करावयाचे असते, तो ठरलेला नियम आहे. आमच्या माशांत असा नियम आहे किं मोठा मासा लहान माशाला  खातो, त्या रिवाजा नुसार ते मला खाऊ शकतात. तुम्ही माझ्यावर ह्यावेळी कृपा केली तर मी त्याची परतफेड भविष्यात करीन. त्या छोट्या माशाची ती विनंती ऐकून वैवस्वात मनुला त्याची दया आली. तो त्या छोट्या माशाला स्वताच्या हातांनी पाण्यातून काढतो व एका मातीच्या मडक्यात पाणी भरून त्यात त्या माशाला सोडतो. तो मासा पाण्यातून बाहेर काढल्यावर चांदीसारखा चमकत होता. विवस्वात मनु त्या छोट्या माशाची देखभाल करत असें. तो मासा जसा मोठा झाला त्याला मनु मोठ्या मडक्यात सोडत असें अशारितीने तो मासा खूप मोठा झाला तेव्हां तो मासा मनुला बोलतो, "आपण पुज्य अहात, मला आता गंगानदीत सोडावे". त्या प्रमाणे मनु त्या माशाला गंगा नदीत नेऊन सोडतो. त्यावेळी तो मोठा झालेला मासा मनुला बोलतो, "अहो पुण्यवंत, तपस्वी, आपण मला सागराच्या पत्नी, गंगा मध्ये सोडले आहे. तेथे मी

सुखाने रहाणार आहे. माझ्यावर आपले उपकार आहेत म्हणून जेव्हां तुम्ही मला बोलवाल तेव्हां मी तुमच्यासाठी उपस्थित होईन. त्या सागरात तो मासा आणखीन मोठा झाला. त्या माशाचा गंध व स्पर्श आनंद देणारा होता. सागरात गेल्यानंतर तो मासा मनुला बोलतो, आपण मला वाढवले आहे म्हणून मी जे सांगतो ते नीटपणे ऐका. "ह्या चराचर सृष्टीचा अंत जवळ आला आहे. सगळे चराचर सागराच्या पाण्यात बुडणार आहेत. म्हणून आपण जे सर्वांचे त्राता अहात ह्यासाठी एक गोष्ट करा, आपण एक भलीमोठी व मजबूत होडी तयार करावी. त्यात सगळी व्यवस्था अशी असावी कीं, त्यात अनेक प्रजातींची युगुलं राहू शकतील. त्यात सगळी चराचर त्यांच्या बिजांसह जमा करून ठेवा. त्या कामात सात ऋषी तुम्हाला मदत करतील. तेवढी तयारी केल्यावर माझी वाट पहात रहा. जसा सागर वाढत जाईल व सगळी भूमि पाण्याखाली जाईल मी तेथे येईन मला ती होडी बांधा. माझ्या मदती शिवाय तुम्ही हे चराचर सृष्टी वाचवू शकणार नाही. आता मी तुमची रजा घेतो".

मनु त्याला बोलतो, "माझा तुझ्या सांगण्यावर विश्वास आहे. मी तू सांगतोस तसे सगळे करून त्या होडीत ते सगळे चराचर (पशु आणि वनस्पती) साठवून ठेवीन". त्यानंतर तो मासा सागरात निघून जातो. वैवस्वात मनु त्याप्रमाणे सगळे करतो. त्या भल्यामोठ्या जहाजात तो सगळे प्राणी, वनस्पती, अनेक प्रकारच्या बी बियाणी साठवून ठेवतो. सगळी तयारी झाल्यावर वैवस्वात मनु त्या माशाचे स्मरण करतो व त्या बरोबर तो मासा त्याच्या कडे सागरातून पोहत येऊन पोहोचतो. तो प्रचंड मासा एकाद्या डोंगरासारखा त्या उसळलेल्या सागरात त्याला येतांना दिसतो. त्या माशाच्या माथ्यावर एक मोठा सुळा दिसत होता. वैवस्वात मनुने त्याचे प्राण्याने भरलेले जहाज त्या सुळ्याला दोरखंडाने मजबूत बांधले. ते मासा ते जहाज त्या तुफान सागरात घेऊन जातो. त्यात मनुसुद्धा बसलेला असतो. त्या वेळी आकाशांत ढगामुळें अंधार होता व सागरात दिशांचा अंदाज करता येत नव्हता. ते जहाज एकाद्या मद्यपी सारखे सागरात हेलकावे खात तरंगत होते. सर्वदूर फक्त पाणीच पाणी दिसत होते. सगळी भूमि पाण्याने गडप केली होती. जेव्हां अशाप्रकारे जग पाण्यात बुडले होते तेव्हां फक्त ते जहाज व त्यात बसलेले प्राणी आणि मनु व त्याचे मदतनीस सात ऋषी तेवढे दिसत होते. त्या अवस्थेत तो मासा त्या जहाजाला अनेक वर्षे तशा पाण्यात घेऊन पोहत होता. अखेरीस तो सागराला आलेला पूर

ओसरण्याची लक्षणें दिसू लागली. त्यावेळी प्रथम हिमालयाची शिखरं दिसू लागली. तेव्हां तो मासा मनुला सांगतो किं, त्याने त्या जहाजाचे दोरखंड त्या शिखरावरील खडकाला बांधावेत. ज्या शिखराला ती बोट बांधली होती त्या शिखराचे नांव आज आहे, नावबंधन. ह्या शब्दाचा दुसरा अर्थ आहे बंदर. ते जहाज बांधल्यावर तो प्रचंड मासा मनुला सांगतो, मी साक्षात ब्रह्म आहे. ह्या सृष्टीचा निर्माता. माझ्यापेक्षा श्रेष्ठ कांहीं नाही. मी तुम्हाला ह्या प्रलयापासून वाचवले आहे. मनु तू आता ह्यापुढे सगळे जाती प्रजाती उत्पन्न करणार आहेस, त्यात देव, असुर, माणसे, सगळे लहान मोठे जीव आणि विविध वनस्पती असतील. सगळे चराचर तू उत्पन्न करणार आहेस. प्रखर तपस्या करून तू त्यासाठी जरुरी असलेली उर्जा मिळवशिल. माझ्या प्रेरणेने त्याला कोणताही भ्रम त्रास देऊ शकणार नाही. असे सांगून तो भलामोठा मासा अदृष्य झाला. त्यानंतर विवस्वात मनुलासुद्धा पुनः चराचर सृष्टी उत्पन्न करण्याची इच्छा झाली. परंतु, त्यात त्याला माया त्रास देऊ लागली. त्यावर मात करण्यासाठी तो प्रखर तप करू लागतो. अशारितीने सांप्रतचे जग सुरू झाले. ही कथा जी मी तुला सांगितली ती जे ऐकतात त्यांचे सगळे पाप धुतले जाते. त्याला सुखी जीवनाचा अनुभव येतो.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा तेहतिसावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्वाचा

## भाग चौतिसावा

ती कथा ऐकल्यावर गुणी राजा युधिष्ठीर नम्रपणे मार्कंडेय ऋषीना विचारतो, "अहो ज्ञानी, आपण हजारो वर्षे जगून अनेक युग पाहिली आहेत. आपल्या इतका जगलेला दुसरा कोणी नाही. त्या काळात आपण विधात्याचे ज्ञान संपादन केले आहे. आपल्या इतके आयुष्य केवळ ब्रह्मदेव जगले आहेत. जेव्हां ह्या सृष्टीचा नाश होत होता तेव्हां आपण ब्रह्माच्या ध्यानात मग्न रहात होता. तेव्हां तेथे आकाश नव्हते, देव नव्हते, असुर नव्हते, त्या वेळी प्रलय आटोपल्यावर ब्रह्मदेव पुनः जागृत झाले. ते सगळे केवळ आपणच पहात होता. ही सृष्टी कशी पुन्हा उत्पन्न झाली व वाढली ते सगळे आपण पहात होता. अहो अवतारी महोदय. ब्रह्माने यथावकाश चार प्रकारचे चराचर (पशु, पक्षी, जलचर आणि वनस्पती) उत्पन्न केले, दहा दिशा ठरवल्या, त्यात हवा, पाणी, जमीन तयार केली, त्यांच्या प्रमाणात. आपण ब्रह्मात विलीन असल्यासारखेच त्याच्या ध्यानात मग्न होता. अहो ब्राह्मणा, आपण आपल्या डोळ्याने त्या सगळ्या गोष्टी घडत असतांना पहात होता. आपण एकुलते एक त्या सगळ्या गोष्टींचे साक्षीदार अहात. ते पहात असतांना आपण व्रतस्थ राहून तप करत होता. आपण प्रजापतिच्याही पेक्षा मोठे अहात. आपल्याला नारायणाचे सगळ्यात जवळचे असें मानले जाते. जो ह्या जगातून पलिकडल्या जगात असा प्रवास करत असतो. आपल्या अध्यात्मिक दृष्टीने आपण त्या नारायणाला ते सगळे करत असतांना पहात होता, कारण, त्याच वेळी तुम्ही तुमच्या ध्यानात मग्न होता. असा तुमच्या योग्यतेमुळें आपल्याला मृत्यू स्पर्श करत नाही. सूर्य, चंद्र, अग्नी, हवा, जमीन किंवा आकाश उरले नव्हते जेव्हां हे जग लयाला गेले. फक्त एक महासागर असल्यासारखे दिसत होते. जेव्हां सगळे देव, असुर आणि उरग भस्मसात होत होते. ते होत असतांना ब्रह्म त्याच्या अगणित पाकळ्या असलेल्या दैवी कमळात ध्यानस्थ बसले होते आणि आपण एकटेच त्यांची पुजा करत होता. आपण हे सगळे अद्भूत पहात होता ह्याचे मला आश्चर्य वाटते. आपल्या ज्ञानचक्षूंनी ते आपण पहात होता. त्या कारणांने असें कांहीं नाही ह्या सृष्टीत, जे आपण जाणत नाही. म्हणून मी तुमच्या कडून सृष्टीच्या बर्याच गोष्टी समजून घेऊ इच्छितो".

ते ऐकल्यावर मार्कंडेय ऋषी बोलले, "तुझे म्हणणे रास्त आहे. मी हे सगळे सांगण्याचा प्रयास करीन. परंतु, त्या आधी सर्व प्रथम आपण त्या स्वयंभू कालातीत अतिप्राचीन अस्तित्वाला वंदन करु", पुढे तो ऋषी सांगतो त्या कालातीत अस्तित्वाचे (स्वयंभूचे) वर्णन, "जे एक असले तरी त्यातून अनेक रुपांचा सतत आविष्कार होत असतो. ज्याचे अस्तित्व नश्वर आहे आणि ज्याच्या बद्दल कल्पनासुद्धा करणे असंभव आहे. ज्याचे गुण विविध असले तरी त्याला प्रत्यक्षात कांहींच गुण नसतात म्हणजे ते निर्गुणी असूनही सर्वगुणीसुद्धा त्याच वेळी असते. ज्याच्या मध्ये उत्तम व नीच असे दोनही गुण एकाच वेळी व्यक्त होत असतात. म्हणजे ते एक असले तरी त्याचे अवतार असंख्य असतात. माणसाला तो पिवळ्या वस्त्रात व्यक्त होतो. तोंच सगळे घडवत व बदलत असतो. तो सर्वकडे विविध रुपांने असतो व नसतो सुद्धा. त्याच्या अशा प्रवृत्तींमुळें त्याला समजणे अशक्यप्राय असते. त्याला समजण्यासाठी त्याच्या सारखे व्हावे लागते. तो एका दृष्टीने पूर्ण असला तरी दुसर्या दृष्टाने अपूर्ण सुद्धा असतो. ते पहाणार्याच्या दृष्टीत असते. त्याला प्रारंभ नसतो व अंतसुद्धा नसतो. ते कधी सुरू झाले ते काळाच्या परिमाणाने समजण्यासारखे नसते. ते सर्व व्यापी असले तरी कोठेच आढळत नाही असें विलक्षण असते. त्यातून सगळे उत्पन्न झाले परंतु, तो कधीच उत्पन्न झालेला नसतो. तो ह्या विश्वाचे कारण आहे. सगळ्या देवांना, असुरांना, माणसांना, इतर प्राण्यांना, सगळ्या वनस्पती समजता येतील परंतु, ह्याला समजणे दुरापास्त असते. सगळे ह्यातून उत्पन्न झाले आहे व अखेरीस ह्याच्यातच विलीन होणार असते. अशा विश्वाचे कांही काळानंतर विलयन होते त्या मध्ये व जेव्हां त्याला पुन्हा इच्छा (काम) होईल तेव्हां पुन्हा त्याच्यातून दुसरे विश्व उत्पन्न होईल अशी रचना आहे आणि अरे युधिष्ठीरा, हे असें अव्याहतपणे अनादि अनंत पणे चालू आहे".

पुढे मार्कंडेय ऋषी सांगतात, "असें सांगतात, कृतयुग चार हजार वर्षे कार्यरत असते. त्याची सकाळ (प्रारंभ) आणि संध्या (शेवट) प्रत्येकी चारशे वर्षे चालते. म्हणजे एकंदर काळ चार हजार आठशे वर्षे होतो. त्रेतायुग त्यानंतर अनुभवास येते, त्याचा काळ तीन हजार वर्षाचा असतो. त्याचा प्रारंभ आणि शेवट प्रत्येकी तीनशे वर्षे चालतो, म्हणजे एकंदर काळ तीन हजार सहाशे वर्षे होतो. त्यानंतर येते द्वापार युग. त्याचा काळ दोन हजार

वर्षाचा असतो त्याच्या प्रारंभ व अंतास प्रत्येकी दोनशे वर्षे लागतात. म्हणजे एकंदर काळ दोन हजार चारशे वर्षे होतो. त्यानंतर कलीयुग येते. त्याचा काळ एक हजार वर्षाचा असेल व त्याचा प्रारंभ व अंताचा काळ प्रत्येकी एकशे वर्ष असेल. म्हणजे एकंदर काळ एक हजार दोनशे वर्षे होतो. मिळून चार युगांचा एकंदर काळ बारा हजार वर्ष इतका असेल. अरे राजा, ह्या सगळ्या युगांचा प्रारंभ आणि अंत काळ समान असतो. कलीयुगाच्या अंतानंतर पुन्हा कृतयुगाचा प्रारंभ होत असतो असें हे माणसाच्या दृष्टीने अव्याहतपणे चालत असते. अशा एक हजार आयनांचा एक दिवस होतो ब्रह्माचा. म्हणजे माणसाची १२०००,००० वर्षे ब्रह्माचा एक दिवस असतो. जेव्हां ह्या विश्वातून ब्रह्म त्याचे अंग काढून घेऊ लागतो त्या प्रसंगाला विश्वाचा नाश असे जाणकार म्हणतात. जेव्हां पाप व पुण्याचे माप समसमान होते तेव्हां त्या विश्वाचा अंत होतो. कृत, त्रेता व द्वापार मध्ये पुण्याचे माप मोठे असते व पाप कमी असते. ती कमी कलियुगात भरून निघते व म्हणून त्यानंतर सृष्टीचा अंत होतो. त्यानंतर जेव्हां पुनः स्वयंभूला जग रहाटी सुरू करण्याची इच्छा (काम) होईल तेव्हां नवीन सृष्टीची उत्पत्ती होते नवीन नियमांनुसार. असा क्रम आहे.

अरे राजा, आता मी तुला सांगतो ह्या चार युगांच्या आवर्तनातील शेवटच्या एक हजार दोनशे वर्षात (कलीयुगात) काय होते. म्हणजे त्या युगात पाप कां वाढते ते समजेल. तो काळ फारच तोकडा असतो. त्याकाळातील माणसांत सगळे उत्तम गुण नीच पातळीला पोहोचलेले असतील, खोटेपणाचे महत्व वाढलेले असेल. त्या काळात यज्ञ व तसे धार्मिक विधी जे यजमानाने स्वतः करावयास पाहिजेत ते दलालांच्या मार्फत होऊ लागतील त्यातून पुरोहित वर्गाचा उत्कर्ष होईल. हे पुरोहित देवांच्या नांवांने देवळे उभारून त्यांचा देव विकण्याचा धंदा करत असतील. हा धंदा अरे राजा, द्वापारयुगाच्या संध्याकाळी सुरू होईल परंतु, कलियुगात तो भरभराटीला येईल. ब्राह्मण शुद्रा सारखे वागू लागतील. शुद्र व्यापारात प्रगती करतील. क्षत्रिय ब्राह्मणांची कामं करू लागतील. कलीयुगात ब्राह्मण जातीचे लोक ज्ञानापेक्षा इतर गोष्टीत जास्त रमतील. यज्ञ व्यवस्था संपुष्टात आलेली असेल. खाण्याबाबतचे नियम पाळले जाणार नाहीत. ब्राह्मण त्यांची त्या वर्णाची दिलेली कर्तव्ये विसरून जातील, त्यांची कामे पैशासाठी शुद्र करत असतील. ब्राह्मण वेदांचा अभ्यास करण्याचे सोडून देतील. शुद्र वर्णातील (जातीतील) जन्मलेले ब्राह्मणांची कर्तव्ये

करू लागतील व ब्राह्मण त्यांची कामं सोडून इतर गोष्टीत पैशासाठी रमतील. ध्यान साधना (तपस्या, तपोश्चरण), व्रतस्थता, सत्वशिलता (चांगुलपणा) ह्या गोष्टींचा विसर पडला असेल. धन हेंच सर्वस्व झालेले असेल. त्यामुळें पापाचरण नित्य कर्म होईल व पुण्यकर्म अपवादात्मक ठरेल. जगण्यासाठी पाप करणे आवश्यक आहे असें समजले जाईल म्हणूनच त्या युगाला कलीयुग म्हणतात. भांडण तंटे, वितुष्ट, विनाकारणचे झगडे, अत्याचार अन्याय हे नेहमीचेच होईल. म्लेच्छ धर्माचा (इस्लाम) प्रसार होईल. तो धर्म जगामध्ये असा पसरेल कीं, त्याचेच राज्य सगळीकडे दिसेल. हे युगांताचे लक्षण असेल. सर्व मानव जातीचे म्लेच्छिकरण करण्याचा घाट म्लेच्छ लोक कार्यरत करतील त्यामुळें कलह वाढलेले आढळतील. निष्पाप लोकांचा संहार होईल. पाप कर्मात मग्न असलेले लोक सत्तेवर येतील. कुलिन क्षत्रिय नसतील, त्याऐवजी भ्रष्ट क्षत्रिय सत्ता गाजवतील. राजकर्ते खोटे बोलतील. प्रजेची नित्य फसवणूक होत असेल. अंध, सल्क, पुलिंद, यवन, कंबोज, वल्हीक, अभीर हे लोक सर्व जगावर राज्य करतील. ते दुष्टपणे राज्य करतील. अशी त्या युगातील परिस्थिती कलियुगाच्या संध्या समयी असेल. कलीयुगात कोणत्याही वर्णाचा मनुष्य त्याच्या वर्णाचे ठरलेले कार्य करणार नाही. ते भलतेच कांहीं करत रहातील. माणसाचे आयुष्य कमी होईल. शरीराची ताकद कमी झालेली असेल. त्यांची हिम्मत कमी असेल व धाडस सुद्धा रहाणार नाही. माणसे जास्त करून खोटेच बोलतील. त्या काळातील लोक ध्यान साधना अपवादानेच करतील. कांहीं भागात लोकसंख्या फार कमी होईल व कांहीं प्रदेशात खूप जास्त झालेली असेल. त्या कलियुगाच्या अंत काळी नालायक माणसें श्रेष्ठी होतील व लायक माणसें चाकरमाने होतील. माणसाच्या विविध अभिरुची कृत, त्रेता, द्वापार मध्ये जशा असतील त्यापेक्षा कलियुगात फार भिन्न असतील. वस्तुतः प्रत्येक युगातील त्या तशा फरकांनेच बदलत असतील. कृतयुगात त्या अत्युत्तम सात्त्विक व कली युगात तामसी असा भेद झालेला दिसेल. त्रेता व द्वापार युगात रजोगुण प्रबळ असेल. बायकांना भरपूर मुलं होतील. त्या खुजा असतील व त्याचे वर्तन निंद्य असेल. बायका रस्त्यावर कामक्रीडा करत फिरतील. लज्जा, मर्यादा हे हास्यास्पद ठरतील. बायकांनी त्यांच्या पुरूषांना मान सन्मान देण्याची आवश्यकता मानणार नाहीत. पुरूषसुद्धा त्या बाबतीत विशेष उत्सूक नसतील. कलीयुगातील दुभत्या कमी दूध देतील.

त्यांचे आकारसुद्धा लहान असतील. झाडांवर कावळे जास्त दिसतील व पक्षी जसें हंस, भागद्वाज, कोकीळ, मोर कमी होतील. झाडांना फुलं व फळ कमी लागतील व त्यात किडी पडलेले असतील. सर्वच बिघडलेले असेल. माणसें अस्वास्थ्यामुळें सदैव अनिश्चिंत असतील. खोटे बोलणे, विश्वासघात करणे, गुंड पुंडगिरीचे महात्म्य वाढेल. विदुषक राज्य करतील, ह्याला पुरूषार्थ समजले जाईल. धर्म कार्याच्या निमित्ताने पाखंड, मिथ्याचार केली जाईल. देवांच्या ऐवजी पिशाच्च, राक्षस पुजले जातील. धर्म एक धंदा होईल. त्यात शुद्र आणि दुर्जन पुढाकार घेतील. ते ब्राह्मण ठरतील. अज्ञानी जाणकार समजला जाईल व जाणकाराचा तिरस्कार केला जाईल. पैसे करण्याचा एक धंदा असें सर्व पवित्र कार्याकडे पाहिले जाईल. कलियुगाच्या अंत काळी पैसा सर्वस्व होईल. कलियुगाच्या अंतकाळी लोकांवर एवढे कर लादले जातील कीं, लोक हैराण होतील. त्यांमुळें शासनात भ्रष्टाचार बोकाळेल. पुरोहित वर्ग साधू संत असल्याचा बहाणा करून पैसे कमावतील. प्रामाणिक व्यवसायापेक्षा सट्टा प्रधान ठरेल. सगळी अर्थ व्यवस्था सट्ट्यावर अवलंबून असेल. ते करतांना आपण कांहीं गैर करत आहोत असें त्यांना वाटणार नाही. झटपट श्रीमंत होण्याची धडपड सर्वत्र होत असेल. पुरूष लोक नखे वाढवणे, केस बायकांसारखे करणे ह्यात भूषण मानतील. सगळे द्विज तत्त्वनिष्ठा घालवून बसतील. नशा, द्युत, सट्टा हे भूषणावह ठरतील. सन्याशांचे आश्रम भिकार्यांचे आश्रम होतील त्यात एकही खरा संन्यासी नसेल. निसर्ग त्याचे ठरलेले काम वेळच्या वेळी करणार नाही त्यामुळें अवर्षणाचे प्रकार नित्य होतील. अवर्षण आणि ओला दुष्काळ नित्याची बाब होईल. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे इंद्राची कृपा होणार नाही. पावसा ऐवजी गारा पडतील. आजार, रोगराई, साथीचे रोग, अपघात नेहमीची बाब होईल. चांगली माणसे त्या युगात असतील परंतु, ते अल्पायुषी असतील, ते अचानक मरून जाणे हे नित्य होईल. पापाचे राज्य असेल. पुण्याच्या नांवाने पाप पसरवले जाईल. व्यापारी धंदा म्हणून चोर्या करतील. ग्राहकांची फसवणूक करणे हुशारीचे समजले जाईल. त्यामुळें पाप शक्ति प्रभावी होतील. पापी समृद्ध होतील व पुण्यवंत भिकेला लागतील. सरकारं भ्रष्ट असतील. पुण्यवंत गुन्हागार ठरवले जातील. पापी क्षमेस पात्र ठरतील. कुमार्ग रास्त मार्ग ठरेल. सर्वच तसे असल्यामुळें चांगले करणे म्हणजे मूर्खपणा समजला जाईल. सहा दोष उन्मत्त होतील,

मद, मत्सर समाजाचे जीवन दुःखमय करतील. पाळीव प्राणी रस्तावर आडवे बसलेले असतील. तीर्थक्षेत्री असे प्राणी सगळीकडे गोंधळ घालत फिरतील. अल्पवयीन मुली गरोदर होतील अनैतिक कृत्यामुळें. अल्पवयीन मुलं बाप बनतील. लहान मुलं मुली आत्महत्त्या करतील. तरुण माणसं अकाली वृद्ध होतील. बायको नवर्याला सोडून जारा बरोबर पळून जाईल. माणसें युद्धाशिवाय एकमेकाला खून खराबा करून मारून टाकण्याचे प्रकार सर्रास होतील. कोणीही कोणावर विश्वास ठेवण्यास घाबरेल. कृत युगात जे केवळ इच्छा करून मिळवले जात होते त्यासाठी त्रेता आणि द्वापार युगात मंत्रतंत्राचा वापर करणारी कर्मकांड नित्य झालेले असतील. त्यामुळें ती विद्या वाढेल. कलियुगात मात्र मंत्रासाठी ज्या देवतां जागृत असाव्या लागतात त्या निद्रीस्त झालेल्या असल्यामुळें मंत्र काम करणार नाहीत. परंतु, मनुष्य यंत्र तंत्राचा विकास करून त्याची कामं करू लागेल. सगळीकडे यंत्रांचे राज्य पसरेल. माणसांची कामं यंत्र करू लागतील. वायू दाबून त्याचा दगड करण्याची किमया माणूस साध्य करील व त्या दगडांपासून तो विविध वस्तु बनवून त्याची काम करत असेल.

अरे राजा, त्या हजारो वर्षाच्या चार युगानंतर माणसांचे आयुष्य फार कमी होते. त्या अखेरीस एक प्रचंड दुष्काळ सुरू होईल. तो बरीच वर्षे चालेल. त्यामुळें असंख्य माणसें उपासमारीने मरून जातील. सूर्य भयंकर आग ओकत राहील त्यामुळे वनस्पती सुद्धा नष्ट होतील. वनात मोठे वणवे पसरतील व सगळी नैसर्गिक सृष्टी र्हास पावेल. त्यावेळी अग्नी ज्याला संवर्तक (वणवा) म्हणतात, जो वार्यामुळें पसरतो तो पृथ्वीवरचे सर्व जाळून टाकील. त्या अग्नीचा प्रवेश पृथ्वीच्या आत मध्ये असा होईल कीं सगळे देव, दानव आणि राक्षस घाबरून जातील. तो अग्नी ज्याला संवर्तक म्हणतात, तो हजारो योजने इतके लांब रुंद प्रदेश भस्म करेल. तो अग्नी ह्या विश्वातील देव, असुर, राक्षस, गंधर्व, यक्ष, नाग आणि मनुष्य ह्याच्या वस्त्या असें सर्व तो संवर्तक संपवेल. आकाशात त्या अग्नीमुळें हत्तीसारखी ढगं वीजेच्या चमचमाटाने भयंकर परंतु, सुंदर दिसतील. त्या भयंकर सौंदर्य असलेल्या ढगांतून मुसळधार पाऊस पडू लागेल त्यामुळें सगळी धरती पाण्याखाली बुडून जाईल. त्याच्यातून निघणार्या बाष्पामुळें सगळे वातावरण धूसर होईल आणि तसे ते किती वर्षे असेल सांगता येत नाही. त्यामुळे अनेक रोग फैलावतील. त्या अफाट जलसागराच्या

जोरामुळें संवर्तक अग्नीचा जोर कमी होईल. असें बारा वर्षे होत राहिल. अशारितीने सगळी पृथ्वी पाण्याने भरल्यावर जोराने वहाणारे पवन त्या ढगांना विखरून टाकेल व त्यानंतर ती ढग आकाशात विरघळून जातील. ते झाल्यावर तो ब्रह्मदेव तो पवन पिऊन टाकेल आणि सृष्टीचा अंत केल्यानंतर विश्रांती घेण्यासाठी झोपी जाईल. तो त्या विश्वाचा कर्ता सगळे चराचर आणि अदृष्य सृष्टीचा विनाश केल्यानंतर त्या अथांग सागरात (जो विचार तत्त्व रुपी पाण्याचा आहे) एकटाच फिरत असतो. कांहींच नसते म्हणजे अगदी आकाश सुद्धा नसते अशा अवस्थेत तो असतांना मला सुचेनासे होण्याचा संभव असतो. मला आधीच्या युगांतील गोष्टी आठवतात व मी अस्वस्थ होतो त्या विलक्षण असा पोकळीमुळें. असे किती काळ असते कोणालाही सांगता येणार नाही. माझ्या त्या अस्वस्थ अवस्थेतून एक इच्छा उत्पन्न होते व त्यातून एक वडाचा वृक्ष साकार होऊ लागतो. तेथे मला नारायण लहान मुलाच्या रुपात दिसू लागतात जे एका कमळात जे त्या सागरात तरंगत असते, बसलेले असतात. त्यांच्या पर्यंत त्या भव्य वडाच्या वृक्षाच्या फांद्या पोहोचलेल्या असतात. मोठे नेत्र असलेल्या नारायणाचे दर्शन मला होईल. त्या दर्शनाने माझ्या डोळ्याचे पारणे फिटते. मी विचार करतो जर सगळे संपले आहे मग हा छोटासा बालक तेथे कोठून आला? माझे ज्ञान भूत, वर्तमान आणि भविष्याचे पूर्ण असूनही मला ते समजले नाही ह्याचे नवल वाटले. माझ्या तपस्येचासुद्धा तेथे उपयोग होत नव्हता. तो साक्षात लक्ष्मी वाटत होता. त्याच्या अंगावर श्रीवास्तवाची लक्षणं होती. तो तेजांने चमकत होता. तो माझ्याकडे पहात बोलला, "अहो मार्कंडेया, तू भृगुच्या परंपरेतील आहेस, तू येथे राहू शकतोस जोवर तुला रहावयाचे आहे. माझ्या कायेचा वापर करून ते तू करु शकतोस. मी तुझ्यावर प्रसन्न आहे". ते त्या दिव्य बालकाचे उद्‌गार ऐकल्यावर मला माझ्या आयुष्याचा व इतकी वर्षे तप केल्याचा तिरस्कार वाटू लागला. त्यानंतर तो विलक्षण बालक त्याचे तोंड उघडतो व मी त्यात फेकला गेलो. जे विधीलिखीत होते तसे होत होते. त्याच्या पोटात गेल्यावर तेथे मला सगळी पृथ्वी तिच्या सागर, नद्या डोंगर अशा सगळ्या व्यवस्थेनिशी दिसत होती. विविध नगरं, राज्ये मला त्यात आधीच तयार असावीत अशी दिसत होती. मी त्याच्या त्या अवाढव्य उदरात फेरफटका मारू लागलो. तेथे मी गंगा, यमुना, शतद्रू, सीता, कौशिकी, चर्मावती, वेत्रवती, चंद्रभागा, सरस्वती, सिंधू, विपाशा, गोदावरी, वश्वोक्षरा, नलिनी, नर्मदा,

तम्रा, वेन्ना आणि इतर बर्याच नद्या व झरे पहात होतो. त्याशिवाय उल्लेख करण्या सारख्या, सुवेन्ना, महानदी, विताशी, कावेरी, विसल्या, किंपुना सुद्धा होत्या. त्या सगळ्या पृथ्वीवरील नद्या मी पहात होतो. मी तेथे महासागर पाहिले ज्यात सुसरी, मोठे कासव, मोठे प्रचंड आकाराचे मांसे पहात होतो. तेथे रत्नांच्या खाणी होत्या त्या मला दिसल्या. तेथे मला वरच्या बाजूस आकाश दिसत होते. त्यात चंद्र, सूर्य तारका चमकत होत्या. जणूकाय नवीन सृष्टीचे लघूरुप मी पहात होतो. तेथील पृथ्वीत वने होती, वाळवंटं होती. आणि ब्राह्मण यज्ञ करत असलेले दिसत होते. क्षत्रिय त्यांची काम करत होती व वैश्य शेती करत होते, शुद्र त्या सगळ्यांना मदत करत होते, म्हणजे अरे युधिष्ठीरा मला येणारे कृतयुग दिसत होते त्या नारायणाच्या उदरात. तेथे मी पहात होतो ते सगळे पर्वत जे आपण पृथ्वीवर व तिच्या अदृष्य सृष्टीत आज पहात आहोत. त्यात हिमालय, हेमकुट, निशाध, चांदीसारखा चमकणारा स्वेत, गंधमादन, मंदार, नील, मेरू आणि महेंद्र असें सगळे तेथे होते, विंध्य होता त्याच्या वरील अरण्यासह. मलय, परिपत्र, आणखीन बरेच तेथे होते. सगळ्यांची नांव मी सांगू शकणार नाही. त्या उदरातील अरण्यात वाघ, सिंह, डुक्कर, हरणं, अस्वलं, रेडे, गाई, आणि इतर बरेच प्राणी दिसत होते. जे पृथ्वीवर असतात.

मी त्या उदरात भटकत असतांना मला देवांच्या असंख्य प्रजाती, दानव, राक्षस, यक्ष, अप्सरा होत्या त्या दिसल्या. त्याशिवाय इंद्र होता, साध्य होते, रुद्र, आदित्य, गुह्यक, पितर, नाग, वसु, अश्विनी, गंधर्व, ऋषी, अनेक दैत्य दिसत होते. देवांच्या प्रमाणे त्यांचे शत्रूत्व करणारे सुद्धा तेथे वावरत होते. जे जे पृथ्वीवर होते व आहे ते सगळे त्या उदरात मला पहावयाला मिळाले. ते स्वयंभूचे उदर अशा सगळ्या गोष्टीने भरलेले होते. मी त्या उदरात वाढणार्या झाडांच्या फळांवर गुजराण करत अनेक शतके राहत होतो. मला ते सगळे पहात असतांना भीती वाटत होती परंतु मला स्वयंभूने दिलेला आशिर्वाद आठवे व मी निर्धास्त होत असें.

मग एकदम एकदा मी त्याच्या उदरातून त्याच्या तोंडावाटे बाहेर फेकला गेलो. माझ्या बरोबर जोराचा वारा सुद्धा आला होता. त्यानंतर मी त्या वडाच्या झाडाच्या एका फांदीवर बसलो. माझ्या बरोबर तो श्रीवास्तव लहान बालक सुद्धा होता. त्याच्या अंगावर पितांबर होते. तो माझ्याकडे पहात हसत होता. तो श्रीवास्तव मला बोलला, तू माझ्या उदरात खूप

फिरला आहेस त्यामुळें थकला असशिल. तरी मी तुझ्याशी आता बोलणार आहे. त्याच्या त्या बोलण्यानंतर माझ्यात बदल झाला, मी वेगळ्याच जाणीवेने संपन्न झालो होतो. मला नवीन दृष्टी मिळाली होती. त्या नवीन जगाची मला माहिती मिळू लागली. मी त्यानंतर त्या श्रीवास्तवाचे लक्षण असलेल्या स्वयंभूची मनापासून प्रार्थना केली. त्याचे रक्तवर्णी पदकमल मी माझ्या हातांने धुतले व पुजा केली. त्या नंतर मी त्याचे डोळे भरून दर्शन घेतले. आणि म्हणालो. "मी तुम्हाला समजून घेण्याची प्रयत्न करत आहे. मी तुमची ही माया समजून घेण्याचा प्रयत्न करत आहे. तुमच्या उदरात जाऊन मी सगळे विश्व पाहिले आहे. त्यात देव, दानव, राक्षस, यक्ष, गंधर्व, नाग, सगळे चराचर तेथे होते. मी सतत तेथे फिरत होतो ते सगळे पहाण्यासाठी. तुझ्या कृपेने ते मी करू शकत होतो. तुझ्या कृपेने मी तुझ्या उदरात गेलो व पुन्हा बाहेर आलो. त्यात माझे कांहींच नव्हते. अरे कमलनयना, तुझे निर्दोष स्वरुप समजण्यास मोठे अवघड आहे परंतु, मी ते समजण्याचा सदैव प्रयास करत असतो. तू असा लहान बालकाच्या रुपात कां असतोस"? "खरे तर एका ब्राह्मणाला असें प्रश्न तुला विचारणे शोभत नाही परंतु, तुझ्या परवानगीने ते मी तुला विचारत आहे. केवळ कुतूहल म्हणून मी विचारत आहे. मला त्यातील सत्य तुझ्या तोंडून समजून घ्यावयाचे आहे. सगळे तपशिलवार सांगशिल कां"?

माझे कुतूहल समजून तो विधाता मला सांगू लागला ह्या विश्वाची माहिती.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा चौतिसावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग पस्तिसावा

मार्कंडेय पुढे सांगतात, तो आदिदेव नंतर मला बोलला, "अहो ब्राह्मणा, देवसुद्धा मला पूर्णपणे समजू शकत नाहीत. परंतु, मला तू जास्त आवडतोस म्हणून तुला हे विश्व मी कसे उत्पन्न करतो व कां ते समजावण्याचा प्रयास करणार आहे. अरे द्विज ऋषी, तू तुझ्या पूर्वजांशी प्रामाणिक असतोस व माझे संरक्षण मागतो आहेस, तू मला तुझ्या दृष्टीने अवलोकन करू शकत आहेस, तसेंच तुझी तपस्या थोर आहे, मी फार प्राचीन काळी जो काळ ह्या काळापेक्षा भिन्न आहे, तेव्हां मी नर नावाच्या विचार सागरात रहात होतो. म्हणून माझे पहिले नांव आहे नारायण. हे विश्व अरे ब्राह्मणा, मी त्या विचार सागरातून उत्पन्न करत असतो. तो विचार सागर माझे आयन म्हणजे घर असते. सगळ्या गोष्टींचे उगम स्थान असते विचार ते माझ्यातून उत्पन्न होत असतात. मी ते जसें उत्पन्न करतो तसेंच निष्प्रभ सुद्धा करत असतो. मी अनादि अनंत असा आहे. मला कांहीं विष्णू म्हणतात. कांहीं मला ब्रह्म म्हणतात. मींच देवांचा मुख्य इंद्र अथवा शक्र आहे. माझ्या विनाशकारी रुपाला कांहीजण यम म्हणून सांगतात. मी वैश्रावण म्हणजे संपत्ती आणि मींच यम म्हणजे मृत्यू असतो. मींच सोम आहे, काश्यप माझ्यातूनच उत्पन्न झाला आहे. जो ही सृष्टी चालवत आहे. मींच शीव आहे. अरे द्विजा, मला कांहीं धात्री म्हणतात. तसेंच कांहीं मला विधात्री म्हणतात. मींच यज्ञाचे रुप आहे. अग्नी माझे तोंड आहे. पृथ्वी माझे पाय आहेत, सूर्य व चंद्र माझे नेत्र आहेत. स्वर्ग माझे शीर आहे. सगळे आकाश व त्याच्या सगळ्या दिशा माझे कान असतात. पृथ्वीवरील पाणी माझा घाम आहे. हवा माझे मन असते. मी स्वतः उत्पन्न केलेल्या गोष्टींच्या आहुती देऊन असंख्य यज्ञ केले आहेत. यज्ञात मी असतो, वेद जाणणारे जे यज्ञ करतात त्यात ते मला आहुत्या देत असतात. पृथ्वीवर माणसातील क्षत्रिय स्वर्ग प्राप्तीसाठी यज्ञ करतात, वैश्य त्यांच्या पृथ्वीवरील कामना पूर्ण व्हाव्या म्हणून यज्ञ करतात ते सगळे मला मिळते. मीच शेष रुप धारण करतो. मी चार समुद्राने वाढलेली, मेरु व मंदार पर्वत असलेली पृथ्वी माझ्या फण्यावर धारण करत असतो. अरे द्विज ब्राह्मणा, मीच वराहाचे रुप धारण करून त्यावेळी पृथ्वीला पाण्यातून बाहेर काढले होते.

मींच तो अग्नी आहे जो पृथ्वीतून उसळून बाहेर येत असतो. मी समुद्र पितो व पुन्हा ओकून टाकतो हे माझ्या शक्तिमुळें होत असते. माझ्या शरीराच्या विविध भागांतून त्या चार प्रवृत्ती (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र) उत्पन्न झाल्या ज्या माणसाचा समाज घडवण्यात कारणीभूत आहेत. माझ्यातून ऋग, साम, यजु आणि अथर्व असे ज्ञानाचे चार खांबे घडले आहेत. त्या खांबांवर ज्ञानाचे घर उभे आहे. हे माझ्यातून बनलेले असते व जेव्हां वेळ येते तेव्हां ते सगळे माझ्यात सामावले जातात. ब्राह्मण प्रवृत्ती ज्ञान साधना व मला ओळखण्याचे काम करणारी आहे. ती वैराग्य संपन्न असते. तो संयमी असतो. सहा दोषांपासून विमुक्त असतो. त्याला कोठल्याही गोष्टीची आसक्ती नसते. तो निष्पाप असतो. मर्यादांचे त्याला भान असते. त्यामुळें त्याचे मन विचलित होत नाही व तो चांगले ध्यान करू शकतो.

मी संवर्तक अग्नी आहे. तो सगळे भस्म करत असतो. मी वारा आहे. आकाशात जे तारे दिसतात ते माझ्या त्वचेची छिद्रं समजावीत. त्या दहा दिशा माझे वस्त्र असते. म्हणून मला दिगंबर असेसुद्धा म्हणतात. तेच माझे घर समजावे. कारण मी त्यात सामावलेला असतो. आणि लक्षात घे कीं, वासना, क्रोध, सुख, भीती, सारासार बुद्धी मी माणसाला त्याचे योगक्षेम करण्याच्या कामात मदत करण्यासाठी दिले आहेत. ती सगळी माझी व्यवस्था आहे. जे कांहीं माणूस त्याच्या चांगल्या कृत्यांमुळे व वागण्यामुळें कमावतो ते सगळे मी देत असतो. माणसाचे दान, वैराग्य, शांती, निस्पृहता, दयाबुद्धी, भूतदया, असें सगळे आदर्श गुण मींच निर्माण केलेले आहेत. माझ्या आदेशांने ते माझ्यात भटकत असतात. ते त्यांच्या इच्छेने कांहींही करू शकत नाहीत. द्विज ब्राह्मण, ज्यांचे चित्त निर्मळ आहे, ज्यांचा क्रोध निमाला आहे, ते अनेक यज्ञ करून मला प्रसन्न करत असतात. ते त्यांना कधीच प्राप्त होत नाही जे पापाचरणात मग्न असतात. ज्यांचा स्वार्थ तामसी आहे त्यांना माझी कृपा कधीच प्राप्त होत नाही. कारण तशा वागण्यामुळें त्यांचा आत्मा अशुद्ध झालेला असतो. आणखीन एक गोष्ट सांगतो, जेव्हां पाप वाढते व दुराचार थैमान घालू लागतो, मी स्वतः त्या मानव समाजात जन्म घेतो. जे पापदर्शक राक्षस आणि दैत्य कोणालाही आटपत नाहीत त्यांचा विनाश मी त्या अवतारात करत असतो. त्या प्रकारे समाजात पुनः स्थैर्य स्थापन करतो. मी उत्पन्न केलेल्या मायेतून देव, गंधर्व, दानव, दैत्य असें सकारात्मक आणि नकारात्मक

दोनही प्रकारचे गुण तयार होतात व ते पुनः संतुलन करण्याचा प्रयत्न करत असतात. जर संतुलन झाले तर मी ती माया (आभासी सृष्टी) नष्ट करतो. पुनः माझ्या इच्छेमुळें ते सगळे पुनः पुन्हा उत्पन्न होत असते व नष्ट होत असते. माझी इच्छा हे एकमेव त्याचे कारण असते. मला जर इच्छा झाली नाही तर हा खेळ होण्याचे थांबेल. सगळे शुन्य होईल. अरे ब्राह्मणा, आता तू मला विचारू नकोस कीं, मला इच्छा कां होते"? माणसाच्या आकलन क्षमते पलिकडची अशी अनेक रुप मी धारण करत असतो. कृत युगात माझा रंग शुभ्र असतो, त्रेता युगात तो पिवळा असतो, द्वापार युगात तो रक्त वर्णी असतो आणि कलीयुगात तो दाट काळा पासून राखाडी असतो. हे रंग त्या युगांतील नैतिकतेचे दर्शक असतात. कृत युगातील नैतिकता जर शंभर टक्के धरली तर त्रेता मध्ये ती पंचाहत्तर, द्वापारा मध्ये पन्नास आणि कली मध्ये पंचवीस टक्के उरली असें असते. जीवनाच्या सुखाचे प्रमाण त्याप्रमाणे असते त्याच्या उलट दुःखाचे असते. म्हणून कलीयुगात दुःख फार असते व कृत युगात त्याच्या पेक्षा खूप कमी असते.

जेव्हां युगांत येतो तेव्हां मीच एक भयंकर रुप धारण करतो आणि सगळे संपवून टाकतो. मी अहंकार आहे व मीच त्याचा नाश करत असतो. सर्व जाणिवा माझ्यातून चराचरात उत्पन्न होत असतात. माझ्या मायेचे मोजमाप करण्यासाठी मीच काळ उत्पन्न केला. तरी मला स्वताला आकार नाही जरी मी सगळ्या आकारांचा म्हणजे रचनांचा कर्ता असतो. ह्या विश्वातील सगळ्या चराचराचे मन मी आहे. असे असूनही कोणाला ते माहित नसते. तुमच्या मनात येणार्या विचारांचा मीच कर्ता असतो. कोणत्याही देवाला केलेली प्रार्थना अखेरीस माझ्याकडे येते. माझ्या उदरात फिरत असतांना तू ज्या दुःख, वेदनांचा अनुभव घेतलास ते सगळे दुसर्यांना सुख देण्यासाठी होते. मी सगळ्यांचा पितामह आहे. मला नारायण म्हणतात. मी माझे वाद्य म्हणून शंखू धारण करतो, माझे शस्त्र आहे सुदर्शन चक्र, आणि गदा. हे विश्व माझ्या विचारातून तयार झाल्यावर मी निद्रा घेतो जेव्हां ते विश्व कार्यरत असते. अरे मार्कंडेया, माझ्या लाडक्या ऋषीवरा, मी ह्या विचारसागरात असाच एकाद्या लहान बालका सारखा निद्रिस्त असतो. युगाचा समय संपायला येतो तेव्हां मी जागा होतो. मी तुला परत परत अनेक आशिर्वाद देत असतो. मला सगळे चराचर विपन्नावस्थेत दिसतात, कारण त्यांचे जन्म व मरण हे सतत चालू असतात. म्हणून मी

तुला माझ्या उदरात नेऊन सगळे दाखवले. जे कधी कोणालाही पहाता येणार नाही. तुला ते पहातांना भोवळ आली म्हणून मी तुला त्वरितपणे माझ्या तोंडातून बाहेर फेकले. मी तुला तुझ्या समाधानासाठी हे सगळे सांगितले, तरी त्यांने तुझे समाधान होणार नाही कारण, त्यात अनेक गोष्टी अशा आहेत ज्या समजावून सांगता येण्यासारख्या नाहीत. मी जे सांगितले ते देवांना, दैत्याना, राक्षसांना, ऋषींना सुद्धा माहीत नाही. असें सांगून तो स्वयंभू अंतर्धान पावला. त्यानी दिलेल्या दिव्य दृष्टीमुळें मी नंतर सगळे पुनः पाहू लागलो. अरे मी ज्या स्वयंभूला पाहिले तो हाच कृष्ण रुप घेऊन येथे बसला आहे. तो असांच ह्या सृष्टीत विविध रुपं घेऊन वावरत असतो. मलासुद्धा तसे करावयाला लावतो. मला सगळे आठवते त्याच्या कृपेने. त्याच्या कृपेमुळें माझे आयुष्य व अंत माझ्या मर्जीवर अवलंबून आहे. एकदा मी त्याला विचारले कीं, जेव्हां तो सगळे विश्व युगांती नष्ट करतो त्यात देव ऋषी असें सगळे तो नष्ट करतो मग तो मला कां नाही नष्ट करत. तेव्हां तो मला म्हणाला अरे मार्कंडेया, तू ह्या सृष्टीचा एकमेव साक्षीदार आहेस. कोठलीही घटना सिद्ध करण्यासाठी त्याचा साक्षीदार असावा लागतो. तू माझ्या सगळ्या निर्मिती व नाशांचा साक्षीदार असल्यामुळें तू नेहमीच माझ्यासारखा अस्तित्वातच रहाणार आहेस. आपण दोघे नेहमीच असणार, विश्वे येतील व जातील. असें त्यांने मला उत्तर दिले.

अरे कुंतीच्या मुला , तुझा आत्ये भाऊ जो वृश्नीमध्ये जन्मला आहे तो तोंच आहे ज्याची माहीती मी तुला सांगत आहे. तोंच धात्री व विधात्री आहे. जगाचा निर्माता व विनाशक ज्याच्या अंगावर श्रीवास्तवाची लक्षणें आहेत. त्यालाच कोणी गोविंद म्हणतात. त्याला अशा प्रकारे पाहून मला जुन्या आठवणी येतात. अरे कुरु वंशाच्या राजा, त्याच्या आश्रयाने रहा, तुझे कल्याण होईल".

वैशंपायन ते सांगितल्यावर पुढे बोलतात, त्यांनी अशाप्रकारे सगळे सांगितल्यावर सगळ्यांचे समाधान झाले, त्यानंतर सगळे पांडव आणि द्रौपदी त्यांच्या पाया पडतात. नंतर ते सगळे कृष्णाच्या पाया पडतात. कृष्ण त्यांचे वंदन स्वीकारतो व प्रेमांने त्यांना आश्वासित करत शांत करतो.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा पस्तिसावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग छत्तीसावा

वैशंपायन पुढे जनमेजयाला सांगतात, त्या विवेचना नंतर युधिष्ठीराचा उत्साह वाढतो व तो मार्कंडेयांना आणखीन प्रश्न विचारण्याची सम्मती मागतो. तो विचारतो, "अहो भृगु कुळातील महामुनी, मला सांगा, ह्यापुढे पृथ्वीचे भविष्यात काय आहे. मला ते ऐकण्याची फार इच्छा आहे. आपण आता जे विश्वाच्या प्रारंभाचे व अंताचे वर्णन केले ते खरोखरच विलक्षण आहे. त्याचे मला फार आश्चर्य वाटते. मला त्यामुळे एक राजा म्हणून पृथ्वीचे भविष्यात काय होणार आहे ते समजून घ्यावेसे वाटते. आपण कलीयुगाचे जे सांगितले त्यामुळें माझी त्या बद्दलची उत्कंठा फार वाढली आहे. कलीयुगात नैतिक मुल्यांचा र्हास होण्याबद्दल जे आपण निवेदन केले त्यामुळें त्या युगाबद्दल आणखीन समजून घेण्याची माझी इच्छा आहे. त्याच्यातील कर्तृत्व कसे असेल, ते काय खातील, त्यांचे जीवन कसे असेल, ते लोक मनोरंजनासाठी काय करतील, त्या युगाच्या संध्याकाळी काय होणार आहे ते मला समजून घ्यावेसे वाटते. मला त्या व इतर सगळ्या गोष्टी तपशिलात सांगाल तर बरे होईल. आपली सांगण्याची पद्धत फारच रोचक आहे".

ते ऐकल्यावर मार्कंडेय ऋषी पुढे सांगू लागतात. त्यांचे कथन ऐकण्यास स्वतः जनार्दन उत्सुक होते.

मार्कंडेय युधिष्ठीराला बोलतात, अरे पंडुच्या मुलां, जे मला अनुभवाला आले, जे दिसले ते तुला सविस्तरपणे आता सांगतो. मला ते सगळे माझ्या अंतर्ज्ञानाने ज्ञात होत होते, त्यात माझे अंतर्चक्षू सुद्धा कारणीभूत आहेत. आता मी तुम्हाला त्या पापमय कलीयुगात काय होणार ते सांगतो.

कृत युगात सगळे निर्मळ होते. नैतिकता शंभर टक्के होती. फसवणूक, विश्वासघात, खोटेपणा, लोभीपणा, व्यसनीपणा, भ्रष्टाचार, व्यभिचार, अन्याय, अत्याचार हिंसा अशा ज्या कांही गोष्टींमुळें पाप वाढते त्या अजिबात नव्हत्या त्या युगात. ह्या सगळ्या पापकारक गोष्टी नंतरच्या युगांत क्रमशः वाढत गेल्या व अंती असलेल्या कली युगात त्यांचा कहर झाला असें चित्र मला दिसत आहे. नैतिकतेची तुलना एका बैलाच्या पायांशी केली जाते जे

केवळ एक रुपक आहे. जसें बैलाला चार पाय असतात तशी ह्या चार युगात नैतिकतेची आहेत असे धरून ते रुपक सांगतात. त्याप्रमाणें, कृतयुगात त्या नैतिकतेचे सगळे चार पाय शाबूत असतात. त्रेतायुगात नैतिकतेचे फक्त तीन पाय रहातात, द्वापारात फक्त दोन पाय व कलीयुगात नैतिकता इतकी अपंग होते की तिला फक्त एकच पाय उरतो. म्हणजे माणसाची नैतिकता जवळपास संपुष्टात आलेली असेल. अशी केविलवाणी अवस्था समाजाची झालेली असेल. असें ह्या रुपकातून सुचवावयाचे आहे. अरे युधिष्ठीरा, त्याच प्रमाणे इतर चांगले गुण सुद्धा कमी झालेले असतील. चार व्रणाचे लोक त्यांच्या कर्तव्यात भ्रष्ट झालेले असतील. चांगल्या गुणांचासुद्धा अशाप्रकारे गैर वापर होत असेल कीं, ते चांगले गुण वाईट परिणाम देत रहातील. सत्याचा विपर्यास ही नित्याची बाब होईल. त्यामुळें जीवनातील निश्चितता कमी झाल्याने माणसांचे आयुष्य कमी होईल. जीवनमान कमी झाल्यामुळे माणूस कोठलीही गोष्ट पूर्ण करु शकणार नाही. त्याच्यात अज्ञान वाढेल. त्या कारणांने लोभ आणि मोह ह्या दोषांत तो अडकून राहील. लोभ पूर्ण होणार नाही त्यातून असंतुष्टतेमुळें क्रोध व दुःख उत्पन्न होईल. जर लोभ पूर्ण झाला तर आणखीन जास्त मोठा लोभ अशी लोभाची मालिका त्याच्या वासनांत भर घालत राहिल. असंतुष्टते मुळें अथवा संतुष्टतेमुळें सुद्धा माणसे एकमेकांशी तुलना करू लागतील त्यातून मद अथवा मत्सर वाढत जाईल. अशारितीने ते सहा दोष माणसाच्या विवेकाचा नाश करतील, तो अधिकाधिक भावनिक विचारात अडकून पडेल. त्यातून आणखीन मद, मत्सर वाढत जातात. अशामुळें त्याचे रक्त सतत जळत राहिल व त्याचा परिणाम स्वरुप त्याचे आयुष्य कमी होईल. मद आणि मत्सर माणसात खूनशीपणा, दुष्टपणा, वाढवतात त्यातून पापाचरण सुरू होईल. असा गुणांचा र्हास होत गेल्यामुळें, सर्व द्विज वर्णातील लोक शुद्र होतील. म्हणजे कलियुगात फक्त शुद्र वर्ण असेल, प्रामुख्याने. शुद्र झाल्यामुळें त्यांचे निर्णय अयोग्य असतील व त्या कारणांने अनेक समस्या त्याच्या पुढे उभ्या होतील. सातत्याने चुकीचे निर्णय घेतले जातील. असें लोक सत्तेवर असल्यामुळें समाजाचे प्रश्न सुटण्या ऐवजी आणखीनच क्लिष्ट होतील. कारण त्या युगातील नैतिकता एकचतुर्थांश झालेली असेल. तरीसुद्धा अरे युधिष्ठीरा, नारायणाच्या कृपेने अधून मधून उच्च कोटीचे दैवी आत्मे समाजाच्या प्रबोधनासाठी अवतारत असतील. एक कृतयुग त्या अथांग कलियुगात एकाद्या

बेटासारखे असेल. ते उरलेल्या सत्त्वशिल, व्रतस्थ लोकांना आधार देत असेल. म्हणजे गुणांचा र्हास पूर्ण नसेल. कांहीं अपवादात्मक गुणीजन आपले काम करत असतील.

त्या काळात निरनिरीळ्या प्रकारचे वस्त्र माणसें नेसतील. सुती, रेशमी वस्त्रापेक्षा ते भिन्न असतील. त्या काळात पुरुष आपल्या पत्नीला बरोबरीचा मित्रत्वाचा दर्जा देतील. माणसें सर्व प्रकारचे मांसाहार, मत्याहार, शाकाहार करतील. शाकाहाराचे प्रमाण वाढलेले असेल. व्रतस्थ रहाणारी माणसेसुद्धा लोभात अडकतील. भांडण मारामार्या, कलह हे नित्याचे असतील. त्यावरून माणसाची ताकद अजमावली जाईल. अध्यात्म साधना कमी झालेली असेल त्या ऐवजी दंभ, मिथ्याचार वाढलेला असेल. योगाच्या नांवाने भलतेच कांहीं आचरण्यात आलेले असेल. ईश्वर न मानण्याचे प्रस्थ वाढत जाईल. देवांच्या नांवाने खर्या खोट्या गोष्टी केल्या जातील. पाण्याचे दुर्भिक्ष असे वाढेल कीं, शेतकरी नदीतच शेती करण्याचा प्रयत्न करतील. कांहीं वेळा तेथेसुद्धा पाण्याच्या अभावी शेती करता येणार नाही.

पितरांच्या व देवांच्या पुजा करण्याचा धंदा सुरू होईल. त्यातसुद्धा पुरोहित निष्पाप लोकांची लुबाडणूक करतील. पापी व गुन्हेगार लोक राज्य करतील. सज्जनांवर खोटेनाटे आरोप करून त्यांना निष्प्रभ करण्याचा प्रयत्न होत असेल. ब्राह्मण त्यांची व्रतस्थता पाळणार नाहीत. त्यांना वेदांचा विसर पडेल. पित्याच्या चिजा (कपडे वगैरे) पुत्र वापरेल व पुत्राच्या पिता वापरेल असें होईल जे हल्लीच्या नितीशास्त्रात वर्ज समजले जाते. कर्मकांड विनाशुचीता पाळले गेल्यामुळें ते निरर्थक ठरतील. यज्ञ कार्याबद्दलचे ज्ञान हरवल्याने यज्ञ करणारे याज्ञिक, ऋद्विक, पुरोहित नसतील. तरी खोटे यज्ञ होम होत रहातील. त्यातून भाविकांची फसवणूक होत राहिल. मुलं पित्याचा खून करतील व पिता मुलांचा, घरात कलह माजलेले असतील. असंख्य मुलं पोरकी होतील, बायका व्यभिचारात मग्न होतील. सगळे जग म्लेच्छ (इस्लामी) झाले असेल. म्लेच्छ धर्माचे प्राबल्य वाढलेले असेल. त्यांचे रिवाज, चालिरीती ह्याचा आग्रह असेल. म्लेच्छिकरणाचे (Arabization) दबाव आणले जातील. लहान मुलांना मोठ्या माणसांची कामं करावी लागत असतील. दुःख, चिंता ह्यांने माणसाचे जीवन त्रस्त झालेले असेल. असहाय, गरीब अपंग अशा लोकांची परवड होत असेल. उनाडकी व शौर्य ह्यातील फरक समजला जाणार नाही व शौर्य समजून उनाडकी,

मवालेगिरी ह्याला उत्तेजन दिले जाईल. शिस्तीच्या नावाखाली दुष्टपणा केला जाईल. एकमेकांचे अपमान करणे हे गंमतीचे समजले जाईल. राजसत्तेत उनाड माणसे सत्तेवर असल्यामुळे, उनाडकी शिष्टाचाराचा भाग असेल. बुद्धीहीनतेमुळें प्रश्न चर्चा करून सोडवण्या ऐवजी द्वंद्वाने, खुन खराबा करून सोडवले जातील. गोष्टी मुद्द्यावरून गुद्द्यावर जातील. त्या युगाच्या अंतकाळी भ्रष्ट क्षत्रियाचेच महत्व असेल. दुष्टपणा हा क्षत्रियांचा गुण असेल. फक्त त्रास देणे हा त्या क्षत्रियांचा उद्योग असेल. प्रजेचे संरक्षण करण्या ऐवजी त्यांचा छळ ते करत असतील. चोर्या करणे, छळ करणे, लुटमार करणे असें उद्योग ते क्षत्रिय करत रहातील. लग्न मुलीच्या इच्छेने (प्रेमविवाह) होतील. ठरवून लग्न करण्याची पद्धत कमी होईल. राजकर्ते जनतेची लूट करण्यासाठी विविध प्रकारचे कर, पट्ट्या, दंड असें बहाणे करतील.

सर्व जग म्लेच्छ (इस्लामी) झालेले असेल. युगाच्या अंत काळी परिस्थिती एवढी बिघडलेली असेल की, उजवा हात डाव्या हाताची फसवणूक करील. इतकी विश्वसनीयता संपुष्टात आली असेल. पांखडी विद्वान म्हणून पुजले जातील. विविध प्रकारे फसवणूकी होत रहातील. भित्रे लोक हिम्मतवाल्याना कामाला लावून त्यांच्या कामाचे श्रेय घेऊन मानमरातब मिळवतील. फक्त पैसा काम करील. बाकीचे गुण विकत मिळतील. ज्याच्याकडे धन तो शहाणा ज्याच्याकडे नाही तो मूर्ख अशी रीत होणार आहे, कलीयुगाच्या शेवटच्या काळात. जगातील सगळी माणसें तयार खाद्य खातील. घरात खाद्यपदार्थ बनवणे थांबेल. खरे ब्राह्मण, कुलिन क्षत्रिय आणि खरे वैश्य आढळणार नाहीत. सगळे भ्रष्ट असतील. बाप मुलाशी व्यापार करील व मुलगा बापाशी धंदा करील. सगळे पैशाने मोजले जाईल. मित्र मित्राला फसवेल, फसवणे म्हणजे पुरूषार्थ असें चित्र असेल. न्यायालयात न्याय मिळणार नाही. न्यायसुद्धा विकला जाईल. त्यात कांहींच गैर नाही असें समजले जाईल, ती जगरहाटी असेल. राजकर्ते प्रजेवर अन्याय बिनदिक्कतपणे करतील आणि प्रजासुद्धा सरकारची फसवणूक करत असेल. दोघेही आपापल्या बदकर्माचे समर्थन करत असतील. गहू आणि जव मुख्य आहार होईल. मांसाहार कमी होईल. शाकाहाराचे प्रस्थ वाढेल.

अरे युधिष्ठीरा, म्लेच्छ धर्माचे प्राबल्य वाढल्यामुळें लोक श्राद्ध करणार नाहीत त्यामुळें पितर उपाशी रहातील, देवता नाराज होतील. त्याचे परिणाम उद्भवतील परंतु, त्याची पर्वा कोणीही करणार नाही. गुरूजनांचे हंसे केले जाईल. शिक्षक विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष करतील. पतीपत्नीत प्रामाणिकपणा रहाणार नाही. धर्माच्या नांवाने खोट्या गोष्टींचा प्रचार होईल. दुष्काळ वेळोवेळी पडतील. वेश्याव्यवसाय भर रस्त्यावर होत असेल. समलिंगी संबंधांचे कौतुक वाढेल त्याचे समर्थक रस्त्यावर उतरतील. प्राचीन मुल्ये धुडकावून लावली जातील. त्यांचे समर्थन करणार्याची छित्थू होईल. अनैतिक संबंध नित्याची बाब असेल, त्यात कांहींच गैर नाही असे समजले जाईल. व्यापार कार्यात वजनात, भावात, वस्तूच्या दर्जात खोटेपणा नित्याचा असेल. त्यामुळें जीवन असुरक्षित होईल. धर्मशास्त्राचे ज्ञान नसलेले पौरोहित्य करतील. असुरक्षितता, माणसामध्ये क्रौर्य निर्माण करील. असें जरी सर्वत्र होणार असले तरी युधिष्ठीरा त्यातसुद्धा कांहीं त्रेतायुगाची व द्वापार युगाची बेटे असतील जेथे परिस्थिती उत्तम असेल. चांगले लोक तेथे जाण्याचा प्रयत्न करतील. नैसर्गिक साधन सुविधा धंद्याच्या मतलबासाठी नष्ट केली जातील. सरकारच दरोडेखोर होईल. त्याविरूद्ध आवाज करणार्याला शासन होईल. चोराच्या उलट्या बोंबा, अशी परिस्थिती सर्वत्र आढळेल. सरकार कराच्या ओझ्याखाली प्रजेला हालअपेष्टा भोगावयाला लावेल. देवांची पुजा न करता माणसें हाडे आणि तसे मृतांचे अवयव जे भिंतीत, जमिनीत पुरले आहेत ते पुजतील. विधात्याची, कुलदेवतेची पुजा करण्या ऐवजी लोक मेलेल्या माणसाला देव समजून त्याची पुजा करतील. त्याच्या कडे आणाभाका करत असतील. भूतांची पुजा केली जाईल. साधू संतांची देवळे बांधली जातील.

व्यसनीपणा, अभक्ष्य भक्षण, अर्वाच्य वाचा असें दोष स्वताला श्रेष्ठी सांगणारे करत असतील. मोसमाचे नियम रहाणार नाहीत. कधीही पाऊस पडेल त्यामुळें शेतीचे गणित चुकेल. वर्ण व्यवस्था पूर्णपणे कोलमडून पडेल पण त्याची क्षिति कोणालाही नसेल. ग्रह तार्यामध्ये अशुभ योग दिसू लागतील. अति दरिद्री आणि अति श्रीमंत असें समाजात वर्ग पडतील. आकाशातून अशनिंचा पाऊस पडेल. कांहीं तारे जे एरवी मंद प्रकाश देतात ते सूर्यासारखे तेजस्वी होऊन चमकू लागतील. सूर्य राहूच्या छायेत जाईल. संतत धार पर्जन्य वृष्टीमुळें सगळीकडे पाणीच पाणी होईल. पिकांवर रोग पडतील. शेतीचे उत्पादन

कमी होईल. बायका पुरूषांवर हल्ला करून जातील. त्यांचा भांडखोरपणा फार वाढेल. त्यांच्यापुढे पुरुष टिकू शकणार नाही. आप्त एकमेकांचे बळी घेतील विनाकारण अथवा क्षुल्लक कारणावरून. मोठ्या आगी लागतील. राहू सूर्य गिळून टाकील. भिकारी रस्त्यावर मरून पडलेले दिसतील. युगाच्या शेवटच्या काळात कावळे सतत ओरडत असतील. कुत्री, कोल्हे, गाढवं जोरजोराने ओरडत असतील. मित्र मित्र रहाणार नाही. लोक देश सोडून जातील. कामधंद्यासाठी परदेशात जाणे नेहमीचेच झालेले असेल.

अशाप्रकारे तो युगांत अनुभवल्यावर पुन्हा नवीन सुरूवात होईल. ती मला दिसू लागली. लोक पुन्हा त्यांच्या चांगल्या सवयी आचरणे जास्त चांगले असें समजून त्याप्रमाणे त्यांच्यात फरक होऊ लागेल. समाजातील चार वर्णाचे लोक आपल्या जबाबदार्या समजून वागू लागतील.

जसे माणसात बदल होतील त्याप्रमाणे विधातासुद्धा अनुरूप होत असल्याचे दिसू लागेल. त्यावेळी सूर्य, चंद्र, गुरू हे तीन एकाच पुष्य नक्षत्रात येतील. तसें झाले म्हणजे पुनः कृतयुगाची सुरूवात होईल. तसे झाले कीं, मोसम सुधारतील व पाऊसपाणी नियमित होईल. तारे, सूर्य पुनः त्यांच्या तेजाने चमकू लागतील. शुभलक्षणं दिसू लागतील. पिकपाणी सुधारल्यामुळें समाजाची परिस्थिती सुधारावयाला लागेल. त्यावेळी एक ब्राह्मण ज्याचे नांव कल्की असेल, जन्म घेईल. तो पुनः एकदा नैतिकतेचे तत्त्व लोकांत पटवून देईल. त्यामुळें सामान्य जन त्यांचे वळण सुधारतील. समाजाची नैतिकता सुधारू लागेल. मर्यादा तत्त्व पुनः लोक समजू लागतील. कल्कीचा जन्म उच्चकुलिन ब्राह्मण कुळात संभल नावाच्या नगरात होईल. त्याच्या कडे सगळी आयुधं जसें रथ, लढवय्ये, चिलखतं, शस्त्रास्त्रे, सज्ज असतील. त्याला जेव्हां वाटेल तेव्हां तो ती वापरू शकेल अशी व्यवस्था असेल. तो समाजात न्याय आणि सुव्यवस्था स्थापन करण्यात यशस्वी होईल. तो राजांचा राजा बनेल. तो सदैव अजिक्य ठरेल. त्याच्या पुण्यप्रभावामुळें सगळे त्याचे ऐकू लागतील. जे विरोध करतील त्यांचा तो पुरता बिमोड करेल. असा तो तेजस्वी ब्राह्मण सगळे अयोग्य जे उत्पन्न झाले ते नष्ट करून टाकील. अशारितीने नवीन युगाची तो स्थापना करील. इतर ब्राह्मणांच्या मदतीने तो सगळे म्लेच्छ जेथे लपले असतील तेथून काढून त्यांना मारून टाकील. अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा छत्तीसावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग सदोतिसावा

मार्कंडेय पुढे सांगत असतात, तो कल्की सगळ्या वाईट लोकांचा नाश करतो व त्यानंतर एक अश्वयज्ञ करतो. त्यानंतर तो पृथ्वी ब्राह्मणांना दान करील. लोक त्याने दाखवलेल्या मार्गाने त्यांचे जीवन जगू लागतील. सगळे वाईट लोक नष्ट केलेले असल्याने समाजात शांतता, समृद्धी वाढू लागेल. कल्की सगळ्या देशांतून त्या वाईट प्रवृत्तीचा नाश करत राहिल. कल्की अंगावर हरणाच्या कातड्याचे वस्त्र नेसून एका हातात त्रिशूळ व दुसर्या हातात तलवार अशा अभिनिवेशांने तो सगळे देश फिरेल व दुष्कृतांचा पुरता बिमोड करेल. त्याची स्तुती ब्राह्मण करत असतील. त्याने मारलेले वाईट लोक जोरजोराने किंचाळत ओरडत आपल्या आई बापांना हांका मरतांना दिसतील. अशारितीने सगळे पाप नाहीसे झाल्यावर कृतयुगाची पहाट सुरू होईल. माणसे त्यांच्या जबाबदार्या समजून वागू लागतील. त्यांची अध्यात्मिक कर्तव्ये ते यथास्थितपणे पार पाडू लागतील. शिस्त लोकांत दिसू लागेल. त्यांच्या वागण्यात मर्यादा आढळून येईल. कल्की गुरूकुल स्थापन करील त्यातून ब्राह्मणी ज्ञानाचा प्रचार केला जाईल. त्यामुळें देवळे व त्या समोर तळी तयार केली जातील असें सगळीकडे झालेले दिसेल. यज्ञाची कर्मकांडं पुनः आचरण्यात येतील. खरे तत्त्वनिष्ठ सत्त्वशिल व्रतस्थ ब्राह्मण सगळीकडे आढळू लागतील. मुनींचे आश्रम दिसू लागतील जेथे आधी गुंडाचे अड्डे होते. लोक सच्चाईने आपले आचरण ठेवू लागतील. पेरलेली बियाणी चांगली उगवतील व शेतीचे उत्पन्न सुधारेल. दानधर्म सुरू होतील. राजे प्रामाणिकपणे राज्यकारभार पाहू लागतील. वैश्य प्रामाणिकपणे त्याची शेती व व्यापार करू लागतील. ब्राह्मण त्यांची सहा कर्तव्ये (ज्ञानप्राप्ती, शिकवणे, यज्ञ करणे, दुसर्यांकडून यज्ञ करवून घेणे (पौरोहित्य), दान करणे, भेटी स्वीकारणे) प्रामाणिकपणे करतील. क्षत्रिय त्यांच्या धाडसाने व हिम्मतीने दुष्टांचे नियंत्रण करतील. शुद्र द्विजांची सेवा करतील. अशाप्रकारे नवीन व्यवस्था प्रस्थापित केल्यावर तो कल्की अरण्यात निघून जाईल. अरे युधिष्टीरा, अशाप्रकारे कृत युगाची सुरूवात होईल. त्यानंतर दिलेल्या क्रमाने त्रेता व नंतर द्वापार युगाचे असेल. हे मला वायूदेवाने सांगितले जे त्याच्या नावाने असलेल्या

पुराणातसुद्धा आहे. त्या पुराणाला सगळे ऋषी फार मानतात. मी अमर असल्यामुळें त्यांचा प्रत्यय मी बर्याचवेळी घेतला आहे. मी जे जाणतो व जे पाहीले ते तुला सांगितले आहे. अरे पंडुपुत्रांनो, आता मी तुमचे धर्माच्या बाबत जे प्रश्न असतील त्यांचे निराकरण करणार आहे. ते नीट लक्ष देऊन ऐका. तुम्ही नेहमी सद्गुणांची बाजू घेऊन जगले पाहिजे. जो चांगल्या प्रवृत्ती स्वतः जोपासतो व इतरांना सुद्धा तसे करण्यास सांगतो त्याचे कल्याण होते. अरे निष्पाप राजांनो, मी जे शुभलक्षणी बोलणार आहे ते समजून घेण्याचा प्रयत्न करा. कधीही ब्राह्मणाचा (ज्ञानी जनांचा) उपमर्द करू नका. कारण जर तो खरा ब्राह्मण असेल तर त्याच्या क्रोधाने तुमचे फार नुकसान होऊ शकते".

वैशंपायन नंतर सांगतात, ते मार्कंडेयांचे ऐकल्यावर युधिष्ठीर त्यांना प्रश्न विचारतो. "अहो मुनी, मला सांगा, जेव्हां मला माझ्या प्रजेचे संरक्षण करावयाचे असते, तेव्हां मी कसे वागले पाहिजे, म्हणजे मी माझ्या वर्णाच्या कर्तव्यापासून हटलेला नसेल"?

मार्कंडेय सांगतात, तू नेहमी तुझ्या प्रजेशी आत्मियतेने वागले पाहिजेस, जसा एक प्रेमळ पिता त्याच्या अपत्यांशी वागेल. कोणाचाही द्वेष न करता तू तुझे निर्णय घेशिल. जसे ब्रह्माशी सगळ्या चराचरांचे नाते असते तसेंच ते त्या राज्याच्या नरेशाशीसुद्धा असते. कारण त्या राज्यासाठी तो त्या ब्रह्माचा प्रतिनिधी असतो. म्हणून कोणावरही अन्याय होणार नाही हि तुझी प्रथम जबाबदारी असेल. नेहमी हितकारक बोलशिल, करशिल. प्रत्येक निर्णय घेतांना ब्रह्माची साक्ष आहे हे लक्षात ठेवून ते घेशिल. पापाचरण जरी मोहक असले तरी ते अंती दुःखदायक आहे ह्याचे भान ठेवून किमान पापाचरण करावेस. असें सांगण्याचे कारण अरे राजा, क्षत्रियांना त्यांची कर्तव्ये करतांना कांहीं पापाचरण करणे अनिवार्य असते. तो धोका ब्राह्मणांना नसतो म्हणून, एक क्षत्रिय म्हणून आपली कर्तव्ये पार पाडणे एका ब्राह्मणापेक्षा जास्त अवघड असते. म्हणून खरा व्रतस्थ क्षत्रिय ब्राह्मणांपेक्षा जास्त श्रेष्ठ असतो. तू पितरांची व इष्ट देवतांची नियमितपणे पुजा अर्चना करत असशिल. तसें करण्यामुळें जर कांही अनिवार्य पाप कर्म त्याच्या हातून झाले तर त्याचे स्वर्गस्थ पितर आणि दैवते त्याला सावरून घेतात. त्याशिवाय सत्पात्र दानं करून तू तुझ्या पापापासून मुक्ती प्राप्त करू शकतोस. चांगल्या कर्माने अनवधानाने (मुद्दाम ठरवून नाही) घडलेल्या पापकर्माचे निराकरण होत असते. गरीबांना अन्नदान, मुक्या जीवांना आश्रय

अशी विविध कामं करून तू ते साध्य करू शकतोस. परंतु, जे पाप तुझ्याकडून बुद्ध्या (जाणून बुजून) झाले असेल त्याचे निराकरण अशा कृत्याने होत नाही हे सुद्धा चांगलेच ध्यानात असू दे. तशा पापांसाठी तुला तपस्या, व्रतस्थता, सत्त्वशिलता अशा जीवन जगण्याने मुक्ती कदाचित मिळू शकते. म्हणून जाणून बुजून पाप कर्म करणे शहाण्या माणसांने टाळणेच श्रेयस्कर असते. आत्मप्रौढी, त्यातून उत्पन्न होणारा उर्मटपणा आणि त्यातून जे वागणे होते ते पापकारक असते म्हणून ते दोष तुमच्यात उत्पन्न होणार नाहीत असें पहावे. सगळे जग जिंकणे ही तुझी जबाबदारी आहे असें समजून तुम्ही कामं केलीत तर तुम्हाला स्वर्गाचे द्वार उघडेल त्यात शंका नको. तेथे कायम सुखात रहाल. अशा प्रकारे राजाने त्याचे वर्तन ठेवले पाहिजे. आज ज्या दुर्दैवी अवस्थेत तुम्ही अहात त्याचा फार विचार करू नका. हा काळ तुमच्या सोशिकतेच्या परीक्षेचा आहे असें समजून त्यातून बाहेर पडा. राजा सहनशिल व शांत प्रवृत्तीचा असावा लागतो ते तू ह्यामधून सिद्ध करणार आहेस. काळ तुमची परीक्षा घेत आहे, जो त्यातून यशस्वी होऊन येतो त्याचे भवितव्य थोर असते. प्रत्येकाला अशा परीक्षांना सामोरी जावे लागते म्हणून त्याचा त्रास करून घेणे अज्ञानीपणाचे लक्षण समजले जाते. तुम्ही कितीही महान असला तरी काळ तुमच्या पेक्षा जास्त प्रबळ असतो हे समजून रहा. काळ सर्वांची परीक्षा घेत असतो. त्यातून कोणाचीही सुटका होत नाही. अशा परीक्षेतून यशस्वीरित्या बाहेर येणे भुषणावह असते. त्याकरतां शांत चित्त, मर्यादा, संयम हे गुण तुमच्यात असावे लागतील. अरे राजांनो, मी जे हे सांगितले त्यावर विचार करा, त्याकडे दुर्लक्ष करू नका. आपण उच्च कुळात जन्मला अहात त्याला शोभेल असें वागा". युधिष्ठीर त्यानंतर बोलतो, "अहो मुनीवर, आपल्या आज्ञेचे पालन मी व माझे बंधू प्रामाणिकपणे करतील असे मी आपल्याला आश्वासन देत आहे. माझ्या बद्दल सांगावयाचे तर माझ्यामध्ये लोभ, मोह, वासना, दुरभिमान असें कोणतेही दोष नाहीत. तुमच्या आज्ञांचे पालन करणे मला फार सोपे आहे". वैशंपायन बोलतात, प्रज्ञावंत मार्कंडेयांचे ऐकल्यानंतर तेथे ऐकणारे पांडवांसह सगळे श्रोतृगण आनंदाने प्रफुल्लीत झाले. त्याचप्रमाणे, मुनींनी जे युगांबद्दल सांगितले ते ऐकून ते सगळे सूज्ञ जन आश्चर्य करत होते.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाची सदोतिसावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग अडतिसावा

जनमेजय वैशंपायन ऋषींना विचारतो, "ब्राह्मणांचे श्रेष्ठत्व मार्कंडेयाच्या तोंडून पांडवांच्या निमित्ताने आपण मला सांगितले ते चांगलेच ध्यानात आले आहे. तसेंच जर आणखीन कांही असेल तर ते सुद्धा मार्कंडेयांच्या मुखातून मला ऐकावयाचे आहे ते सांगा". त्यावर वैशंपायन सांगू लागतात, मार्कंडेय पुढे सांगतात, एके काळी एक राजा होऊन गेला. त्याचे नांव होते परिक्षीत. त्याचे राज्य अयोध्येत होते. तो इक्ष्वाकू घराण्यातील होता. तो एकदा मृगया करण्यासाठी अरण्यात गेला होता. त्याने एक हरीण हेरले व त्याचा तो त्याच्या घोड्यावरून पाठलाग करू लागला. ते हरीण त्यांना खूप आतमध्ये त्या अरण्यात मनुष्यवस्ती पासून दूर  घेऊन गेले. तेथे जात असतांना तो व त्याचा घोडा दोघेही थकून गेले. तेथे त्याला भर वनात एक सुंदरसे सरोवर दिसते. ते दोघे त्या सरोवरात स्नान करतात आणि तहान भागवतात. घोड्याला तो तेथील कमळाचे देठ व गवत खाण्यास देतो. आपला थकवा काढण्यासाठी तो राजा त्या तलावाच्या एका बाजूस आराम करण्यासाठी बसतो. त्याला एक सुमधूर गाणे ऐकू येऊ लागते. त्याला समजत नाही, ज्या परिसरात कोणी नाही मग हे मधूर स्वर कोणाचे असू शकतील? तो आजुबाजूला त्याची नजर फिरवतो तेव्हां त्याला एक रुपगर्विता तेथे दिसते, ती तेथील जंगली वनस्पतीची फुलं जमा करत होती. फिरत फिरत ती मुलगी त्याच्या जवळ येऊन पोहोचते. तीला पाहून तो राजा परिक्षीत तिला वाचारतो, "अहो सुंदरी, तू कोण आहेस? तू कोणाची आहेस"? ती मुलगी त्याला सांगते, मी कुमारीका आहे. त्यावर तो राजा तिला विचारतो, "तू माझी होशिल कां"? ती मुलगी त्यास सांगते, "जर मला पाण्यापासून दूर ठेवण्याचे वचन तू देऊ शकत असशिल तर मी तुझ्याशी लग्न करण्यास तयार आहे नाही तर नाही".

राजा ती अट मान्य करतो व तिच्याशी लग्न करतो व तेथेच राहू लागतो. थोड्या काळानंतर त्याचे सैन्य त्याला शोधत तेथे येते व राजाला भेटते. राजा परिक्षीत त्याच्या सुस्वरुप पत्नीला घेऊन रथात चढतो व आपल्या राजधानी कडे रवाना होतो. तेथे तो तिच्या बरोबर राहू लागतो. परिक्षीत राजा तिच्यात एवढा गुंतून जातो कीं, राज्य

कारभाराकडे त्याचे दुर्लक्ष होते. त्याचे मंत्री काळजीत पडतात. त्याना काय करावे ते समजत नाही. ते राजमहालातील इतर दास्याना विचारतात काय मामला आहे. त्या सांगतात, राजा त्या नवीन राणीबरोबरच असतो व त्या बायका मंत्र्याला सांगतात किं, त्या राणीला पाण्याचे भय वाटते म्हणून तिला पाण्यापासून दूर ठेवण्याच्या सुचना राजांने दिल्या आहेत.

ते ऐकल्यावर ते मंत्री एक कृत्रिम तलाव तयार करतात. त्या तलावावर मोत्याच्या जाळीचा गालिचा अंथरतात. सभोवार सुंदर फुलं असलेले वृक्ष लावतात. तो परिसर सुशोभित करतात. त्यात राजाला रहाण्याची व्यवस्था करतात. त्यानंतर तो मंत्री राजाला भेटून सांगतो, तेथे एक सुंदर वन आहे, तेथे पाणी नाही तरी तुम्ही तुमच्या नव्या राणीला घेऊन तेथे राहू शकाल. तेथे भटकत असतांना त्याला तहान लागते. त्याला व त्याच्या राणीला एक माधवी जातीच्या फुलांची वेल दिसते. ती त्याची फुल काढण्यासाठी वेलीजवळ जाते. त्या ठिकाणी गेल्यावर त्यांना एक पाण्याचा तलाव दिसतो व त्याबरोबर ती मुलगी त्या पाण्यात पडते. राजा परिक्षीत तिला शोधण्याचा खूप प्रयत्न करतो. परंतु, त्याला ती आढळत नाही. राजा तो तलाव उपसण्याचा हुकूम देतो व जेव्हां तो तलाव रिकामा होतो तेव्हां त्यांना तेथे एक बेडकीण तळाला बसलेली तो पहातो. त्याला वाटते किं, त्या बेडकिणाने त्याची पत्नी खाऊन टाकली. त्यामुळें राजा सगळ्या बेडकांवर रागावतो. तो इतका रागावतो किं, सगळे बेडूक ठार मारण्याचा आदेश देतो. राजा असा हुकूम काढतो किं, जर कोणाला त्याची भेट घ्यावयाची असेल तर त्या इसमांने तीन मारलेले बेडुक दाखवावे लागतील. त्यामुळें त्याच्या राज्यातील बेडकांची मोठी हत्या सुरू होते. तसे झाल्याने बेडकांचा राजा आयु परिक्षीताला संन्याशाच्या रुपात भेटतो व सांगतो कीं हे त्याने बंद करावे. राजा त्याचा बेडकांवर राग कां आहे त्याचे कारण सांगतो. ते ऐकल्यावर बेडकांचा राजा त्याला सांगतो किं, ज्या मुलीशी त्याने लग्न केले आहे ती त्याची मुलगी आहे. ती मायावी विद्येत प्रवीण आहे. बेडकांचा राजा नंतर सांगतो किं, त्याच्या मुलींने बर्याच मानवी राजांना अशारितीने फसवलेले आहे. तिचे नांव आहे, सुशोभना व बेडकांच्या राजाचे नांव आहे, आयु. तो आयु बेडकांचा राजा त्याला सांगतो किं, हे नाहक पाप तो करत आहे ते त्याने थांबवावे. शांत होऊन नेमके काय झाले आहे ते समजून घेण्याचा

त्याने प्रयत्न केला पाहिजे. सगळ्या बेडकांचा नाश करण्याचा आततायीपणा करणे थांबवावे. राजा त्याला सागतो, ती कशीही असली तरी मला ती पाहिजे व त्याप्रमाणें ती त्याला परत मिळावी असें तो आयुला सांगतो. त्यानंतर आयु त्याला सुशोभना मानवी रुपात देतो. तीला आयु सांगतो, हो तुझा नवरा तुझ्यावर फार प्रेम करत आहे तरी त्याला फसवू नकोस. आयु आपल्या कन्येला सांगतो किं, तू बर्याच राजांना फसवले आहेस म्हणून तुझ्या पोटी जे जन्मतील ते ब्राह्मणांचा उपमर्द करतील. त्यानंतर तो निघून जातो. तिला मिळवल्यावर परिक्षीत राजा मोठे पराक्रम करत सगळे जग जिंकतो. त्याला सुशोभना पासून तीन मुलं होतात. त्यांची नाव होती, साल, दाल आणि वाल. कालांतराने रिवाजानुसार परिक्षीत राजा संन्यासाश्रमात जातो तेव्हां मोठा मुलगा साल ह्याला गादीवर बसवतो.

साल एकदा मृगया करण्यासाठी वनात जातो व एका हरणाच्या पाठी त्याचा रथ पाठलाग करत असतो परंतु, त्याला तो हरण मिळत नाही. साल त्याच्या सारथ्याला विचारतो, ह्या हरणाला पकडण्यासाठी आपले घोडे कमी पडतात. त्यावर तो सारथी सालला सांगतो, त्यासाठी वामदेवाचे घोडे पाहिजेत. त्यावर साल राजा त्याला विचारतो, वामदेवाच्या घोड्यांबद्दल मला सगळे सांग नाहीतर मी तुला मारून टाकीन. असे बोलण्याचे कारण सारथी प्रथम राजाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करतो. तसे करण्याचे कारण सारथी वामदेवाच्या शापाला घाबरत असतो. शेवटी राजाला तो सारथी वामदेवाच्या घोड्यांची माहिती सांगतो किं, ते घोडे मनाच्या वेगांने पळतात. ती ऐकल्यावर राजा साल त्याला आज्ञा करतो कीं, ताबडतोब वामदेवाच्या आश्रमाकडे जांवे. तेथे पोहोचल्यावर राजा साल त्या ऋषीला सांगतो, "अहो पवित्र ब्राह्मणा, मला एका चपळ हरणाचा पाठलाग करावयाचा आहे त्यासाठी मला आपला घोडा मिळाला तर बरे होईल. वामदेव त्याला सांगतो कीं, त्याचे काम झाल्यानंतर त्याचा घोडा राजाने परत केला पाहिजे. राजा त्या अटीवर ते दोन घोडे साल ताब्यात घेतो. परंतु, त्याचे काम झाल्यावर तो ती दोन घोड्यांची जोडी वामदेवाला परत करत नाही. साल त्याच्या सारथ्याला बोलतो, "असें घोडे राजाच्याच कडे असले पाहिजेत, त्या ऋषीकडे त्यांचे काय काम"? ते हरण पकडल्यावर राजा त्या दोन घोड्यासह आपल्या राजधानीकडे थेट जातो. राजा पोटात पाप असल्यामुळें ते घोडे

त्याच्या वाड्याच्या आतल्या कक्षात लपवून ठेवतो. वामदेव विचार करतो, राजा तरूण आहे, चांगली घोड्यांची जोडी मिळाली आहे म्हणून त्याची बुद्धी फिरली असावी. त्याला राजाच्या पोरकटपणाची किंव येते तो त्याचा शिष्य अत्रेय ह्याला बोलावतो. त्याला सांगतो एक महिन्यानंतर त्या राजाकडे जाऊन आपली घोड्यांची जोडी घेऊन ये. राजाने ती घोड्यांची जोडी परत केली पाहिजे. अत्रेय साल कडे जाऊन त्याच्या गुरूचा आदेश सांगतो. राजा त्याला सांगतो, "ब्राह्मणाला अशा घोड्यांची काय गरज"?

अत्रेय घोड्यांशिवाय आश्रमात परत येतो. ते पाहिल्यावर ऋषी वामदेवाला फार रांग येतो. वामदेव स्वतः रागाच्या भरात साल कडे जातो. राजा त्यालासुद्धा दाद देत नाही. ते पाहून वामदेव त्याला त्याने दिलेल्या वराची आठवण करून देतो. त्याला वामदेव सांगतो जेव्हां ब्राह्मणाची क्षत्रिय अवज्ञा करतात तेव्हां वरुणदेवाची फास त्याला लागतो, त्याचीसुद्धा आठवण करून देतो. ते ऐकल्यावर तो उर्मट राजा त्याला उत्तर देतो, हे दोन उत्तम बैल आहेत, ते बलवान आणि आज्ञाधारक सुद्धा आहेत, ते तुम्ही त्या घोड्यांच्या बदल्यात घेऊन जा. ते तुमच्या जास्त उपयोगाचे आहेत. वेदाज्ञेनुसार सुद्धा ते उचीत आहे. वामदेव त्याला सांगतो, वेदाच्या गोष्टी नंतरच्या काळातील असतात, आता ह्या काळात जे उचीत ते करावे. वामदेव त्याला सांगतो मला प्रवास करण्यासाठी माझे घोडे पाहिजेत, शेतीसाठी नाही. त्यावर राजा उर्मटपणे त्याला सांगतो. "मग, हे दोन गाढव आहेत, ते न्या कारण, ते तुम्हाला जास्त शोभतील नाहीतर चार घोडे देतो जे तुमच्या साठी चांगले असतील. परंतु, मी कोठल्याही परिस्थितीत हे दोन घोडे तुम्हाला देणार नाही. कारण असें घोडे फक्त राजाकडेच चांगले दिसतात". ते ऐकल्यावर वामदेव त्या उद्धट सालला ऐकवतो कीं, "जर माझी तपस्या श्रेष्ठ असेल तर चार राक्षस येऊन तुला ठार मारतील. ते तुझ्या शरीराचे चार तुकडे करून टाकतील". ते ऐकल्यावर राजासुद्धा ऐकेरीला येतो व वामदेवाला बोलतो, "जर तू एक ब्राह्मण असून मला ठार मारण्याच्या गोष्टी करतोस तर मी राजा आहे, माझ्या एका आज्ञेने मी तुला व तुझ्या शिष्याला जमिनीवर झोपवून तलवाराने मारू शकतो हे सुद्धा लक्षात ठेव". वामदेव राजाला पुन्हा त्याने दिलेल्या शब्दाची आठवण करून देतो पण व्यर्थ. तो राजाला ऐकवतो कीं, "राजा जर त्याने दिलेला शब्द पाळत नसेल व त्या ऐवजी लोकांना लुबाडत असेल तर त्या राजाला जगण्याचा अधिकार नसतो. तू दिलेला शब्द

पाळत नाहीस म्हणून तुला मी शिक्षा करणार आहे. तू मला व माझ्या शिष्यांना शिक्षा करण्याची गोष्ट करत आहेस, तुला माहित आहे, ब्राह्मणाला कोणीही मनुष्य मारू शकत नाही. त्याला विचारांनी अथवा शब्दाने किंवा कृतीने कोणीही इजा करू शकत नाही. जो असे करण्याचा प्रयत्न करतो तो नाश पावतो".

एवढे बोलल्यावर मार्कंडेय पुढे सांगतात, वामदेवाने असें बोलल्यावर तेथे चार राक्षस उत्पन्न होतात. त्यांचे रुप भयंकर होते, त्याच्या हातात घाबरवणारी हत्यारं होती. ते साल राजाला मारण्यासाठी पुढे सरसावतात. त्यावेळी साल ओरडून बोलतो, "जर मी इक्ष्वाकु घराण्याचा राजा, माझ्या प्रजेची चांगली सेवा केली असेल, जर माझे भाऊ दाल, वाल आणि माझ्या राज्यातील वैश्यांवर मी कधी अन्याय केला नसेल तर माझे संरक्षण पितर करतील. परंतु, मी ते घोडे देणार नाही". तो ते बोलत असतांना ते राक्षस त्याला मारून टाकतात. त्याचा मृत्यू झाल्यामुळें इक्ष्वाकु लोक त्याचा धाकटा भाऊ दाल ह्याला गादीवर बसवतात. ते झाल्यावर वामदेव त्या नव्या राजाला भेटतो व पुन्हा त्याचे घोडे मांगतो. वामदेव त्याला सांगतो जर तू निष्पाप असशिल तर माझे घोडे मला परत करशिल.

दाल त्याच्या मोठ्या भावा सारखाच अविवेकी असतो. तो वामदेवाची मांगणी ऐकतांच क्रोधीत होतो व त्याच्या सारथ्याला आज्ञा करतो कीं, त्याने दालचे चांगले धारदार बाण आणून द्यावे. त्या बाणांनी वामदेवाला जखमी करून तो जमिनीवर पडावा व नंतर कुत्री त्याला फाडून खातील असें तो ठरवतो. ते समजल्यावर वामदेव त्याला ताकिद देतो, "अरे राजा मला माहित आहे तुला एक लहान मुलगा आहे. त्याचे नांव आहे सेनाजित. तो तुला तुझ्या पत्नीपासून झाला आहे. जर तू माझ्याशी कांही करण्याचा प्रयत्न करशिल तर त्या ऐवजी तुझा मुलगाच तेथे माझ्या जागी पडलेला पहाशिल".

मार्कंडेय पुढे सांगतात, दालने मारलेला बाण वामदेवाला न लागता, आतमध्ये त्याच्या मुलास लागतो. त्यामुळें कृद्ध झालेला दाल ओरडून बोलतो कीं, "मी आता ह्या ब्राह्मणाचा नाश करून टाकतो". तो आणखीन बाण फेकणार असतो तेव्हां वामदेव त्याला पुनः ताकिद देतो, "जे बाण तू माझ्यावर फेकणार आहेस ते तू फेकू शकणार नाहीस". ते ऐकल्यावर राजा ओरडून बोलतो, "अहो इक्ष्वाकु जमातीच्या लोकांनो पहा मी बाण कसा मारतो". जर ह्या बाणाने तो ब्राह्मण मारला गेला नाही तर त्याचे आयुष्य मोठे आहे हे मी

मान्य करीन व त्याची इच्छा पूर्ण करीन". त्यावर वामदेव त्याला सांगतो, तुझ्या बाणाने तू तुझ्या बायकोचा वध आता करणार आहेस. ब्राह्मणाचा वध करण्याचा प्रयत्न करणार्याला अशीच शिक्षा होणार. ते ऐकल्यावर दालची बायको पुढे येते व म्हणते, "अहो मुनी, माझा नवरा नीच स्वभावाचा आहे, त्याला सुधारण्याचे काम मी करत आहे गेली कित्येक दिवस. ह्यापुढे मी ब्राह्मणांची नित्य सेवा करण्याचे आपल्याला आश्वासन देत आहे. तसे करून मी पवित्र स्वर्गात जागा मिळवू इच्छिते". असें राणीचे बोलणे ऐकल्यावर शांत झालेले वामदेव तिला बोलतात, "अहो सुंदरी, तू तुझ्या पतिला वाचवले आहेस तुझ्या अशा बोलण्याने. तुला कोणता आशिर्वाद मी द्यावा ते सांग. जे पाहिजे ते मांग. ती वामदेवाला हात जोडून मागणे सांगते, "माझ्या नवर्याला त्याच्या पापापासून मुक्ती मिळावी आणि त्याचा मेलेला पुत्र पुन्हा जीवंत व्हावा. त्याच्या इक्ष्वाकु घराण्याचा उत्कर्ष व्हावा".
मार्कंडेय पुढे सांगतात, ते राणीचे ऐकल्यावर तिला "तथास्तु", असा आशिर्वाद तो देतो. ते पाहिल्यावर आपली चूक लक्षात आल्यामुळें दाल खजिल होतो व वामदेवाला त्याचे दोन घोडे परत करतो. त्यांच्या पाया पडतो व क्षमा मांगतो.
अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा अडतिसावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग एकोणचाळिसावा

वैशंपायन ऋषी सांगत असतात, त्यानंतर तेथे असलेले ऋषी, ब्राह्मण व पांडव मार्कंडेयांना विचारतात, आम्हाला सांगा ऋषी, वकाच्या दीर्घ आयुष्यामागील रहस्य काय आहे. मार्कंडेय सांगतात, वक राजर्षी होते. त्यांच्या दीर्घ आयुष्याबाबत कोणीही विचारणा करणे अप्रस्तुत आहे. असें त्यांचे बोलणे ऐकल्यावर असमाधानी युधिष्ठीर व त्याचे सगळे बंधू त्याना विनम्रपणे पुनः विचारतात, आम्ही ऐकतो किं, वक आणि दल्व्य हे दोघे अमर ऋषी इंद्राचे चांगले स्नेही होते, आम्हाला कृपया सांगा अहो ऋषीवर्य, त्या दोस्तीचे कारण काय व त्याचा इतिहास काय आहे. ते कसे भेटले वगैरे सगळी माहीती आम्हाला ऐकावयाची आहे. त्यात आनंद व दुःख असें दोनही आहेत असें आम्ही ऐकतो म्हणून त्यात आम्हाला कुतुहल आहे. थोडक्यात तो सगळा वृत्तांत आम्हाला ऐकावयाचा आहे.

मार्कंडेय सांगू लागतात, फार प्राचीन काळातील हे घडलेले आहे, त्यात देव आणि असुरांच्या युद्धाचा संबंध आहे. त्यात जे युद्ध झाले त्यात दानव हरले आणि इंद्र स्वर्गाचा राजा झाला. इंद्र सत्तेवर आल्यामुळें पर्जन्यमान सुधारले व कृषीचा विकास चांगला झाला. सर्व लोक सुखी झाले होते. देवांचे विश्वास नैतिक मुल्यांवर असल्यामुळें न्याय, शांती ह्यांचे राज्य आले होते. जे अशा नैतिक मुल्यांवर श्रद्धा ठेवून होते ते सुखी झाले. दानव राजा वला ह्याचा वध करणारा शक्र त्यामुळें आनंदी झाला होता. तो शतयज्ञी इंद्र त्याच्या ऐरावतावर विराजमान होता. त्याच्या समाधानी प्रजेकडे पहात होता. त्याची नजर तेथे वस्ती करणार्या ऋषींच्या आश्रमाकडे जाते. तेथून वहाणार्या पवित्र नद्या तो पहातो. समृद्ध नगरे आणि सुखात असलेली खेडी, गाव पहात असतो. त्याशिवाय इतर राजे जे प्रजेच्या भल्यासाठी पुण्य मार्गांने काम करत होते त्यांचे कार्य पहात असतो. त्याच्या राज्यातील तळी, तलाव, टाक्या, विहीरी पाण्याने भरलेल्या होत्या. कशाचीच कमतरता नव्हती. त्याची प्रजा आपापल्या कामात वाकबगार होती व त्यांची कामं मोठ्या हुशारीने करत होती. ब्राह्मण त्यांची कर्तव्ये प्रामाणिकपणे करत होते. अशा प्रकारे सगळे पहात तो शतयज्ञी पृथ्वीवर पहाणी करण्यासाठी उतरतो. पृथ्वीवर आल्यावर तो पवित्र आश्रमांकडे

जातो जेथे भरपूर पशु, पक्षी आनंदाने बागडत होते. ते आश्रम समुद्रांच्या किनारांवर होते. पूर्वेकडील वनात घनदाट वनश्री आहे अशा पवित्र जागी तो जातो. तेथे एका आश्रमात तो इंद्र वक ऋषीना बसलेले पहातो. ऋषी वकसुद्धा त्या देवांच्या राजाला, इंद्राला येतांना पहातात व आनंदी होतात. वक ऋषी इंद्राला पाय धुण्यासाठी पाणी देऊन त्याचे स्वागत करतात. त्यानंतर त्याला आसनावर बसण्याची विनंती करतात. पिण्यासाठी पाणी देतात (अर्घ्य देतात) खाण्यासाठी फळं दिली जातात. आशिर्वाद देण्याची क्षमता असलेला वलाचा वध करणारा शतयज्ञी जो चिरंजीव आहे, वकऋषीला विचारतो, "आपण शेकडो वर्षे जीवंत अहात मला सांगा अमर असणार्यांचे दुःख कोणते असते"? मार्कंडेय सांगतात,

ते ऐकून, वक त्याला उत्तर देतो. अयोग्य लोकांबरोबर रहावे लागणे, प्रिय लोकांची ताटातूट होणे, पापी लोकांच्या बरोबर रहावे लागणे अशी दुःखं पृथ्वीवरील अमर लोकांना सहन करावी लागतात. त्याशिवाय आपले आप्त आपल्या समोर मरणे, दुसर्यांवर विसंबून रहावे लागणे, नवीन पिढीबरोबर जुळवून घेण्यातील अडचणी असे प्रश्न अमर माणसास सोडवावे लागतात. निर्धन अवस्थेत रहावे लागणे, ज्यामुळें प्रसंगी अवमान सहन करावा लागणे, ज्याना प्रिय समजलो त्यांनी आपल्याला सोडावे, ज्यांना कुलिनता नाही त्यांना ती मिळणे, व ज्याचा आहे त्यांची त्यांच्या पासून हिरावली जाणे असे अनुभव त्याला सहन करावे लागतात. ते सगळे तुझ्या डोळ्या समोर आहे. तू पहात आहेस कसे कसे दुःखाचे प्रसंग देवांनी, राक्षसानी, असुरानी, गंधर्वांनी, नांगांनी अनुभवले ते तू सगळे जाणत आहेसच. वाईट लोकांबरोबर रहावे लागणे, धनवंतांकडून अपमान होणे, ह्यापेक्षा जास्त दुःखदायक काय असते"? अशी असंख्य उदाहरणे तू नित्य पहात आहेस. मूर्ख, पापी मजेत रहात असतांत व तत्त्वनिष्ठ, विद्वान, पुण्यवंत दुःखात पडलेली किती उदाहरणे तुला सांगू. अमर लोकांना मर्त्य लोकांचे हाल त्यांचे आजार पहावे लागतात, त्यामुळें ते दुःखी होतात. भरपूर दुःख अशा अमर लोकांना भोगावे लागतात. ते ऐकल्यावर तो देवांचा राजा शक्र पुनः विचारतो, आता मला सांगा अहो मुनीवर, अमर लोकांच्या जीवनातील सुखाच्या गोष्टी कोणत्या"?

वक सांगू लागतो, विकृत माणसांची साथ नाही अशा परिस्थितीत जेव्हां तो स्वतःसाठी पोटापुरते शाकाहारी जेवण शिजवतो तेव्हां त्याला परम सुख मिळते. जेव्हां तो फक्त

एकटाच असतो तेव्हां तो सुखात असतो. एकटेपणात जे सुख आहे ते इतर कशातही नसते. स्वावलंबित्व माणसाला सुख देते ते इतर कशानेही प्राप्त होत नाही. दुसर्याने दिलेले खाणे कितीही चांगले असले तरी ते दुःखदायक असू शकते. जो दुसर्याच्या घरात फुकटचे खाणे खातो त्याचा धिक्कार असो. असे म्हणण्याचे कारण आपण आपल्याला दिलेले खाणे प्रथम पितरांना अर्पण करतो व मग ते खातो त्यांचा प्रसाद म्हणून हि आपली परंपरा आहे, त्यात जे खाणे दुसर्याने आपल्याला दिले आहे ते पितरांना आपण देऊ शकत नाही कारण ते खाणे पितर स्वीकारत नाहीत म्हणून ते निषिद्ध असते. यजमानाने पाहुणे, नोकर, आपल्यावर अवलंबून असलेले असें सगळे खाऊन जे उरेल ते ब्राह्मणांने खावयाचे असते. सर्व संतुष्ट झाले हे पाहूनच त्यांने आपले जेवण खावयाचे असते हा नियम घरातील गृहिणीलासुद्धा लागू असतो. तसे न करता सर्वांच्या आधी खाणे निषिद्ध असते. सर्वांचे समाधान केल्यानंतर खाणारा ब्राह्मण हजार गाई दान केल्याचे पुण्य मिळवत असतो. तसे व्रतस्थ राहून जो ब्राह्मण रहातो त्याची त्याने केलेली सगळी पापं धुतली जातात. असे व्रतस्थ जीवन जगणार्या ब्राह्मणांच्या हातचे पाणी घेतल्यानेसुद्धा त्याचे पाप धुतले जाते.

अशारितीने विविध विषयांवर गप्पा मारून इंद्र स्वर्गात निघून जातो.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा एकोण चाळिसावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग चाळिसावा

वैशंपायन सांगत असतात, त्यानंतर पांडव मार्कंडेयाला विनंती करतात, "अहो मुनी, आपण आम्हाला ब्राह्मणांचे सांगितले आता आम्हाला सांगा कुलिन क्षत्रियांची लक्षणे कोणती असतात". ते ऐकल्यावर ऋषी मार्कंडेय सांगू लागतात, "ऐका आता मी काय सांगतो ते, त्यातून तुम्ही कुलिन क्षत्रियांचे समजू शकाल. एक राजा ज्याचे नांव होते सुहोत्र, जो कुरु वंशाचा होता, एका ऋषीची भेट घेण्यासाठी गेला होता. ती भेट झाल्यावर तो परतत होता तेव्हां त्याला उशिनराचा मुलगा सिवी त्याच्या रथाने समोरून येतांना दिसतो. ते दोघे राजे एकमेकांना अभिवादन करतात. परंतु, ते एकमेकांना समान दर्जाचे मानतात व त्यासाठी कोणी दुसर्याला जाण्यासाठी वाट द्यावी प्रथम त्यावर त्यांच्यात वाद होऊन तेढ निर्माण झाली. जो कमी दर्जाचा त्यांने उच्च दर्जाच्या क्षत्रियांस वाट द्यावयाची असते असा परिपाठ त्या काळात होता. ज्याअर्थी ते दोघे स्वताला एकाच दर्जाचे समजत होते दोघेही मागे हटण्यास तयार नव्हते. अशारितीने ते दोघेही वाट अडवून बसले होते. त्यावेळी नारदमुनी ते पहातात किं, ते दोन राजे एकमेकांची वाट अडवून बसले आहेत. ते विचारतात, "अरे तुम्ही असें एकमेकांची वाट अडवून कां बसला अहात"? ते ऐकल्यावर ते दोघेही नारदांना सांगतात, "अहो मुनी, आपण असें कृपया बोलू नका. प्राचीन ऋषींनी सांगितले आहे कीं, जो उच्च त्याच्यासाठी नीचांनी नमावयाचे असते. जर मी त्याला वाट दिली तर तो माझ्यापेक्षा उच्च आहे असें मी मान्य केल्यासारखे होईल आणि ते मला मान्य नाही म्हणून आम्ही एकमेकांची वाट अडवून बसलो आहोत".

ते त्यांचे स्पष्टीकरण ऐकल्यावर नारद एक श्लोक गाऊन दाखवतात, त्याचा अर्थ असा आहे, "अरे कुरुवंशी राजांनो, जो वाईट आहे तो चांगल्याशीसुद्धा वाईट वागतो, जो चांगला आहे तो उपकार समजून वाईटाशीसुद्धा चांगला वागतो, असें देवांत समजत असतात हे तुम्हाला माहीत आहेकां? येथे पहा, उशिनराचा मुलगा सिवी तुझ्यापेक्षा जास्त चांगला असेल तर तो तुला वाट देईल अशासाठी कीं, तो जास्त चांगला आहे, त्यात उच्चतेचा अथवा नीचतेचा विषय नसतो. येथे कोण जास्त चांगला हा विषय असतो ते समजून

घ्यायला पाहिजे. जो जास्त चांगला तो प्रथम बाजूला होईल व कमी चांगल्याला वाट देईल. चांगुलपणाने जे जिंकले जाते ते कायम तुमच्याकडे रहाते. जे बळजबरीने जिंकले जाते ते केव्हातरी तुमच्या कडून निघून जाते. सत्पात्र चांगुलपणा दाखवणे हे सर्वश्रेष्ठ आयुध आहे जे न मारता दुसर्याला जिंकण्यात मदत करत असते". नारद असें बोलून गप्प होतात. त्यानंतर ते कुरु वंशाचे राजे काय योग्य ते समजून त्यातील एक दुसर्याचे कौतुक करत त्याला वाट देतो. अशारितीने क्षत्रियाचे तेज शौर्यापेक्षा चांगुलपणात जास्त असते असें नारद सुचवून जातात. चांगुलपणा, माणूसकी, भूतदया ह्या स्वर्गाला जाण्याच्या शिड्या आहेत जर त्यांचा उपयोग सत्पात्र होत असेल तर, मात्र अपात्र झाल्यास त्यामुळें पाप वाढत असते असें नारद पुढे सांगतात.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा चाळीसावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व
## भाग एकेचाळिसावा

मार्कंडेय पुढे सागत असतात, आता आणखीन एक गोष्ट ऐका, एके दिवशी राजा ययाति, नहुषाचा पुत्र, त्याच्या राजगादीवर बसलेला होतो. त्याच्या भोवती त्याची प्रजा होती. त्यावेळी एक ब्राह्मण त्याच्याकडे विनंती करतो कीं, त्याला त्याच्या गुरूला देण्यासाठी कांहीं धन हवे आहे. म्हणून तो ब्राह्मण राजाला सांगतो कीं, त्याच्या गुरूला तो ठरलेल्या रिवाजानुसार कांहीं रक्कम देऊ लागतो व ती रक्कम राजाने त्या ब्राह्मणाला दान करावी म्हणजे तो ब्राह्मण ती देऊन गुरूचे ऋण फेडेल. ते ऐकल्यावर राजा विचारतो "काय ठरले आहे तुझ्यात व तुझ्या गुरूत रक्कमे बद्दल ते सांगावे". ब्राह्मण सांगतो, "अरे राजा, जेव्हां कोणी मदत मागतो, त्याची किंमत रहात नाही. लोक तुच्छतेने त्याच्याकडे पहातात म्हणून मी तसे आपल्याला सांगितले". राजा त्याला बोलतो, "मी कधीही दिलेल्या दानाचा विचार करत नाही कारण ते दान मी देवाला दिले आहे असें समजत असतो. त्यामुळें त्याच्यावर बोलणे अप्रस्तुत असते. त्याची साधी चौकशीसुद्धा करावयाची नसते". असें बोलून राजा ययाति, त्या ब्राह्मणाला एक हजार गाई दान करतो. ययाति त्यावेळी सगळ्याना सागतो, "मी माझ्याकडे दान मागणार्याला कधीही दुखवत नाही. तो ब्राह्मण मला प्रिय असतो". त्यानंतर तो ब्राह्मण दान घेऊन निघून जातो.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा एकेचाळिसावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व
## भाग बेचाळिसावा

वैशंपायन जनमेजयाला सांगत असतात, ते पंडुचे पुत्र त्या ऋषीला पुन्हा विचारतात, कुलिन क्षत्रियांच्या वैभवाच्या गोष्टी आम्हाला सांगा.

त्यावर मार्कंडेय सांगू लागतात, एके काळी दोन राजे होते, एकाचे नांव वृषदर्भ आणि दुसर्याचे सेदुक होते. त्यांचे नितीशास्त्राचे ज्ञान पूर्ण होते त्याशिवाय ते शस्त्र अस्त्रांत सुद्धा प्रवीण होते. सेदुक वृषदर्भाला त्यांच्या बालपणापासून ओळखत होता. सेदुकांने मनातल्या मनात ठरवले होते कि, तो ब्राह्मणाला दान करतांना फक्त सोने अथवा चादी देईल. अशाच एके वेळी एक ब्राह्मण त्याचे शिक्षण संपवल्यावर गुरूला दक्षिणा देण्यासाठी सेदुकाकडे दान मागावयाला जातो. तो राजाकडे एक हजार घोडे दानात मागतो. ते ऐकल्यावर सेदुक त्या ब्राह्मणाला सांगतो किं, तो घोडे देणार नाही, त्यासाठी त्याने वृषदर्भाकडे त्याला जाण्यास सांगितले. तो सांगतो ब्राह्मणाला कीं, वृषदर्भ मोठा गुणी राजा आहे तो तुला दान करील. ब्राह्मण त्यानंतर वृषदर्भाकडे जाऊन घोड्याचे दान मागतो. त्यावर वृषदर्भ त्याला चाबकाने मारतो. त्यावर ब्राह्मण त्याला विचारतो किं, त्याला राजांने कां मारले? चिडून तो ब्राह्मण वृषदर्भाला शाप देणार असतो तेवढ्यात राजा त्याला विचारतो कीं, त्याला कोणी त्याच्याकडे पाठवले? ते ऐकल्यावर ब्राह्मण सांगतो कीं, सेदुकाने पाठवले. मी प्रथम त्याच्याकडे गेलो होतो परंतु, त्याने मला सांगितले कीं, जर घोडे दानात पाहिजे असतील तर आपल्याकडे जाणे योग्य म्हणून मी आपल्याकडे आलो आहे. ते ऐकल्यावर राजा शांत होतो व सांगतो कांहीं काळजी करू नकोस. मला आज जी खंडणी मिळेल ती मी तुला देऊन टाकीन. पुढे तो राजा दिलगिरी व्यक्त करत बोलतो कीं, ज्या माणसाला मी नाहक चाबकाने मारले, त्याची मी संतुष्ट करूनच बोळवण करीन. असें सांगितल्यानंतर तो राजा त्या दिवसाची सगळी खंडणी त्या ब्राह्मणाला दान करतो. त्यात हजारापेक्षा जास्त घोडे त्या ब्राह्मणाला मिळतात.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा बेचाळिसावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व
## भाग त्रेचाळिसावा

मार्कंडेय पुढे सांगतात, एके दिवशी लोकपाल देव ठरवतात कीं, ते पृथ्वीवर येऊन राजा सिवीच्या चांगुलपणाची परीक्षा घेतील. एकमेकांशी गप्पा मारत ते अग्नी व इंद्र पृथ्वीवर येतात. त्यात अग्नी कबुतराचे रुप घेतो व इंद्र घारीचे. असें दाखवतात कीं, ते कबुतर घारीच्या हातून सटकून पळाले व सिवीच्या कडे गेले आहे. त्यासाठी ते कबुतर सिवीच्या मांडीवर येऊन बसते. धारीच्या रुपातील इंद्र कबुतराला शोधत तेथे पाहोचतो. तो पहातो कीं, कबुतर राजाच्या मांडीवर बसले आहे. तेथे असलेले राजपुरोहित राजाला सांगता कीं, "ते कबुतर स्वतःला घारीपासून वाचवण्यासाठी आपल्या आश्रयास आले आहे. तरीसुद्धा असे सांगतात, कीं अशाप्रकारे एक कबुतर मांडीवर येऊन बसणे हा एक अशुभ शकुन असतो. राजाने त्या अशुभ शकुनापासून बचावण्यासाठी कांहीं दान करून टाकावे". ते ऐकल्यावर ते कबुतर राजाला सांगते, " अरे राजा, मी एक मुनी आहे, कबुतराच्या रुपात. त्या रुपात असतांना ही घार माझ्या मागे लागली म्हणून मी तुझ्या आश्रयाला आलो आहे. मला कबुतर न समजता एक वैदिक ब्राह्मण समजून माझे संरक्षण करावे. माझ्या बोलण्यावर विश्वास ठेव. पाहिजे तर मी वेद बोलून दाखवू कां? कृपया मला त्या घारीच्या ताब्यात देऊ नका". तसें कबुतराचे बोलणे झाल्यावर घार राजाला सांगते, अरे राजा तू मोठा न्यायी आहेस असे सगळे सांगतात. तुला विधात्याच्या रचनेचा चांगलाच अभ्यास असेल असें मी समजतो. अरे राजा हे माझे खाद्य आहे विधात्याच्या योजनेनुसार हे तू समजू शकतोस. निसर्गाच्या नियमानुसार मला ते कबुतर खाणे योग्य आहे. माझ्या त्या अधिकाराचे तू अवमुल्यन करू नकोस. जरी गेल्या जन्मी तो तुझा बाप असला तरी ह्या जन्मी तो एक माझे खाणे बनून आला आहे. राजा आजुबाजूला पहात लोकांना विचारतो, "अरे मंडळींनो कोणी घारीला इतके स्वच्छ मानवी भाषेत बोलतांना आधी पाहिले आहे कां? मला सांगा आता ह्यात पुण्याचा मार्ग कोणता? संरक्षण मागणार्या कबुतराला अभय देणे कीं, घारीला तिचे नैसर्गिक खाद्य खाण्यास देणे"? जर मी त्या कबुतराला संरक्षण नाकारले तर भविष्यात मलासुद्धा जेव्हां संरक्षणाची गरज असेल ते मिळणार नाही. हे

विधात्याच्या रचनेप्रमाणे आहे. त्याच प्रमाणे, जर मी घारीला तिचे खाद्य मिळण्यास बाधा केली तर भविष्यात मलासुद्धा कधी खाद्य मिळण्यात बाधा होऊ शकते त्याच विधात्याच्या रचनेनुसार, अशा परिस्थितीत मी काय करावे ते सांगा". राजा त्या सभेत असलेल्या पंडितांना विचारत असतो. असें सांगतात, जो अभागीला संरक्षण नाकारतो त्याची मुलं त्याच कारणांने मरून जातात. त्याच्या शेतात पाणी रहात नाही. तशा माणसाचे पितर स्वर्गातून बाहेर फेकले जातात. असें सांगून राजा सिवी त्या घारीला सांगतो एक वेळ मी तुला एक आख्खा बैल भाजून देतो तो तू हवा तसा खा पण ह्या कबुतराची अभिलाषा धरू नकोस कारण त्याला मी संरक्षणाचे आश्वासन दिले आहे. राजाचा ते प्रस्ताव एकून घार रागावून बोलते, "अहो राजा, मला तो बैल नको कारण ते माझे शिकार नाही. असे आयते खाणे हे भिक मागण्या सारखेच नीचतेचे असते. मला माझी शिकार हे कबुतर पाहिजे. आम्ही क्षत्रिय बाण्याचे पक्षी आहोत आम्ही भिकेचे खात नाही, स्वतः मिळवून खातो त्यामुळें हा तुझा प्रस्ताव मला मंजून नाही". राजा पुनः पुन्हा त्या घारीला तो बैल स्वीकारण्याची विनंती करतो पण घार ऐकत नाही आणि त्या कबुतरावरील आपला हक्क सोडत नाही. राजा त्या घारीला सांगतो, "तुझ्यासाठी दुसरे कांहीं करण्यास तयार आहे पण ह्या कबुतराचा विचार सोडून दे". ते ऐकल्यावर घार राजाला सांगते, "जर तुझी तशी इच्छा असेल तर मला त्या कबुतराच्या भारा एवढे मांस तुझ्या शरीराचे काढून दे". ते ऐकून त्या सभेतील सगळे हळहळतात कारण सिवी तसे करणार हे त्या सभेतील प्रजेला माहित होते. राजाने कबुतराचे वजन केले पण ते त्याच्या सगळ्या वजनापेक्षा जास्त झाले. ते झाल्यावर घार एकदम अंतर्धान पावते. राजा कबुतराला विचारतो, "ही घार कोण होती"? त्यावर कबुतर सुद्धा त्याचे खरे अग्नीरुप धारण करतो व सांगतो घार इंद्र होता आणि आम्ही तुझ्या वचनबद्धतेची परीक्षा घेत होतो. तुला जी जखम झाली आहे ती लवकरच भरून निघेल व तू सिवी, सुरथाचा मुलगा, मोठा कल्याणकारी राजा म्हणून ख्यातनाम होशिल. सगळे देव आणि ऋषी तुझे कौतुक करत रहातील. तुझ्या मांडीचा जो भाग कापला आहे त्यातून एक पराक्रमी पुत्र उत्पन्न होईल त्याचे नांव कपटरोमन असेल. तो सौरथावर राज्य करील त्यांचे सौंदर्य व पराक्रम अतुलनीय असतील.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा त्रेचाळीसावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग चव्वेचाळिसावा

वैशंपायन सांगत असतात, पुन्हा एकदा पंडुची मुलं मार्कंडेयांना आग्रह करतात, आम्हाला राजांच्या वैभवाची आणखीन कांहीं माहिती सांगा. मार्कंडेय सांगू लागतात, एकदा अश्वयज्ञ होता राजा अष्टकाच्या राज्यात, जो राजा विश्वामित्राच्या घराण्यातील होता. त्या यज्ञाचे आमंत्रण तीन भावांना दिले होते. त्यांची नांव प्रतर्दन, वसुमन आणि सिवी अशी होती. ते सगळे राजा उशिनराचे पुत्र होते. यज्ञ पूर्ण झाल्यावर राजा अष्टक त्याच्या रथातून त्याच्या भावंडांबरोबर जात होता. त्यांना वाटेत नारद मुनी भेटतात. ते त्याला नम्रपणे बोलतात, आपण आमच्या सह रथातून यावे. नारद त्यांच्या रथात चढतात. त्यातील एकांने ज्याने नारदांची कृपा प्राप्त केली होती तो बोलला, अहो पुण्यवंत, मला आपल्याला कांही विचारावयाचे आहे. ऋषी त्याला प्रश्न विचारण्याची सम्मती देतात. तो बोलू लागतो, "आम्ही सगळे दीर्घ आयुष्याची देणगी घेऊन आलो आहोत. त्याशिवाय आम्ही पुण्यवंतसुद्धा आहोत. त्यामुळें आमच्या येथील जीवनानंतर आम्ही स्वर्गात जाणार आहोत. तरी मला सांगा आमच्यातील कोण प्रथम स्वर्गातून पुनः पृथ्वीवर फेकला जाईल"? तो प्रश्न ऐकल्यावर नारद चटकन सांगतात, "हा अष्टक प्रथम खाली येणार आहे". प्रश्न करणारा विचारतो, "कोणत्या कारणांने ते होईल"? नारद सांगू लागतात, त्याचे असें झाले, एकदा हा अष्टक मला घेऊन रथातून जात होता, गांवाबाहेर बरीच जनावरं चरत होती. मी त्याला विचारले, "हे पशुधन कोणाचे"? अष्टक मला म्हणाला ते मी दुसर्याला दिले आहेत. ह्या त्याच्या उत्तरामुळें तो कम अस्सल ठरला व म्हणून तो फार काळ स्वर्गात राहू शकणार नाही. कारण त्या उत्तरात त्याचा गर्व स्पष्ट व्यक्त झाला होता. ते स्पष्टीकरण ऐकल्यावर त्यांच्यातील एक विचारतो, म्हणजे आम्ही उरलेले तीन जण स्वर्गात रहाणार. त्यातील कोण त्यानंतर पहिला खाली येणार. ऋषी सांगतात, प्रतर्दन. त्यावर पुन्हा ते विचारतात, "कां"? त्याचे कारण मी कांहीं वेळ त्याच्या घरात राहिलो आहे. तो एकदा मला त्याच्या रथातून घेऊन जात होता, वाटेत एक ब्राह्मण त्याला अडवतो व विनंती करतो कीं, त्याला एक घोडा पाहिजे. त्यावर प्रतर्दन त्याला शब्द देतो कीं परत आल्यावर देईन. त्यावर तो

ब्राह्मण त्याला बोलतो, मला त्वरित घोडा पाहिजे. त्या बरोबर प्रतर्दन त्याच्या रथातील एक घोडा वेगळा करून त्याला देतो. ते पहाताच आणखीन एक ब्राह्मण येतो व रथाचा दुसरा घोडा मागतो. प्रतर्दन दुसरा घोडा काढून देतो. त्यानंतर आमचा रथ उरलेल्या घोड्याच्या मदतीने जात होता. त्यावेळी आणखीन एक ब्राह्मण त्याला घोडा द्यायला सांगतो. तेव्हां प्रतर्दन त्याला आश्वासन देतो कीं परत आल्यावर देईन. परंतु पुनः एक ब्राह्मण येतो व तो उरलेला घोडासुद्धा मागतो. तेव्हां पुढचा मागचा कसलाही विचार न करता प्रतर्दन त्याला तो तिसरा घोडा देतो व स्वतः रथ खेचत नेऊ लागतो तेव्हां तो स्वताशी म्हणतो, आता ब्राह्मणांसाठी मागण्यासारखे कांहीं नाही. असें बोलून राजाने हार मानली असे दिसत होते. त्यात त्याचा नाराजीचा सुर होता म्हणून त्याने केलेली सगळी दान व्यर्थ झाली होती. म्हणून तो त्याचे पुण्य संपल्यावर खाली पृथ्वीवर येईल. नारदमुनी ते सांगितल्यावर पुन्हा ते विचारतात, "आता जे दोन उरले त्यातील कोण प्रथम पृथ्वीवर फेकला जाईल"? ताबडतोब नारद बोलतात वसुमन. पुन्हा ते विचारतात कारण काय तेव्हां नारद सांगतात, माझ्या भटकंतीच्या काळात मी एकदा वसुमनच्या घरी गेलो होतो. त्यावेळी त्याच्या घरात ब्राह्मण स्वस्तीवाचन विधी करत होते. स्वर्गातून एक रम्य रथ मिळावा म्हणून तो विधी होत होता. मी तेथे हजर होतो, तो विधी पूर्ण झाल्यावर तो अपेक्षित रथ त्यांना दिसू लागला. मी त्या रथाची स्तुती केली. ते ऐकल्यावर वसुमन मला म्हणाला ऋषी आपल्याला तो रथ फार आवडला आहे तेव्हां तो तुमच्यासाठी ठेवा. त्यानंतर कांही समयानंतर मी तो रथ मागण्यासाठी त्याच्याकडे गेलो तेव्हां तो म्हणाला, हा रथ तुमचाच आहे. पुनः एकदा मी त्याच्याकडे गेलो असतां त्या रथाची पुन्हा स्तुती केली तेव्हां मात्र तो मला म्हणाला आपण माझ्या रथाची आधीच खूप प्रशंसा केली आहे असें बोलला खरे पण मला तो रथ देण्याचे बोलला नाही. असा त्याच्या वागण्यामुळे तो स्वर्गातून खाली फेकला जाईल. शेवटी ते विचारतात आता आपण स्वर्गाजवळ आलो आहोत तर कोण पहिला आत जाईल व कोण पाठी राहिल. त्यावर नरद उत्तर देतात, अर्थात् सिवी आत जाईल व मी मागे राहीन. त्यावर ते विचारतात, "असें कां"? नारद त्यांना सांगतात त्याचे कारण मी सिवीच्या बरोबरीचा नाही. त्याचे कारण एकदा एक ब्राह्मण सिवीकडे गेला होता. तो सिवीला बोलतो अरे सिवी मी तुझ्याकडे जेवावयाला आलो आहे.

सिवी त्याला बोलतो, बोला मी काय करावे ते सांगा. तो ब्राह्मण त्याला बोलतो तुझा पुत्र वृहग्गर्भ आहे. त्याला मारून त्याचे मांस मला खाण्यास दे. सिवीने त्याप्रमाणे आपल्या मुलाला मारून त्याचे मांस शिजवून तयार केले व त्या मुलाचे शीर हातात घेसतेता तो त्या ब्राह्मणाला शोधू लागतो. त्याला इतर माणसे सांगतात किं, तो ब्राह्मण निघून गेला आहे. तो ब्राह्मण त्याच्या नगरात जाऊन सगळे कांहीं जाळून उद्ध्वस्त करत असल्याचे त्याला समजले. सिवी विचलित न होता त्या रागावलेल्या ब्राह्मणाला शांतपणे सांगतो किं, आपले जेवण तयार आहे. ते ऐकून तो ब्राह्मण आश्चर्यचकीत झालेला खाली मान करून उभा रहातो. सिवी ब्राह्मणाला संतुष्ट करण्यासाठी बोलतो, "अहो ब्राह्मण, आपले जेवण तयार केलेले आहे ते स्वीकारावे". तो ब्राह्मण पहातो सिवी एका हातात मांस शिजवलेले ताट व दुसर्या पहातात त्याच्या मुलाचे मुंडके असा त्याच्या पुढे उभा होता. ते पाहून तो ब्राह्मण चिडल्याचा अविर्भाव करत सिवीला सांगतो, "ते आता तूंच खा"? सिवी त्यावर बोलतो "जशी आज्ञा", आणि तो ते खाण्यासाठी तयार होतो. त्यावर तो ब्राह्मण सिवीचा हात पकडतो व ते खाण्यापासून त्याला थांबवतो आणि बोलतो, "अरे सिवी, तू तुझा क्रोध पूर्णतया घालवला आहेस. तू ब्राह्मणाला कांहींही दान करण्यास तयार आहेस हे तू सिद्ध केले आहेस. तू धन्य झालास". त्यानंतर तो ब्राह्मण सिवीची स्तुती करू लागतो. त्यावेळी सिवी बाजूला पहातो तो त्याला त्याचा पुत्र एका पाळण्यात निजलेला दिसतो, त्याच्या अंगावर रत्नजडीत दागिने होते आणि त्याच्या हातातील ते मुंडके नाहीसे झालेले होते. त्यानंतर सिवी त्या ब्राह्मणाकडे पहातो तो त्याला साक्षात विधात्री तेथे उपस्थित असलेली दिसते. विधात्री स्वतः त्या राजर्षीची परीक्षा घेण्यासाठी आली होती. त्यानंतर त्याचे कारभारी सिवीला बोलतात, "आपण एका मोठ्या परीक्षेतून गेला अहात". त्यावर सिवी त्यांना सांगतो, "मी हे केले ते कांहीं प्रसिद्धी साठी अथवा, कोणावर छाप मारण्यासाठी अथवा धन प्राप्तीसाठी अथवा कांहीं सिद्धी प्राप्त करण्यासाठी अथवा मजा वाटावी म्हणून, अशा कोणत्याही उद्देशाने केले नाही. ते माझ्या स्वभावाचा भाग आहे म्हणून माझ्याकडून झाले आहे. कोठलेही कार्य करतांना त्यात पाप नाही एवढेच फक्त मी पहातो. पुण्यवंत ज्या गोष्टी करतात त्या नेहमी स्तुत्य असतात. त्या सिवीच्या वागण्यामुळें मी तसें सांगितले, नारद सांगतात.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा चव्वेचाळिसावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग पंचेचाळिसावा

वैशंपायन पुढे सांगतात, पंडुची मुलं व तेथे जमलेले ऋषी मार्कंडेयांना विचारतात, "अहो ऋषीवर आम्हाला सांगा, तुमच्या सारखा आणखीन कोण आहे ज्याला आपल्या इतके दीर्घ आयुष्य लाभले आहे"?

मार्कंडेय सांगू लागतात, "एक राजर्षी आहे, त्याचे नांव आहे इंद्रद्युम्न. त्याचे पुण्य कमी झाल्यामुळें तो स्वर्गातून पृथ्वीवर फेकला गेला आहे. तो ओरडतो खाली येत असतांना माझे पुण्य कमी झाले आहे. असें बोलत तो मला भेटला व मला विचारले त्याने, मला तू ओळखतोस कां? मी त्याला उत्तर दिले, आपण आपल्या अध्यात्मिक उद्धारासाठी गृहस्थाश्रम स्वीकारत नाही. एका गांवीसुद्धा एका रात्रीपेक्षा जास्त रहात नाही. अशाप्रकारचे जोग्याचे जीवन जगणार्या मला तुझ्या, एका गृहस्थाश्रमीच्या, काय अडचणी असतात ते समजू शकत नाही. म्हणून मी तुला समजू शकत नाही. तरी तुला एक सांगतो किं, त्या हिमालयात एक घुबड रहाते त्याचे नांव आहे प्रवर्कर्ण. तो माझ्यापेक्षा जास्त वृद्ध आहे, त्याला जाऊन भेट. कदाचित तो तुला सांगू शकेल. हिमालयाच्या ज्या भागात तो रहातो तो येथून खूप दूर आहे. ते ऐकल्यावर इंद्रद्युम्न घोडा झाला व मला त्याच्यावर बसण्यास सांगितले व आम्ही दोघे प्रवर्कर्णाकडे निघालो. तेथे गेल्यावर राजाने त्या घुबडाला विचारले, "अहो घुबड, आपण मला ओळखता कां"? तो घुबड थोडावेळ विचार करतो व नंतर बोलतो, "मी तुला ओळखत नाही". त्यानंतर इंद्रद्युम्न त्याला विचारतो, "तुझ्यापेक्षा जास्त वृद्ध कोणी आहे कां ह्या जगात"? तो प्रश्न ऐकल्यावर तो घुबड सांगतो, तेथे एक सरोवर आहे त्याचे नांव आहे इंद्रद्युम्न त्या तलावात एक करकोचा रहातो, त्याचे नांव आहे नडीजंघ. तो माझ्यापेक्षा वृद्ध आहे. त्याला जाऊन विचार तुला जे विचारावयाचे आहे ते. तेथे राजा जातो व त्या करकोचाला विचारतो, "तू राजा इंद्रद्युम्नला ओळखतोस कां"? त्यावर तो वृद्ध पक्षी थोडा विचार करतो व बोलतो, तो पक्षी सांगतो, त्याला राजा इंद्रद्युम्न माहित नाही. त्यावर राजा त्याला विचारतो, "तुझ्यापेक्षा जास्त वृद्ध कोण आहे"? तो पक्षी सांगतो, "ह्याच तलावात एक कासव रहातो तो माझ्यापेक्षा जास्त वृद्ध आहे त्याचे

नांव आहे अकुपर, तो माझ्यापेक्षा जास्त वृद्ध आहे". राजा त्या करकोचाला विनंती करतो कीं त्या कासवाला बाहेर बोलाव. त्यावरून तो नडीजंघ कासवाला हांक मारतो व वर बोलावतो आणि सांगतो कीं ह्या राजाला तुझ्याशी कांहीं विचारावयाचे आहे. त्याची हांक ऐकून अकुपर कासव बाहेर येतो. त्याला राजा विचारतो, "तू राजा इंद्रद्युम्नाला ओळखतोस कां"? तो प्रश्न ऐकल्यावर त्या कासवाच्या डोळ्यांतून अश्रू येऊ लागतात व तो थरथरू लागतो, कांहीं दुःखाने असें वाटते. थोडावेळ तो नुसता स्तब्ध रहातो. त्यानंतर तो हात जोडून बोलतो, "मी कसा नाही ओळखणार इंद्रद्युम्नाला. त्यानेच हा तलाव त्याच्या खिल्लाराच्या पायांनी खोदला होता. येथे यज्ञ केले होते. त्यासाठी असंख्य पशु त्याने दान केले होते. ह्या तलावाचे नांव त्याच्या नांवावरून आले आहे. मी त्यावेळे पासून येथे रहात आहे". असें त्याचे बोलणे होत असतांना स्वर्गातून रथ येतो व राजाला परत स्वर्गात आमंत्रण मिळते. तुझे स्थान तुझी वाट पहात आहे. तुझे कर्तृत्व महान आहे. लवकर तुझ्या स्थानी ये असा निरोप त्याला त्या आकाशवाणीने दिला. माणसाच्या उत्तम गुणांची जेव्हां पृथ्वीवर चर्चा सुरू होते तेव्हां ती स्वर्गात यथावकाश पोहोचते. जोवर ती प्रसिद्धी असते तोवरच तो माणूस स्वर्गात राहू शकतो. जेव्हां त्याच माणसाच्या कृष्ण कृत्यांची चर्चा पृथ्वीवर सुरू होते तेव्हां ती सुद्धा स्वर्गात पोहोचते आणि परिणाम स्वरुप तो पृथ्वीकडे फेकला जातो. अशी एकंदर व्यवस्था असते मार्कंडेय सांगतात पांडवांना. म्हणून माणसाने त्याच्या उत्तम गुणाची जगाला माहीती होईल असें पहावयाचे असते. केवळ पुण्यवान असून भागत नाही तर त्याची जनतेत ख्याती व्हावी लागते तर स्वर्ग मिळतो. तसें मोक्षाबाबत नसते, मोक्ष प्राप्तीसाठी माणसाला त्याच्या पुण्याची ख्याती करण्याची आवश्यकता नसते. त्याच्या पुण्याची नोंद लिंगदेहात होणे पुरेसे असते. कारण सगळे लिंगदेह ब्रह्माशी जोडलेले असतात. ते ऐकल्यावर राजा इंद्रद्युम्न बोलतो मी ह्या सगळ्या वृद्धाना त्यांच्या योग्य स्थळी पोहोचवतो व नंतरच स्वर्गाकडे जातो. त्याप्रमाणे तो त्यांना त्यांच्या जागी नेतो व मगच रथात बसून स्वर्गाकडे जातो, हे सगळे मी पहात होतो. मार्कंडेय सांगतात.

वैशंपायन पुढे सांगतात, पांडव मार्कंडेयांना बोलतात कीं, त्यानी इंद्रद्युम्नाला मदत करून एक चांगले काम केले. तेव्हां मार्कंडेय त्यांना सांगतात, देवकी पुत्र कृष्णानेसुद्धा तसेंच राजर्षी नृग जो नरकात खचत होता, त्याला वाचवून स्वर्गात नेले होते.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा पंचेचाळिसावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग सेहेचाळीसावा

वैशंपायन सांगत असतात, राजा युधिष्ठीर मार्कंडेयांना ते सगळे इंद्रद्युम्नाचे ऐकल्यावर विचारतो, "अहो मुनी मला सांगा, स्वर्गात स्थान मिळवण्यासाठी कोणत्या परिस्थितीत माणसाने दान धर्म करावयाचे असतात. आणखीन सांगा, गृहस्थाश्रमी, त्या आधी व वृद्धाश्रमी माणसांने काय करावे स्वर्गाचे दरवाजे उघडण्यासाठी? मला सांगा अहो ऋषीवर, दानाचे काय विशेष श्रेय आहे पुण्य प्राप्तीमध्ये? केव्हां व कोठल्या परिस्थितीत दानकर्म पुण्य प्राप्तीच्या दृष्टीने व्यर्थ समजले जाते"?

मार्कंडेय सांगतात, जीवन अयशस्वी होण्याची चार कारणे सांगितली आहेत. त्याचप्रमाणे दानाचे सोळा प्रकार पुण्यप्राप्तीच्या दृष्टीने व्यर्थ असतात. ती सोळा व्यर्थ दान अशी आहेत,

१. असें मानले जाते ज्याला पुत्र नाही त्याचे जीवन व्यर्थ आहे.

२. तसेंच ज्याने पुण्यकर्म करण्याचे बंद केले आहे त्याचे जीवनसुद्धा व्यर्थ असते.

३. तसेंच जो दुसर्याचे खाणे खातो.

४. तसेंच जो स्वतःसाठी खाणे शिजवतो पण पितरांना, देवांना आणि पाहुण्याना देण्याचे विसरतो.

५. ज्याने सत्कर्म करण्याचे बंद केले आहे (अपात्र) अशांना दान करणे व्यर्थ असते.

६. तसेंच पाप मार्गाने कमावलेले धन दान करणे व्यर्थ असते.

७. भ्रष्ट ब्राह्मणाला दान करणे व्यर्थ असते.

८. भ्रष्ट गुरूला दान करणे सुद्धा व्यर्थ समजले जाते.

९. खोटे बोलणारा,

१०. पापमय जीवन जगणारा,

११. नमकहराम, विश्वासघातकी

१२. गांवात सगळ्या लोकांसाठी यज्ञ करणारा,

१३. पैसे घेऊन वेद शिकवणारा,

१४. जो ब्राह्मण शुद्रांसाठी जेवण शिजवतो,

१५. जो जन्माने ब्राह्मण आहे परंतु, कर्माने तसा राहिलेला नाही,

१६. मजूरी काम करणारा.

अशी सोळा दानं व्यर्थ असतात.

कशाच्या तरी भितीमुळें जे दान केले जाते त्याचा त्याला उपयोग पुढच्या जन्मी होतो. ब्राह्मणाला दिलेले दान कधीही व्यर्थ जात नाही ते त्याला त्याच्या वृद्धपणी उपयोगाचे असते. म्हणून ज्याला स्वर्गात जागा पाहिजे त्यांने सत्पात्र ब्राह्मणाला दान करत रहावे. ते दान कशाचेही असले तरी चालते.

ते ऐकल्यानंतर युधिष्ठीर त्यांना विचारतो, मला सांगा, ब्राह्मण जो चारही वर्णाच्या लोकांकडून दानं घेतो त्यांना कसे मदत करत असतो आणि स्वतः कसा त्यामुळें उद्धारीत होत असतो.

मार्कंडेय सांगतात, ब्राह्मण जप करतो त्या दान करणार्यासाठी त्याचा फायदा त्या दान करणार्याला होत असतो. त्याशिवाय योग्य पावित्र्याच्या अवस्थेत असलेला ब्राह्मण मंत्र साधनेने होम यज्ञ करून, वेद शिकवून तो स्वतः व त्याच्यासह त्याला दान करणारे अशा सगळ्यांचे भले करत असतो. ते करण्या आधी तो ब्राह्मण त्या देवतेला विनंती करत असतो कीं, त्या जपाचा, मंत्राचा, होम यज्ञाचा फायदा त्या यजमानाला (दान करणारा) होवो. त्या बरोबर त्या देवता जर प्रसन्न झाल्या तर त्याचा फायदा त्या पौरोहित्य करणार्या ब्राह्मणाला सुद्धा होत असतो. त्यामुळें कदाचित एकादा माणूस ब्राह्मणाच्या प्रयत्नाने स्वर्गात जाऊ शकतो. अरे राजा, तू पितराची आणि कुलदेवतेची पुजा करत असशिल तर सुद्धा तू परमानंदात जाऊ शकतोस. तू जरी अश्रद्ध असलास तरी ह्या कर्मकांडामुळें तुझा फायदा होत असतो कारण, ते करणार्या ब्राह्मणाच्या श्रद्धेने काम होत असते. त्यासाठी सत्पात्र ब्राह्मणाची योजना अशा कामांसाठी करावयाची असते. म्हणून नेहमी सत्पात्र ब्राह्मणाचा आदर करत जा. त्यांना दानं करत जा म्हणजे त्याच्या सदिच्छा तुला उपयोगी येतील. श्राद्धाच्या जेवणात अयोग्य (अपात्र) ब्राह्मणाला आमंत्रण देऊ नये कारण तशी काळजी घेतली नाही तर तो श्राद्ध विधी व्यर्थ ठरू शकतो. त्याच प्रमाणे खूप जास्त श्वेत वर्णी (गोरा) आणि फार सावळे ब्राह्मणसुद्धा श्राद्धासाठी बोलावू नयेत. ज्याना असाध्य व्याधी आहेत, ज्यांची नख वाढलेली आहेत किंवा विकृत आहेत, जे विधवेला जन्मले

आहेत, जे अनैतिक नात्याने जन्मले आहेत, जे व्यापार करतात, जे शस्त्रांशी संबंधित आहेत, अशा अयोग्य ब्राह्मणाना श्राद्धासाठी बोलावले तर तो यजमान कापरासारखा जळून जाईल. तसेंच मुके, आंधळे, अपंग, बहिरा अशांना बोलावले तर त्यांच्या बरोबर वेदाचे ज्ञान असलेले ब्राह्मण असले पाहिजेत. आता सांगतो तुला कोणाला तू दान करावेस. अशा ब्राह्मणाला नेमावे जो इतका ज्ञानी आहे किं, तो स्वताला व यजमानाला सांभाळू शकेल. अशा बर्याच नकारात्मक शक्ती आपल्या भोवती वावरत असतात त्यांच्या पासून संरक्षण देण्याची क्षमता त्या ब्राह्मणांत असते जो सत्वशिल, व्रतस्थ आणि तपस्वी आहे. पवित्र अग्नीच्या समाधानासाठी त्याला साजुक तुपाचे अर्घ्य अथवा सुगंधी फुलं आणि चंदनाच्या संमिधा देण्यापेक्षा अभ्यागतांचे सन्माननीय प्रकारे स्वागत करणे जास्त श्रेयस्कर असते. म्हणून पाहुण्यांचा सन्मानपूर्वक आदर करणे हे यज्ञप्रसंगी महत्वाचे असते. जो यजमान त्याच्याकडे आलेल्या पाहुण्याला पाय धुण्यासाठी पाणी देतो, थकलेल्या पायांना तेलांनी मालिश करतो, खाणे देतो व निजण्यासाठी चांगला बिछाना देतो तो यमाच्या घरी सुखात रहातो. ब्राह्मण अतिथीची सेवा करणे ज्यात त्याचे चांगले स्वागत करणे, त्याला पाय धुण्यासाठी पाणी देणे, त्याला चंदनाची उटी देणे, त्याच्या दिमतीस हजर रहाणे हे त्याला गाईचे दान करण्यापेक्षा जास्त महत्वाचे असते. अर्थात एक कपिला गाय देण्याने त्याची अनेक पापापासून मुक्तता होते. म्हणून एक कपिला दागिन्यानी मढवून ब्राह्मणाला दान करावयाची असते. अरे भरत वंशाच्या राजा आणखीन कांही गोष्टी लक्षात ठेव. त्या अशा, चांगल्या कुळातील वेद जाणणार्या माणसास दान (मदत) करणे चांगले असते. तसेंच जो गृहस्थाश्रमी आहे व त्याच्या कुटूंबाच्या जबाबदारीने खचला आहे अशा सज्जनाला दान करणे योग्य असते. जो पवित्र अग्नी सांभाळतो परंतु तुझ्याशी त्याचा कांही संबंध नाही अशाला मदत करणे चांगले असते. जे संपन्न आहेत त्यांना कधीच मदत करू नये. तशा मदतीची किंमत शून्य असते. ब्राह्मणाला एक गाय जरूर दान करावी कारण, अरे राजा, ती त्याचे एकमेव खाद्य असते. जो आठ बत्ती (?) शुद्ध सोने दान करतो त्याने शंभर सोन्याची नाणी दिल्यासारखे असते. जो शेतीच्या कामाचा बैल ब्राह्मणाला दान करतो त्याची मृत्यू नंतर रवानगी थेट स्वर्गात होते. जो सज्जन, शेतीची जमीन दान करतो त्याच्या सगळ्या कामना पूर्ण होतात. प्रवास करून थकलेला जर कोणाचे नांव घेऊन जेवण मागत असेल

तर त्याला जेवण द्यावे त्याचे नांव न विचारता कारण, जेवण देण्यासारखे पुण्याचे काम नाही. दुसर्या कशाही पेक्षा जेवणाचे दान सर्वश्रेष्ठ समजले जाते. म्हणून अन्नदान करून माणूस पुण्य सहज मिळवू शकतो. म्हणून अन्नं ब्रह्म, असें म्हणतात. तसेंच आजार्याची सेवा करणे हेसुद्धा मोठे पुण्यकर्म समजले जाते. ती सेवा आणि ते अन्नदान कोणतीही अपेक्षा न धरता केली तरच पुण्य प्राप्त होते पण जर कांही अंतस्थ उद्देशाने हि सगळी दानं केली (पुण्य मिळवणे असा उद्देश असेल तरी) तर ती पुण्यप्रद ठरत नाहीत. ह्या अशा सगळ्या गोष्टी मागे एकच उद्देश योग्य समजला जातो व तो आहे ब्रह्माची सेवा करण्याचा उद्देश. ब्रह्माची सेवा हांच केवळ मान्यवर उद्देश सगळ्या चांगल्या कामात असला पाहिजे. त्यातून पुण्य मिळते अथवा नाही हे विचारात असतां कामा नये. अरे पंडुपुत्रानो, माणसाचा जन्म होतो ब्रह्माची सेवा करण्यासाठी हे लक्षात असूद्या. सगळे योगक्षेम माणसांने ब्रह्माची सेवा असें समजून करावयाचे असतात. हे सगळे जग त्यातूनच उत्पन्न झाले आहे. त्याशिवाय मधूर वाणी हा पुण्य प्राप्तीचा एक मार्ग आहे. अन्नाप्रमाणे पाणी देणे हेसुद्धा तितकेच पुण्यप्रद असते. तळी खोदणे, तलाव बांधणे, शेतीसाठी कालवे करणे, विहीरी बांधणे अशी काम राजाने करावयाची असतात त्याने त्याला भरपूर पुण्य मिळते. मधूर वाणी असलेल्याला यम कधी रागवत नाही. सत्वशिलता (चांगुलपणा साध्या शब्दात) माणसाला स्वर्गाजवळ नेतो. यमाच्या दरबारात अन्न व पाणी देणारे प्रथम विचारात घेतले जातात, त्यानंतर मधूर वाणी असलेले येतात. असे असले तरी ते सगळे एकाच ठिकाणी पोहोचतात.

वैशंपायन पुढे सांगतात, ते ऐकल्यावर पांडवांची उत्सुकता अधिक वाढली ते आणखीन विचारू लागले. "अहो ऋषी, आम्हाला सांगा, यमाचे स्थान माणसापासून किती दूर आहे. ते अंतर कसे पार करावयाचे? त्यासाठी काय साधन वापरावयाचे"?

मार्कंडेय सांगू लागतात, "अहो राजश्री हा तुमचा प्रश्न एका मोठ्या गुपिताशी निगडीत आहे. त्या प्रश्नावर ऋषी खूप बोलतात व प्रशंसासुद्धा करतात. त्याचा संबंध आहे तुमच्या पुण्य प्रभावाशी. जितके तुमचे पुण्य जास्त तितके तुम्ही यमाशी चांगले संबंध प्रस्तापित करू शकता. म्हणाल तर ते अंतर कांहींही सांगतात, ते अतर ऐंशी हजार योजने इतके आहे. पण हे कल्पनेचे आहे. जे पुण्यात कमी असतात त्यांना ते अंतर पार करणे फार अवघड असते व जे पुण्यवंत असतात त्याना ते अंतर कमी असते. त्या वाटेत असंख्य अडचणी

आहेत परंतु, त्या पार करण्यासाठी तुमचे पुण्य पुरेसे असते. पुण्य हे एकच साधन आहे ज्याच्या मदतीने तुम्ही ते मोठे अंतर लिलया पार करू शकता. पुण्यवंताना त्या रस्त्यावरून जातांना यमाचे सेवक मदत करतात व जे पुण्यवंत नाहीत त्यांना त्रास देतात. त्यामध्ये ज्यांने जे दान केले त्याप्रमाणे त्याला ते यमदूत मदत करतात अन्न दान करणार्यांना प्रवासात खाद्य मिळते जे वस्त्र देतात त्यांना उत्तम कपडे मिळतात. ज्यानी पाणी दिले त्यांना सगळे खाद्य व पेये मिळतात. त्यामुळें त्यांचा प्रवास सुखाचा होतो म्हणून प्रत्येकांने त्याच्या जीवंतपणी सत्पात्र दान करत रहावे. मार्कंडेय पांडवांना सांगतात. ज्यानी गोदान केले ते त्यांची सगळी पाप धुतल्यामुळे आनंदात प्रवास करत असतात. ज्यांनी उपवास केले त्यांना रथातून जायला मिळते, जे रथ हंसपक्षी ओढतात. ज्यांनी सहा रात्री उपवास केले त्यांचा रथ मोरपक्षी ओढतात. जे एकदा जेवून उपवास करतात त्यांना कोणताही त्रास न होता ते यमाकडे सुखाने जातात. तहानलेल्याला पाणी जे त्यांच्या जीवंतपणी देतात त्यांना पुष्पोदक नावाच्या अमृता सारख्या पाण्याच्या नदीवर रहावयाला मिळते ज्यात अवर्णनीय सुख असते. हे झाले चांगले काम करणार्यांचे आता सांगतो पाप करणार्यांचे कसे होते. पापी लोकांच्या अंगातून पू येऊ लागतो. त्यांचा यमाकडचा प्रवास दुःखमय असतो. तुझ्याकडे असलेले ब्राह्मण यात्रेत चालून थकले आहेत. त्यांचे पाय कमजोर झाले आहेत ते तुझ्याबरोबर चालत होते. त्यांचे पाय मातीने मळलेले आहेत. प्रवासी त्याला अन्न देणार्याचे नांव काढतात. त्या अन्नासाठी ते मोठ्या आशेने तुझ्याकडे येतात. ते तुझा आदर करतात. असा तो तुझा पाहुणा असतो व तो ब्राह्मण असतो. सगळे देव इंद्राच्या मार्गदर्शनाखाली ब्राह्मणांच्या मागून जात असतात. जेव्हां त्या ब्राह्मणाचा आदर केला जातो. जर अशा लायक ब्राह्मणांचा सन्मान झाला नाही तर देव नाराज होतात. म्हणून अरे पांडवा, तू तुझ्या सह असलेल्या ब्राह्मणांचा नेहमी आदरपूर्वक सन्मान करत जा. आता पर्यंत बरेच कांहीं मी तुम्हाला सांगितले आहे, आणखीन काय सांगू ते विचार". असें बोलून मार्कंडेय थांबले.

युधिष्ठीर विचारतात, अहो महान महर्षी, आपले पुण्य व नैतिकतेचे ज्ञान परिपूर्ण आहे. म्हणून मी पुन्हा आपल्याला विचारू इच्छितो किं, आपण पुन्हा पुन्हा पवित्र गोष्टींचा उल्लेख करत असता ज्यांचा संबंध पुण्य आणि नैतिकतेशी असतो. त्याचे विवरण कराल तर बरे

होईल. मार्कंडेय सांगतात, अरे राजा, तुला इतकी उत्कंठा आहे म्हणून आता सांगतो, पुण्य प्राप्ती करण्याचे व पापनाशाचे तंत्र जे पवित्र आणि गुप्त ज्ञानात गणले जाते. जे फक्त गुरू शिष्याला देत असतो. असें कारण अकारण त्याची चर्चा करणे व्यर्थ असते. नीट लक्ष देऊन ऐक, त्यात ब्राह्मणांचे श्रेष्ठत्व तुला समजेल. तू भरत श्रेष्ठी, कपिला गाय तीर्थक्षेत्र ज्येष्ठ पुश्कर तीर्थक्षेत्री, दान देण्याने जे पुण्य प्राप्त होते ते तेथे असलेल्या ब्राह्मणांचे पाय धुण्याने मिळते इतके असते. जोवर ब्रह्माच्या पृथ्वीवर पाणी आहे व त्या पाण्याला ब्राह्मणांनी स्पर्श केला आहे ते पितर कमळाच्या पानाच्या द्रोणाने पित असतात. जर ब्राह्मण अतिथी आला व त्याची नम्रपणे विचारपूस केली तर अग्नीदेव संतुष्ट होतो. जर अशा ब्राह्मणाला बसण्यासाठी आसन दिले तर साक्षात शक्र संतुष्ट होतो. जर ब्राह्मणाचे पाय धुतले तर सगळी पितरं समाधानी होतात. जर त्याला जेवण दिले तर प्रजापति खूष होतात. गाभण गाय व्यायतांना जेव्हां तिच्या योनीतून ते वासरू बाहेर येत आहे व त्या वासराचे तोंड आणि पाय दिसत आहेत व ते त्या योनीतून जमिनीवर पडते अशावेळी ती गाय देण्याने पृथ्वीचे दान ब्राह्मणाला केल्याचे पुण्य लागते. अशी गाय दान करणार्याचे स्थान स्वर्गात अनेक युग निश्चित होते. दान मिळाल्यावर ताबडतोब ते ब्राह्मणाला दान केल्याने फार मोठे पुण्य मिळते. अशा माणसाला पृथ्वीचे दान करण्याचे पुण्य मिळते.

जो ब्राह्मण शांतपणे जेवतो व त्याचे हात गुडघ्यात ठेवून बसतो तो दुसर्यांना वाचवतो.

जो ब्राह्मण कोणाशी बोलत नाही, कोणतेही व्यसन करत नाही व ज्याच्या बद्दल कोणी वाईट बोलत नाही, असा ब्राह्मण दुसर्याला वाचवू शकतो. जो ब्राह्मण नित्य नेमाने संहिता वाचतो तो दुसर्यांना वाचवू शकतो. जो ब्राह्मण वेदाचा अभ्यास करतो त्याला लोणी व इतर खाद्य वहावयाचे असतात. यज्ञात वाहिलेले लोणी कधीही व्यर्थ जात नाही. जसे क्षत्रिय शस्त्राने मारतात जी धातुंची बनवलेली असतात तसे ब्राह्मण त्याच्या क्रोधाने मारत असतो (शाप देऊन) जसें इंद्राने वज्र वापरून असुरांचा नाश केला. ब्राह्मणाच्या संदर्भातील नैतिकतेचे व पुण्य प्राप्तीचे विवेचन इतके पुरे". मार्कंडेय त्यांचे विवेचन संपवतात. ते ऐकून तेथे जमलेले मुनी आनंदाने भरून जातात. त्याच प्रमाणे ते विवेचन ऐकून त्यांचे पाप धुतले जाते. हे गुप्त ज्ञान ऐकणारे त्यांच्या पापातून मुक्त होतात. त्यांना पुन्हा जन्म घ्यावा लागत नाही.

युधिष्ठीर विचारतो, "स्वताला शुद्ध राखण्यासाठी ब्राह्मणाला काय करावे लागते? मला ते सगळे समजून घ्यावेसे वाटते". मार्कंडेय सांगतात, ब्राह्मणासाठी तीन प्रकारच्या शुद्धी सांगितल्या आहेत. वाचा शुद्धी, कर्म शुद्धी आणि पाणी वापरण्याने मिळणारी शुद्धी. ज्या ब्राह्मणाला त्या तीन शुद्धी करता येतात तो निश्चितपणे स्वर्गात जातो. जो ब्राह्मण संध्या देवीचे स्मरण सकाळी व संध्याकाळी करतो, जो वेदाची जननी गायत्रीचे जप करतो व ह्या तीन शुद्धी करतो तो स्वर्गात जातो. तो त्याच्या सगळ्या पापांपासून मुक्त होतो. ह्या तीन शुद्धी संपन्न करणारा ब्राह्मण त्याचे अशुभ ग्रहयोग सुधारू शकतो. भयंकर राक्षस त्याला त्रास देऊ शकत नाहीत. त्या तीन शुद्धी करणारा ब्राह्मण स्वतः एकाद्या भडकलेल्या आगीसारखा असतो. तसा ब्राह्मण कोणतेही दान घेण्याने विद्या शिकवण्याने यज्ञ करण्याने किंवा भेटी घेण्याने दोषी ठरत नाही. ब्राह्मण ज्ञानी असो अगर नसो त्याचा कधीही उपमर्द केला नाही पाहिजे. कारण, ब्राह्मण एकाद्या आगी सारखा असतो जसे आग कोठेही असो ती नेहमी शुद्ध समजली जाते तसेंच ब्राह्मणांचे असते. नगरं कितीही सुंदर असली त्यात जर ब्राह्मण रहात नसतील तर त्या नगराला कांहीं किंमत नसते. परंतु, ज्या शहरात वेद शास्त्र संपन्न ब्राह्मण रहातात व त्याचे नित्याचे कर्मकांड सांभाळतात त्या शहराची योग्यता मोठी असते. जरी एकाद्या वनात अथवा शेतात वेदशास्त्र संपन्न ब्राह्मण रहात असेल तर त्याला नगर समजावे. ते तीर्थक्षेत्र समजले जाते. अशा ब्राह्मणाच्या कृपेने राजाचे पाप धुतले जाते. जाणकार सांगतात, ज्याठिकाणी वेदाचे वाचन होते, जेथे पुण्यवान रहातात, ते तीर्थक्षेत्र समजले जाते.

संन्याशाचा दंड धारण केलेला, पाण्याचे अर्घ्य देणारा, डोक्यावर जटा धारण करणारा, हरणाच्या कातड्याचे वस्त्र नेसणारा, अंगावर भस्माचे पट्टे ओढलेला, जप करणारा, अग्नी सांभाळणारा, जंगलात रहाणारा जर मनाने शुद्ध नसेल तर ते सगळे सोग व्यर्थ समजावे. भोगात रमणारा व त्यात गुंतणारा माणूस व्यर्थ समजावा. सुखात अडकणारा अध्यात्मात प्रगती करू शकत नाही. माणसाच्या सहा इंद्रियांपैकी मन असे आहे जे सहजपणे फार चंचल आहे. त्याला नियंत्रित करणे सोपे नसते. बाकीची आहेत नेत्र, कान, नाक, जीभ आणि त्वचा. त्या सगळ्यांचे नियंत्रण मन आणि बुद्धी करत असतात. बुद्धीचे नियंत्रण तर्कशुद्ध पद्धतीने होत असते पण मनाला तर्काचे बंधन नसते त्यामुळें त्याचे काम

बेशिस्तपणे होते व मनाबरोबर ते इंद्रियसुद्धा भरकटत जाते. त्या अनियमित भरकटण्यामुळें पाप कर्म होत असते. मनाचा संयम करणे सोपे नसते. ते करण्यासाठी माणसाला बुद्धीने मनावर ताबा करावयाचा असतो. ज्याला ते जमते तोंच पापविरहीत कर्म करू शकतो. ज्यांना ते जमत नाही ते पाप करतात. अभ्यास व सततचे प्रयत्न हेंच त्याला उत्तर आहे. मार्कंडेय सांगत असतात. त्यासाठी वैराग्यशिलता आचरण्याची गरज असते. त्याशिवाय व्रतस्थता, मर्यादा अशा तत्त्वांचा उपयोग असतो. सामान्य माणूस ते करू शकत नाही. असें समजतात कीं, उपवास, आणि तपस्या करून ते साध्य होईल परंतु ते खरे नसते. मन अशामुळें थोडाकाळ नियंत्रणात येते पण ते फारकाळ टीकत नाही व पुनः मन त्याचे बेशिस्त सुरू करते. अकारण केले जाणारे उपवास व तपस्या त्या माणसाचे शरीर कमजोर करू शकतात. म्हणून ते खरे मार्ग नसतात. खरा मार्ग असतो बुद्धीचा मनावर ताबा वाढवणे. त्याचे शिक्षण गुरूकडून घ्यावे लागते. औदासिन्य विविध भोगाबद्दल वाढवणे हा खरा मार्ग असतो. त्याशिवाय तटस्थता उपयोगाची असते. शरीराच्या गरजेपुरते भोग घ्यावयाचे असतात त्याची मर्यादा समजणे ह्याला बुद्धीची गरज असते. ज्याला शरीराच्या गरजांचे भान असते तो मनावर बुद्धीच्या मदतीने नियंत्रण करू शकतो. एकदा ते नियंत्रण शक्य झाले कीं, बाकीच्या गोष्टी तुलनेने सोपे होत असते. भोगांचे नियंत्रण करणे एवढेच पुरेसे नसते, त्याबरोबर इतरांबद्दल सहानुभूती, आस्था, त्यांच्या अडचणीबद्दल सहानुभूती असणे असें क्षमाशिलतेचे गुण असावे लागतात. सर्वांशी सहृदयतेने वागणारा जरी गृहस्थाक्षमी असला तरी तो मुनी समजावा. त्याची सगळी पाप नाहीशी होतात. केवळ उपवास आणि जप करून केलेली पाप धुतली जात नाहीत. त्यांचे कटू भोग भोगावेच लागतात. अशा चुकीच्या साधनेमुळें ब्रह्माने दिलेले शरीर जे धर्मसाधनेचे एकमेव साधन आहे ते नष्ट होत असते, म्हणून तो खरा मार्ग नसतो हे अरे, युधिष्ठीरा लक्षात असू दे. शरीराला तोशिस न देता पुण्य साधना करावयाची असते. शरीराचे भोग योगक्षेमाच्या मर्यादेत रहातील एवढी दक्षता बाळगणे हेंच खरे असते. त्यालाच इंद्रिय संयमन समजले जाते. ज्या माणसाच्या मनात दुसर्या बाबत अनुकंपा नाही तो त्याच्या मृत्यूनंतरच्या (पिशाच्च अवस्था) अवस्थेत फार कष्ट सोसत असतो. त्याच्या तशा वागण्यामुळें जे पाप त्याला लागते त्यापासून त्याची सुटका होत नाही. त्याचे कटू भोग भोगावेच लागतात. जे

दुःख तो इतरांना देतो तसे सगळे त्याला त्याच्या नंतरच्या काळात भोगावे लागते. त्यांने जरी होमहवन करून कर्मकांड केली तरी त्याचा उपयोग नसतो. पवित्र जीवन [वासना विरहीत आणि प्रेमळ (भूतदया) असें जीवन] आणि पुण्यकर्म त्याला तो मोक्षाचा अनुभव देत असतात. तशा जीवनात त्याला साथ जर उपोषण आणि व्रतस्थता असेल तर जास्त फायदा होत असतो. मिताहार, मितनिद्रा, मितभोग, फळं व कंदमुळं खाणे आणि मौन (ह्या योगक्षेमाच्या मर्यादा) ही व्रतस्थता सांगितलेली आहे. त्यात जर तो संन्याशी असेल तर डोक्याचे केस काढून टाकणे, किंवा जटा धारण करणे, एकाच जागी न रहाणे (भटकत), उघड्यावर निजणे, दररोज उपवास करणे, अग्नी धारण करून त्याची पुजा करणे, अभ्यंग स्नान करणे, किंवा नदीच्या पाण्यात पोहून स्नान करणे, जमिनीवर निजणे, असें जगले तरी जर पावित्र्य आणि व्रतस्थता नसेल तर त्याचा कांहीं उपयोग नसतो. पावित्र्य व व्रतस्थता पाळणारा गृहस्थ अशा संन्याशापेक्षा श्रेष्ठ असतो. पावित्र्यामुळें व्याधी, अपंगत्व आणि मृत्यू ह्यांपासून संरक्षण मिळते. तो उच्चपदी जातो. आपले शरीर त्यात आत्मा नसेल तर एकाद्या ओंडक्या सारखे आहे. त्याला तोशिस देण्यात आत्म्याचा उद्धार होत नाही. आत्मा व शरीर ह्यांचे खरे नाते जो समजला तो त्याबाबतचा जाणकार समजला जातो. त्यासाठी वेदाचा उपयेग होतो. त्याच प्रमाणे आत्मा व विधाता ह्यांचे नाते जो समजतो तो खरा ज्ञानी ठरतो. ते सांगून येत नाही, त्यासाठी तपस्या करावी लागते. ते झाले म्हणजे तो मुक्त झाला असें होते. परंतु त्या दोन नात्या बाबत ज्याच्या मनात संभ्रम आणि शंका आहेत तो कधीही पुढे जाऊ शकत नाही. अशा माणसांने वेदातील श्रृती अथवा स्मृती कितीही वाचल्या तरी ते व्यर्थ असते. अशा चुकीच्या मार्गाने जाणारा भरकटत भटकत रहातो. तो कधीच मुक्त होत नाही. वेदातील ज्ञान जरी खरे असले तरी ते समजण्यासाठी साधना आवश्यक असते ज्या बद्दल मी तुला सांगत आहे. केवळ वेद वाचून, पठण करून कांहीं उपयोग नसतो. अशा वाचनाने माहिती मिळते परंतु, त्याचे ज्ञानात परिवर्तन होणे अपरिहार्य असते. जर ते झाले नाही तर ती माहिती व्यर्थ असते. शरीराच्या बंधनात अडकलेला आत्मा त्या अंतिम सत्याला त्या बंधनामुळें समजू शकत नाही. तरी त्याची माहीती तो त्याच्या बुद्धीने प्राप्त करू शकतो. निरनिराळ्या युगांत देवाच्या व देवतांच्या अस्तिस्वाचे ज्ञान निनिराळ्या प्रकारे होत असते. जगाची जाण

आपल्याला आपल्या ज्ञानेंद्रियांद्वारा होत असते. म्हणून त्या ज्ञानेंद्रियांचे संयमन करणे ह्याला खरे उपोषण समजले पाहिजे. खरी मुक्ती त्या ज्ञानेंद्रियावरच्या नियंत्रणानेच प्राप्त होत असते. ज्ञानेंद्रिय आपल्याला काय माहिती पुरवतात हे आपल्या बुद्धीच्या विवरण करण्याच्या क्षमतेवर अवलंबून असते. चुकीचे विवरण केले तर ज्ञाना ऐवजी अज्ञान प्राप्त होत असते. त्यामुळें साधक मार्गभ्रष्ट होत असतो".

वैशंपायन सांगत असतात, अशारितीने मार्कंडेय तो जटील विषय समजावून देत असतांना युधिष्ठीर त्यांना विचारतो, "अहो ऋषीवर, मला दानाबद्दलचे काय नियम आहेत ते समजावून द्याल तर बरे होईल".

मार्कंडेय सांगू लागतात, "अरे युधिष्ठीरा, त्या दानाबद्दल मला फार आदर आहे. आता मी सांगतो स्मृती आणि श्रृतीमध्ये दानाबद्दल काय सांगितले आहे. श्राद्ध करणे हे एक मोठे दान कर्म असते. जर कोणी अश्वत्थ वृक्षाच्या छायेत केले तर त्याला गजछाया असें म्हणतात, त्याची प्राप्ती मोठी असते. अरे युधिष्ठीरा, जो राजा धर्मशाळा प्रवाशांसाठी उघडतो त्याला अनेक कल्प काळ सुख मिळते. त्यामुळें त्याला सगळ्या यज्ञाचे श्रेय प्राप्त होत असते. अशा ठिकाणी जेथे नदीचा प्रवाह उलट दिशेने पाहत असतो त्या तीर्थक्षेत्री घोड्याचे दान केले तर तो न संपणारे पुण्य प्राप्त करत असतो. जर कोणी (सत्पात्र) अतिथी आला तर त्याला साक्षात इंद्र आला आहे असें समजून त्याची व्यवस्था केली तर जे पुण्य प्राप्त होते त्याची तुलना कोणत्याही पुण्याशी होत नाही. ब्राह्मणाला दही दिले तर ते पुण्य मोठे असते. कांही शुभ योग असतात, त्या प्रसंगी केलेले दान मोठे उपकारक ठरत असते. कांहीं अशी वर्ष असतात त्यात जर दान केले तर त्याचे कित्येक पटीने दान केल्यासारखे फायदे असतात. वर्षाच्या शेवटच्या दिवशी केलेले दान सर्वोत्कृष्ट समजले जाते. ग्रहण काळात दान करणे चांगले समजले जाते. तुला, कन्या, मीन, मिथून आणि सिंह राशीतून सूर्याच्या बाहेर पडण्याच्या शेवटच्या दिवशी केलेले दान चांगले समजले जाते. योग्य वेळी केलेले दान अवेळी केलेल्या दानापेक्षा जास्त श्रेयस्कर असते. राहू दिसत असतांना जे दान केले जाते त्याचे फायदे हजारपट असतात. भूदान श्रेष्ठ दान असते. रथ, इतर प्रकारचे वाहन दान ब्राह्मणाला करणे उत्तम असते. दान एकतर ब्राह्मणाला अथवा शुद्राला करावयाचे असते. दान केल्याने होणारे फळ फक्त पुढच्या जन्मी

प्राप्त होत असते. तसेंच कांही मिळावे म्हणून जर दान केले असेल तर ते व्यर्थ जाते कारण दान ब्रह्माच्या नांवे करावयाचे असते, जणूकाय ते ब्रह्माने केले आहे तुझ्या हातून अशी त्या दान करणार्या यजमानाची प्रेरणा असली पाहिजे. मी दान करतो अशी प्रेरणा असेल तर ते दान व्यर्थ गेले असे समजावे. दान करून तो ब्राह्माची सेवा करत असतो. त्यामुळे त्या दानाने जर ब्रह्म संतुष्ट झाले तरच त्याला त्या दानाचे फळ मिळत असते. सोने, जमीन आणि गाई देणार्याला अग्नी, विष्णू आणि सूर्य अशा स्वर्गातील जागी स्थान मिळत असते. दान केल्याने त्या ऐहिक जीवनात कांहीं मिळत नसते हे लक्षात असू दे. दान देणार्याचे मृत्यू नंतरचे जीवन आनंदमय होत असते. म्हणून कांही अपेक्षा न ठेवता केवळ ब्रह्माची सेवा म्हणून दान करत जावे. म्हणून दान हे सर्वात श्रेष्ठ कर्म समजले जाते.
अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा सेहेचाळिसावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग सत्तेचाळिसावा

वैशंपायन सांगतात, महर्षी मार्कंडेयांकडून राजा इंद्रद्युम्नच्या स्वर्गारोहणाचा इतिहास ऐकल्या नंतर तो त्या ऋषीला आणखीन प्रश्न विचारतो. "आपण सर्वज्ञानी अहात, आपण सगळ्या देवांना, राक्षसांना, दानवांना, नांगाना, अप्सरांना, गंधर्व, यक्ष अशा सगळ्या स्वर्गातील प्रजाती ओळखता. आपण अनेक राजर्षींच्या पिढ्या ओळखत अहात. आम्हाला त्यांच्याबद्दल आणखीन माहीती करून घ्यावयाची आहे तरी आपण आम्हाला ते सगळे सांगाल तर मोठी कृपा होईल. अहो ब्राह्मण, मला सांगा कुवलस्व राजा जो ईक्ष्वाकू घराण्याचा होता त्यांने त्याचे नांव कां बदलले. त्यांने धुंधुमर हे नांव कां घेतले, असे काय झाले ते समजून घ्यावयाचे आहे.

वैशंपायन पुढे सांगतात, ते ऐकल्यावर मार्कंडेय त्या राजा धुंधुमरचा इतिहास सांगू लागले.

मार्कंडेय सांगू लागतात, अरे राजा य्रुधिष्ठीरा, ऐक इतिहास तो मी तुला सागत आहे. त्या राजाची गोष्ट नैतिकते बद्दलची आहे. इक्ष्वाकु घराण्यातील कुवलस्व राजाचे नांव धुंधुमर कां झाले. एक ख्यातनाम ऋषी होते त्यांचे नांव होते उतंक. त्याचा आश्रम एका प्रसंन्न करणार्या वनश्रीत होता. तेथे ऋषी उतंक घोर तपस्या करत होते. तशा तपोश्वरणात तो अनेक वर्षे होता. त्या मागील उद्देश एकच होता कीं, त्याला विष्णूचे दर्शन व्हावे. एक दिवशी भगवान विष्णू त्याच्या तपस्येने संतुष्ट होऊन त्याला दर्शन देण्यासाठी त्याच्या समोर उभे होतात. ते दर्शन झाल्याने आनंदी झालेले ऋषी उतंक त्याच्या स्तुतीची अनेक कवने गाऊ लागतात. त्या कवनांत तो प्रसन्न झालेला ऋषी विष्णूची स्तुती करण्यासाठी जे बोलतो ते असें,

"अरे भगवंता, ह्या सृष्टीतील ब्रह्मा सह सगळे चराचर तू उत्पन्न केले आहेस. हे आकाश तुझा माथा आहे, तू सगळे ज्ञान तुझ्यात सामावून असतोस, आकाशातील सूर्य व चंद्र तुझे डोळे आहेत. वारा तुझा श्वास आहे, अग्नी तुझी शक्ती आहे, क्षितिजं तुझे हात व पाय आहेत. समुद्र तुझे उदर आहे, ह्या पृथ्वीवरील डोंगर तुझ्या मांड्या आणि पोट आहेत, अरे मधूचा वध करणारा तू आकाश तुझी कंबर आहे, पृथ्वी स्वतः तुझे अंग आहे, अहो भगवंत,

सगळे देव अग्नी, वायू, वरूण, सोम, असुर, नाग तुझ्या आज्ञेची वाट पहात नम्रपणे तयार असतात. तुझे तेज कधी कमी होत नाही. ज्या गोष्टी तू उत्पन्न केल्या आहेस त्यात तू विराजमान असतोस, जे महान ऋषी सदैव घोर तपस्येत गर्क असतात ते तुझी स्तुती करत असतात. जेव्हां तू संतुष्ट असतोस हे जग सुखात असते. जेव्हां तू असंतुष्ट असतोस तेव्हां हे जग सुद्धा अस्वस्थ असते. तू सगळे जग सुरक्षित करत असतोस. तूंच एकमेव पुरूष आहेस. तुझ्या तीन पावलात सगळे जग तू पार करत असतोस. तू असुरांचा नाश केलास जेव्हां ते सर्व शक्तिमान होते. तुझ्या हिम्मतीने व धाडसाने तू स्वर्गात आनंद निर्माण केलास". अशारितीने उतंक विष्णूची स्तुती करतो. ती ऐकल्यावर विष्णू त्याला सांगतो, "मी तुझ्या स्तुतीने प्रसन्न झालो आहे. तुला कोणता आशिर्वाद हवा आहे तो सांग, मी तुला तो देण्यासाठी आलो आहे. परंतु, तुला कसलीच वासना उरलेली नाही. तरी मी काय करावे तुझ्यासाठी ते सांग. कारण मी आलो आहे तेव्हां तुला कांहींतरी मागावेच लागेल". अशारितीने विष्णूकडे कांहीतरी मागणे क्रमप्राप्त झाले होते उतंकाला. तेव्हां तो ऋषी हात जोडून देवाला सांगतो, "माझे मागणे असें आहे कीं, मी सदैव पुण्यकर्मात गढून गेलो पाहिजे. मी तुझे स्मरण करण्यात समाधानी आणि सत्यात (परमेश्वरात) रमणारा सदैव राहो असें कर. तुझी भक्ती करण्यातच माझा सगळा काळ व्यतीत जाईल असें कर". उतंकाचे ते ऐकल्यावर भगवान विष्णू त्याला सांगतात, "अरे ब्राह्मणा, ते सगळे माझ्या कृपेने होईल. त्याशिवाय तुला मी अशी एक सिद्धी देणार आहे जी वापरून तू स्वर्गातील व तिन्ही जगातील लोकांचे भले करू शकशिल. हल्ली एक मोठा असुर धुंधु नांव आहे त्याचे, फार घोर तपस्या करत आहे. त्याचा उद्देश सगळी तिनही जग नष्ट करण्याचा आहे. आता मी तुला सांगतो जो त्या धुंधु असुराचा वध करणार आहे. नीटपणे ऐक उतंका, आता मी जे सांगतो ते, एक महापराक्रमी राजा इक्ष्वाकु कुळात येणार आहे. तो अजिंक्य असेल. त्याचे नांव असेल वृहदस्व, त्याला एक मुलगा होईल त्याचे नांव असेल कुवलस्व तो सुद्धा तसांच महा पराक्रमी आणि अजिंक्य असेल. तो पवित्र प्रवृत्तीचा असेल. त्या राजामध्ये तुझ्या कृपेने ती योगिक शक्ती प्राप्त होईल ज्याच्या मदतीने तो कुवलस्व, धुंधु असुराचा वध करेल. अशी रचना आहे माझी, अरे द्विजा. असें बोलून विष्णू अंतर्धांन पावतात.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा सत्तेचाळिसावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग अठ्ठेचाळिसावा

मार्कंडेय पुढे सांगतात, अरे राजा युधिष्ठीरा, इक्ष्वाकु गेल्यानंतर त्याची सुपुत्र ससद गादीवर येतो. तो तितकांच चांगला शासक असतो. त्याच्यानंतर त्याचा मुलगा ककुत्स्थ गादीवर येतो. त्यानंतर अनेनस त्याचा मुलगा राज्य कारभार पहातो. त्याच्या पश्चात पृथू येतो. त्याचा मुलगा विश्वगस्व गादीवर बसतो. त्याच्यानंतर येतो श्रवस्थ जो श्रवस्थी नगरी स्थापन करतो. त्या श्रवस्थाला वृहदस्व होतो. त्याला कुवलस्व होतो. त्याला वीस हजार पुत्र होतात. ते सगळे शूर योद्धे असतात. कुवलस्व त्याच्या पित्यापेक्षा सर्वच बाबतीत वरचढ होता. यथावकाश त्याला वृहदस्व गादीवर बसवतो. त्यानंतर तो महान राजा वृहदस्व संन्यास घेऊन अरण्यात जातो.

पुढे मार्कंडेय सांगतात, अरे युधिष्ठीरा, तसा राजर्षी वृहदस्व अरण्यात जाण्यासाठी निघाला, उतंकला त्याची वार्ता समजली. तो त्या महाप्रतापी राजाला भेटण्यास गेला. उतंक त्याला विनंती करतात कीं त्यांने अजून संन्यासाश्रम स्वीकारू नये. उतंक त्याला विनवणी करतो, "अरे राजा प्रजेचे संरक्षण करणे तुमचे क्षत्रियांचे कार्य आहे. संन्यास घेणे नाही. जोवर सगळ्या प्रकारच्या धोक्यापासून जनता सुरक्षित नाही तोवर तू संन्यास घेणे उचीत नाही. क्षत्रियांसाठी जनसेवा हींच साधना म्हणून ब्राह्माने सांगितली आहे. ती जोवर पूर्ण होत नाही तोवर त्यातच तुला राहिले पाहिजे. उतंक त्या राजाला सांगतात अरे राजा, मी शांतपणे माझी साधना करू शकत नाही कारण, माझ्या आश्रमाजवळ एक वाळूचा समुद्र आहे. त्याला उज्जकल म्हणतात तो प्रदेश सखल आहे. परंतु तेथे पाणी नसते. त्याचा आकार अनेक योजने चौफेर पसरलेला असा आहे. त्या रेतीच्या समुद्रात (वाळवंटात) जमिनीखाली एक दानवांचा प्रमुख रहात आहे. त्याचे नांव आहे धुंधु. तो मधू आणि कैतभा ह्यांचा मुलगा आहे. तो इतर दानवांसारखा भयंकर व आगाऊ आहे. त्याचा तू वृहद्रथा, प्रथम नाश कर आणि मग तुला जर संन्यास घ्यावयाचा असेल तर खुशाल घे. धुंधु एक मोठे तपोश्चरण करत आहे. त्यात जर तो यशस्वी झाला तर सगळ्यांना फार मोठ्या आपत्तीला तोंड द्यावे लागेल. तो कोणालाही आटपणारा नाही म्हणून त्याचे तप

पूर्ण होण्या आधी त्याचा वध होणे आवश्यक आहे. त्यासाठी माझी अध्यात्मिक शक्ती व विष्णूचे वरदान तुझ्या पाठी देण्याचे आश्वासन मी देतो. कारण त्या शिवाय एकट्याने तुला तो झेपणार नाही. धुंधुला सगळ्या तिनही जगावर राज्य करावयाचे आहे व ते विष्णूला मान्य नाही त्यासाठी त्या दानवाला मारून टाकण्याचे पवित्र कार्य तू करावेस असे विधीलिखीत आहे तरी तू ते शेवटचे कार्य करून मग संन्यास घे. त्याचे कारण असे आहे किं, प्रजापतिने त्याला अशा आशिर्वाद देण्याचे ठरले आहे कीं, त्याला कोणीही देव, राक्षस, गंधर्व मारू शकणार नाही. त्याची तपस्या जवळ जवळ पूर्ण होण्यास आली आहे म्हणून त्याचा निप्पात करण्याचे कार्य त्वरित केले पाहिजे. हल्ली तो दानव वर्षभर निद्रीस्त असतो पण एकदा तो रात्री जागा झाला कीं, त्याच्या श्वासोंश्वासामुळें सगळी धरती हादरू लागते. रानातील वृक्ष थरथरू लागतात. त्याच्या श्वासातून धुराचे लोट निघतात व त्यात आकाश भरून जाते. सूर्य सुद्धा झाकला जातो. सर्वदूर अंधार पसरतो. त्याच्या श्वासातून आगीचे लोट निघतात त्यांच्या ठिणग्या सर्वत्र पडून आगी लागतात. मोठा अनर्थ होत असतो. हे आताचे आहे परंतु, जर तो त्याच्या साधनेत यशस्वी झाला तर काय करेल त्याचा अंदाजसुद्धा करू नये. त्याच्या ह्या अशा कारवायांमुळें मला शांतपणे माझी साधना करता येत नाही. माझे सुख व आनंद लोप पावला आहे. विष्णूनेच मला सांगितले आहे किं त्याचा वध तुझ्या हाती लिहीलेला आहे म्हणून मी तुला भेटत आहे. त्याच्या नष्ट होण्याने तू तिनही जगावर कृपा केल्यासारखे होईल. विष्णूने फार पूर्वी सांगितले आहे किं, जो त्याची वध करील त्याला विष्णूची वैष्णव शक्ती प्राप्त होईल. धुंधुला नष्ट करणे तुला एकट्याला शक्य नाही म्हणून मी व विष्णू तुला मदत करणार आहोत.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा अठ्ठेचाळिसावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग एकोणपन्नासावा

मार्कंडेय सांगत असतात, उतंकाचे ते बोलणे ऐकल्यावर राजा वृहदस्व त्याला सांगतो तुमचे काम माझा मुलगा त्याच्या हजार मुलांच्या मदतीने सहजपणे पूर्ण करेल मी ते करणार नाही कारण मी आता शस्त्र त्याग केला आहे व आता मला फक्त वैराग्य अपेक्षित आहे. म्हणून मला ती जबाबदारी माझ्या लायक मुलावर सोडण्याची परवानगी द्यावी. माझा मुलगा कुवलस्व माझ्यापेक्षा जास्त सामर्थ्यवान आहे. जे सहाय्य तुम्हाला व विष्णूला करावयाचे आहे ते त्याला करावे म्हणजे तुमचे कार्य विनासायास पार पडेल. असें बोलून राजा एका उत्तम अशा अरण्यात त्याच्या पत्नीसह निघून जातो. ते ऐकल्यावर उतंक त्या व्यवस्थेला मान्य करतात.

युधिष्ठीर मार्कंड्याना विचारतो, "मुनी मला सांगा हा धुंधु कोण"? मी या आधी हे नांव ऐकलेले नाही. मला त्या बद्दल सगळे सांगा. तो कोणाचा मुलगा वगैरे सगळे सांगा". ते ऐकल्यावर मार्कंडेय सांगू लागतात, अरे राजा, मला ते सगळे इत्थंभूत माहीत आहे. जसे घडले तसे, ते मी आता तुला सांगतो. ते तेव्हां सुरू झाले जेव्हां ही सृष्टी एक महासागर होता. सर्व चराचर नष्ट झालेले होते. सगळं संपल होतं. जो ह्या सृष्टीचा निर्माता व नष्ट करणारा तो नारायण, पितांबर नेसलेला, पृथ्वीला वेटोळे घालून राहिलेल्या शेषाच्या फण्यावर योगमुद्रेत शांतपणे समाधिस्त होता. एकदम त्याच्या बेंबीतून एक कमळ बाहेर येते. त्या कमळातून ब्रह्मदेव अवतरतात. त्यांना चार हात होते, तसेंच चार मुख होती. त्यांच्या हातात वेद होते. त्याच्या तेजापुढे सूर्य फिका पडत होता. ते होत असतांना विष्णू ज्यानी कौस्तुभ धारण केला होता, अनेक योजने असे लांबरुंद त्या ठिकाणी पहुडलेले होते. शेषाच्या फण्यामध्ये तो विश्वनाथ शांतपणे झोपलेला होता. असंख्य सूर्याचे तेज असलेला तो जगन्नाथ तसा असतांना व त्याच्या बेंबीतून बाहेर आलेल्या कमळात विराजमान असलेल्या ब्रह्मदेवाला दोन दानव येऊन त्रास देऊ लागले. त्यामुळें ब्रह्मदेव त्यांचे सृष्टी निर्मितीचे काम करण्यात अडचण होऊ लागली. त्या दोन दानवांची नांव होती, मधू आणि कैतभा. नारायणाला शांतपणे झोपला आहे असें पाहून त्यांचा जोर वाढला व ते

ब्रह्माला आणखीन त्रास देऊ लागले. ते दोघे साक्षात विश्वनाथावर बसलेल्या ब्रह्माला सतावत होते ह्यावरून त्यांची हिम्मत समजण्या सारखी होती. कमळाला ते धक्का देत होते असा कीं, त्यात बसलेले ब्रह्मदेव त्यातून खाली पडावेत. त्या चाळ्यामुळें अखेरीस नारायण जागे झाले. विष्णू त्यांना पहातो. त्यांना बोलतो, "अरे वा, तुम्ही आलात. या, मी तुमचे स्वागत करतो, बोला तुम्हाला कोणता आशिर्वाद पाहिजे. मी तुमच्यावर प्रसन्न झालो आहे". ते विष्णूचे बोलणे ऐकून त्या गर्विष्ठ दानवांना त्याचे बोलणे आवडले नाही. ते नारायणाकडे कुत्सितपणे पहात हंसू लागले. मधू नारायणाला बोलतो, "तू आम्हाला वर देणार"? उलट आम्हीच तुला आशिर्वाद देणार आहोत". असें बोलून ते दोघे खदाखदा त्यांच्याकडे (नारायण व ब्रह्मदेव) पहात हंसू लागले. ते त्या आदिदेवांना बोलतात, "आपण सर्वात श्रेष्ठ देवता अहात, आम्ही तुम्हाला वर देण्याचा विचार करत आहोत". ते ऐकल्यावर विष्णू त्यांना सांगतात, "तसे असेल तर मला तुमच्याक़डून आशिर्वाद हवा आहे. मला तुमच्या कडून एक वर पाहिजे, काय तुम्ही तो मला देऊ शकाल? तुम्ही दोघे महाबली अहात. गेल्या युगातील अहात. तुमच्या सारखा दुसरा पुरूष अस्तित्वात नाही. तुमची हिम्मत अतुलनीय आहे परंतु, मला जे पाहिजे ते देण्याची हिम्मत तुमच्यात आहे कां"? ते ऐकल्यावर ते दोघे जिद्दीला पेटतात व काय वर पाहिजे त्याचा विचार न करतांच, ते विष्णूला शब्द देतात कीं, तो जे मागेल ते त्याला ते दोघे देण्यास बांधलेले आहेत. असे झाल्यावर नारायण त्यांना सांगतात कीं, त्याला कोणता वर पाहिजे. तो जगन्नाथ त्या दोघांना बोलतो कीं, त्याला त्या दोघांना ठार मारावयाचे आहे. तर ते त्यांनी मान्य करावे कीं, ते त्याच्या हाती मरतील. तुम्हाला मारून तुमचे ह्या नवीन सृष्टीसाठी पायाचे दगड करावयाचे आहेत म्हणजे सृष्टी मजबूतपणे उभी राहील. जगाच्या भल्यासाठी त्याने जीवनदान करावे. मधू व कैतभा दोघे आता अडचणीत पडतात कारण, ते दोघे ब्रह्मचारी तपस्वी कधी खोटे बोलत नव्हते, त्यांचे नैतिकतेचे व सत्याचे स्थान अढळ होते. आता त्यांना दिलेला शब्द फिरवता येत नव्हता. त्यामुळेंच तर ते बलशाली दानव झाले होते. त्याचे वैराग्य अप्रतिम होते. त्यांचे संयमन, मर्यादा, दानशूरपणा, बिनतोड होते. त्या करता ते विष्णूला सांगतात आम्ही तुला दिलेला शब्द पाळणार आहोत म्हणून, तू आम्हाला ठार मारू शकतोस कारण त्यातच आमचा, आमच्या तत्त्वांचा विजय होईल. जर तीच काळाची

इच्छा असेल तर तसे होण्यापासून कोणी थांबवू शकत नाही. परंतु आमची एक अट आहे ती अशी कीं, तू आम्हाला अशा ठिकाणी मारशिल जेथे पृथ्वीचा भाग उघडा राहीला आहे. तशी अट घालण्यात त्यांचा उद्देश असा होतां कीं, पृथ्वी त्याकाळात वनश्रीने पूर्णतया झाकलेले होती. विष्णू ती अट मान्य करतो. विष्णू त्यांना बोलतो, "जसे तुम्ही सांगता, तसेंच होईल".

मार्कंडेय पुढे सांगतात, विष्णू पहातो ते त्याला पृथ्वीवर कोठेही भाग उघडा नव्हता. किंवा आकाशसुद्धा उघडे नव्हते. तो समुद्रात गेला तेथे समुद्र थोडा उघडा राहिला होता. ते पहाताच गोविंदाने त्याचे सुदर्शन चक्र फेकले व त्या दोघांची शिर धडापासून वेगळी केली.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा एकोणपन्नासावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग पन्नासावा

मार्कंडेय सांगत असतात, तो प्रसिद्ध दानव धुंधु, मधू आणि कैतभा ह्यांचा मुलगा, ज्याची स्वताची शक्ती जी त्याला तपस्येने प्राप्त झाली होती, तेथे एका पायावर उभा राहून आणि तपोश्चरणाने शरीराचे शरपंजर केलेला असा तो ब्रह्माच्या कृपेची आराधना करत होता. त्या तपस्येने ब्रह्म त्याच्यावर प्रसन्न होतात. तो जो वर मागतो तो असा होता, देव, राक्षस, यक्ष, गंधर्व, नांग, दानव ह्यांपैकी कोणीही त्याचा वध करू शकणार नाहीत. ब्रह्मदेव तो वर त्याला देतात. त्यानंतर तो धुंधु ब्रह्माचे पाय स्वताच्या माथ्याला लावतो आणि आपल्या मोहिमेवर निघतो. धुंधुला आशिर्वाद मिळाल्यावर तो थेट विष्णूकडे त्याचा मोर्चा वळवतो. कारण त्याला त्याच्या बापांच्या वधाचा बदला घ्यावयाचा असतो. त्याआधी तो गंधर्वांचा बिमोड करतो. वाटेत येणारे सगळे देव तो पराजित करत असतो. त्यानंतर तो पापात्मा त्या वाळूच्या समुद्राकडे पोहोचतो. ज्याचे नांव होते उज्जकल. तेथे असलेला उतंकांची सुंदर आश्रम तो तोडण्याचे काम सुरू करतो. त्यानंतर तो महाभयंकर राक्षस तेथे वाळवंटाखाली असलेल्या त्याच्या भल्यामोठ्या गुहेत शिरतो. तेथे तो दुसरी घोर तपस्या आरंभ करतो कारण आता त्याला तिनही जगं संपवायची असतात. त्यानंतर कुवलस्व त्याच्या सगळ्या मुलांसह व त्याच्या जय्यत तयारीत असलेल्या फौजा घेऊन तेथे येतो. त्यावेळी भगवान विष्णू त्यांची शक्ती त्याला देतात, त्याशिवाय उतंकांचे तपोसामर्थ्य त्याला साथ देत असते. अशा तयारीनिशी तो त्या वाळूखाली असलेल्या गुहेला गराडा घालण्याचे ठरवतो. त्याची सगळी एकवीस हजार मुलं त्याच्यात होती. जे सगळे मोठे शूरवीर योद्धे होते. धुंधुचा वध केल्यामुळे तिनही जगांचे कोट कल्याण होणार आहे ह्या विचाराने प्रेरीत असा तो इक्ष्वाकु मोठ्या उत्साहाने स्वारीची तयारी करत होता. त्यावेळी एक आकाशवाणी होते. त्यात तो दैवी आवाज सांगतो कीं, हा अजिंक्य राजा आता धुंधुचा नाश करण्यात कामयाब होणार आहे. त्यानंतर आकाशातून स्वर्गीय फुलांचा वर्षाव त्या सैन्यावर होऊ लागतो. त्या फुलांचा परिमल अप्रतिम असतो. सगळे देव, अप्सरा, राक्षस, दानव ते युद्ध पहाण्यासाठी आकाशात जमा झालेले असतात. त्यावेळी स्वर्गीय सुमधूर धून ऐकू येऊ लागते. जसे ते

सैन्य पुढे चालू लागते मंदसा शितल वारा वाहू लागतो व पाऊस पडू लागतो. त्या पावसाच्या पाण्याने सगळे भिजून जातात. आकाशात सगळे देव त्यांच्या रथात बसलेले असे त्या युद्धाचे काय होते ते पहात होते. नारायणाच्या सिद्धीने सज्ज असा कुवलस्व त्या वाळवंटात खोदकाम करण्याचे आदेश देतो. कारण, त्या जमिनीत असलेल्या गुहेत शिरण्यासाठी ते आवश्यक होते. असें सात दिवस खोदकाम होत होते. त्यानंतर त्याना तो दानव तेथे खोल आत ध्यानस्थ बसलेला दिसला. त्याचे शरीर फार मोठे होते व ते त्या रेतीत पसरलेले होते. त्याच्या शरीरातून प्रखर तेज ओसंडत होते. जणूकाय सूर्य चमकत आहे. कोणी ते पाहू शकत नव्हते. तो दानव त्या वाळवंटाच्या पश्चिमेकडील भागात होता. कुवलस्वाच्या मुलांनी त्याच्यावर हल्ला केला. त्यांच्या हातात असलेल्या शस्त्रांनी ते तो करतात. त्या शस्त्रांत बाण, तलवारी, काठ्या, गदा, सोटे, काटेरी गदा, साखळीच्या गदा, असें बरेच होते. परंतु, तो राक्षस त्याना आटपणारा नव्हता. तो माणूस नव्हता किं अशा शस्त्रांनी त्याचा बिमोड होईल. ते झाल्यावर तो महाभयंकर दानव जागा होतो. त्याच्या चेहर्यावर संताप स्पष्ट दिसत होता. धुंधु त्या कुलवस्वाच्या मुलांनी फेकलेली शस्त्रं गिळून टाकावयाला सुरूवात करतो. त्यांचा त्याच्यावर कांहींच परिणाम होत नव्हता. ती शस्त्र गिळल्यानंतर तो तोंडातून आग ओकू लागला. त्यामुळें सर्वत्र आगीचा भडका उडाला होता. ज्या आगीला संवर्तक म्हणतात तशी ती आग होती. युगांताच्या वेळी जशी आग होते तशी ती होती. त्या आगीच्या भडक्यात कुवलस्वाची सगळी मुलं जळून गेली. जशी राजर्षी कपिलानी राजा सगराची मुलं भस्म केली होती. त्या धुंधुच्या तोंडातून येणार्या आगीने जणू सगळी तिनही जग व्यापली होती असे वाटत होते. त्याचा विचार न करत बसत कुवलस्व धुंधुवर चाल करून जातो त्यावेळी त्याला विष्णूच्या सिद्धीचा जी ऋषी उतंकाच्या तपस्येने प्रभावित झाली होती त्याचा उपयोग होत असतो. त्यामुळें कुवलस्वच्या तोंडातून प्रचंड असा पाण्याचा झोत येऊ लागतो व त्यात ती आग विझली जाते. कुवलस्व विष्णूने दिलेले ब्रह्म अस्त्र बाहेर काढतो व त्याचा प्रयोग धुंधुवर करतो. त्याने दानव धुंधु मारला जातो. त्या घटने नंतर सगळे देव आणी ऋषी त्या राजाला धुंधुमर असें कौतुकाने बोलू लागले. तो सगळ्यात अजिंक्य राजा मानला जाऊ लागला. ते युद्ध पहाणारे सगळे देव, राक्षस, गंधर्व धुंधुमराचे कौतुक करू लागले. ते सगळे देव त्याला बोलू

लागले कीं, त्याने त्यांच्याकडे कांहीं आशिर्वाद मागावा. त्यावर तो दिलदार राजा हात जोडून मांगतो की, त्याला नेहमी ब्राह्मणांना दान देण्याची क्षमता असावी. त्याच प्रमाणे मी सदैव अजिंक्य राहीलो पाहिजे. मला सदैव विष्णूची मैत्री प्राप्त हो. माझ्या मनात सदैव भूतदया कायम राहो. माझ्या हृदयात फक्त पुण्याचाच विचार असावा असे करा, आणि शेवटी मांगतो, त्याला कायम स्वर्गात रहावयाला मिळावे. त्याच्या मागण्या ते सगळे देव आणि ऋषी मोठ्या आनंदाने मान्य करतात. त्यानंतर त्याची स्तुती करणारी बरीच भाषणे झाली आणि त्यानंतर ते सगळे आपापल्या ठिकाणी निघून गेले.

अरे युधिष्ठीरा, कुवलस्वाची फक्त तीन मुलं सोडून बाकी सगळी जळून गेली होती. त्यांची नांव अशी होती, मोठा दृदस्व, मधला कपिलस्व आणि धाकटा चंद्रस्व. त्या तिघांपासून पुढे तो इक्ष्वाकु वंश चालत राहिला आहे. ते सगळे महा पराक्रमी, धाडशी व हिम्मतवान असे होते. अरे राजा, मी ते सगळे पाहिले आहे, त्याप्रमाणे तुला सांगितले, धुंधुचा वध केला म्हणून कुवलस्वाचे नांव धुंधुमर झाले, तुझ्या प्रश्नाचे मी उत्तर दिले आहे. त्याप्रमाणे ती कथा पुराणात प्रसिद्ध झाली आहे. जे ती ऐकतात त्यांचे कल्याण होते. त्यांना चांगली मुलं होतात. चंद्र ग्रहणाच्या समयी ती कथा ऐकण्याने त्याला दीर्घ आयुष्याचा लाभ होतो. तो समृद्ध होतो व त्याच्या सगळ्या काळज्या, चिंता संपतात, तो रोगमुक्त होतो.

युधिष्ठीर मांकंडेयांना विचारतो माणसातून देव, असुर कसे उत्पन्न होतात ते सांगा. वेदात सांगितल्या प्रमाणें अरे पंडुपुत्रा, माणसाने तीन दान आणि दोन व्रत करावयाची असतात. ती तीन दानं नैतिकतेच्या उद्धारासाठी असतात व व्रतं अध्यात्मिक उद्धारासाठी असतात. ती तीन दान अशी, माणूसकी, चांगुलपणा आणि भूतदया ह्या प्रकारे जो आपले जीवन जगतो त्याने ती तीन दानं ब्रह्माला केली असे समजले जाते. जी दोन व्रत सांगितली आहेत ती अशी, ब्रह्मचर्य आणि ध्यान साधना. ह्या दोन व्रतांमुळें माणसाची अध्यात्मिक उर्जा वाढत जाते, जो ह्यां पाच गोष्टी प्रामाणिकपणे साध्य करतो तो माणूस देवत्वाला पोहोचतो. परंतु, जर त्याने फक्त ब्रह्मचर्य आणि ध्यान साधना केली आणि चांगुलपणा, माणूसकी व भूतदया ह्यांचे पालन केले नाही तर तो अध्यात्मिक उर्जेने संपन्न असा माणूस अनैतिक होतो, तेव्हां त्याला असुर म्हणतात.

*१) कोणाच्याही अज्ञानाचा, गरीबीचा, भोळेपणाचा, कमजोरीचा गैरफायदा न घेणे ह्यालाच*

***माणूसकी** असे म्हणतात.*

*२) मला समाजाने कसे वागवावे असे मला वाटते तसेंच मी समाजातील लोकांशी वागणे ह्यालाच **चांगुलपणा** असे म्हणतात.*

*३) सर्व प्राणिमात्रांबद्दल सन्मानाची भावना बाळगून त्याप्रमाणे जगणे आणि सगळ्या प्राणिमात्रांचा आदर करणे ह्याला **भूतदया** असे समजले जाते.*

युधिष्ठीर पुनः विचारतो अहो ऋषीवर्य मला सांगा ब्रह्मचर्य पाळण्याची सोपी पद्धत कोणती आहे. तसेंच ध्यान साधना करावयाची म्हणजे काय करावयाचे ते सुद्धा सांगा. मार्कंडेय सांगतात, ब्रह्मचर्य पालन करण्याची सोपी पद्धत सांगतो, जो पुरूष सर्व स्त्रियांबद्दल आत्यांतिक आदराची व सन्मानाची भावना ठेवून जगतो तो आपसुकपणे ब्रह्मचर्य पालन करत असतो. पत्नीशी एकनिष्ठ असलेला विवाहीत पुरूष त्याच्या पत्नीकडे सुद्धा, अनंत काळाची माता व क्षणाची पत्नी, अशा भावनेने पहातो तो ब्रह्मचर्य पालन करत असतो. आता सांगतो ध्यान साधना कशी करावयाची त्या बद्दल. एक चित्ताने ब्रह्माच्या अथवा महादेवाच्या स्मृतीत जो रहातो ज्यामुळें त्याच्या मध्ये कोणताही विचार उत्पन्न होत नाही त्या एकचित्त अवस्थेत (विचारशून्य अवस्था) रहाण्याच्या उपक्रमाला ध्यान साधना असें म्हणतात. अशारितीने जो आपली अध्यात्मिक उर्जा वाढवतो तो ब्रह्माला व शिवाला प्रसन्न करत असतो. ब्रह्म अथवा महादेव प्रसन्न झाले कां ते जो मागाल तो वर देतात. म्हणून पुराणातील अनेक असुर असेंच बलशाली झाले त्यांच्या गोष्टी मी तुम्हाला सांगत आहे.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाची पन्नासावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग एकावन्नावा, व्याध गीता सुरू

वैशंपायन पुढे सांगतात, अरे जनमेजया, त्यानंतर राजा युधिष्ठीर मार्कंडेयांना एक वेगळाच प्रश्न विचारतो. तो बोलतो कीं, त्याला ऐकावयाला आवडेल जर ते त्याच्या प्रश्नाचे खरे उत्तर देणार असतील. मार्कंडेय त्याला प्रश्न विचारण्याची मुभा देतात. तो विचारतो, आता पहा आपण ज्या कांही गोष्टी पहातो जसें सूर्य, चंद्र, वायू, पृथ्वी, अग्नी, पिता, माता, आकाश, द्युत ते सगळे विविध देवतांच्या रुपांने आपण त्यांना मानत असतो. त्या सगळ्यांचा आपण त्या प्रकारे आदर करत असतो आणि कांहीं वेळा त्यांची पुजासुद्धा करत असतो. पतिव्रता पत्नी तिच्या पतिची जी सेवा करते त्यात मात्र मला कांहीं खोट असते असें वाटते. म्हणून ऋषीवर मला सांगा, पवित्र पतिव्रता पत्नी तिचे सगळे भोग इंद्रिय संयमित करून आपल्या पतीची सेवा करत असते कारण ती त्याला तिचा परमेश्वर मानत असते. परंतु, हे सगळे मला त्या स्त्रीसाठी फार मुष्कीलीचे असावे असे वाटते. अहो ब्राह्मणा, मुलांनी पित्याची आणि आईची सेवा करणे व बायकोने नवर्याची सेवा करणे हे दोनही मला फार अवघड असले पाहिजेत असें वाटते. पवित्र पत्नीचे जगणे जितके मुष्कील असते तितके कांहींच मुष्कील नसते असे मला वाटते. पवित्र जीवन जगणे आणि त्यात गरोदरपणी त्या वेदना सहन करणे असें सगळे त्यांना करावे लागते. मुलांना जन्म देणे किती जोखमीचे असते ते तुम्ही जाणता अहात. त्यानंतर त्यांना वाढवणे, तेसुद्धा मोठ्या प्रेमाने, ते करत असतांना त्यांना त्याच पतीचे व मुलांचे द्वेषाने भरलेले वागणे सहन करावे लागत असते रोजच्या रोज हे किती तापदायक असेल ते तुम्ही पहात असाल. ते सगळे सहन करत त्या बायका ते काम करत असतात. त्यात त्याना काय सुख मिळत असेल ते मला समजत नाही. पण तरीसुद्धा त्या ते करत असतात न चुकता. मला हे सगळे फार मुष्कीलीचे काम आहे असे वाटते.

अहो द्विज, मला सांगा, क्षत्रियाच्या कर्तव्याची माहीती. मी समजतो कीं, क्षत्रियाला त्याच्या कामात अनेक कटु निर्णय घ्यावे लागतात ज्यात पाप कर्म होण्याची धास्ती असते. म्हणून ते कार्य मी मुष्कील समजतो. वरकरणी पापसदृश्य कृत्य करतांना त्याला मनात शंका येत

असतील तर तशा परिस्थितीत त्यांने कसे काम करावे. तशी कामं करत असतांना त्याला पुण्य कसे मिळते. मला खात्री आहे आपण पूर्ण ज्ञानी असल्याने माझे त्याबद्दल प्रबोधन करू शकाल. माझी इच्छा आहे कीं, आपण त्यावर विवरण करून माझ्या शंकांचे निरसन करावे. युधिष्ठीर त्याप्रकारची विनंती पुन्हा पुन्हा मार्कंडेयांकडे करत असतो तेव्हां तो महाऋषी त्याला सांगतो, मी तुझ्या सगळ्या शंकांचे समाधान करणार आहे. प्रश्न कितीही अवघड असला तरी त्याला उत्तर असतेच व ते मी तुला देणार आहे. त्यासाठी नीट लक्ष देऊन मी जे सांगत आहे ते ऐक, कांहीं मातेला उच्च मानतात व कांहीं पित्याला. तरीसुद्धा आपण एक गोष्ट लक्षात घ्यावयाला पाहिजे कीं मुलाला जन्म देणे व वाढवणे हे अवघड कार्य माता करत असते. त्याऐवजी पिता मुलं मोठी झाल्यावर त्याच्या तपस्येने त्यांना योग्य संस्कार देत असतो (*हे विवेचन द्वापार युगातील आहे हे लक्षात घेऊन वाचावे.*) त्याशिवाय पोषणाची तजवीज करत असतो. ते दोघे त्या मुलांनी मोठे व्हावे व कांहीं बनावे असें समजत असतात. दोनही कामं त्या त्या प्रकारची पण मुष्कील असतात हे मान्य करावे लागेल. दोघेही आपली मुलं काय करतात ते पहाण्यासाठी उत्सुक असतात. त्यासाठी जी संतान आपल्या जन्मदात्यांची ती इच्छा पूर्ण करतात ते उत्तम संतान समजले जाते. जी संतान आपल्या जन्मदात्याची ती कामना पूर्ण करतात ते उच्च गतीला जातात. आता बायकांबद्दल सांगतो. त्यांनी उपवास करणे, व्रतवैकल्ये करणे ह्यात कांही अर्थ नसतो. त्या ऐवजी आपल्या संसारात पूर्णपणे रमणे व आपल्या पतीची व मुलाबाळांची काळजी घेणे हेंच त्यांच्यासाठी खरे व्रतवैकल्य असे समजले पाहिजे. जी स्त्री त्यात यशस्वी झाली ती वरच्या गतीला जात असते. तो तीचा कर्मयोग असतो व तो इतर कोणत्याही साधनेहून श्रेष्ठ समजला जातो कारण अरे युधिष्ठीरा, ते कार्य साक्षात ब्रह्माचे कार्य समजले जाते. संसार चालवणे हे सृष्टी चालवण्या इतकेच श्रेष्ठ समजले जाते म्हणून जी स्त्री त्यात मग्न असते ती एकाद्या तपस्व्या सारखीच समजावी. खर्या गृहीणीला एकाद्या कर्मयोग्यापेक्षा कमी समजू नकोस. पतीशी जी स्त्री एकनिष्ठ असते ती ब्रह्मचारीणी समजली जाते. म्हणून बहुतेक संसारी स्त्रिया स्वाभाविकपणे ब्रह्मचर्य पालन करत असतात.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा एकावन्नावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग बावन्नावा

मार्कंडेय सांगत असतात, फार पूर्वी, त्रेता युगात एक महान वैरागी होता त्याचे नांव होते कौशिक. त्याचा वेदाचा अभ्यास चांगला होता. त्याचा वेदाच्या अभ्यासा बरोबर वेदांग आणि उपनिषदांचासुद्धा अभ्यास होता. तो एके दिवशी सकाळच्या प्रहरी एका झाडा खाली बसून वेदाचे पठण करत होता. त्यावेळी त्या झाडाच्या एका फांदीवर एक मादी बगळीण बसलेली होती. ती बगळीण त्या कैशिकावर शिटते. ते झाल्यामुळे कौशिक त्या बगळीणीवर फार रागावला. रागावून तो त्या बगळीणीकडे पहातो तोंच ती झाडावरून मरून खाली पडते. ते पाहून त्या ब्राह्मणाला वाईट वाटते कीं, त्याच्या क्रोधामुळे ती निष्पाप पक्षीण मेली. त्याला त्या मृत पक्षाबद्दल फार वाईट वाटते व त्यामुळे तो दुःख करू लागला. तो स्वतःला सांगतो, "मी आज फार मोठे दुष्कृत्य केले कीं, त्यामुळें एक निरपराध प्राणी मेला आहे". असें स्वताशीच बडबडत तो नंतर भिक मांगण्यासाठी गांवात गेला. तरीसुद्धा, त्याला त्याच्या ह्या सिद्धीचा (दूर)अभिमानसुद्धा वाटू लागतो. भिक मांगण्यासाठी तो त्या गांवातील प्रतिष्ठीत वस्तीत फिरत होता. त्याला माहीत असलेल्या एका घराकडे तो जातो. तेथे तो भिक मांगण्यासाठी बाहेर उभा रहातो व "भिक्षांदेही", असा आवाज देतो. त्यावर आतून ती गृहीणी त्याला थांबावयाला सांगते. आत मध्ये घरात ती गृहीणी त्याला भिक्षा देण्यासाठी पात्र स्वच्छ करत असते. त्या गोष्टीला वेळ लागतो. त्याच वेळी तिचा पति पिण्यासाठी पाणी मागतो व कांहीं खाण्यासाठी सुद्धा दे असे त्या गृहीणीला आग्रहाने सांगतो. म्हणून ती त्याला खावयाला देऊ लागते. त्याला खाणे दिल्यानंतर ती त्याच्या बाजूला आणखीन काय त्याला पाहिजे ते विचारत उभी असते हे सगळे कौशिक पहात असतो. ती पतिव्रता त्याप्रमाणे तिचे कर्तव्य करत होती. एका पतिव्रतेला शोभेल असे तिचे सगळे वागणे होते. ते करत असतांना तिचे कौशिककडे संपूर्ण दुर्लक्ष झालेले असते परंतु, जसे तिच्या लक्षात येते कीं, एक ब्राह्मण भिक्षा घेण्यासाठी बाहेर उभा आहे तेव्हां तिला फार शरम वाटते व ती लगबगीने त्याच्या साठी भिक्षा भरून आणते. त्यावेळी तो ब्राह्मण तिला थोड्या घुश्श्यातच बोलतो, "अहो गृहीणी, मला तुझ्या ह्या वर्तणूकीचे आश्चर्य वाटते.

मला थांबण्यास सांगण्याऐवजी जाण्यास सांगितले असते तर चांगले झाले असते". तो रागावला आहे ते तिला समजते व ती त्याच्या कडे दिलगीरी मागते. "मला क्षमा करा, माझ्या कडून चूक झाली आहे". असे ती बोलते. पुढे ती सांगते, "हे पहा एका पतिव्रता स्त्रीला तिचा पति परमेश्वर असतो हे तुम्ही जाणता अहात. त्याच्याकडे प्रथम मला लक्ष द्यावे लागते हे तुम्ही समजू शकता". कौशिक तिला विचारतो, "तुझ्या दृष्टीने ब्राह्मण त्याच्या पेक्षा कमी आहे कां? एक गृहीणी झालीस म्हणून तू एका ब्राह्मणाला विसरलीस? इंद्रसुद्धा आम्हा ब्राह्मणापुढे झुकतात, माणसांचे काय? तू कदाचित ऐकले नसशिल कीं ब्राह्मण अग्नी असतो व जर तो रागावला तर सगळी पृथ्वी जाळून टाकू शकतो". त्याचे ते ऐकल्यावर ती काळेभोर डोळे असलेली देखणी पतिव्रता त्याला बोलते कीं, "मी बगळीण नाही कीं, तुझ्या नजरेने मरून पडेन. मला माहीत आहे तुमचा वेदांचा अभ्यास आहे तरी असे नाहक रागावणे तुम्हाला शोभत नाही. तुझ्या त्या रागीट नजरेने माझे कांहींच बिघडणार नाही". पुढे ती त्याला बोलते, "मी खर्या संयमी ब्राह्मणांचा कधीच अनादर करत नाही. मला कल्पना आहे ब्राह्मणांच्या सामर्थ्याची परंतु, खरा ब्राह्मण क्षमाशिल असतो तो त्याचा क्रोध असा व्यर्थ वापरत नाही. ब्राह्मणांच्या अनाहूत क्रोधामुळेंच समुद्राचे पाणी खारट झाले आहे हे तुम्हाला ज्ञात असेलच. मी बर्याच मुनींना ओळखते ज्यांचे चित्त शांत असते तरी जेव्हां त्यांचा क्रोध सकारण असतो तेव्हां तो दंडक अरण्यसुद्धा भस्म करत असतो. वातपीने अगस्त्यांचा उपमर्द केला तेव्हां त्याचे काय झाले सगळ्यांना ज्ञात आहे. महान ब्राह्मण जसे रागीट असतात तसेंच क्षमाशिलसुद्धा असतात. म्हणून तू मला माफ केले पाहिजेस. मी माझ्या पतिची सेवा सर्व प्रथम करते कारण, तो माझ्यासाठी परमेश्वर आहे. बायकांसाठी त्यानी त्यांच्या लायक पतीची सेवा करणे ह्यासारखे पुण्य कर्म नसते. मी तेंच करत होते मग त्यात दोष कसा तुम्ही पहाता? मला माहीत आहे किं, तू रागाच्या भरात एका निरपराध पक्षाला तुझ्या क्रोधाने मारले आहे, असा अकारण वापरलेला क्रोध माणसाचा दुष्मन असतो हे तुझ्या लक्षात कसे येत नाही? ब्राह्मण त्याच्या संयम, मर्यादा, विवेक, क्षमाशिलता अशा गुणांसाठी ओळखला जातो ते गुण तुझ्यात मला दिसत नाहीत. तुझ्यातील अहंकार अमर्याद झाला आहे अशा परिस्थितीत तू स्वतःला खरा ब्राह्मण समजतोसच कसा? मी काय करत होते ते पाहिल्यानंतर तू मला समजून घेणे आवश्यक

होते त्या ऐवजी तू मला एक पक्षीण समजलास त्यात तुझ्या अज्ञानाची कल्पना येते. ब्राह्मणाचा राग अन्याया विरुद्ध वापरण्यासाठी असतो स्वतःचा अहंकार पोसण्यासाठी नाही. जो ब्राह्मण त्याच्या ह्या सिद्धीचा दुरुपयोग करतो तो भ्रष्ट होतो त्याला गती नाही कारण, त्यांने त्याची विद्या वापरुन अन्याय केलेला असतो. स्वतःचा अहंकार अशारितीने पोसणे हे मोठे पाप कर्म असते ते मी तुला सांगावयाला पाहिजे कां? हे प्राथमिक ज्ञान तुला नसेल तर तुम्ही वेदांचा काय अभ्यास केला, हे मला समजत नाही. क्रोध ही एक वासना आहे त्याचे नियमन करावयाचे असते किं, ते असे व्यर्थ दुरुपयोगात आणावयाचे ते तुझ्या लक्षात कसे येत नाही. ब्राह्मण दुसर्याला शिकवतो तोंच जर असा बेशिस्त असेल तर कसे चालेल. एका सच्च्या ब्रह्मणाकडून काय अपेक्षा असतात ते मी तुला सांगितले. आता तुला सांगते, सच्च्या ब्राह्मणाची लक्षणं काय असतात. वेदाचा अभ्यास, साधी रहाणी, सर्व भोग आणि कर्म इंद्रियांचे संपूर्ण संयमन, सत्यावरील (परमेश्वर) श्रद्धा, त्यात प्रामाणिकपणा हा मोठा गुण ब्राह्मणात असावा लागतो. पुण्याचे ज्ञान होणे सोपे नसते. पण एक गोष्ट निश्चित कीं, पुण्याचा संबंध थेट सत्याशी असतो. जाणकार सांगतात कीं, श्रृतीमध्ये पुण्याचा सविस्तर विचार केला आहे परंतु, पुण्य ही एक फार प्रगल्भ बाब आहे त्याची चर्चा करणे येथे मला उचीत वाटत नाही. तुम्ही वेदाचा अभ्यास केलेले अहात तरी तुम्ही असें कसे वागता. तुमचे वर्तन पुण्याच्या विरुद्ध आहे हे लक्षात कसे येत नाही. मला असें वाटते तुम्हाला पुण्याचा अभ्यास करण्यासाठी एका ज्ञानी माणसाला भेटावे लागेल. तो तुम्हाला चांगल्या प्रकारे हा विषय समजावून सांगेल. तो माणूस जनक राजाच्या मिथिला नगरीत असतो. त्याचा व्यवसाय मांस विकण्याचा आहे. तरी जर तुला खरोखर शहाणे व्हावयाचे असेल तर तू त्याला जाऊन जरूर भेट, त्याला शरण जा". असे सांगून ती पतिव्रता त्या कौशिक ब्राह्मणाला आणलेला शिधा दान करून त्याच्या पाया पडते. त्याला विनंती करते कीं, चांगले लोक स्त्रीवर कधी रागवत नाहीत म्हणून तुम्ही माझ्या तुम्हाकडे दुर्लक्ष करण्याच्या प्रमादासाठी माफ करावे. त्या पतिव्रतेच्या सांगण्यामुळें कौशिक सावध झालेला असतो व तो तिला म्हणतो, "मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे. तुझ्यामुळें माझे डोळे उघडले आहेत व मला माझी चूक समजली आहे. त्यामुळें मला तुझ्यावर कोणताही क्रोध नाही". नंतर तो तिला सांगतो, तिच्या सांगण्याप्रमाणे तो मिथिला नगरीत जाऊन त्या मांस

विकणार्याला भेटणार आहे व त्याच्या कडून ज्ञान घेणार आहे. ते ऐकल्यावर ती पतिव्रता सुद्धा प्रसन्न होते व त्याला, तुझे कल्याण हो, अशा शुभेच्छा देते. कौशिक तिला निरोप देतांना आश्वासन देतो कीं, तो तुरंत मिथिला नगरीत जाऊन त्या खाटकाची भेट घेऊन ज्ञान प्राप्त करणार आहे.

त्यानंतर तो आपल्या घरी जात असतांना त्याला सतत एका गोष्टीचे आश्चर्य वाटत असते कीं, ह्या गृहीणीला त्याने क्रोधाने एका पक्षिणीला मारले हे कसें कळले? त्याच्याच विचारात तो आपल्या घरी जातो.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा बावन्नावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व
## भाग त्रेपन्नावा

मार्कंडेय पुढे सांगतात, कौशिक त्या बाईने जे सांगितले त्यावर सतत विचार करत रहातो. तिने जे कांहीं सांगितले ते सगळे योग्य होते हे त्याच्या लक्षात आले होते. नैतिकतेच्या सुक्ष्म बाबींकडे त्यांने लक्ष द्यावयाला सुरूवात केली. तो अखेरीस ठरवतो, कीं, त्याने मिथिला नगरीत जावे. त्या जाणकार खाटकांस भेटावे व त्याच्या कडून ज्ञान घ्यावे.

त्या पतिव्रतेने जसे ओळखले कीं, त्याच्या क्रोधामुळें ती पक्षीण मेली त्यामुळें त्याला समजते कीं, ती बाई मामुली नाही कारण एरवी ते समजणे त्या बाईला केवळ अशक्य होते. अशा कारणाने कौशिक तिच्या सांगण्यानुसार करण्याचे ठरवतो. तो पायीच निघतो मिथिला नगरीकडे. अनेक जंगले व शेतीवाड्या, गांव आणि नगरं असें चालत अखेरीस तो मिथिला नगरीला पोहोचतो. ते शहर अतिसुंदर होते. त्या ठिकाणी जागोजागी पताका फडकत होत्या. ठिकठिकाणी कमानी होत्या. तेथे अनेक चौसोपी वाडे दिसत होते. रस्ते रुंद होते. त्या रस्त्यांच्या दुतर्फा उंच भिंती होत्या. लोकांची वर्दळ कमालीची होती. सगळीकडे सण असल्यासारखे वातावरण होते. रस्त्यावर सुशोभित रथ फिरतांना दिसत होते. रस्त्याच्या दुतर्फा दुकानं सजलेली होती त्यात विविध वस्तु विकण्यासाठी मांडलेल्या होत्या. लोकं आनंदाने इकडे तिकडे फिरत होती. लहान मुलं मुलीं वाड्याच्या अंगणात खेळतांना दिसत होती. रथांबरोबर उत्तम प्रकारची वाहनं, घोडे आणि हत्ती सुद्धा वावरतांना दिसत होती. तेथे कौशिक जागोजागी जेथे जमेल तेथे त्या ज्ञानी खाटकाची चौकशी करत फिरत असतो. एका जागी त्याला समजते कीं, तो खाटीक कोणत्या मंडईत बसतो. त्या मंडईत कौशिक ब्राह्मण जातो व पहातो कीं, तेथे एका मांस विकणार्या दुकानात खूप गर्दी असते. तो चौकशी करतो तेव्हां त्याला समजते कीं, हांच तो ज्ञानी खाटीक. बराच वेळ कौशिक त्या तिथे वाट पहात तात्कळत उभा असतो. त्यानंतर त्या खाटकाची नजर जशी ग्राहकांची गर्दी कमी होते, त्या ब्राह्मणांवर पडते. सगळी ग्राहक संपल्यावर तो खाटीक आपले काम आटोपत कौशिकची चौकशी करतो. त्यावेळी कौशिकला दुसरा धक्का बसतो कारण तो खाटीक त्याला विचारतो कीं काय त्याला त्या गांवातील पतिव्रतेने

पाठवले आहे कां? कौशिकला तो आदरपूर्वक त्याच्या घरात आणून बसवतो त्याला पिण्यासाठी पाणी देतो व पाय धुण्यासाठी सुद्धा पाणी देतो. खाटकाचे घर आटोपशीर व सुंदर ठेवलेले होते. स्वतः त्याचे दुकान आवरण्यासाठी निघून जातो. कौशिक तेथे बसल्या बसल्या आश्चर्य करत असतो कीं ह्या दोघांना कसे समजते कीं माझ्या बाबत काय झाले. त्यामुळें त्याचा विश्वास बसतो कीं, त्या दोघात कांही विशेष सामर्थ्य निश्चितपणे आहे.

मार्कंडेय पुढे सांगतात, खाटीक त्याचे दुकान आटोपून घरी आल्यावर स्नान करतो व त्याची देवाची पुजा केल्यावर ब्राह्मणाकडे येऊन बसतो. त्यांचे संभाषण सुरू होते. कौशिक त्याला विचारतो "अहो ज्ञानी, आपल्या ज्ञानाची योग्यता पहाता हा व्यवसाय जो तुम्ही करत अहात तो अयोग्य नाहीं कां वाटत आपल्याला"? खाटीक सांगतो, "अहो ब्राह्मणा, हा व्यवसाय आमचा पिढीजात आहे". ब्राह्मण बोलतो, "मला वाटते हा व्यवसाय क्रौर्यावर आधारित आहे म्हणून ज्ञानी माणसास शोभत नाही". ते ऐकल्यावर तो ज्ञानी खाटीक त्याला सांगतो, "क्रौर्य कर्मात नसते ते करणार्याच्या विचारात असते. कोठलेही कर्म क्रूर किंवा दयाळू असें नसते. हे त्याकडे पहाण्याचे दृष्टीत आणि करणार्याच्या उद्देशात असते. त्याशिवाय हा माझा पिढीजात असल्यामुळें तो करणे मला क्रमप्राप्त आहे. प्रत्येक माणसाला विधात्याने कांहीं कर्तव्ये दिली आहेत व ती प्रामाणिकपणे करण्यात कांहींच दोष लागत नाही. विधाता जे कर्म आपल्यावर आपल्या जन्माने सोपवतो ते करणे आपले कर्तव्य असते. असें न करणे म्हणजे विधात्याची प्रतारणा करण्या सारखे असते. सृष्टी चालण्यासाठी विविध प्रकारची कामं होणे आवश्यक असते, त्यात जास्त चांगले कार्य आणि कमी चांगले कार्य असें कांहीं नसते, तसेंच ते कार्य जे विधात्याने आपल्याला दिले आहे ते जास्तीत जास्त उत्तमरित्या करणे हांच त्या माणसाचा एक धर्म असतो. हे सत्य तू प्रथम समजून घे". खाटीक हे बोलल्यावर ब्राह्मण त्याला विचारतो, "एकादा प्राणी मारणे हे कसे काय एक कार्य असू शकते ते मला समजत नाही". खाटीक सांगतो, "खाण्यासाठी प्रत्येक प्राणी कोणातरी जीवाची हत्या करत असतो कारण, "जीवो जीवस्य जीवनं", हा निसर्गाचा अबाधित नियम आहे तो कोणीही बदलू शकत नाही. माणसें शाक भाजी खातात, त्यातसुद्धा जीव असतो म्हणून ते खाणे अप्रसुत ठरत नाही". कौशिक त्याला विचारतात त्याच्या स्वताच्या कर्माबद्दल. तो सांगतो, "मी देव, अतिथी आणि जे माझ्यावर

विसंबून आहेत त्यांचे खाणे झाल्यावर माझे त्यात जे उरले आहे ते एकदा संध्याकाळी खाऊन गुजराण करतो. मी कधी कोणाला अपशब्द वापरून बोलत नाही. मला माहीत आहे कीं, आपले हे जीवन आपल्या ह्या आधीच्या जीवनाशी जोडलेले असते. तसेंच आपले पुढचे जन्म सुद्धा ह्या सध्याच्या जीवनाशी निगडीत असतील. त्याप्रमाणे सगळे होणार असते ते आपण बदलू शकत नाही. मग त्यात आपले व्यवसाय, नातेवाईक, सगळे आधीच ठरवून ठेवल्यासारखेच असतात. विशेष म्हणजे ते सगळे आपल्याच कर्मधर्मानुसार होत असते".

कौशिक त्याला विचारतो, "तो ज्या राज्यात रहात आहे तेथे कशी व्यवस्था अमलात आणली जाते. तेव्हां खाटीक त्याला सांगू लागतो, कृतयुगापासून तीन व्यवसाय माणसाच्या समाजाच्या उद्धारासाठी सांगितली आहेत. त्यांत कृषी, पशुपालन आणि व्यापार हे प्रमुख समजले जातात. त्यांत नंतर कांहीं उप व्यवसाय समाजाच्या गरजेनुसार उत्पन्न होत असतात. त्याशिवाय अध्ययन (वेदांचे प्रामुख्याने), नितीशास्त्र, पौरोहित्य असें ब्राह्मणांना दिले आहेत. द्विजांची मदत करणे शुद्रांना सांगितले आहे. वैश्य जरी प्रामुख्याने कृषी करण्याचे अपेक्षित असले तरी ते व्यापारसुद्धा करू शकतात. शुद्रसुद्धा व्यापार करत असतात. अन्याया विरुद्ध लढणे हे क्षत्रियांचे काम सांगितले आहे. ब्राह्मणांना इंद्रिय संयमन, मंत्र पठण अशी आणखीन कांही कर्तव्ये सांगितली आहेत. असें जर सगळे आपापली कामं व्यवस्थितपणे करत असतील तर राजा त्याचा राज्य कारभार चांगला चालवू शकतो. जे लोक त्यांने दिलेली कामं नीटपणे करत नाहीत त्यांना वळणावर आणणे, जसे गुराखी भरकटणार्या गुरांना लाठी मारून वळणावर आणतो, राजाचे कर्तव्य असते. राजाबद्दल प्रजेत आदरयुक्त भय असले पाहिजे जसे पित्याबद्दल मुलांच्या मनात असावे लागते जर कुटूंब व्यवस्थित चालावयाचे असेल. एकादे राज्य कुटूंबासारखे समजून जो राजा काम करतो तो त्याच्या प्रजेत प्रिय होतो". पुढे तो खाटीक सांगतो कौशिकाला किं, जनक राजाच्या राज्यात असा एकही इसम मिळणार नाही जो त्याचे विहीत कार्य करत नाही, म्हणून येथे सुराज्य नांदत आहे. जो त्याचे कर्तव्य करत नाही त्याला राजा शासन करतो. त्याच्या मुलांनी जरी कांहीं अयोग्य काम केले तर त्यालासुद्धा क्षमा होत नाही. त्या

बद्दलचे निर्णय ब्राह्मण घेतात व क्षत्रिय त्याची अमलबजावणी करतात. जे गुणी आहेत त्यांना कोणताही त्रास ह्या राज्यात होत नाही.

त्यानंतर तो स्वताच्या व्यवसायाबद्दल सांगू लागतो. आमचे कुटूंब मांस विक्रीचे काम करत आहे. त्यांत गोमांस, डुकराचे मांस व म्हशीचे मांस प्रामुख्याने असते. त्यांची हत्या दुसरे करतात ज्यांना विनावेदना वध कसा करावा ह्याचे प्रशिक्षण असते. कारण खाण्यासाठी प्राणी मारणे वैध असले तरी त्याला मृत्यू विनावेदना (अहिंसक) देणे हे पवित्र कार्य सगळ्यांना जमत नाही ते त्या प्रशिक्षित व्याधांना येत असते. त्यांना व्याध असें म्हणतात कारण तो वध करत असतो. व्याध म्हणजे शिकारी अथवा ठार मारण्याचे काम करणारा. "पशुंना ते विनावेदना कसे मारतात"? कौशिक त्याला विचारतो. खाटीक सांगतो, "आता मी तुला व्याधाची सिद्ध पद्धत काय आहे ते सविस्तरपणे सांगतो. प्रथम प्राणी बेहोष केला जातो व तो बेहोष असतांना त्याच्या मेंदूकडे जाणार्या नसा तो प्रथम कापतो व त्यामुळें तो प्राणी शांतपणे बेहोष असतांनाच मृत होत असतो". कौशिक विचारतो, "अरें व्याधा, प्राणी प्रथम बेहोष कसा करतात"? खाटीक सांगतो, "त्यासाठी कांही जडीबुट्टी वापरली जाते, ती त्यांना खाण्यात दिली जाते, त्यांमुळें तो पशु शांतपणे झोपून जातो, त्याला एका पिठावर (चौथरा) निजवले जाते. अतिशय धारदार सुरे कापण्यासाठी वापरले जातात ते घिसाडी आमच्यासाठी तयार करत असतात. एक प्राणी मारला जात असतांना इतर प्राणी तेथे नसतात त्यामुळें, त्यांना आत काय होत आहे ते समजत नाही. कारण अरे ब्राह्मणा, जर त्या इतर प्राण्यानी ते पाहिले तर व्याधाला पाप लागते असे सांगतात. वधक्रिया नेहमी गुप्तपणेच करावयाची असते. वध झाल्यावर त्याचे कातडे त्याच्या शरीरापासून काढले जाते. नंतर त्या शरीराचे मोठे तुकडे केले जातात त्याच वेळी कोथळा वेगळा काढून शुद्राना दानात दिला जातो. ते मोठे मांसाचे तुकडे माझ्याकडे येतात ते मी माझ्या ग्राहकांना आणखीन लहान करून त्यांच्या गरजेनुसार कापून विकत असतो". कौशिक विचारतो, "हे व्याध कार्य कोण करतात"? "व्याध कार्य मुख्यत्वेकरून ब्राह्मणांनेच करावयाचे असते, असा मिथिलात नियम आहे. वेदांत सुद्धा तेंच सांगितलेले आहे. मी मात्र, अरे ब्राह्मणा, वैश्य आहे परंतु, शुद्रसुद्धा हा व्यवसाय करतात". खाटीक सांगतो. "ते वध करण्याचे काम करणारा ब्राह्मण यमाची प्रथम पुजा करतो व त्याची परवानगी घेऊन

मगच त्याचे वध कार्य त्या दिवशी प्रारंभ करत असतो. यज्ञातील बळी व हा वध समानच समजले जातात. असें समजले जाते कीं, ते मारलेले प्राणी त्या दिवशी मरणार होते म्हणून मेले, यमाला ते अर्पिले जातात. त्यांचे मांस खारट पाण्याने (मिठाच्या पाण्याने) धुतले जाते त्यामुळें ते शुद्ध होते असे समजले जाते मगच विक्रीसाठी घेतले जाते". पुढे तो व्याध कौशिकाला सांगतो कीं, तो सहसा मांस खात नाही. दिवसातून एकदाच रात्री जेवतो. त्याच्या पत्नीकडे तिच्या परवानगीनेच जातो. तो खोटे बोलत नाही. कोणाचा द्वेष करत नाही. दिवसभर अनशन करतो. तो कोणाशी स्वताची तुलना करत नाही त्यामुळे तो मद व मत्सर विरहीत जीवन जगत असतो".

तो खाटीक कौशिकाला सांगतो, "जर राजाची नियत बिघडली तर राज्य बरबाद होते. त्यामुळें अशा राज्यात शरीराने विकलांग असलेले जन्मतात. त्यात कुबड आलेले, आंधळे, मुके, बहिरे, अपंग, राक्षसा सारखे दिसणारे अशी बालक तेथे जन्म घेतात. त्याप्रमाणे लोकांची प्रजनन क्षमता कमी होते. परंतु आमचा राजा निर्दोष असल्याने येथे असें विकलांग कोणी जन्मत नाही. यथा राजा तथा प्रजा, ह्या न्यायाने मिथिलेत सगळे सुव्यवस्थित आहे. राजा गुणी असेल तर प्रजासुद्धा तशीच गुणी रहाते. त्या कारणांने राज्यात पाप कमी होते व पुण्याचा प्रभाव वाढतो. त्यानंतर कौशिक त्याला विचारतो, "मला सांगा ज्ञानी, हत्या व हिंसा ह्यात काय भेद असतो. हत्येमुळें पाप होते कां"? खाटीक सांगतो, "हत्या करण्याने तेव्हांच पाप लागते जेव्हां त्या मागील उद्देश दुःख देण्याचा असतो. तसेंच उद्देश नसला तरी जर अशा हत्येने दुःख दिले गेले तरीसुद्धा ते कांहीं प्रमाणात पापकारक समजले जाते. दुःख हे पापाचे कारक समजले जाते. जर दुःख न होता हत्या केली तर त्यात पाप होत नाही. हिंसा म्हणजे असें कृत्य ज्यामुळें दुःख उत्पन्न होते. त्यात जरी हत्या झाली नाही तरी दुःख उत्पन्न झाले म्हणून ते पापकारक ठरते. पाप कारक कृत्य विचाराने प्रथम होत असते. अशा सगळ्या पापकारक कृत्यामुळे जी मनाने अथवा प्रत्यक्ष कृतीने (शरीराने) केली गेली आहेत त्या कर्त्याचे अध्यात्मिक स्थान नीच स्थानी जाते. पुण्यामुळें ते स्थान उंच जागी जात असते. म्हणून माणसांने नेहमी पुण्य करावे असे समजतात. तरीसुद्धा पापशक्ती माणसाला विविध प्रलोभने दाखवून पाप करण्यास उद्युक्त करत असतात. म्हणून दुःखहीन जीवन जगणे व जगण्यास मदत करणे

ह्यासारखे पुण्य कार्य नाही. माणसं वाचेने सर्वात जास्त पाप करतात कारण अपशब्दाने (अपमान कारक, टोमणे मारणे, हसें करणे, दुर्लक्षणे, चेष्टा मस्करी वगैरे प्रकार ह्यात येतात.) इतरांना दुःख दिले जाऊ शकते ते बोलणार्याचे अध्यात्मिक स्थान खाली आणत असते म्हणून मधूर वाचा असावी. क्रोध हे आणखीन एक कारण आहे ज्यामुळें माणूस इतरांत दुःख उत्पन्न करत असतो. त्यासाठी ज्याला पुण्यप्रद जीवन जगावयाचे आहे त्यानी क्रोध व अपशब्द टाळावेत. त्यासाठी चित्तवृत्ती शांत राखणे आवश्यक असते. दुसर्यांच्या गोष्टीत अनावश्यक लक्ष घालू नये. अशारितीने जो सावधगिरी बाळगून वागतो त्याच्या भोवती पुण्य शक्ती जमा होतात व त्या त्याला मदत करत असतात. त्या उलट पाप करणार्याच्या भोवती पापशक्ती जमा होतात व त्या आणखीन पाप वाढवण्याचा प्रयत्न करत असतात. वासनांच्या आहारी जाणारे अशा मध्ये अडकत असतात. माणसाच्या जीवनात सुखाचे व दुःखाचे प्रसंग येत असतात त्यामुळें तो अति सुखी वा अतिदुःखी होत असेल तर ते त्याच्यासाठी चांगले नसते. माणसाने चांगले झाले म्हणून फार खूष होणे व वाईट झाले म्हणून फार दुःखी होणे टाळावे. परिस्थिती चांगली असो अथवा वाईट असों त्याच्या चित्तवृत्ती स्थीर असल्या पाहिजेत. वाईट काळात त्यातून सुटण्यासाठी चुकीच्या मार्गाचा अवलंब करणे टाळावे. चुकून कांहीं वाईट कृत्य अनवधानाने घडले तर त्याची पुनरावृत्ती करू नये. आपल्यावर ब्रह्माची नजर आहे व आपले प्रत्येक विचार आणि कृत्य तो पहात आहे हे लक्षात घेऊन जर माणूस जगू लागला तर तो निष्पाप जीवन जगू शकेल. नेहमी न्यायाने वागावे. पाप करणारा ब्रह्माच्या नजरेत खोटा ठरतो व प्रायः त्याचा यथावकाश अधःपात होत असतो. पाप, पुण्य असे कांही मी मानत नाही, असें म्हणणारे बहुधः पापाच्या विळख्यात अडकून बरबाद होतात. अहंकाराच्या आहारी जाऊन जे कृत्य अथवा भाषण होते ते पापकारक असते त्यामुळें त्याचा अध्यात्मिक दर्जा कमी होतो. स्वताची स्तुती करणे अथवा दुसर्याला करावयाला लावणे हे पापकारक असते. चुकून कांही गैरकृत्य घडले तर त्याची भरपाई चांगले काम करून करावी. प्रामाणिक पश्चात्ताप बहुतेक पापांचे निराकरण करत असतो. चुका करत व त्या सुधारत माणूस प्रगती करू शकतो. सगळे मोक्षाला गेलेले ह्याच मार्गाने गेले आहेत. अरे ब्राह्मणा, श्रृतीमध्ये हे सगळे दिले आहे. अज्ञानामुळें झालेल्या पापाला चूक म्हणतात ते प्रायश्चित्त करून धुता येते.

जाणून बुजून जे केले जाते त्याला पाप म्हणतात व ते धुतले जात नाही, त्याची शिक्षा भोगावीच लागते. कांहीं चुका अनिवार्य व अपरिहार्य असतात त्यांच्या निराकरणासाठी दानं करावीत, दुसर्याला मदत करावी, समाजात चांगुलपणा वाढवावा. असें केल्याने त्या चुकांचे निवारण होत असते". कौशिक विचारतो, "अहो ज्ञानी, मला सांगा, पापकृत्य किती प्रकारे होत असते"? व्याध सांगतो, "अनवधानाने, हलगर्जीपणाने, बेपर्वाईने, जाणूनबुजून, अपघाताने, दुसर्याच्या सांगण्यामुळें, अज्ञानाने अशा सात कारणांने ते होऊ शकते. त्यातील बेपर्वाई, जाणून बुजून, दुसर्याने सांगितले म्हणून, हलगर्जीपणाने जे होते त्याचे पाप शिक्षेस पात्र समजले जाते. बाकीचे चुका (अनवधानाने, अज्ञानाने, अपघाताने) समजून क्षम्य समजले जातात. गुणीजनांच्या अशा क्षम्य चुकांना जो माफ करतो तो स्वर्गात जाण्यास योग्य समजला जातो. पश्चाताप माणसाला त्याच्या अक्षम्य पापां पासूनसुद्धा वाचवू शकतो. कारण ते सगळे ब्राह्माचे असंख्य नेत्र पहात असतात. त्या नजरेतून कांहींही सुटत नाही. आपण सगळे ब्रह्माच्या परीक्षेस बसलो आहोत, जर उत्तीर्ण झालो तर स्वर्गात व नापास झालो तर परत पृथ्वीवर अथवा त्याखाली नरकात जाणार असतो. ही विधात्याची रचना समजून जे जगतात ते उद्धरतात. पापाचे एक प्रमुख कारण मोह व दुसरे लोभ आहे. योगक्षेमापुरत्या आपल्या अभिलाषा ठेवणे व त्यापेक्षा जास्त त्यात न रमणे हांच त्यावर उपाय असतो. योगक्षेम म्हणजे शरीराच्या नित्य गरजा, त्या पुरवण्यासाठी हि सृष्टी व त्यातील विविध गोष्टी असतात. तेवढेच जर केले तर पापापासून माणूस मुक्त राहू शकतो. त्यालाच दुसर्या शब्दात मिताहार, मितनिद्रा, मितभोग, मौन किंवा मितभाषा असें सांगितले आहेत. येथे मित म्हणजे जेवढ्यांस तेवढे असे मर्यादीत, न जास्त न कमी. पापी माणसें कधी स्वताला पुण्याच्या बुरख्यात लपवण्याचा प्रयत्न करतात परंतु ते हे विसरतात कीं, ब्राह्माच्या नजरेतून ते पाप कृत्य निसटू शकत नाही. अशी माणसं इतर जनांना फसवत असतात व त्याबरोबर स्वतःलाही फसवत असतात, ब्रह्माची कधीही फसवणूक करता येत नाही हे ते विसरतात".

एवढे सांगितल्यावर कौशिक त्याला पुनः विचारतात, "पुण्यकर्म कसे ओळखावे ते समजावून सांगा. मला ते ऐकावयाचे आहे".

मार्कंडेय पुढे ते सांगत रहातात, तो पुढे त्याला बोलतो आपण पुण्यकर्मी अहात म्हणून मी तुम्हाला हे विचारत आहे. ज्ञानी खाटीक सांगू लागतो, "यज्ञ करणे, भेटी देणे, वैराग्य, वेदाचा अभ्यास, सत्याची चाड राखणे अशा पांच गोष्टी त्याच्यात प्रामुख्याने आढळतात. त्याला पुण्यवान समजले जाते. त्याशिवाय, वासनांत न रमणे, घमेंड न करणे, लोभीपणा न करणे, वाईट न वागणे, त्या बरोबर चांगल्या गोष्टीत रमणे, मधूर वाणी असणे, सत्याला स्मरून (परमेश्वराला स्मरून) सगळ्या गोष्टी करणे, आपल्यापेक्षा श्रेष्ठींना मान देणे, क्रोध नसणे, आपल्यावर अवलंबून असणार्यांचा अपमान न करणे ह्या आणखीन कांहीं गोष्टी त्याच्यात असाव्या लागतात. अशारितीने जगणारा ब्रह्माला प्रिय असतो. वेदाचा सारांश सत्यात आहे. सत्याचा सारांश आहे संयमित जीवनात, संयमित जीवनाचा सारांश आहे जगातील भोग्य गोष्टींबद्दल औदासिन्य बाळगण्यात. पुण्यवंतात हे सगळे तुला आढळेल. पुण्याच्या मार्गाने जाणे ह्यालाच धर्म (कर्तव्य) म्हणतात. त्यासाठी सगळ्या अवांतर इच्छां बद्दल औदासिन्य बाळगणे हींच अध्यात्म साधना आहे. तुला तुझ्या बुद्धीचा सुयोग्य वापर करून हे साध्य करावयाचे असते. आपल्या वासनात रमणारे, सत्यापेक्षा इतर गोष्टी ज्यात असत्यमय भोग (व्यसनं) आहेत त्यांना मानणारे त्यांना अश्रद्ध लोक म्हणून ओळखले जाते ते पुण्ण्यापासून दूर जात असतात. माणसाच्या जीवनगंगेत तो पोहोत असतांना, वासना (ज्या योगक्षेमाच्या गरजेबाहेर आहेत) एकाद्या विषारी सापासारख्या असतात व त्यांच्या दंशामुळें माणसाचे जीवन भ्रष्ट होत असते व तो त्यात बुडून जाण्याचा धोका असतो. वासनांच्या आहारी जाऊन दुसर्याला दुःख देणे हे एक मोठे पाप समजले जाते. प्रत्येक वासनामय विचारांचा तीव्र तिरस्कार करण्याची सवय लावावी लागते व ते शक्य असते कारण, अशा सगळ्या गोष्टी सवयप्रधान असतात. एकदा तशी सवय झाली कीं, वासनांचे उद्रेक आवरणे सोपे असते. परंतु, त्या तिरस्कारात क्रोधाची व द्वेषाची भावना नसावी, तो तिरस्कार धोरणात्मक असावा. अशा सवयीमुळें व्यर्थच्या वासना ज्या योगक्षेमाच्या नाहीत त्या येणे बंद होते. माणसाचे मन त्या प्रकारे तयार करावे लागते. मनाचा सवयप्रधान गुण ह्या ठिकाणी उपयोगाचा असतो. योगक्षेमाच्या वासना (इच्छा) कोणत्या व वाह्यात वासना कोणत्या हे ओळखण्यासाठी आपल्या सुबुद्धीचा उपयोग करावा लागतो. माणसाच्या मनात विविध प्रकारचे विचार येत असतात त्यातील बिनकामाचे

विचार न वाढवण्याचे धोरण असले पहिजे. योगक्षेमाचे विचार जे आवश्यक असतात त्यांची दखल घ्यावी. जर तुझ्या बुद्धीने तुला फसवले तर तू भ्रष्ट होशिल. जे लोक सत्याला (परमेश्वराला) मानतात त्यांना त्याचा आधार मिळत असतो. परंतु, जे देव, पितर ह्यांना मानत नाहीत त्यांना त्यांचा आधार न मिळाल्यामुळें ते वासनांत अडकून पडतात. परमेश्वरा वरील श्रद्धा त्याला अनेक अडचणींतून बाहेर येण्यात मदत करू शकतात. कारण पापशक्ती अशा माणसाला त्रास देत नाहीत. त्यात पितर, देव हे सगळे येतात. आपले आयुष्य त्यांना पाहून जे जगतात, ते वाह्यात (नको असलेल्या) वासनांत रमत नाहीत पण हे त्याच्या प्रामाणिकपणावर अवलंबून असते. त्यासाठी सतत अभ्यास करणे, आपल्या ज्ञानाचे क्षितीज वाढवणे, पुजापाठ करणे, यात्रा करणे त्यावेळी लोकांचे निरीक्षण करणे, पवित्र लोकांच्या सानिध्यात रहाणे अशा प्रकारे तो स्वताचे कल्याण करत असतो. पुण्यवान माणसे सगळ्यांशी प्रेमाने वागतात. हितकारक वागतात. ज्यामुळें समाजातील चांगल्या शक्तींचे बळ वाढेल असें त्याचे वागणे, बोलणे असते. त्याचा सगळ्यांना आधार वाटतो. त्याचा सल्ला सगळे मानतात. लहान मुलं, बायाबापड्या, म्हातारे कोतारे असे सगळे कमजोर लोक त्याला आधार मानतात. म्हणून राजा तसा पुण्यवान असावा लागतो. भूतदया हा पुण्यवान माणसाचा गुण असतो. सगळे प्राणीमात्र त्याच्या सानिध्यात स्वताला सुरक्षित समजतात. असा पुण्यवान देवांना फार आवडतो. तो मृत्यूनंतर स्वर्गात जातो. परंतु, जर त्याला त्याच्या चांगल्या वर्तणूकीचा अभिमान झाला तर मात्र तो पाप कारक असतो म्हणून, कितीही गुणवान असला तरी त्याची गुणवत्ता त्यांने ब्रह्माला दान करून जगावयाचे असते. आपल्या चांगुलपणाचा कोणी गैरफायदा घेत नाही नां, ते त्याने पहावयाचे असते कारण प्रायः दुर्जन अशा चांगल्या लोकांच्या मागून आपल्या कारवाया करत असतात. त्यांच्या पत प्रतिष्ठेचा ते फायदा उठवत असतात. जर तसे होत असेल व त्याकडे तो दुर्लक्ष करत असेल, तर त्याचे चांगले गुण व्यर्थ समजावेत. त्याचे पुण्यकर्म पापासमान समजावे. त्या दुर्जनांबरोबर तो सुद्धा नरकात जातो. म्हणून अशा पुण्यवंताने दुर्जनांपासून दूर रहावयाचे असते. पापाचे आणखीन एक मुख्य कारण असते माणसाची भावना विवशता. जो फार भावना विवश असतो तो नकळत पापाचरण करून बसत असतो. पुण्यवान तो, जो त्याचे सगळे निर्णय विवेकांने (योग्य, अयोग्य, हित, अहित अशा

गोष्टींचा सारासार विचार) घेतो. भावना माणसाला पाप करावयाला भाग पाडत असतात म्हणून माणसाने त्याच्या भावना नियंत्रित करावयाच्या असतात. भावनांचे समर्थन करणारे प्रायः चुका करत असतात कारण भावनांच्या आहारी जाऊन जेव्हां निर्णय घेतले जातात तेव्हां ते प्रायः अयोग्यच असतात. तशा चुकीच्या निर्णयांमुळें तो व त्याच्यावर विसंबून असणारे असें सगळे पापात अडकण्याची शक्यता असते. अरे ब्राह्मणा, माझ्या ज्ञानाप्रमाणे जे उचीत असते ते तुला सांगितले आहे. त्याचा तुला किती उपयोग होईल ते तू पहा". कौशिक त्याला विचारतो, "अहो ज्ञानी, आपण पाप शक्ती व पुण्यशक्ती असें सांगितले त्याबद्दल जास्त सांगाल तर बरे होईल". व्याध त्याला सांगतो, "ह्या सृष्टीचे दोन भाग असतात त्यातील एका भागात जो दृष्य आहे (व्यक्त) आपण असतो दुसरा भाग अदृष्य (अव्यक्त) असतो. त्यात ह्या सगळ्या शक्ती जसे देव दानव, पितर, पिशाच्च आणखीन बरेच कांहीं असतात. त्यातील पुण्य शक्ती ज्यांना आपण देव, पितर, देवता अशा नांवाने ओळखतो. पापशक्ती दानव, राक्षस, पिशाच्च वगैरे नांवाने ओळखल्या जातात. श्रृतीत ते दिले आहे. आज आपण त्रेता युगात आहोत म्हणून पुण्यशक्ती विशेष प्रबळ आहेत. कृत युगात त्या सर्वात जास्त शक्तीमान होत्या. जस जसें युग बदलते त्याप्रमाणे त्याची शक्ती व क्षमता सुद्धा बदलत असते. पुढे कलीयुग येणार आहे. तेव्हां पाप शक्ती सर्वात जास्त प्रबळ असतील व पुण्यशक्ती कमजोर असतील. त्याकाळात पाप वाढते. पुण्यशक्ती कमी जोरात असतील त्यामुळें पापमयता कलीयुगात जास्त असेल. त्या युगात पुण्यकर्माचा उपयोग करून पाप वाढवण्या इतपत पापशक्तींची मजल जाणार आहे. कलीयुगात पाप पुण्याचे सोंग घेऊन वावरतांना दिसेल".

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा त्रेपन्नावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग चोपन्नावा

मार्कंडेय पुढे सांगत असतात, अरे युधिष्ठीरा, तो खाटीक पुढे ब्राह्मणाला सांगतो. "अहो ब्राह्मणा, हा माझा पेशा माझ्या गतकर्मानुसार मला मिळालेला आहे. त्यात कांहीं कमी पहाण्याचे कारण नाही. कारण, जन्म आणि मरण दोनही सृष्टीच्या कर्माचे भाग आहेत. जन्माचे आपण कौतुक करतो व त्याचे स्वागत करतो परंतु, मृत्यूला टाळण्याचा प्रयास करत असतो. एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे कीं, जन्म व मृत्यू एकाच नाण्याच्या दोन बाजू असें असतात. जन्म झाला कीं मृत्यू क्रमप्राप्त आहे. मग जन्माचे स्वागत व मृत्यूची भिती, तिरस्कार असे वाटण्याचे कारण आपले सृष्टीच्या नियमांचे अज्ञान आहे. खरे ज्ञानी जन्म व मृत्यू समसमान मानतात कारण ते जाणतात कीं, ते एकाच गोष्टीची दोन रुप असतात. मृत्यू मग तो कोणाचाही असो तो स्वागतार्ह असला पाहिजे. कारण त्यामुळे पुढचा जन्म होणार असतो. जर मृत्यू झाले नाहीत तर जन्म होणे थांबणार असते. अरे ब्राह्मणा, येथे प्रश्न मरण्याचा अथवा मारण्याचा नसतो. प्रश्न असतो त्या बरोबर होणार्या दुःखाचा. ते दुःख नको असते म्हणून मृत्यूला विरोध असतो पण जन्मसुद्धा विना वेदना होत नाही त्याची कां दखल घेत नाहीत, ह्या प्रश्नाकडे कां दुर्लक्ष होते ते सांग. मुलतः अरे ब्राह्मणा, तुला माझ्या पेशाबद्दल जो आक्षेप आहे तो तुझ्या अज्ञानामुळें आहे. कोणताही पेशा कांही ना काही कमी घेऊन येत असतो. पूर्णतः निर्दोष असा पेशा नाही. म्हणून माझ्या पेशामध्ये कमी पहाण्याचे सोडून दे. अरे ब्राह्मणा, क्षत्रियांचे कौतुक होते तेसुद्धा हत्या करत असतात ते कां होते ते सांग. क्षत्रिय राजे शत्रू ठरवून माणसांची हत्या मोठ्या कौतुकांने करत असतात. त्यांना स्वर्गात कां जाता येते ते सांग. ते पुण्यकर्म कसे ठरते ते सांग. हि सृष्टी व तिचा कर्ता महाबली आहेत. त्यांना कोणी अक्कल शिकवण्याचा प्रयत्न करू नये पण मनुष्य हा असा प्राणी आहे कीं, तो विधात्याच्या चुका दाखवण्याचा मूर्खपणा मोठ्या हुशारीने करत असतो. खरा ज्ञानी जन्म, मृत्यू, सुख, दुःख, आनंद, निराशा अशा विविध एकमेकां विरुद्ध गोष्टीत खोट काढत नाहीत कारण, ते सगळे निसर्गाच्या कामात होणारे परिणाम असतात व ते साधारणपणे अपरिहार्य आणि बर्याच वेळा अनिवार्य

असतात हे तो जाणत असतो. जसें जर अग्नी असेल तर तेथे धूर असणार तसे ते समजतात. माणसाने कोणताही पेशा करतांना ते कार्य ब्रह्माला वाहून करावयाचे असते. ते ब्रह्माची सेवा ह्या विचाराने करावयाचे असते. त्यात खोट काढत बसणे अज्ञानमुलक असते. जेव्हां माणूस त्याचा पेशा ब्रह्माला वाहून करतो तेव्हां तो ते कार्य निर्दोष करत असतो कारण ते तो ब्रह्मासाठी करत असतो. म्हणून प्राण्याला मृत्यू देण्याचे कार्य करतांना त्या प्राण्याला किमान दुःख होईल अशी दक्षता बाळगणे हे त्या ब्रह्माच्या सेवेचा एक भाग आहे असे समजून काम करावयाचे असते. ते जर झाले तर तो मृत्यू विनावेदना होतो व ते कार्य नियमानुसार झाले असे होते. युद्धात क्षत्रिय शत्रूला मारतांना त्याला कमीत कमी वेदना होतील अशारितीने मारावयाचे असते. जो तशा रितीने शत्रूची हत्या करतो तोच वीरगतीला जात असतो जर तोसुद्धा त्यात मेला. खाटकाच्या कामात आम्ही असें मानतो कीं, तो प्राणी यमदेवता मारत असते व आम्ही फक्त साधन स्वरुप आहोत. म्हणून जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे ते काम करावयाचा प्रयास होत असतो. जर यमदेवाची इच्छा नसेल तर तो प्राणी मरणार नाही असें आम्ही सगळे समजतो हे तुला सुद्धा माहीत आहे. मारल्यानंतर त्याचे मांस शुद्ध करून (मिठाच्या पाण्याने) आम्ही यमदेवाला अर्पण करत असतो. त्यानंतरच ते विकण्यासाठी दिले जाते. त्यामुळें त्यात कोठलेही पाप घडत नाही हे समजून घे. जर कोणी व्याध स्वताच्या सुखासाठी प्राणी मारत असेल तर ते मात्र पाप ठरते. मांस हे यज्ञाच्या अग्नीला (हुताशनीला), अतिप्रिय असते. विशेष करून त्याचे मेद त्याला फार आवडते असें वेदांत सांगितले आहे, हे तुला माहीत असेलच. त्याशिवाय इतर सगळ्या देवतांना सुद्धा मांस त्याच्या रुचीमुळें प्रिय असते. सर्वच देवतांना प्राण्याचे मांस प्रसाद म्हणून द्यावयाचे असते. आपण जाणता कीं पहिला मान ब्राह्मणाचाच असतो ते खाण्यात. सर्व प्रसादांत गोमांस हे उत्तम प्रसादाचे म्हणून सांगितले आहे हे तुम्ही जाणता अहात. मग ते तुम्हाला कसे मिळणार जर कोणी ते मारण्याचे काम केले नाही. वेदात सांगितले आहे कीं, वनस्पतीसुद्धा श्वास घेतात, त्यांच्यात प्रजनन होत असते व म्हणून ते सुद्धा सजीव असतात. त्यांचे खाण्यानेसुद्धा दुःख त्याना होत असते मग त्याबद्दल काय आक्षेप असतो ते सांगा. सगळे देव, देवता, यक्ष, गंधर्व, पितर मांसाचाच प्रसाद मांगतात, त्यांना शाक प्रसाद देण्याने त्यांचा उपमर्द होतो हे तुला माहीत नाही कां"? पुढे तो व्याध

कौशिकाला बोलतो, "माणूस मांस खाओ अथवा शाक वनस्पती खाओ त्याला त्या जीवाला दुःख दिल्याने पाप लागणारच त्या पापाला अनिवार्य पाप असें वेदात दिले आहे. त्यासाठी पश्चात्ताप करावयाचे सांगितले आहे. कारण आपण जगतो तेंच मुळी पापामुळे जे आपण आधीच्या अनेक जन्मांत केले आहे. म्हणून खाण्यामुळें पाप होणे अपरिहार्य म्हणून अनिवार्य असते हे तू जाणतोस. त्याबद्दल एवढा गहजब तू कां करतोस, त्याचे कारण तुझे ह्या सृष्टीचे ज्ञान अपुरे आहे. काय तुम्ही खाता हे महत्वाचे नसते, दुःख निर्माण करता कां नाही, ते महत्वाचे असते. दुःखहीन खाद्य खाणे हा प्रधान उद्देश असला पाहिजे. दुःखहीनता हा धर्माचा भाग आहे. खाण्यात परोक्ष अथवा अपरोक्ष दुःख उत्पन्न होत असेल तर ते खाणे पाप कारक समजले जाते. राजा सिवीने स्वताचे मांस देवाला अर्पण केले होते. त्यामुळें तो स्वर्गात गेला हे तू जाणतोस. अतिप्राचीन काळी राजा रतिदेवांने दररोज यज्ञात हजारो गाई कापल्याचे सांगितले जाते ते इंद्राकडून कृपा प्राप्त व्हावी म्हणून हेसुद्धा तू जाणत असशिल. ते सगळे मांस तो ब्राह्मणांना प्रसाद म्हणून देत असें. जर कोणी तरी ते मारण्याचे कार्य केले नाही तर ब्राह्मणांचा प्रधान आहार, जो गोमांस आहे तो त्यांना कसा मिळणार ते सांगा. अहो ब्राह्मण, आमचा पेशा तुम्हा ब्राह्मणांची सेवा करण्यासाठीच आहे हे प्रथम लक्षात घ्या. अहो ब्राह्मणा, तुम्ही शाकाहार करा अथवा मांसाहार करा पाप माथी लागणारच कारण दोनही आहारात जीवाला (प्राणी अथवा वनस्पती) दुःख दिले जात असते. तरी आपल्या बेहोष करून नंतर मारण्याच्या सिद्ध पद्धतीमुळें कमीतकमी दुःख त्या प्राण्याला होत असते. शाकाहारात वनस्पती बेहोष न करतांच शिजवली जाते त्यामुळे खूप जास्त पाप होत असते म्हणूनच सांगितले आहे किं गृहस्थाच्या स्वयंपाक घरात पांच खाटीकखाने असतात. [मनुस्मृतीत त्याबद्दल जास्त माहिती आहे ती पहावी] त्याकरतां, प्रायश्चित्तं दिली आहेत ती करावी लागतात. असें वेदात सांगितले आहे कीं, यमाला बळी दिल्यामुळें त्या प्राण्याला उच्च गती प्राप्त होते व त्याचे कल्याण होत असते. यज्ञात बळी देण्याचे काम तुमच्या सारखे ब्राह्मणच करत असतात. कारण त्या नंतर जे प्रायश्चित्त करावयाचे ते फक्त ब्राह्मणच करू शकतो म्हणून खाटीकांचे कार्य वेद काळापासून ब्राह्मणांचीच जबाबदारी समजली जाते हे तुम्ही जाणताच मग माझ्या पेशाबद्दल आक्षेप करण्याचे काय कारण"? असे सांगतात देवांच्या प्रमाणे पिशाच्च देवसुद्धा मांस प्रसाद

मांगतात. त्यामुळें ब्राह्मणांप्रमाणे शुद्रसुद्धा माझ्याकडून मांस घेत असतात. ह्या ना त्या कारणांनी सगळेच लोक मांस खात असतात. ते पुरवणे आमचे काम असते". अहो ब्राह्मणा, "जर प्राचीन पवित्र अग्नीला मांस इतके आवडत नसते तर कदाचित मांस इतके प्रचारात आले नसते. त्यासाठी प्राचीन मुनींनी कांहीं नियम घालून दिले आहेत ते पहा. त्याप्रमाणें जो प्रथम देवांना व पितरांना अग्नीच्या मुखातून मांसाची आहुती देतो त्याला कांहीं दोष लागत नाही. आणि अशा माणसांने जरी मांस प्रसाद म्हणून खाल्ले तर त्याने ते खाल्ले असें समजले जात नाही. तो फक्त एक साधन स्वरुप आहे असें समजावे. हे तसे असते जसें, ब्राह्मणांने त्याच्या पत्नीसह संभोग जर तिच्या ऋतुच्या काळात तिच्या परवानगीने घेतला तर तो संभोग मानला जात नाही [अशा संभोगाला प्रजनना प्रित्यर्थ केलेला संभोग असें समजले जाते.] व तो ब्राह्मण ब्रह्मचारीच समजला जातो, तसे आहे. त्याचप्रमाणे पत्नीच्या इच्छेने जो तिला सुख देतो तोसुद्धा ब्रह्मचारीच समजला जातो हे मुनींचे वचन आहे. पुरुषाने कदापिही स्वेच्छेने तिच्याकडे अथवा इतर कोणाही स्त्रीकडे पहाणे पाप कारक समजले जाते, तसें हे नियम आहेत. पुरूषाने नेहमीच संयमित राहावे असे संकेत आहेत. हिताचा विचार लक्षात घेऊन हे नियम बनवलेले आहेत". असें व्याध कौशिकाला सांगतो. व्याध विचारतो, "अरे ब्राह्मणा, राजा सुदास जेव्हां शापाच्या प्रभावाखाली होता तेव्हां लोकांवर हल्ला करून त्यांना खात असें. त्या त्याच्या कृत्यामुळें त्याला पाप लागत होते कां? त्यावर तुझे मत काय आहे"? कौशिक ब्राह्मण त्यावर उत्तर देतो, "शापाच्या प्रभावाखाली तो तसे करत असल्यामुळें त्याला पाप लागत नाही परंतु, जे पाप त्याच्या शरीराला लागले ते अनिवार्य असते म्हणून क्षम्य असते". पुढे कौशिक त्याला त्याने विचारलेल्या आधीच्या प्रश्नाचे उत्तर देतो, "जन्म देणार्या मातेसच आणि जन्मणार्या अर्भकास फक्त ते जन्माचे दुःख भोगावे लागते म्हणून त्या दुःखाकडे दुर्लक्ष होत असते, परंतु, मृत्यूमुळें इतर बर्याच लोकांना दुःख होत असते म्हणून ते विशेष लक्षात घेतले जाते". त्या उत्तराने व्याध प्रसन्न होतो.

त्यानंतर व्याध कौशिकाला सांगतो, "माझा जन्म ह्या घरात झाला जेथे हा व्यवसाय पिढीजात चालू आहे व तुम्हाला माहीत आहे कीं, माणसाने त्याचा पिढीजात व्यवसाय न करणे हे चुकीचे समजले जाते. पिढीजात व्यवसाय करत रहाणे नेहमीच श्रेयस्कर मानले

गेले आहे सर्व वैश्यांसाठी. त्यामुळेंच ब्राह्मणांची मुलं त्यांच्या पित्याचा व्यवसाय करत असतात जसे तुम्ही करत अहात, मग आम्ही केले तर त्यात गैर काय"? किंबहुना, त्यामुळेंच जन्मनिहाय वर्णव्यवस्था उदयांस आली आहे. आपल्या गत जन्माची कर्मं आपल्याला सोडत नाहीत. हा नियम सगळ्या प्राणिमात्रांना सारखाच लागू होतो. प्राण्याच्या कर्म भोगांचा विचार करतांना विधात्याने हा नियम ग्राह्य मानलेला आहे. जर एकाद्याला समजले कीं तो त्याच्या गतजन्माच्या पापामुळें पापमुलक कृत्य करणास प्रवृत्त होत आहे तर अशावेळी त्यांने त्याच्या विवेकाचा आधार घेऊन त्यापासून निवृत्त व्हावयाचे असते. **माझ्या कर्माचे फळ सुधारण्यासाठी मी वेदाचा अभ्यास करत असतो, दानं करत असतो, चांगुलपणाने सगळ्यांशी वागत असतो. अडलेल्या नडलेल्यांना मदत करत असतो. सर्व प्राण्यांशी भूतदयेने वागत असतो. माझे वागणे निरहंकारी, दयाघन, ब्राह्मणांबद्दल (गुणीजन) आदरपूर्वक, तसेंच मी मिताहारी, मितभाषी, मितनिद्रा अशारितीने माझ्या कडून जी अनिवार्य म्हणून अपरिहार्य असलेली नित्य पापकर्म घडत असतात त्यापासून माझे संरक्षण करत असतो,** ह्यालाच **पाप क्षालनाचे व्रत** समजले जाते. तोच मार्ग वेदांनी सांगितला आहे  व ऋषींनी दाखवलेला आहे. शेती कार्य चांगले सांगितले जाते पण त्या मातीत अनेक जीव नांगरणी करतांना व इतर नित्य कर्मं करतांना मारले जातात, त्यामुळें केव्हढी हिंसा होते तरी त्याला विरोध नसतो कारण ती सगळी आपल्या ऋषींनी अनिवार्य म्हणून सांगितलेली आहेत. अरे ब्राह्मणा, माणूस दुसर्या जीवाचा नाश केल्याशिवाय जगूच शकत नाही. म्हणून त्याबद्दल पाखंड करून कांहीं साध्य होणारे नसते. म्हणून माझ्या व्यवसायाबद्दल रोष बाळगून तू कांहींच साध्य करू शकणार नाहीस. कंदमुळं मातीतून काढतांना, धान्याची कणसं कांडापासून छाटतांना, फळं झाडावरून तोडतांना, शेतात वखारणी, निंदणी करतांना, धान्य कांडतांना, डाळींचे दल करतांना, भाज्या शिजवतांना, उकडतांना, भाजतांना, तळतांना किती मोठ्या प्रमाणात हिंसा होते आणि ती सगळी पाप केल्याशिवाय शाकाहार करता येत नाही. प्राण्यांप्रमाणे वनस्पतीलासुद्धा संवेदना असतात त्यामुळें ह्या गोष्टी करतांना त्यांना वेदना होत असतात म्हणून त्या सगळ्या कृती हिंसा

करणार्या ठरतात. (श्री जगदीशचंद्र बोस ह्यानी ते प्रयोगांनी १९०१ साली सिद्ध सुद्धा केले आहे, परंतु, विशेष म्हणजे हे ज्ञान व्याधाला त्रेतायुगात उपलब्ध होते) त्या सर्व पापांकडे डोळेझाक कां करावी ते सांगा. त्यापेक्षा सिद्ध पद्धतीने यमाच्या नांवाने केलेली हत्या निश्चितच कमी पापकारक असते. वेदांत सांगितले आहे किं माणसाने कांहीही खाण्या आधी ते प्रथम देवाला अर्पण (मनाने) करावयाचे असते व ते त्याचा प्रसाद म्हणून खावयाचे असते. तसे केल्याने कोणतेही पाप लागत नाही त्याशिवाय नित्यनेमानें, **पाप क्षालनाचे व्रत**, ज्याबद्दल आधी सांगितले आहे ते नित्य करत रहावे. माणसाने कोणताही आहार केला तरी पाप लागणारच म्हणून आपल्या प्राचीन ऋषींनी **पाप क्षालनाचे व्रत** सांगितले आहे ते करावयाचे असते". अरे ब्राह्मणा, "वृही आणि इतर सगळ्या भाताच्या प्रजाती सजीव असतात हे सगळे जाणतात. ते शेतात भरडून त्यातून दाणा काढतांना त्या जीवाला हानि होते म्हणजे मोठ्या प्रमाणात हिंसा होत असते. गव्हाचे, साळीचे बी वेगळे करण्यासाठी त्याची साल कांडण करून काढावी लागते त्यामुळें त्या बियांना ज्या वेदना होतात त्याचा कां विचार होत नाही. मोठ्या प्रेमांने वाढवलेले पीक आल्यावर उरलेली कांड उपटून काढतांना त्यांना ज्या वेदना होतात त्याची कां दखल घ्यावयाची नाही, त्यात पाखंड होतो त्याचे कसे समर्थन होते ते सांगा. शाकाहारा मागे अज्ञान आणि मिथ्याचार असतो त्याचे समर्थन कसे होते ते सांगा? त्याबद्दल तू काय आक्षेप घेतोस ते सांग"? शेतकरी कापणी करतो, निंदणी करतो, नांगरणी करतो, वखारणी करतो, झाडे छाटतो, कंदमुळं उपटून काढतो, ह्या आणि अशा प्रकारच्या सगळ्या कर्माने पाप सतत होत असते त्याबद्दल तुला कां आक्षेप नाही"? वरकरणी दिसले नाही म्हणजे ते पाप झाले नाही, ती हिंसा झाली नाही असें समजणे केवळ अज्ञानाचे लक्षण आहे व ते तुमच्या सारख्या विद्वानाला शोभत नाही. साधा श्वासोंच्छ्वास घ्या, त्यामुळें हवेतील कित्येक जीव आपण मारत असतो, ते तुम्ही थांबवू शकत नाही कारण श्वासोंच्छ्वास करणे अपरिहार्य म्हणून अनिवार्य सुद्धा असते. असे असल्याने आपल्या प्राचीन ऋषींनी **पाप क्षालनाचे व्रत** सांगितले आहे. मासे माशाला खातात, सगळेंच जीवो जीवस्य जीवनम् चे पालन करत असतात. आपण साधे बोलू लागलो, चालू लागलो, अनेक जीव मारत असतो. अरे ब्राह्मणा, मोठे ज्ञानी सुद्धा तसे पाप करत असतात. ती सगळी पापं क्षम्य मानलेली आहेत

म्हणून त्यांना पाप न समजता चुका असें समजले जाते. रोगी बरा करतांना त्या रोगाचे कारण असलेल्या लक्षावधी सुक्ष्म जीवांना आपण औषधं वापरून मारून टाकतो व म्हणून आपण बरे होतो. जर ते केले नाही तर आपण मरणार असतो. इतका जीवांचा एकमेकांवर अवलंबून रहाण्याचा योग आहे. आपले राज्य वाचवण्यासाठी शत्रूचा नाश करतो ते सगळे क्षम्य समजलेले आहे. कारण ह्या सगळ्या हिंसेच्या घटना अनिवार्य आणि अपरिहार्य अशा असतात. तेथे जगण्याचा प्रश्न असतो. अशा गोष्टींचे अवडंबर माजवणे हे मिथ्याचाराचे लक्षण समजले जाते. प्राचीन काळापासून अनेक ऋषींनी जीवांची हिंसा टाळण्यासाठी अनेक प्रयोग केले परंतु व्यर्थ गेले ते सगळे प्रयास. म्हणून शेवटी कांहीं नियम करण्यात आले ते तुला सांगतो. सिद्ध पद्धतीनेच खाण्यासाठी प्राण्याची हत्या करावयाची, त्यात मोठे प्राणी मारावयाचे कारण लहान प्राणी मारला तर जास्त मारावे लागतात व त्यामुळें जास्त हत्या व त्या अनुषंगाने जास्त हिंसा होण्याची शक्यता असते. मोठा प्राणी अनेक जण खातात त्यामुळें प्रती खाणारा एकंदर पापाचा वाटा कमी येतो. त्यासाठी गाय, बैल, म्हशी, रेडे, डुक्कर असें मोठे प्राणीच मारावयाचे असा दंडक जनक राजाने जारी केला आहे. त्याशिवाय ज्या प्राण्याचे आयुष्य पूर्णपणे तो जगला आहे असें प्रौढ अथवा वृद्ध प्राणीच खाण्यासाठी मारावयाचे असतात. तरुण, लहान, गाभण असें मारावयाचे नसतात. त्यामुळें किमान दुःख निर्माण होते. राजांनी सुद्धा शिकार करतांना मोठेच प्राणी मृगयेसाठी निवडावयाचे असतात अशी प्रथा आहे हे तुला माहीत असेलच.

त्या चर्चेनंतर कौशिक दुसरा विषय घेतो. तो विचारतो त्या व्याधाला त्याचे मत कीं, "उच्च कुलिन प्रतिष्ठीत समजले जाणारे लोक स्वताच्या सोय़ीसाठी दुसर्यांना त्रास देण्यात धन्यता मानतात त्यात हिंसा होते. मग ते करणे श्रेयस्कर समजावे कां"? तसे वागणार्यांचे दोस्त त्यांचे कौतुक करत असतात. पढतमूर्ख विद्वान त्यांच्या व कधी कधी विधात्याच्या चुका दाखवण्याचे धाडस करत असतात. ते पापाचरणात येत नाही मग असे सगळे वागणे योग्य समजावयाचे कां"? चांगल्या लोकांचे चांगले कार्यसुद्धा कधी कधी इतर चांगली माणसें कौतुकांने पहात नाहीत ते बरोबर आहे कां"? चुकीच्या रीतीने वागणार्यांचे मात्र कौतुक वाईट माणसें करत असतात ते ग्राह्य समजावयाचे कां"? ह्यात सगळ्या उदाहरणांतून आपण विरोधाभास पहात असतो. असें सर्वत्र आढळून येत असते. अशा

परिस्थितीचा अध्यात्मिक दृष्ट्या आपण काय अर्थ काढाल"? आपले मत मला ऐकावयाला आवडेल.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा चोपन्नावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग पंचावन्नावा

मार्कंडेय पुढे सांगत असतात, अरे युधिष्ठीरा, तो पवित्र आणि दयाघन असा व्याध मोठ्या चतुराईने त्याला उत्तर देतो. "एक प्राचीन म्हण आहे कीं, चांगुलपणाच्या तर्हा विलक्षण, सुक्ष्म आणि विविध असतात. आपण खरे बोलण्याबद्दलचे पाहूया. उदाहरणार्थ, जीवन जेव्हां अवघड परिस्थितीत असते किंवा लग्न जुळवण्याच्या प्रसंगी माणसे बर्याच वेळा खोटे बोलतात. ते योग्य समजले जाते कारण, त्या प्रसंगी हित व अहित ह्यांचा विचार करावयाचा असतो. खरे आणि खोटे ह्यांचा संबंध हित व अहिताशी होत असतो. कारण कधी कधी खोटे सांगण्याने सत्याचा विजय होणार असतो. जर अशावेळी खरे सांगितले तर असत्याचा विजय होण्याची जास्त शक्यता उत्पन्न होत असते. ह्या ठिकाणी जे सर्व प्राणिमात्रांसाठी हिताचे आहे ते सत्याला मंजूर असते असे गृहीत धरून गोष्टी ठरवल्या जातात. खरे बोलणे अथवा त्यानुसार काम करणे असत्याला मदत करणारे असते. ह्यात त्याचा विलक्षणपणा दिसून येतो. माणसाचे कर्म चांगले असेल अथवा वाईट असेल त्या प्रमाणे त्याचे फळ त्याला मिळत असते. अज्ञानी व्यक्ती जी दुर्दैवी परिस्थितीत गेलेली आहे, देव, परमेश्वर अशांची प्रार्थना करते परंतु, ती लक्षात घेत नाही कीं, तिच्या त्या परिस्थितीला तिचे चुकीचे अथवा पाप कर्म कारण असते. असे असले तरी तो त्या देवांना दोष देत असतो. तशामुळें त्याचे नुकसान होण्याची शक्यता असते. त्यामुळे तो आणखीन दुःखात जाण्याची जास्त शक्यता असते. अशा प्रसंगांतील सुक्ष्मता लक्षात न घेता अशी व्यक्ती बहुधा आपले निर्णय घेत असते. अशा परिस्थितीत त्याचे पुस्तकी ज्ञान आणि चांगले वागणे सुद्धा त्याला मदत करू शकत नाही. जर सगळे ह्याच जन्मापुरते मर्यादित असते तर ह्या जन्मात केलेल्या चांगल्या वाईट कृत्याची प्रतिक्रिया ह्याच जन्मात मिळाली असती परंतु, तसे होतांना दिसत नाही. असें जसे एकाद्या बुद्धीमान माणसाला आढळून येते तेव्हां त्याचा गोंधळ होतो व तो असें कां होते ते समजू शकत नाही. तो पहातो कीं कांही जण वाईट कर्मात व्यस्त असूनही मजेत रहात आहेत व चांगले काम करणारा दुःखी कष्टी जीवन जगत आहे. कांहींही केले तरी तो ती परिस्थिती बदलू शकत नाही. असें कां

होते ते त्याला समजत नाही व असा गोंधळलेला माणूस प्रायः देवांना दोष देऊन मोकळा होतो. वस्तुतः त्याच्या त्या दुःखमय भोगांचा देवांशी कांहींही संबंध नसतो. परंतु, तसे विनाकारण देवांना दोष देण्यामुळें उलटे पाप त्याच्या पदरात पडत असते (त्याची अध्यात्मिक पातळी उतरत असते) पण ते त्याच्या अज्ञानामुळे त्याच्या लक्षात येत नाही. म्हणून माणसांने ह्या सृष्टीचा हा जो खेळ विधात्याच्या इच्छेने चालू आहे त्याचे नियम समजून घेतले तर तो ह्या खेळात निश्चितपणे यशस्वी होत असतो. ह्या सृष्टीच्या खेळातील आपण निव्वळ प्यादे आहोत हे त्यासाठी प्रथम आपल्याला मान्य करावे लागेल. आणि आपल्याला हा खेळ खेळणे बंधनकारक आहे मग तो त्याला आवडो अगर न आवडो, हे समजून जगणे हेंच आवश्यक असते. बरेचजण चुकीच्या काल्पनिक विचाराने प्रेरीत होऊन त्यापेक्षा वेगळे कांहीं करत रहातात व त्यांनी ह्या खेळाचे नियम न पाळल्यांमुळें ते जीवनात अयशस्वी ठरतात. जो ह्या खेळात जिंकला तो मोक्ष प्राप्त करत असतो म्हणजे त्याला खेळात पुनः यावे लागत नाही म्हणजे त्याला पुनः जन्म घ्यावा लागत नाही. जोपर्यंत ती व्यक्ती ह्या विधात्याने मांडलेल्या खेळात जिंकत नाही तोवर त्याला पुन्हा पुनः जन्म घेऊन यावे लागत असते. एकदा ह्या खेळातील जन्म जन्मातरीची रचना तू समजलास कीं, ह्या जन्मात जे घडत आहे त्याचा संबंध तुझ्याच मागील जन्मांशी निगडीत आहे ते लक्षात येते व आपलेच कर्म आपल्या पाठी लागले आहे हे समजते. त्यावेळी आपण ह्या जन्मात कसे व काय केले पाहिजे त्याचे नियोजन तो करू शकतो. कांहीं जन्मताच श्रीमंत असतात तर कोणी गरीब असतात. कोणी धष्टपुष्ट असतात तर कोणी अशक्त असतात. कोणी सुंदर असतात तर कोणी कुरूप असतात. कोणाला उत्तम आरोग्य लाभते तर कोणी जन्मतः रोगट असतो. ह्या वैविध्याचे कारण, त्या त्या व्यक्तीचे मागील कर्म असतात. जसे केले त्या जन्मी तसे ह्या जन्मी भोगत असतो. चांगल्या कर्माचे अथवा विचारांचे चांगले व वाईट कर्माचे अथवा विचारांचे वाईट प्रभाव दिसून येत असतात. त्या प्रमाणे जसे शरीराचे वैविध्य आपण माणसांत पहातो तसेंच त्याच्या विचार करण्याच्या स्वभावातसुद्धा वैविध्य आढळून येत असते. त्याला वेदांतसुद्धा माणसाचे प्राक्तन अथवा भाग्य म्हणून समजले आहे. माणसाचे भाग्य हे त्याची गतकर्माची पुंजी स्वरुप असते. चांगल्या कर्माचे चांगले व वाईट कर्माचे वाईट भोग अशी साधारणपणे व्यवस्था असते परंतु, गोष्टी तितक्यावर थांबत

नाहीत. त्यात आणखीन बर्याच गुंतागुंती दिसून येतात. भाग्य प्रत्येकांचे असते व ते प्रत्येकाचे त्याच्या गतकर्मानुसार रचलेले असते. कोणाला मुलं होतात, कोणाला होत नाहीत, कोणाला लोकांचे सहकर्य लाभते तर कोणाला समाजाकडून विरोध होत असतो. कोणाला यश मिळते तर कोणाला बरीच मेहनत करूनही यश मिळत नाही. कोणी मजेत रहातो तर कोणी सजेवर जातो. कोणाची मुलं त्याच्या इच्छा पूर्ण करतो तर कोणाची मुलं त्याला ताप देतात. कोणाच्या मुलींची लग्न चटकन होतात तर कोणाच्या मुलींची लग्न होता होत नाहीत. कोण एक लग्न करतो तर कोणी अविवाहीत असतो. तर कोणाची अनेक लग्न होत असतात. असे वैविध्य सर्व ठिकाणी आपण पहात असतो. माणसाचे स्वभाव सुद्धा त्याच्या गत जन्मातील कर्माचाच परिणाम स्वरुप असतात. कोणी रागीट तर कोणी प्रेमळ, कोणी संशयी तर कोणी चटकन भरवसा टाकणारे असें विविध स्वाभाव आढळतात. अशारितीने प्रत्येक व्यक्ती त्याची पुंजी घेऊन येत असतो. त्या पुंजीच्या जोरावर त्याला त्याचा जीवनाचा सरीपाट मांडावयाचा असतो. कोणाला गुणी मुलं होतात तर कोणाला दुर्गूणी होतात. कोणाची मुलं त्यांच्या कामात यशस्वी होतात तर कोणाची मुलं अयशस्वी होतात. कोणाच्या पोटी तेजस्वी साधू पुरूष जन्मतो तर कोणाच्या पोटी करंटा जन्मतो. म्हणजे आपल्या पोटी कोण जन्मणार तेसुद्धा आपल्या भाग्याचाच भाग असतो. कोणी त्यांच्या पूर्वजांच्या श्रीमंतीवर जगतात तर कोणाला त्यांची संपत्ती स्वतः कमवावी लागते. माणसाची शरीर प्रकृतीसुद्धा त्याच्या गतकर्माचा परिपाक असतो. कोणी सदृढ असतो जन्मताच तर कोणी रोगट असतो. ते जन्मणे त्या त्या प्रकारचे भोग असलेल्या मातापित्यांच्याच पोटी जन्म घेत असतात. कोणी जन्मतः मनोरुंग्ण असतात अथवा नंतरच्या काळात वेडे होतात तर कोणी अल्पायुषी असतात व लवकर मरतात. कोणी बलवान असतात तर कोणी साधारण प्रकृतीचे असतात. कोणी अध्यात्मिक प्रवृत्तीचे असतात तर कोणी अश्रद्ध असतात. कोणी क्षमाशिल असतात तर कोणी सुडबुद्धीने वागणारे असतात. कोणी दुष्ट असतात तर कोणी दयाळु असतात. अशारितीने प्रत्येक व्यक्ती कांही कमी व कांहीं जास्त घेऊन जन्म घेत असते. माणसाला त्याचे जीवन त्या पुंजीच्या मदतीने जगावे लागते. तो बरेच प्रयत्न करत असतो परंतु, त्याला त्यात यश येत नाही. त्यासाठी तो देवाला दोष देऊन मोकळा होतो वस्तुतः त्याच्या मागे त्याच्या गत

जन्मातील दुसर्यांना त्रास देण्याच्या कृत्याचा संबंध असतो ते तो लक्षात घेत नाही. जर तसे नाही मानले तर अशा अनुभवांचे स्पष्टीकरण देता येत नाही. जर तसे नसेल तर कोणीही मरणार नाही. कोणीही अयशस्वी होणार नाही. कोणीही त्याच्या प्रतिस्पर्ध्याला हरवू इच्छित असतो पण त्यात त्याला यश येतेच असें नाही. सगळे त्यांच्या आयुष्यात यशस्वी होण्याचाच प्रयत्न करत असतात. पण सगळ्यांना ते मिळत नाही. कांहीं चांगल्या नक्षत्रांवर जन्म घेतात तरी त्यांना यश मिळत नाही. असें काय बिघडते ते त्याला समजत नाही व तो त्यासाठी देवांना जबाबदार धरतो. वस्तुतः त्याचे कारण त्याच्याच गेल्या जन्मातील त्याची कृष्णकृत्ये असतात. ह्यावरून एक गोष्ट स्पष्ट होते कीं, कोणीही त्याच्या जीवनाचा खरा मालक नाही. त्याच्या ह्या जीवनावर त्याच्याच गतकर्माचा ताबा असतो, त्यालाच आपण दैव म्हणतो. त्या प्रमाणे त्याचे जीवन ठरत असते. गेल्या जन्मातील कर्माचे फळ त्याला ह्या ना त्या स्वरुपात भोगावे लागत असते. ते त्याचे गत क्रम त्याला नाचवत असते. येथे विधाता कोठेही हस्तक्षेप करत नाही. त्यात त्याच्या जीवनाच्या सगळ्या पैलूंचा समावेश होत असतो. म्हणजे त्याचे स्वताचे जीवन, त्याच्या जवळच्यांचे जीवन, त्याची अपत्ये, त्याची भावंड, त्याचे मित्र, शत्रू असे सगळेच त्यात अडकलेले असतात. त्याचे शरीर, त्याचा स्वभाव, त्याच्यातील इतर गुण असें सगळे घेऊन तो तयारीने ह्या जगात जणू फेकला जात असतो. म्हणजे आपले जीवन आपले असले तरी ते पूर्णतया आपले नसतेसुद्धा. ह्या खेळाचा नियोजक (विधाता) ते करत असतो व त्यासाठी आपलेच कर्म तो वापरत असतो. असें सांगतात त्यात जो खरा खेळाडू असतो, तो कोण ते प्रथम समजले पाहिजे. असें समजले आहे किं, त्यातला खेळाडू आपला आत्मा असतो व तो कधीच मरत नाही तो चिरंजीव असतो. तोंच पुनः पुन्हा जन्म घेत असतो. शरीर त्या खेळात एक साधनस्वरुप असते व ते नश्वर असते. ते त्याचा काळ संपला की नष्ट होणारच कारण कोणतीही वास्तविक गोष्ट चिरंजीव नसते. मृत्यू शरीराचा झाला कीं तो आत्मा त्याच्या बरोबर नवीन कर्मफलांची पुंजी घेऊन त्यातून बाहेर पडतो. त्या कर्मफलाच्या पुंजीला योगशस्त्रात लिंगदेह असें म्हणतात. त्यानंतर मृतात्मा म्हणून तो रहात असतो पुनः जन्म मिळे पर्यंत". त्यावर ब्राह्मण व्याधाला विचारतो, "आपण ज्ञानी अहात व विषय समजावण्यात आपला चांगला हातखंडा आहे म्हणून मला सांगा, हा आत्मा चिरंजीव कसा

होतो"? ते ऐकल्यावर मोठ्या समाधानाने तो व्याध सांगू लागतो, "आत्मा कधीच नष्ट होत नाही पण त्याच्या भोवतीच्या कांहीं व्यवस्थात बदल होत असतो. त्या न समजल्यामुळें अज्ञानी लोक समजतात कीं तो आत्मा मेला आहे. प्रत्यक्षात काय होते ते मी आता तुला समजावून सांगतो कारण, तू ते ऐकण्यासाठी आतूर आहेस. शरीराचा मृत्यू झाल्यानंतर त्यातून आत्मा त्याची कर्मफलाच्या पुंजी ज्याला लिंगदेह म्हणतात, घेऊन त्या कलेवरातून बाहेर पडतो. अशा परिस्थितीला, आत्म्याने आपले पहिले शरीर सोडण्याला, मृत्यू असे म्हणतात. साधारणपणे एका माणसाचे कर्मभोग दुसरा माणूस भोगू शकत नाही. एकदा एक कर्म झाले किं, त्याचे परिणाम त्याला भोगावेच लागतात, त्यापासून त्याची सुटका होत नाही. चांगल्या कर्माचे चांगले व वाईट कर्माचे त्या प्रमाणात वाईट भोग त्याला भोगावेच लागतात. अशारितीने बाहेर पडलेला आत्मा त्याच्या कर्मफलाच्या पुंजीसह अवकाशात तरंगत असतो. त्या अवस्थेला प्रथम प्रेतावस्था आणि तेरा दिवसानंतर पिशाच्च अवस्था असे समजले जाते. त्याच्या शेवटच्या मृत्यूवेळी ज्या वासनांत (व्यसनं वगैरे) तो गुंतलेला होता त्या वासना त्याला त्या पिशाच्च अवस्थेत त्रास देत असतात. कर्मफल योगानुसार यथावकाश तो पुन्हा जन्म घेतो. बहुधा त्याच कुळात किंवा त्याच्या आसपासच्या गोतावळ्यात तो होत असतो. माता चार आठवड्याची गर्भवती असतांना तो त्या गर्भात शिरतो व तेव्हां त्या गर्भाचे हृदय कार्यान्वीत होत असते. त्या सुमारास त्या मातेला तो आल्याचे स्वप्नाद्वारा सुचवत असतो. परंतु, त्याकडे सहसा कोणी लक्ष देत नाही.

कौशिक व्याधाला विचारतो, "तो आत्मा कां पुन्हा जन्म घेतो व त्याचे कर्मफल (लिंगदेह) कसे त्याच्या बरोबर येते"? व्याध सांगतो, "त्याच्या कर्मफलानुसार तो जन्म होत असतो. तो त्या आत्म्याचा विधात्याने मान्य केलेला हक्क असतो त्यापेक्षा इतर कांहीं होऊ शकत नाही. कर्मफलाप्रमाणे त्याचे लिंग ठरत असते. ह्यात गर्भधारणेच्या गुंतागुतीचा विचार करावा लागेल व ते मी तुला सांगू शकणार नाही परंतु, थोडक्यात जे सांगता येण्यासारखे आहे ते सांगतो. गुणवंत कर्मफल असलेले त्याच प्रकारच्या घरात जन्म घेतात व गुणहीन कर्मफल असलेले त्याच प्रकारच्या घरात जन्म घेतात परंतु, त्याला कांही अपवाद असतात. कांहीं आत्म्यांच्या कर्मफलात मिश्र भाव असतो त्यावेळी असें अपवाद होतात.

चांगल्या घरात एकादा वाईट प्रवृत्तीचा आत्मा जन्म घेतो कारण तो त्या घराचा वाईट भोग असतो. असें साधारण समजतात कीं, पापकर्मा प्रमाणे, त्या आत्म्याला कधी खालच्या योनीत जन्म घ्यावा लागतो परंतु, त्या योनीतून तो आत्मशुद्धी करू शकत नाही व तो आत्मा त्यात अडकल्या सारखा पडून असतो. कृतयुगात अरे ब्राह्मणा, पशु योनीतसुद्धा आत्म्याचा उद्धार होत असे पण नंतरच्या युगांत ते कमी होत अखेरीस द्वापारयुगापासून ते सर्वस्वी बंद होणार आहे त्यानंतर फक्त मानव जन्मातच ते शक्य होत असते. कारण त्या युगांत इतर खालच्या योनीतील जन्मात तो आत्मा पूर्णतया बंदिस्त अवस्थेत रहाणार आहे. म्हणून आत्मशुद्धी होण्यासाठी कलीयुगात केवळ मानव जन्म असावा लागेल. कौशिक व्याधाला विचारतो, "मला सांगा अहो ज्ञानी माणसाचे लिंग कसे ठरते"? ज्ञानी व्याध सांगू लागतो, "संभोगाच्या नंतर जर गर्भ धारणा झाली तर त्यावेळी पुरूषाच्या प्रवृत्तीनुसार पहिले लिंग ठरते परंतु जेव्हां चौथ्या आठवड्यास त्यात आत्मा प्रवेश करतो त्याच्या लिंगदेहासह तेव्हां त्या लिंगदेहाचे लिंग व सुरूवातीचे गर्भाचे लिंग ह्यात कांहीं समन्वय सिद्ध होऊन त्या गर्भाचे अंतिम लिंग निश्चित होत असते. उदाहरणार्थ, समजा दोनही स्त्री लिंग असतील तर पूर्ण स्त्री असा तो गर्भ वाढत रहातो. जर पहिला पुरूष व दुसरासुद्धा पुरूष असेल तर पूर्ण पुरूष असा तो गर्भ वाढतो. जर पहिला स्त्री व दुसरा पुरूष तर तो गर्भ अशा स्त्रीचा असतो ज्याच पुरूषीपणा असतो, तसेंच जर पहिला पुरूष व दुसरा स्त्री असेल तर तो पुरूष स्त्रैण स्वभावाचा (बायल्या) निपजतो. तसेंच अशा समन्वयात कांहीवेळा किन्नर जन्मतात जर दोनही लिग समसमान असतील". कौशिक व्याधाला विचारतो, माणसाचे देवात रुपांतर केव्हां व कसे होते ते सांगा कारण, त्याबद्दल मला फार कुतूहल आहे". व्याध सांगतो, "आत्मा सातत्याने उत्तम गुणी असा एका मागोमाग एक असें सात्त्विक प्रवृत्तीचे जन्म घेत असेल तर त्याच्यातील तमोगुणाचा पूर्णतया र्हास झालेला असतो तशा स्थितीत त्या माणसाचे संत प्रवृत्तीच्या माणसात परिवर्तन होत असते. तसे अनेक जन्म संत प्रवृत्तीत गेल्यानंतर असा माणूस मेल्यावर स्वर्गात जातो व तेथे त्याला कांहीं विशेष कार्य जर सोपवले गेले तर तो देवत्वाला पोहोचतो. सृष्टीचे कार्य चालवण्यासाठी अशा आत्म्यांची नेमणूक विधाता करत असतो. त्यात त्यांना कांहीं सिद्धी प्राप्त होतात त्यामुळें तो आत्मा देवत्वाला जातो. त्याला नेमून

दिलेले कार्य त्याने यशस्वीरित्या केले तर त्याची देवत्वात जास्त बढती मिळून तो आणखीन मोठा देव होतो अशारितीने जसे चांगले कार्य करणार्याची प्रगती होत असते तशीच वाईट कार्य करणार्या पापात्म्यांचीसुद्धा बढती त्या दिशेने होत असते. त्यातून दानव, राक्षस उत्पन्न होत असतात. ही सृष्टीच्या कार्य पद्धतीची माहीती जी मला दृष्टांताने ज्ञात झाली, ती सांगितली. त्याच प्रमाणे एका विशिष्ट मर्यादेपेक्षा जास्त खालच्या पातळीला आत्म्याची अध्यात्मिक पातळी उतरली तर त्या प्रमाणे त्याला खालच्या श्रेणीच्या योनीत जन्म प्राप्त होत असतो. त्याचे गणित मला जास्त माहीत नाही, जेवढे माहित आहे तेवढे सांगितले. फारच खालच्या पातळीला त्याची अध्यात्मिक अवस्था असेल तर ते त्या प्रमाणे नरकात जीवजंतू म्हणून जन्म घेतात. अशा सगळ्या आत्म्याच्या अधःपाताला अथवा उत्कर्षाला त्याचेच कर्म कारणीभूत असते. हि सृष्टीची रचना नीट समजून जो आपले वळण ठेवेल त्याचा उत्कर्ष होतो तो देवत्वाला पोहोचू शकतो. एरवी तो आत्मा तसाच भरकटत भटकत रहातो. विशेष म्हणजे असा आत्मा मिळेल त्या योनीत सुख शोधत रहातो व त्याला त्या योनीच्या योग्यतेचे सुख मिळत असते. त्या योनीत राहून त्याचे भोग भोगून झाले किं त्याचा मृत्यू होतो व तो आत्मा पुनः नवीन जन्मासाठी सज्ज होतो. असें हे जीवन चक्र सतत अव्याहतपणे चालू असते. परंतु जर त्या वासनांच्या साखळ्या तो तोडून (तपस्या, इंद्रियनिग्रह, मर्यादा, संयमन वगैरे आचरून) त्यांतून बाहेर आला तर त्याला पुन्हा त्या कर्मफलांच्या तावडीत न जाता आपला अध्यात्म साधता येतो. अशा ह्या सगळ्या योनींना कर्मभोग योनी असें समजले जाते. त्यात सुख आणि दुःख दोनही भोगावे लागतात. त्यापुढे देव योनी आहे, त्यात फक्त सुखानुभव प्राप्त होत असतो. ती योनी प्राप्त व्हावी असा सगळ्या द्रष्ट्यांचा प्रयत्न असतो. पापात रमणारे त्या अवस्थेत कधीच जात नाहीत. त्या पुण्यप्रभावी योनीत जाण्यासाठी सातत्याने चांगले कार्य करावे लागते. सगळीकडे आनंद वाढेल असें करावे लागते. परंतु, अरे ब्राह्मणा, हे कृत व त्रेता युगात सोपे आहे तसे पुढील युगात तितके सोपे नसेल. कारण द्वापार युगापासून पाप शक्तींची ताकद वाढत जाणार आहे व पुण्य शक्तींची क्रमशः क्षीण होत जाणार आहे व कलीयुगात ती खूप जास्त असेल. म्हणून स्वर्ग गाठणे आज जसे सोपे आहे तसें कलीयुगात नसेल. कलीयुग पाप शक्तींच्या साठी असेल. त्या काळात पुण्यवान लोकांच्या

सहवासात रहावे लागेल, त्यांच्याकडून पुण्य मार्ग शिकावा लागेल. आपल्याला जन्माने जो व्यवसाय दिला आहे तो करत हे त्याला साध्य करावयाचे असते. तुम्ही कोणताही व्यवसाय करा, त्यात तुम्ही पुण्य कर्म करत राहू शकता. सुखापेक्षा समाधान जास्त महत्वाचे असते जो सुखापाठी धावतो तो सुख कधीच मिळवू शकत नाही पण समाधान मिळवणे तुलनेने जास्त सोपे असते. समाधान मिळाल्यावर मनाला जी शांतता मिळते ती सुख मिळवून मिळत नाही. तसे पाहिले तर अरे ब्राह्मणा, दोनही आपल्या मनाच्याच कल्पना असतात. प्रत्यक्षात कांहींच नसते. मानले तर सुख न मानले तर दुःख, अशी वास्तविक परिस्थिती असते. परंतु, मनुष्य त्यांच्या मागे धावत असतो. सगळा कल्पनांचा खेळ असतो. चांगुलपणातून जे समाधान मिळते त्यात चिरकाल टिकण्याचा गुण असतो. परंतु, तेथवर ज्ञानी थाबत नाही. त्याला त्याहीपेक्षा कांहीं जास्त करावयाचे असते. तो सुख, दुःख, समाधान ह्यापेक्षा वेगळे अनुभव अपेक्षित असतो ते त्याला मिळण्यासाठी तो त्या सगळ्यांचा अंती त्याग करतो. कारण त्यांनासुद्धा कधीतरी अंत असतो. त्याला औदासिन्य आवडू लागते कारण त्यात चिरंतनता असते. एकदा तो सगळ्याच अनुभवांबद्दल उदास वृत्ती राखून जगू लागला कीं, त्याला कशाचीच गरज उरत नाही. परंतु तो पुण्याचा मार्ग मात्र सोडत नाही. असा योगी मोक्षाकडे जात असतो. कारण अरे ब्राह्मणा, निरीच्छता हेंच मुख्य अंतिम ध्येय असले तरच मोक्ष मिळतो. सुखाची, समाघानाची असली तरी ती इच्छा असते व म्हणून ती त्याला वासनेच्याच एकाद्या स्वरुपात अडकवत असते. सर्वस्वाचा त्याग करण्यात ती सुद्धा इच्छाच असते, त्याग करण्याची इच्छा, म्हणून त्या अवस्थेत गेलेल्याला ती सुद्धा नको असते. त्याला योगात शून्य म्हणतात. जो अशा अवस्थेत खरोखरच पोहोचतो त्याला ब्राह्माचा साक्षात्कार होतो.

ब्राह्मण त्या व्याधाला विचारतो, "तू सदैव धार्मिक कार्यात, पुजा पाठ करण्यात तुझा समय व्यतीत करत असतोस. योगक्षेमासाठी हा तुझा व्यवसाय उरकून ते करत असतोस, मला सांग, तू तुझ्या इंद्रियांना कसा आवर घालतोस. ते मला समजून घ्यावयाचे आहे. इंद्रिय दमनाने काय साध्य होते ते सांग. इंद्रिय दमनाने औदासिन्य प्राप्त होते कां"? मला इंद्रियदमनातील सत्य समजावून सांग.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा पंचावन्नावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग छप्पन्नावा

मार्कंडेय त्याला सांगत असतात, अरे युधिष्ठीरा, असा प्रश्न कौशिक ब्राह्मणांने विचारल्यावर तो ज्ञानी व्याध त्याला सांगतो. अरे ब्राह्मणा, माणसाचे मन व बुद्धी त्याची ह्या जगाबद्दलची माहीती वाढवण्याच्या प्रयत्नात असते अगदी बालपणापासून. त्या मिळवलेल्या माहिती नुसार तो त्याची कामं करत असतो. त्यांच्या मदतीने तो त्याच्या विविध वासना आणि इच्छा वाढवत असतो. त्यासाठी जे आवश्यक आहे ती कामं करत असतो. त्याद्वारा तो अनेक सुखाच्या गोष्टी मिळवत असतो अथवा निदान त्यासाठी प्रयत्न करत असतो. त्याच्या पुढे दोन मार्ग असतात, एक पाप मार्ग व दुसरा पुण्य मार्ग.

आता मी प्रथम तुला सांगतो पाप मार्गाने जाणार्याचे कसे होते. त्यातून त्याला कांहीं सुखं विशेष आवडतात त्यांच्या पाठी तो मग लागत असतो. अशा आवडीच्या गोष्टींच्या लोभात तो जास्तीत जास्त अडकत रहातो. त्यात रमल्यामुळें त्याचे स्वतःच्या अध्यात्मिक परिस्थितीकडे संपूर्ण दुर्लक्ष होते. किंबहुना तो विसरतो कीं, त्याचा जन्म हे भोग घेण्यासाठी नसून, त्यातून मुक्त होण्यासाठी आहे. त्याचे अशा बाबतीतील यश इतरांच्या मानाने कमी अथवा जास्त असू शकते. त्यानुसार त्याच्या मनात मदभाव अथवा मत्सर भाव उत्पन्न होत असतो जेव्हां, तो स्वताची तुलना इतरांशी करतो. एकदा त्याच्या मनाची ह्या दोन दोषांनी पकड केली कां त्याचा चांगुलपणा व इतर चागले गुण र्हास पावतात. तो पुण्यमार्ग सोडतो व पापमार्गाने जाऊ लागतो. तरी असा माणूस चांगुलपणाचे सोंग घेऊन बरीच कामं करत असतो त्यामुळें फायदा मात्र पाप कर्माला होत असतो. त्याच्यात मिथ्याचाराचे अवडंबर वाढत जाते. त्या तुलनेमुळें तो जास्त सरस होण्यासाठी कोठल्याही मार्गाचा अवलंब करण्यास तयार होतो. त्याची अध्यात्मिकता अगदी खालच्या पातळीला जात रहाते. त्यामुळें पुण्यशक्ती त्याच्या पासून दूर होऊ लागतात परंतु, त्याचवेळी पापशक्ती त्याला मदत करण्यासाठी पुढे सरसावत असतात. त्यांच्या कृपेने तो पाप मार्गात कामयाब होत जातो व त्यामुळें त्याला असें वाटू लागते कीं, हाच खरा मार्ग आहे. तो आणखीन खचत जातो पण त्याला त्याची कल्पना नसते. पापशक्ती जास्त तेजवान

असतात व चटकन फळ देतात त्यामुळें तो फार खूष असतो परंतु, त्याला हे माहीत नसते कीं, ते फळ नंतर फार मोठ्या संकटात त्याला टाकणार असते. संकट असें कि, पाप प्रवृत्तीच्या स्वभावानुसार त्याला अध्यात्मिक र्हास आणि त्याबरोबर येणारे कटू अनुभव मिळणार असतात. परंतु, ते त्याला त्याच्या नंतरच्या जन्मात अनुभवावयाचे असते. ते होत असतांना त्याच्या बरोबर असलेले पुण्य मार्गी त्याला सावध करण्याचा प्रयत्न करत असतात पण त्याची पाप बुद्धीने त्या सगळ्यांना कावेबाज उत्तर देऊन आपली बाजू मारून नेत रहातो. तो कोणाचेच ऐकेनासा होतो कारण त्याच्या नजरेत ते पापाने मिळालेले यश व धनसंपत्ती असते. पुण्यमार्गी त्याला समजावण्यात अयशस्वी ठरतात व त्याची अध्यात्मातील घसरण चालूच असते जरी वास्तविक जगात तो यशस्वी ठरत असतो. ते करत असतांना जर त्याने कांही पापक्षालनाचे व्रत केले असेल, जे तो त्याच्या पूर्व जन्माच्या संस्कारामुळें अथवा त्याच्या कुटूंबियांच्या प्रभावाने करत असेल तर त्याचा त्याला निश्चतपणे फायदा होत असतो. त्या कारणाने त्याचा अध्यात्मिक र्हास कमी होऊ शकतो. असा माणूस आपल्या पापाला लपवण्यासाठी तीन प्रकारची पाप करत असतो. तो वाईट विचार बाळगतो, खोटे बोलते, खोटे काम करते अशा प्रकारे तो अधिकाधिक पापात डुबत जात असतो. एकदा पाप करण्याचे व्यसन लागले कीं, त्याच्या चांगल्या सवई नष्ट होतात. किंवा किमान पातळीला येऊन ठेपतात. त्या त्याच्या जीवन पद्धतीमुळें तो तशाच प्रकारच्या लोकांशी दोस्ती करत असतो व त्यांच्या प्रभावाखाली आणखीन पाप कृत्ये सहजपणे करत असतो. आपण पापमय जीवन जगत आहोत व विचारांने, बोलण्याने व कृतीने अशा तिनही मार्गाने पाप करत आहोत त्याचे त्याला भान रहात नाही. तो त्या पापातून कांहीं सुख मिळवत असतो व त्याचे त्याला समाधान वाटत असते. आपण योग्य मार्गानेच जात आहोत असे त्याचे भ्रष्ट झालेले मन सांगत असते व त्यात तो संतुष्ट असतो. असा पापप्रवृत्तीच्या माणसाचा जीवन प्रवास असतो.

आता सांगतो, पुण्य प्रवृत्तीच्या माणसाचे कसे होत असते. पुण्य प्रवृत्तीचा माणूस सुरूवातीपासून त्याच्या अध्यात्मिक अवस्थेबाबत जागृत असतो. कांहीं करावयाचे ते त्या पुण्य मार्गाच्या नियमांत असले पाहिजे ह्याबाबत तो विशेष सावध असतो. त्याला तशी दृष्टी प्राप्त झालेली असते. कोणत्या मार्गाने सुख मिळवावयाचे त्याबद्दलचे त्याचे विचार

निश्चित असतात. तो सज्जनांच्या सहवासात रहाणे व त्यांचाच सल्ला घेणे असें मानून त्याची कामं करत असतो. त्याच्या मनात चांगुलपणा सर्वश्रेष्ठ असें ठरवलेले असल्यामुळें त्या व्यतिरीक्त दुसरा मार्ग तो आचरत नाही. त्यामुळें बर्याच वेळा तो त्याच्या कार्यात कमी ठरत असतो परंतु, त्याचे मन त्याला त्याबद्दल दोष देत नाही. कोणतेही काम करण्याची यशस्वी पद्धत तो समजून त्या मार्गाने पाप न करता त्याची कामं करत असतो. तो काहींही झाले तरी चांगुलपणाचा मार्ग सोडत नाही. यशापेक्षा चांगुलपणाचा मार्ग त्याला जास्त महत्वाचा वाटतो, त्यामुळें बर्याच वेळा तो पाप मार्गी लोकांच्या मागे रहातो वास्तविक यशाच्या बाबत, पण त्याचे त्याला कांही देणे घेणे नसते. तरी अखेरीस तो यशस्वी होत असतो. त्याच्या पुण्यवंत काम करण्यामुळें तो ज्या समाजात रहात असतो तो समाज त्याला फार मान देऊ लागतो. त्या त्याच्या वागण्यामुळें सगळे चांगले लोक त्याच्या भोवती रहातात व त्याची व एकंदर चांगुलपणाची क्षमता सुधारतात.

ते ऐकल्यावर कौशिक ब्राह्मण म्हणतो, फार सोप्या शब्दात आपण खर्या धर्माचे (चांगुलपणा) वर्णन केले आहे. आपले अध्यात्माबाबतचे ज्ञान विलक्षण आहे व आपण कोणाही महान ऋषी पेक्षा कमी नाहीत. धर्माची इतकी सोपी व्याख्या मी आधी कधी ऐकलेली नाही. आपण शिकवत रहावे व मी ऐकत राहावे असें वाटते.

त्यावर व्याध त्याला शांतपणे सांगतो, ते ऋषी आपण पुजत असतो कारण ते आपले पूर्वज आहेत. त्यांना त्यांच्या आवडीचा प्रसाद देऊन आपण त्याची पुजा करत असतो. सगळे शहाणे लोक तेंच करतात मनापासून जे त्या ऋषींनी योग्य म्हणून सांगितले आहे. मीसुद्धा तेंच सांगितले तुला जे त्या ऋषीने मला सांगितले. त्यांना स्मरून मी ते सांगितले आहे. ते ब्रह्माचे तत्त्वज्ञान आहे. त्याच्यापेक्षा उच्च ज्ञान कांहीं नाही. हे विश्व जे कोणालाही सहजपणे समजणारे नाही त्यालाच आपण ब्रह्म असें बोलतो. त्यातील पृथ्वी तत्त्व, वायू तत्त्व, जल तत्त्व, अग्नी तत्त्व आणि आकाश तत्त्व ही पांच महा तत्त्व आहेत. त्यांना समजण्यासाठी आपल्याला विधात्याने आकार, ध्वनी, वास, स्पर्श, रुची अशा चाचण्याने ओळखता येतात. ती तत्त्वे एकमेकांशी संबंधित असतात. त्याना समजण्यासाठी आपल्याला मन दिले आहे. त्यानंतर येते बुद्धी. त्यानंतर येतो अहंकार. त्यानंतर आपली पांच ज्ञानेंद्रीये आणि आत्मा अशी रचना आहे ह्या विश्वाची. त्यानंतर नैतिक मुल्ये, सत्त्व, रजस आणि तमस

समजून घ्यावयाची असतात. हे विश्व ह्या सतरा (पांच महाभूत, मन, बुद्धी, आत्मा, अहंकार, सत्त्व, रजोगुण, तमोगुण आणि पंचेंद्रीये) गोष्टीने प्रभावीत होत असते. एवढे सांगितले, आणखीन काय तुला माझ्या कडून ऐकवयाचे आहे ते विचार.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा छप्पन्नावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग सत्तावन्नावा

मार्कंडेय पुढे सांगतात, अरे पंडुपुत्रा अशारितीने त्यांच्यातील संवाद मोठ्या मजेत होत होता. पुढे काय झाले ते आता तुला सांगतो, ब्राह्मण कौशिक व्याधाला विचारतो, "अहो ब्रह्मज्ञानी, असें आम्ही जोणतो कीं, हे विश्व पांच मुल तत्त्वांनी बनले आहे. त्यांची माहीती मला तुमच्या कडून ऐकण्याची इच्छा आहे. त्यावर व्याध सांगू लागतो, तू म्हणतोस ती पांच मुल तत्त्वे आहेत पृथ्वी, पाणी, अग्नी, हवा आणि आकाश. त्यांच्या गुणाबद्दल बोलावयाचे तर असें समजावे लागेल कीं, आपल्या पंच ज्ञानेंद्रियांद्वारा आपण त्याना जाणून घेत असतो. ते कसे ते मी तुला सांगतो, प्रथम पृथ्वी पाहू, तिला पांच गुण आहेत. त्यानंतर पाणी त्याला चार गुण असतात, त्यानंतर अग्नी त्याला तीन गुण असतात, त्यानंतर हवा, त्याला दोन गुण असतात, त्यानंतर आकाश त्याला फक्त एकच गुण असतो जो आपली ज्ञानेंद्रिय (कान-ध्वनी, त्वचा-स्पर्श, गंध-नाक, तोंड-रुची, डोळे-आकार) आकलन करू शकतात. आता ते कोणते गुण त्या पंचतत्त्वांत आढळतात ते पहावे लागेल. पृथ्वी मध्ये सगळे पांच गुण आहेत, पाण्यात चार गुण आहेत ध्वनी, स्पर्श, रुची आणि आकार. अग्नी मध्ये तीन गुण आहेत ध्वनी, स्पर्श, आकार. हवेत दोन गुण आहेत ध्वनी आणि स्पर्श. अखेरच्या आकाशाला फक्त एकच गुण आहे तो असतो ध्वनी. हे एकंदर पंधरा गुण सर्वच पदार्थात तुला आढळतील जे ह्या पांचांपासून बनले आहेत. ते गुण एकमेकांना पुरक असतात. त्यामुळें ही सृष्टी बनली आहे. अशारितीने जोवर ते गुण काम करत असतात तोवर सगळे व्यवस्थित असते परंतु, जेव्हां त्यात गोंधळ होतो तेव्हां सगळे आपापली रुप बदलतात व ते नष्ट होतात. हे जग त्या पंच तत्त्वांनी बनले आहे. सगळ्या चराचरात तेंच असतात. त्यापेक्षा इतर कांहींही नसते. त्यातील जे दिसतात त्यांना व्यक्त सृष्टी किंवा दृष्य सृष्टी असें म्हणतात व जे दिसत नाहीत त्यांना अव्यक्त सृष्टी अथवा अदृष्य सृष्टी असे म्हणतात. जेव्हां एकादा माणूस आत्मशुद्धीची साधना करण्याचे ठरवतो, तो त्याची ज्ञानेंद्रिये बंद करतो (ज्ञानेंद्रिये साधारणपणे सतत कार्यरत असतात पण ती बंद करावी लागतात जेव्हां आपल्याला आपले आत्मज्ञान करावयाचे असते. ते एकाग्र चित्ताने

साध्य म्हणजे, ध्यान साधनेने शक्य होत असते), असें बरेच काळ तो करतो तेव्हां त्याला त्याच्या सत्य रुपाचे दर्शन होते. परंतु जो त्याच्या गतकर्मात अडकला आहे तो ते एकचित्त साध्य करू शकत नाही. कारण तो त्या गतकर्माच्या गराड्यात अडकलेला असतो. अशा माणसांने कितीही प्रयत्न केले तरी ते त्याला साध्य होत नाही. ज्याने त्याची त्या गतकर्मापासून सुटका केली आहे तोंच मात्र ते साध्य करू शकतो. तो ह्या असत्य जगाला समजून त्यात न रमण्याचा निर्धार करतो व त्यानुसार प्रयत्न करतो तो अंती त्यात यशस्वी होतो व त्याला आत्मज्ञान होते. जे एकमेव सत्य आहे. त्यात विधात्याची ती सगळी लक्षण आढतात जसें प्रज्ञा, सर्वज्ञ, स्वयंभू, अमर, विलक्षण, अतुलनीय, सर्वशक्तीमान, निर्विकल्प, निर्गूण, अनंत असा तो त्याला जाणवू लागतो. अरे ब्राह्मणा, हे तुला मी सांगितले ती झाली तुला माहीती पण त्या माहितीचे तुझ्या ज्ञानात परिवर्तन होण्यासाठी तुला तपश्चर्या करावी लागेल. बहुतेक ब्राह्मणांना ही माहीती असते कारण ते वेदांचे अभ्यास करतात पण माहिती निरुपयोगी असते, जेव्हां त्याची प्रत्यक्ष अनुभूती होते तेव्हां त्याला ज्ञान म्हणतात. त्यासाठी तुला ती तपश्चर्या करणे आवश्यक आहे. स्वर्ग, पृथ्वी आणि नरक सगळे आपल्यातच असतात त्याची अभिव्यक्ती त्या त्या कर्मानुसार त्याला होत असते. जर भोगांच्यात न रमता जो तपस्या करतो व तो पूर्ण औदासिन्यांने त्याना हरवतो तो त्याच्यातच असलेल्या स्वर्गात जातो व चिरंतन आनंदात रहातो. जो त्याच्या भोगांच्यात रमतो तो त्याच्यातच असलेल्या नरकात चिरकाळ खितपत पडतो. आपल्या भोगेंद्रीयांना औदासिन्याने हरवणे ह्यालाच तपस्या असेसुद्धा म्हणतात. ह्यात एक गोष्ट लक्षात घे अरे ब्राह्मणा, शरीराच्या व्यवहारात म्हणजे योगक्षेमात तो साधक ढवळाढवळ करत नसतो. म्हणजे कोणते भोग शरीराला अत्यावश्यक आहेत त्यांना तोशीस न देता तो हि तपस्या करत असतो. असे मुष्कील कार्य जो साध्य करतो तो योगी समजला जातो. शरीराला जपावयाचे व त्याचवेळी आत्म्याला नियंत्रणात ठेवावयाचे अशी कसरत त्याला करावी लागत असते. म्हणून अरे ब्राह्मणा, तसे करण्यासाठी तो माणूस पूर्ण सात्त्विक अवस्थेत गेलेला असला पाहिजे. भोगेंद्रियांचे व्यवस्थापन ज्याला जमते तो जिंकतो व ज्याला जमत नाही तो बरबाद होतो. जो भोगेंद्रियांत जाणून बुजून स्वताला अडकवून ठेवतो त्या भोगांच्या लोभाने, तो भ्रष्ट होतो व पृथ्वी आणि नरक ह्यात फेर्या मारत रहातो. ज्याला

औदासिन्य हा मार्ग जोपासता आला तो अशा साधनेत हमखास यशस्वी होतो. त्याला कोणतीही वासना त्रास देऊ शकत नाही. ह्यामध्यें मनाच्या सवयप्रधान असण्याच्या गुणाचा उपयोग होत असतो. ज्या प्रकारच्या विचारांची सवय आपण आपल्या मनाला लावतो त्या प्रकारचे विचार आपल्या मनांत येत असतात. त्याच प्रमाणे विचारहीनता जोपासणेसुद्धा त्यामुळेंच शक्य होते. माणसाच्या शरीराला रथाची उपमा देऊन एक रुपक सांगितले आहे, वासनांना घोडे दाखवले आहे, ज्या रथाचा सारथी (मन, बुद्धी) हुशार आहे तो त्या घोड्यांना योग्य रितीने घेऊन जाऊ शकतो असें सांगितले आहे. विशेषकरून तारुण्याच्या काळात जेव्हां शरीराची भोगेंद्रियांची गरज तीव्र असते तेव्हां औदासिन्य पाळावे लागले तर ते अवघड असते तरी सततच्या प्रयासाने ते अंती साध्य होत असते. परंतु त्यासाठी माणसाला गृहस्थाश्रम सांगितला आहे ज्यामुळें त्याच्या वासनांना उचीत वळण देणे शक्य होते. तरीसुद्धा एकदा मनाला वासनां बद्दल उदास रहाण्याची सवय लागली तर ते सोपे होते. परंतु, मनातल्या मनात तो त्या वासनांत रमत राहून कमी प्रतीचे पाप करत रहातो. अरे ब्राह्मणा, घरातील संस्कार, चांगला मित्र परिवार, गुरूवरील श्रद्धा, चांगल्या इतर सवई अशांच्या मदतीने ते शक्य होत असते. आपल्या निर्धाराचा पक्केपणा, साधना पद्धतीबद्दलची श्रद्धा त्याला त्यात मदत करत असते. वाढत्या वयात शरीराची वासनिक गरज कमी होते. त्यामुळें त्या वयात वासनांचा क्षोभ आवरणे सोपे होते. घरातून जे संस्कार असतात त्याचा फार उपयोग होत असतो. बालपणापासून वैराग्याचे महत्व मनावर बिंबवल्यामुळें ते सोपे होते. परंतु, लग्न झाल्यानंतर योगक्षेमाच्या गरजेनुसार वासनांना वाट मिळत असते. त्यामुळें त्या वयोगटात संयमन सोपे होत असते. मितभोगाचे धोरण त्याकाळांत मोठे उपयोगी ठरत असते. जर तसे संस्कार नसतील तर मात्र साधना अवघड होते. कारण मनाला नियंत्रण नसते. त्याचा विवेक काम करेनासा होतो व तो वादळात सापडलेल्या नांवेसारखा भरकटत जातो. गृहस्थाश्रमात पत्नीची साथ मिळाली तर त्याची साधना यशस्वी होते. योग्य संस्कार, योग्य विवेक व मनावरील तांबा बुद्धीच्या मदतीने घेऊन जो काम करतो त्याला यश मिळतेच. आपण ह्या खेळात आहोत व आपले एक खेळाडू म्हणून काम आहे किं, आपण स्वतामधील विधाता पहावयाचा आहे, असे संस्कार जर सुरूवातीपासून असतील तर साधना सोपी होत असते. अरे ब्राह्मणा,

माणसाला कांहींही अशक्य नसते व जर जिद्द असेल तर तो कांहींही करून दाखवू शकतो असा विश्वास ठेवला तर साधना सोपी ठरते.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा सत्तावन्नावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग अठ्ठावन्नावा

मार्कंडेय सांगत असतात, जसें व्याधाने ते साधनेबाबतचे सांगितले तसें कौशिक ब्राह्मणाला आणखीन विचारावेसे वाटले. आता मला सांगा अहो ज्ञानी कीं, सत्त्व, रज आणि तमो गुणांची अधिक माहीती. कारण हे विश्व त्या गुणांनी घेरले आहे असें मी शिकलो आहे परंतु, त्यांचे मुल तत्त्व कोणते ते मला माहित नाही तरी ते मला आपण सांगावे,

व्याध सांगू लागतो, मी तुझ्या सगळ्या शंकांचे समाधान करणार आहे, तरी नीटपणे लक्ष देऊन पूर्ण श्रद्धेने ऐकत जा. त्यातील तमस गुण मायेच्या मोहात अडकल्याचे लक्षण समजले जाते. रजस मध्ये कर्मयोगाची लक्षणं आढळतात आणि सत्त्व गुणात अध्यात्मिक जागृतीचा अनुभव येत असतो. जो अध्यात्मिक जागृती पासून दूर असतो, ज्याच्या वर्तणूकीत अविवेकीपणा अथवा मूर्खपणा जास्त असतो, जो वाह्यात कल्पनाविश्वात रमलेला असतो, जो आळशी असतो, ज्याचे क्रोध, लोभ, मोह त्याला त्रास देत असतात अशा माणूस तामसी समजला जातो. अशी माणसे, जे वागणूकीने चांगले असतात, बोलण्याची त्यांना पद्धत असते, जे विवेकांने आपले निर्णय घेतात, जे उद्योगी आहेत, जे कोणाचा द्वेष करत नाहीत, जे महत्वाकांक्षी आहेत, जे थोडे अधीर आहेत, ज्यांचा स्वभाव चांगला आहे असे लोक राजस गुणाचे समजले जातात. सत्त्व गुणी माणसें शांत प्रवृत्तीचे असतात, त्यांच्यात धैर्य चांगले असते, आपले निर्णय उत्तम प्रकारे घेतात, कोणतेही व्यसन नसते, क्षमाशिल असतात, दुसर्याचे ऐकण्यास तयार असतात, त्यांच्यात समजूतदारपणा चांगला असतो जो राजस गुणात कमी असतो व तमोगुणात अजिबात नसतो. अशा लोकांना सत्त्वगुणी समजले जाते. त्याशिवाय ह्या तीन गुणांची आणखीन बरीच लक्षणं आहेत परंतु, तूर्तास एवढेच सांगतो. जेव्हां सत्त्वगुणी माणूस जगाच्या व्यवहारी स्वभावात अडकतो तेव्हां त्याला त्यातून बाहेर येण्यात पुष्कळ त्रास होत असतो. कारण तो स्वभावानेच व्रतस्थ प्रवृत्तीचा असतो. तो जगाच्या त्या स्वभावाचा द्वेष करू लागतो. त्यातून दूर जाण्याच्या गोष्टी करू लागतो. त्यामुळें त्याच्या मनांत ह्या जगाच्या कोणत्याही गोष्टींबद्दल औदासिन्य वाटू लागते. त्याच्यातील अहंकार कमी होतो व त्याच्यातील

इतरांबद्दलचे वागणे जास्त चांगले व समजूतदारपणाचे असे होते. त्याच्यातील नैतिकतेला विशेष महत्व प्राप्त होते. स्वाभाविकपणे औदासिन्य त्याच्या स्वभावात आल्याने त्याला त्याच्या इच्छांवर नियंत्रण करणे सोपे होते. असा माणूस चांगली अध्यात्म साधना करू शकतो. असा माणूस कोणत्याही घरात (अगदी शुद्राच्या) जन्मलेला असला तरी त्याच्या गुणकर्मामुळें तो वैश्य व त्याही पेक्षा जास्त गुणवत्ता असेल तर क्षत्रिय व त्याही पेक्षा जास्त असेल तर ब्राह्मण होतो. त्याच्यातील स्वाभाविक व्रतस्थतेवरून हे ठरत असते. मी तुला ह्या त्रिगुणांची माहीती सांगितली आहे, आणखीन काय तुला माहीत करून घ्यावयाचे आहे माझ्याकडून ते बोल. कौशिक ब्राह्मणा व्याधाला विचारतो, "सगळे विश्व ह्या तीन गुणांनी व्यापले आहे, ते गुण कसे उत्पन्न होतात व त्यांचे कारण काय"? व्याध त्याला सांगू लागतो, "हे विश्व ज्या स्वयंभूच्या इच्छेमुळे निर्माण झाले तो स्वतः अध्यात्माचा गाभा आहे. त्यातून सगळे विचार, वस्तु, दिशा, रचना, व्यक्त आणि अव्यक्त गोष्टी उत्पन्न झाल्या आहेत. ते होत असतांना पूर्ण अध्यात्मिक शक्ती त्यात कमी जास्त स्वरुपात असावी लागते कारण, तेंच त्या गोष्टीचे कारक असते. पूर्ण अध्यात्मिकता असल्यास ते दैविक ठरते. त्यापेक्षा कमी असेल तर ते सात्त्विक समजले जाते, त्यापेक्षा कमी असेल तर ते रजस गुणाचे कारण असते आणि त्याही पेक्षा कमी असेल तर ते तमोगुणाचे कारक असे समजले जाते. हे सगळ्याच गोष्टीत त्याच्या अध्यात्मिकतेच्या कुवतीनुसार असते. त्याचे साधारणपणे तीन गुणात वर्गीकरण केलेले असले तरी प्रत्यक्षात ते वर्गीकरण अनेक टप्प्याने होत असलेले आढळते. दैविकतेच्या अध्यात्मिकतेत जर कमी झाली कांहीं कारणांने व ते कमी पवित्र ठरले तर त्यानुसार ते सात्त्विक गुणात जाते. त्याहूनही कमी पावित्र्य झाले तर ती रजोगुणात आहे असें समजले जाते आणि त्याही पेक्षा कमी पावित्र्य झाले कीं, त्याला तमोगुणात समजले जाते. कारण अध्यात्मिकता त्यातील पावित्र्याने मोजली जात असते. त्याहीपेक्षा कमी झाली पावित्र्यता तर ते आणखीन खालच्या पातळीला गेले असें समजले जाते. कृतयुगात अध्यात्मिकता दैविक पातळीची होती, त्रेतायुगात ती सात्त्विक पातळीला आली, त्यानंतर द्वापारयुगात रजोगुणाच्या पातळीला येईल व कलीयुगात ती तमोगुणाच्या व त्याही पेक्षा खालच्या पातळीला जाणार आहे. हे पावित्र्याचे कमी होणे अथवा जास्त होणे क्रमशः असते त्यातील भेद सावकाशपणे प्रकट

होतात. तेंच माणसाच्या त्रिगुणांबद्दल होत असते. अशारितीने ह्या विश्वाची पावित्र्यता पाहिली जात असते. त्रिगुण त्याचे प्रमाण ठरवण्याचे एक परिमाण आहे, अरे ब्राह्मणा. देवांची पावित्र्यता उच्च असते म्हणून ते देव असतात. त्यानंतर सात्त्विक असते त्यात संत, साधू येतात. त्यानंतर रजो व शेवटी तमो असें वर्गीकरण साधारणपणे असते. तमोपेक्षा कमी झाले कीं ते दानव, राक्षस अशा प्रकारचे समजले जात असते. त्यात दुर्जन गुणी समजले जाते. तरीसुद्धा दोन सात्त्विक माणसांच्या सात्त्विकतेत सुद्धा कमी जास्त असा फरक असू शकतो. त्याच प्रमाणे दोन रजोगुणी मध्ये त्यांच्या रजो अवस्थेत कमी जास्त असते त्यामुळे कोणी रजोसात्त्विक अशा पावित्र्याच्या अवस्थेत असू शकतात. तसेंच कोणी रजोतमो अशा मधल्या अवस्थेत असू शकतात. दोन तमोगुणी मध्येसुद्धा असाच पावित्र्याच्या पातळीत फरक असू शकतो. म्हणजे अरे ब्राह्मणा, प्रत्यक्षात पावित्र्याच्या असंख्य पातळ्या असू शकतात. परंतु, सोयीसाठी स्थुलमानाने तीन वर्ग पाडले आहेत पावित्र्य ठरवण्याचे, असे समज. सामान्य माणूस ह्या तीनही अवस्थात दोलायमान होत असतो. म्हणजे तो कधी सात्त्विक वागतो तर कधी रजो व कधी तमो असे होत असते. ते त्याच्या मनसेथितीमुळे होत असते".

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा अठ्ठावन्नावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व
## भाग एकोणसाठावा

ब्राह्मण व्याधाला विचारतो, "मला समजत नाही, अग्नी व इतर वस्तुमात्र कसे एकत्र येऊन जीवनमात्र घडवतात. अग्नी बरोबर त्यांचा सहयोगातून फक्त त्या वस्तुमात्राची राखच होऊ शकते हे माहीत असून आपण असें कसे बोलता? त्याच प्रमाणे प्राणवायू त्याच्या स्वभावाप्रमाणे, स्नायू व नसा कशाप्रकारे उत्तेजित करतो ते समजावून सांगा". असा अवघड प्रश्न ऐकल्यावर तो ज्ञानी व्याध त्याला चटकन उत्तर देतो, "शरीरात असलेला जीव त्या सगळ्या गोष्टी घडवून आणण्यात सिद्ध असतो. तो जीव त्या शरीराबरोबर जन्मलेला असतो व तो जीव त्या शरीरासह नष्टसुद्धा होणार असतो. रथाला जसा सारथी असतो तसेंच हा जीव, जो देहाबरोबर पैदा झाला तो रथाच्या सारथ्याप्रमाणे, शरीराला चालवत असतो. योगक्षेमाचे सगळे कार्य ही त्याची जबाबदारी असते. त्यात असलेला आत्मा मात्र त्यात भाग न घेता फक्त त्यांचे कार्य एकाद्या निरीक्षकाप्रमाणे न्याहाळत असतो, त्यांच्या कामात तो भाग घेणे अप्रस्तुत समजले जाते. परंतु, अरे ब्राह्मणा, येथेच जर त्या आत्म्याने त्यांच्या कारभारात लक्ष घालून हस्तक्षेप केला तर ते पाप कर्म ठरते व ते त्या आत्म्याला भोगावे लागते यथावकाश. खरा साधक तो असतो जो अशाप्रकारे हस्तक्षेप करत नाही. ज्ञानी माणसांचे आत्मे त्यांच्या शरीर व जीव ह्यांच्या कामात लक्ष घालत नाहीत, तो आत्मा चिरंतन स्वयंभूच्या ध्यानात रमलेला असतो. त्याला शरीराप्रमाणे काळाचे बंधन नसते. तो चिरंजीव असतो. त्या आत्म्याच्या शरीरात असण्यामुळें ते शरीर जीवंत असते कारण त्या शरीराला त्या आत्म्याकडून जगण्याची प्रेरणा मिळते म्हणजे जीव जो त्या शरीराबरोबर जन्मला तो आत्म्याकडून प्रेरणा घेऊन काम करत असतो. शरीराला जगण्यासाठी खाणे, पिणे, श्वासोंश्वास, विश्रांती वगैरे आवश्यक असते तर जीवाला आत्म्याचे सानिध्य आवश्यक असते. शरीर वास्तविक असते परंतु, जीव आणि आत्मा अव्यक्त अवास्तविक असतात. शरीर कांहीं कारणाने मृत झाले तर त्यातील जीव सुद्धा मरतो व तसें झाले कीं, त्यात असलेला आत्मा त्याची कर्मफल पुंजी (लिंगदेह) घेऊन ते शरीर सोडून निघून जातो अशी रचना आहे. आत्म्याच्या सानिध्यात

असलेल्या जीवाला अहंकार प्राप्त होतो. त्याचे त्या अनुषंगाने जे कर्म होते ते त्या आत्म्याला लागत असते असा त्या जीव आणि आत्म्याचा अन्योन्य संबंध असतो. जीवाला पाप लागत नाही कारण तो स्वतंत्र नसतो. जीव हे शरीर आणि त्यातील आत्मा ह्यांना जोडणारा दुवा असतो. जीव हा त्या शरीराच्या योगक्षेमाचा कर्ता असतो व त्यामुळें ते शरीर जगत असते जसें रथाला सारथी असतो तसे शरीराचा तो सारथी असतो. आत्मा त्या शरीरातून जगणारा प्रवासी असतो जसे रथातून प्रवासी असावा अशी साधारण व्यवस्था असते. खरेतर ही व्यवस्था खूपच जटील आहे पण मी येथे तुला जमेल तितकी सोपी करून सांगण्याचा प्रयास करत आहे". "अरे ब्राह्मणा, सामान्य माणसाचा आत्मा जीवाच्या कारभारात ढवळाढवळ करतो कारण, अज्ञानामुळें तो ते त्याचे काम नाही हे समजत नाही व त्यामुळें पापाचरण सुरू होते. जसें रथ चालवणार्या सारथ्याच्या कामात त्यात बसलेल्या उतारूने ढवळाढवळ करावी".

आत्मा व जीव ह्यांना जोडणार्या वायूला प्राण म्हणतात. तो श्वासोंच्छ्वासातून व्यक्त होत असतो. जर श्वासोंच्छ्वास कांही कारणाने थांबला तर तो जोड तुटतो व आत्मा तो देह सोडून जात असतो. त्याशिवाय समान, अपान असें इतर प्रकारचे वायू त्यांत शरीराचे व जीवाचे संबंध टीकवण्यात कार्यरत असतात. अपान वायू शरीरातील मळ व मुत्र ह्यांचे व्यवस्थापन करण्यात कार्यरत असतात. त्याचा प्रभाव आपल्या मुत्रपिंड आणि आतड्यांशी असतो. त्याशिवाय उदान व व्यान असें आणखीव दोन वायू कार्यरतच असतात. अशारितीने प्राण, समान, अपान, उदान आणि व्यान असें पंचप्राण जीवाला त्याचे कार्य करण्यात मदत करत असतात. ते आयुर्वेदात सांगितले आहे हे तुला माहीत असेलच. त्या सगळ्या पंचप्राणामुळें आपल्याला जेवण खाणे, पचवणे, शौंचास व मुत्र बाहेर टाकणे अशा कामात एक जोर, अशाप्रकारे मदत करत असतात. त्यामुळे आपल्या शरीरात तो अग्नी चेतवलेला रहातो. प्राण, अपान, समान, उदान ह्या वायूंच्या कामामुळें शरीराची वाढ होत असते. खरा योगी ह्या पंचप्राणांचे नियमन करून सर्व भूतमात्रांबद्दल समान दृष्टी ठेवून त्याच्यातील आत्म्याला पाहू शकतात. प्राण व अपान सगळ्या प्राणिमात्रांत असतात. त्या शरीरात आत्मा विविध रुपात अशा शरीरात असतो. तरीसुद्धा तो त्या शरीरात असूनही त्यात नसतो असे विलक्षण नाते त्या दोघांत (शरीर व आत्मा) असते. तुला मी

आधीच सांगितले आहे कीं, सत्त्व, रजस् आणि तमस् हे त्रिगुण त्याला त्याच्या शुद्धतेनुसार बाधत असतात. जर त्या शरीरातील आत्मा चांगला शुद्ध असेल तर त्यातून सात्त्विक गुणाचा अनुभव येतो. तसेंच आत्मा अशुद्ध असेल तर त्या प्रमाणे त्यातून तमोगुणाचा अनुभव येत असतो. त्या शुद्धतेच्या विविध अवस्था त्या आत्म्याबरोबर असलेल्या लिंगदेहाला असतात कारण, आत्म्याला कांहींच स्पर्श करू शकत नाही. अशा परिस्थितीत त्या आत्म्याचा लिंगदेह त्याच्यावतीने शरीराशी व त्यातील जीवाशी संपर्क करून काम करत असतो. जसे एकादा श्रीमंत त्याची कामं त्याच्या नोकराकडून करून घेत असतो (श्रीमंत म्हणजे आत्मा व नोकर म्हणजे लिंगदेह) तसेंच काहीसे हे असते. असा आत्मा जरी कधीच कोणालाही प्रत्यक्ष दिसत नसला तरी ज्ञानी माणसे त्याला त्यांच्या अध्यात्मिक दृष्टीने दृष्टांता द्वारा पाहू शकतात. अज्ञानी त्या दृष्टीला समजत नाहीत. अशा दृष्टीला दृष्टांत असें म्हणतात. विशेषकरून जे सात्त्विक असतात त्यांना असें दृष्टांत जाणवतात परंतु, रजो व तमोगुणी माणसांना ती दृष्टी नसते त्यांना दृष्टांत होत नाहीत. म्हणून असें अज्ञानी त्या दृष्टांतावर विश्वास ठेवत नाहीत. ते त्या ज्ञानी माणसाला, "तू खोटे बोलतोस", असें बोलतात. प्रसंगी तमोगुणी लोकांच्या समाजात अशा दृष्ट्यांचा छळसुद्धा होत असतो. आत्मशुद्धीमध्ये प्रयत्नशिल असलेला त्याच्या तपोश्चरणाने यथावकाश त्याची सगळी पाप (अशुद्ध प्रवृत्ती) नष्ट करत असतो. अशा चित्तशुद्धी झालेला माणूस शांतपणे निद्रा घेऊ शकतो. जस जसे त्याची अध्यात्मिक शुद्धी अधिकाधिक होत जाते त्याला सगळे विश्वाचे ज्ञान आपसूकपणे होऊ लागते. असा जर मिताहार करत असेल तर त्याला लवकर ते अनुभव आतल्या आत (अंतर्यामी) येऊ लागतात. सतत ध्यानात रहाण्याने त्याला त्याच्याच आत्म्याचे परमेश्वर स्वरुप अनुभवास येऊ लागते. जे अनुभव सांगता येत नाहीत, स्वतःला आल्यावरच ते समजतात. त्या अवस्थेला मोक्षावस्था समजतात, तरी तो त्या देहात असतो. लोभ आणि क्रोध त्याने टाळावयाचे असतात. त्या अवस्थेत रहाणारा सदैव इच्छा मुक्त होतो कारण इच्छा म्हणजे अपुरेपणा. ते ज्ञान झाल्यावर त्याच्यातील अपुरेपणा संपतो व त्यामुळें त्याला कशाचीच गरज वाटत नाही. असे झाले तरी त्याला अजून शरीर असते व त्या शरीराच्या नित्य गरजा त्याला पुरवाव्या लागतात. लोभ आणि इतर पांच दोष (काम, क्रोध, मोह, मद व मत्सर) त्या शरीराच्या गरजा पुरवण्यासाठी

तरीसुद्धा त्याला सांभाळावे लागत असतात. त्यालाच योगक्षेम असें म्हणतात. जेव्हां ते सहा योगक्षेमापुरते काम करतात तेव्हां त्यांना दोष न समजता गुण समजले जाते. परंतु, जेव्हां त्यांत आत्मा रस घेतो तेव्हां ते दोष समले जातात. त्यांचा प्रभाव त्याला अनुभवावा लागत असतो. त्यासाठी क्रोध आणि लोभाच्या आहारी तो जाण्याची विशेष शक्यता असते व त्यामुळे पुन्हा त्याचा अध्यात्मिक र्हास होण्याचा संभव असतो. सात्त्विकतेच्या उच्च पदाला गेलेल्याला त्याचा अभिमान व त्यातून उत्पन्न होणारा गर्व बाधत असतो. अरे ब्राह्मणा, त्या पक्षीणीला तू मारलेस व त्याचा तुला गर्व झाला व म्हणूनच तुला त्या पतिव्रतेने माझ्याकडे पाठवले हे तू जाणतोस. जे तुझे झाले तसे बर्याच जणांचे होते म्हणून सावध राहून साधना करावयाची असते. ह्याकरतां जे साध्य झाले ते ब्रह्माला अर्पण करून स्वतः सदैव नम्र भावात रहाण्याचे धोरण आचरण्यात आले पाहिजे. साधनेच्या वरच्या अवस्थेत नुकसान होण्याचा संभव जास्त असतो. स्वताची अध्यात्मिक अवस्था (सत्त्व, रज, तम) ओळखून त्यात सुधारणा करण्याचे धोरण जो ठेवतो तो तरून जातो. त्याकरतां नम्रता, सावधपणा आवश्यक असतो. ते त्याचे धार्मिक कर्तव्य असते. देहाला त्याच्या गरजांसाठी तेवढीच मदत करणे व बाकी त्या वासनांपासून विरक्त रहाणे हे त्याचे धार्मिक कर्तव्य असते. असा माणूस खरा संन्यासी समजला जातो. अंतिम ज्ञान आपले आपल्यालाच कमवावे लागते ते तुझा गुरूसुद्धा तुला देऊ शकणार नसतो कारण, ते अनुभवसिद्ध ज्ञान असते. परमेश्वर कोणी दाखवू शकत नाही, तो आपला आपल्यालाच अनुभवावा लागतो. पुस्तक वाचून किंवा कोणाकडून ऐकून ते माहिती तुला जरूर मिळवता येईल पण त्याचे ज्ञानात परिवर्तन करण्यासाठी तुला तपस्या करावा लागेल. एर्हवी ते प्राप्त करता येत नाही. गुरू आपल्याला मार्गदर्शन करू शकतो पण त्याची अनुभूती देऊ शकत नाही. अंतिम टप्प्याला आलो किं. सगळ्या ऐहिक गोष्टींचा वस्तुतः त्याग करावा लागतो. त्याला योग असे म्हणतात. त्या अवस्थेत गेलेल्याने, कोणाही जीवाला त्रास द्यावयाचा नसतो. भूतदया, निस्पृहता, शांत मन, निरिच्छता अशा वागण्याने अध्यात्मिक दर्जा वाढवणे सोपे जाते. सतत आपला अध्यात्मिक दर्जा कसा सुधारता येईल, अधिकाधिक सात्त्विक कसा करता येईल, त्यावर सदैव लक्ष असले पाहिजे. सात्त्विक वैराग्य आचरणे त्यासाठी औदासिन्याचे धोरण वागण्यात व विचार करण्यात बाळगणे, सर्व भूतांबद्दल

सहानुभूती असणे, त्यासाठी आपल्या विवेकाचा उपयोग करून सावध रहाणे असे सदैव असले पाहिजे. जर तो त्याचा स्वभाव झाला तरच तो मोक्षपदी जाऊ शकतो. ह्यांना योगशास्त्रात गुण म्हणतात जे त्याच्यात असावे लागतात. ते गुणसुद्धा त्याच्यातून निघून जावे लागतात. तरच तो मोक्षास जातो. त्याला त्यानंतर सत्चिदानंद प्राप्त होतो जो गुणापलिकडला आहे. त्या अवस्थेत गेलेल्याला वासना, भावना, प्रतिक्रिया असें कांहीं नसते जणू मृत झाला आहे जरी तो पूर्णपणे जीवंत असतो. असा माणूस जीवंतपणी ब्रह्मीभूत झालेला असतो.

अरे ब्राह्मणा, तुला थोडक्यात जे मी अनुभवले व माझ्या दृष्टांताने पाहिले ते सांगितले आहे. एक महत्वाचे लक्षात असू दे, कीं, अशा निस्पृह माणसाच्या चांगुलपणाचा गैर फायदा घेणारे तमोगुणी अर्थात दुर्जन समाजात असतात त्यांपासून त्यांने म्हणजे सगळ्याच सात्त्विक माणसांनी सावध रहावयाचे असते. आणखीन काय तुला माहिती माझ्याकडून पाहिजे ते बोल.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा एकोणसाठावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग साठावा

मार्कंडेय सांगत असतात, मोक्षाबद्दलचे निवेदन कौशिक ब्राह्मणांस पूर्ण सांगितल्यावर ते ऐकून तो ब्राह्मण अतिशय प्रसन्न झाला व व्याधाला बोलला, "आपण मला जे निवेदन केले ते अगदी स्पष्ट असें होते. त्याबद्दल मला आता कांही शंका उरलेली नाही. ह्यावरून मला समजले कीं आपले ज्ञान ह्या विषयाबद्दलचे पूर्ण आहे". ते ऐकून व्याध त्याला बोलतो, "माझ्या ज्ञानाची प्रचीती तुम्हाला येत असेलच. ज्यामुळें मी आज ह्या निर्वाण अवस्थेत पोहोचलो आहे. आपण कृपया उठावे व आत माझ्या माता पित्यांना भेटावे"?. अशी विनंती तो व्याध ब्राह्मणाला करतो. त्याप्रमाणे, कौशिक उठतो व त्याच्या बरोबर त्याच्या घरात निघतो. "आपण आला अहात तेव्हां, माझ्या माता पित्यांना भेटावे असें मला वाटते". त्या प्रमाणे तो ब्राह्मण व्याधाबरोबर आत जातो व त्या वृद्ध मातापित्यांना भेटतो. त्या व्याधाचे घर आतूनसुद्धा फार चांगले ठेवलेले होते. मार्कंडेय ऋषी युधिष्ठीराला सांगत असतात, त्या घरात चार मोठ्या खोल्या होत्या. प्रत्येक खोली चांगल्या प्रकारे सजवलेली होती. ते एका ब्रह्मज्ञानी विरक्ताचे घर आहे असे जर कोणाला सांगितले तर ते चटकन पटले नसते. ते पाहून कौशिक ब्राह्मणाला त्याच्या स्वताच्या अव्यवस्थित घराची आठवण येते. घरात सुगंध जाणवत होता त्या फुलांचा जी पुजेत देवघरात वाहिलेली होती. त्याचे पवित्र जीवन जगणारे माता पिता पांढर्या शूभ्र वस्त्रात नुकतेच त्यांचे जेवण उरकून बसलेले होते. व्याध त्यांना पाहून त्याना साष्टांग नमस्कार घालतो. त्यावर ते वृद्ध पिता त्याला उठण्याची आज्ञा देतात. त्याला आशिर्वाद देतात, "तुझे चांगुलपण तुझे असेंच संरक्षण करो. तुझे पवित्र जीवन पाहून आम्हाला फार आनंद होत असतो. तुला दीर्घ आयुष्य लाभो. तुझ्या ज्ञानात, समृद्धीत भरभराटी येवो. तू आमचा एक कृतज्ञ पुत्र आहेस. कारण तू आमच्या दोघांची सतत फार काळजी घेत असतोस. स्वर्गीय देवतांच्या बरोबरीची तुझी योग्यता झाली आहे कारण तू तुझ्या जबाबदार्या सांभाळत सत्याचा शोध घेत आहेस. तुझे स्थान एकाद्या ऋषीसारखे झाले आहे. तपस्या, संयमन, व्रतस्थता, मर्यादा, सत्त्वशिलता (चांगुलपणा), भोगांबद्दलची उदासिनता आणि आमच्या बद्दलची (तुझ्यावर विसंबून असणार्यां बद्दलची)

कर्तव्यदक्षता अशा अनेक सवयींमुळें तू ब्रह्माला सुद्धा प्रिय झाला आहेस. आम्हाला आनंदात ठेवण्यासाठी तू काय करत असतोस त्याचे आम्ही काय वर्णन करणार? तो जमदाग्नीचा मुलगा त्याचे पिता माता सदैव सुखात असावे म्हणून कसा झटत होता, तसा तू आज वागत आहेस आम्हाला सुखात ठेवण्याकरतां".

त्या नंतर तो त्याची व कौशिक ब्राह्मणाची ओळख करून देतो. ते वृद्ध आई बाप त्याचे स्वागत करतात. कौशिक त्यांचे स्वागत स्वीकारतो. तो रिवाजा प्रमाणे त्यांचे ख्याली खुशाली विचारतो. त्यांच्या स्वास्थ्याची चौकशी करतो, रिवाजानुसार. ते वृद्ध दांपत्य सांगते, आम्ही आमच्या नोकरासह खूप खुशाल आहोत. नंतर ते ब्राह्मणाला विचारतात, त्याला मिथिलाकडे येण्यात कांहीं त्रास झाला कां? अशाप्रकारे त्यांच्या औपचारीक गप्पा झाल्या. त्या संपल्यावर तो नम्र व्याध ब्राह्मणाला सांगतो कीं, अहो विद्वान मुनी हे माझे देव आहेत असे बोलून तो त्याच्या पितरांकडे बोट करतो. मी माझ्या माबापाचेच पुजन करतो, त्यातून मला ब्रह्माचे दर्शन झाले. माझ्याकडे इतर कोणी देव नाहीत. जसें तुम्ही ब्राह्मण त्या तेहतीस प्रकारच्या देवांची आराधना करता तशी मी ह्या माझ्या जन्मदात्या आईबाबांची आराधना करतो. त्यातून मला दृष्टांत झाले व मला ज्ञान प्राप्त झाले आहे. अशा प्रकारे सगळ्याच घरात ही जीवंत दैवत असतात पण आपण त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो व कधीही न पाहिलेल्या देवांच्या पाठी जातो जे कधींच मिळत नाहीत. मी त्यांची सेवा करतो म्हणजे त्यांच्या माध्यमातून ब्रह्माची सेवा करत असतो. वृद्धत्वामुळें ते कधी माझ्यावर रागावतात पण मी त्यांच्यावर रागावत नाही. त्यांची सेवा ब्रह्माची सेवा समजून एकचित्ताने करत असतो. अडलेला नडलेला अशांत देव पहाणे हांच खरा आपला धर्म आहे, जेव्हां ते समजते तेव्हांच मोक्षाचा, सत्याचा खरा मार्ग साधकाला मिळत असतो. जेव्हां असें कोणी नसतात तेव्हां देवाची पुजा करावी. माझ्यासाठी हेंच ते पवित्र अग्नी आहेत ज्यांचा उल्लेख वारंवार वेदात होत असतो. आमच्या घरातील सगळे, माझी पत्नी, मुलं इत्यादी ह्याच प्रकारे ब्रह्माची आराधना करत असतात. त्यांना सतत संतुष्ट ठेवण्यासाठी मी व माझे कुटूंब प्रयत्न करत असतो. त्यांनासुद्धा त्याची जाणीव आहे हे तुम्ही आता पाहिले असेलच. त्यांना आनंदात ठेवण्यासाठी मी कधी खोटेसुद्धा बोलतो. खरे आणि खोटे ह्याला कांहीं महत्व नसते कारण ते सगळे असत्यात (मोह मायेत) असते. म्हणून सत्याच्या दृष्टीने ते

दोनही असत्यच असतात त्यामुळें पाप लागत नाही. त्यांच्या आनंदात सत्य मी पहातो. जे माझ्या पितरांबद्दल आहे ते सगळ्या पितरांबद्दल तितकेंच लागू असते. पवित्र अग्नी चेतवत ठेवणे, माता पिता व इतर जे माझ्यावर अवलंबून आहेत ते सगळे माझ्यासाठी देव आहेत त्यांची देशभाल करणे हे मी माझे कर्तव्य समजतो, तो माझ्या साधनेचाच एक भाग असतो. थोडक्यात मी माझा गृहस्थाश्रम प्रामाणिकपणे सांभाळत असतो. जो इसम त्याचा गृहस्थाश्रम प्रामाणिकपणे पार पाडतो तो स्वर्गात जात असतो, त्याच्यासाठी सर्वसंग परित्याग करणार्यापेक्षा जास्त मोठे स्थान असते कारण अरे ब्राह्मणा, गृहस्थाश्रम सर्व आश्रमात श्रेष्ठ असतो. माझ्या कुटूंबियांच्या सात्त्विक अपेक्षा पूर्ण करण्यात मला धन्यता वाटते. त्यांची सात्त्विक खुषी माझ्यासाठी देवांच्या खूषी सारखी आहे. घरात सात्त्विक वातावरण राखणे हे सुद्धा पुण्य मिळवण्या सारखे असते. तो आनंद मी माझ्या घरात जपत असतो. आमच्या घरात कोणी कोणाचा अपमान करत नाहीत, कोणी आवाज चढवून बोलत नाही. कोणी कोणाला दुःख होईल असे वागत किंवा बोलत नाही. जो तो एकमेकांला त्यांच्या त्यांच्या कामात मदत करत असतो. सगळ्यांचा उत्कर्ष कसा होईल ते सगळ्यांनी पहावयाचे असते असा नियम आमच्या घरात आहे. क्रोध, गर्व आणि द्वेष आमच्या घरात तुम्हाला मिळणार नाहीत कारण ते सत्याचे वैरी असतात. अहो ब्राह्मणा, माझ्या घरातील सगळे माझ्या नियमांचे पालन स्वखुषीने करत असतात त्यामुळें ह्या घरात साक्षात कृतयुगाचा अनुभव आपल्याला येईल. अहो ब्राह्मण, माणसाने केल्याने ते सगळे तो करु शकतो, करण्याची प्रामाणिक मनिषा असली पाहिजे.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा साठावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग एकसष्ठावा

मार्कंडेय पुढे युधिष्ठीराला सांगतात, ते पाहुणचाराचे झाल्यावर पुन्हा तो व्याध ब्राह्मणाला सांगू लागतो, "आपण माझ्या ह्या जीवन शैलीचा गांभिर्याने विचार करावा. माझ्या ह्या गृहस्थाश्रमी तपस्या पद्धतीमुळें मी किमान चुका करत माझी साधना पूर्ण करू शकलो आहे. ज्याप्रकारे गृहस्थाश्रम माणसाला अध्यात्मिक उच्चता मिळवण्यात सहाय्यक ठरतो तसा इतर कोणताही आश्रम मदत करू शकत नाही. ज्ञान मिळवण्यासाठी घरदार सोडून भटकण्याची अजिबात गरज नसते. माझ्या वरून हे तुम्हाला समजले असेलच. तुम्हाला त्या पतिव्रतेने माझ्याकडे पाठवले कारण तुम्हाला हे समजावे असा तिचा उद्देश होता कारण तू तिच्याशी व्यर्थ युक्तीवाद करत होतास. तुला गृहस्थांचा खरा धर्म काय ते समजावे असा त्यामागे तिचा उद्देश होता". ते ऐकून कौशिक ब्राह्मण त्याला बोलतो, "मला आता समजले त्या पतिव्रतेने मला तुमच्याकडे कां पाठवले. कारण जर ती सांगू लागली तर मी माझ्या अहंकारामुळें तिच्याकडून कांहीं शिकू शकलो नसतो. तसेच ती गृहीणी माझ्याशी बोलण्यास सुद्धा राजी नव्हती. तरी आपल्याकडे मला पाठवून माझ्यावर तिने मोठे उपकार केले आहेत". व्याध बोलतो, "तिने जसे अपेक्षा केले होते तसे मी तुला सांगितले आहे. मी तुम्हाला जे सत्याला धरून आहे तेंच सांगत आहे. आता थोडे आणखीन सांगतो जे तुझ्या भल्यासाठी आहे. ते नीट ऐक, तू एक खूप चांगला ब्राह्मण आहेस, तुझ्याकडे माहितीसुद्धा उत्तम आहे, परंतु, चुकीच्या निर्णयामुळें तू तुझ्या मातापितरांवर अन्याय करत आहेस किंबहुना, ते त्या पतिव्रता स्त्रीला उमगले व म्हणून तिने तुला माझ्याकडे खरा धर्म शिकण्यासाठी पाठवले होते. वेद शिकण्यासाठी तू त्यांना न सांगता घर सोडून निघून गेलास. हे तुझे वागणे अनुचित होते. तुझे तपस्वी माता पिता आज अंध झाले आहेत, त्यांना तुझ्या मदतीची आवश्यकता आहे. ते अतीव दुःखात जगत आहेत. तू जरी तपस्या केली असलीस तरी त्यामुळें तू कोठेच नाहीस कारण, जो आपल्या जबाबदार्या सोडून जातो त्याला ब्रह्मदेव क्षमा करत नाही. म्हणून तू आता तुझ्या घरी जा व तुझ्या निजी जबाबदार्या समजून पुढील कामं करावीस, त्यातच तुला खरी गती मिळेल.

तू आताच तुझ्या स्वगृही जा". ब्राह्मण त्याला उत्तर देतो, "आपण जे सांगता ते खरे आहे". त्यानंतर तो ब्राह्मण त्याला आशिर्वाद देतो कीं, त्याचे भले हो.

त्यानंतर पुन्हा तो व्याध त्याला सांगतो, "तू त्वरित जाऊन तुझ्या गृहस्थी जबाबदार्या सांभाळण्यास तयार हो. तुला तुझ्या साधनेत यश येईल कारण तुझा अहंकार आता निमाला आहे. प्रथम गेल्यावर त्यांची क्षमा माग त्यात कमी समजू नकोस. गृहस्थाश्रम हा मोठा गुणी मार्ग आहे. त्या सारखा सोपा मार्ग मोक्षासाठी दुसरा नाही". ब्राह्मण त्याला बोलतो, "माझे मोठे भाग्य म्हणून मला तुम्ही दोघे भेटलात. तुम्ही दोघे माझे खरे गुरू अहात. आपण मला धर्माचा खरा अर्थ इतक्या साध्या सोप्या पद्धतीने समजावला किं, त्याला तोड नाही. आपले ज्ञान पूर्ण असल्यामुळेंच तुम्ही अशारितीने ते मला सांगू शकलात. आपली मैत्री मला प्राप्त झाली तेसुद्धा माझे मोठे भाग्य आहे. मी अहंकाराने केवळ नष्ट होणार होतो व त्यावेळी ती पतिव्रता माऊली आणि त्यानंतर तुम्ही मला भेटला हे ब्राह्मानेच घडवून आणले असावे असे मला वाटते. हे सगळे अवचितपणे घडले, मला त्या बाईने सांगितले व मीसुद्धा ते मनावर घेऊन इतके लांब मिथिलेला आलो. सगळेच माझ्या भल्यासाठीच होत होते जसें ययातिच्या पणतूने (मुलीचा मुलगा) त्याला वाचवले होते. तसेंच कांहींसे हे झाले आहे". पुढे कौशिक त्या ज्ञानी व्याधाला सांगतो, "त्यातूनच आपण सांगितल्या प्रमाणे, तपस्या (ध्यान साधना), संयमन, व्रतस्थता (खरे बोलणे, सत्पात्र हित करणे, सत्पात्र क्षमा करणे, वासनांना आवर घालणे आणि ज्ञानसाधना करणे), मर्यादा, सत्त्वशिलता (चांगुलपणा), भोगांबद्दलची उदासिनता आणि मातापित्याबद्दलची (स्वतावर विसंबून असणार्यां बद्दलची) कर्तव्यदक्षता हे **गृहस्थी व्रत** प्रामाणिकपणे आचरण्यास मी सुरूवात करतो. त्यातूनच माझा खरा उद्धार होईल". अहो ज्ञानी आपण वैश्य अथवा शुद्र असूच शकत नाही कारण जे ज्ञान आपण मला दिले ते एकाद्या सामान्य शुद्राला केवळ अशक्य आहे. अहो ज्ञानी, आपण जाणता कर्मविपाकाचा नियम सगळ्यांना सारखाच लागू होत असतो, मला असें म्हणावयाचे आहे कीं, आपण एवढे ज्ञानी असण्या मागे ह्या जन्माप्रमाणे आपल्या मागील जन्माचासुद्धा कांहीं संबंध

असलाच पाहिजे. आपण सर्वज्ञ अहात तेव्हां ते काय ते मला सांगाल तर माझी उत्कंठा पूर्ण होईल. कृपा करून ते मला आपल्या पद्धतीने व मर्जीने सांगावे.

व्याध सांगतो, "अरे चांगल्या ब्राह्मणा, मी सगळ्या ब्राह्मणांचा आदर करतो. मी आता तुला माझ्या आधीच्या जन्माची कथा सांगतो. मी गेल्या जन्मी तुझ्या सारखाच ब्राह्मण होतो. माझा वेदाचा अभ्यास चांगला झाला होता. मी त्या जमान्यात एक उत्तम वेदांग जाणकार होतो. परंतु, माझ्या एका चुकीमुळें मला ह्या जन्मी हा हलक्या कुळात जन्म प्राप्त झाला आहे. त्या काळी एक राजा जो धनुर्वेद चांगला जाणत होता, माझा मित्र होता. त्याच्या संगतीने मीसुद्धा चांगला तिरंदाज झालो होतो. एके दिवशी माझा मित्र व त्याचे कारभारी असे सगळे मृगया करण्यासाठी निघाले होते. त्या लोकांनी एका ऋषीच्या आश्रमा जवळच बरीच हरणं मारली. मीसुद्धा त्या शिकार्यात होतो. मी फेकलेल्या बाणांने मात्र एक ऋषी जो तेथून जात होता त्याला इजा होते. तो जोरांने ओरडून सांगत असतो किं, त्याने कधीही कोणालाही इजा केलेली नाही, मला बाण मारणारा हा कोण पापी माणूस असें बोलू लागतो. मला समजले नाही कारण तेथे घनदाट झाडीमुळें अंधार होता. मला वाटले मी हरणाला मारले आहे परंतु, जवळ गेल्यावर मला समजले कीं, ते माणूस आहे. तो ओरडत होता. मला शाप देत होता. मी मात्र निष्पाप मनाने त्याच्या जवळ जाऊन कबुली दिली कीं, मी तो बाण मारला होता पण तो चुकून त्याला लागला होता, मी त्याची क्षमा मागितली पण व्यर्थ, तो महाज्ञानी ऋषी मला शाप देतो कीं, मी पुढच्या जन्मी व्याध होईन व जनावरांचे मांस विकत बसेन.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा एकसष्ठावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग बासष्ठावा - व्याध गीता समाप्त

व्याध सांगत होता, "अशारितीने त्या ऋषीचा शाप मला मिळाला, मी त्याला पुनः पुन्हा विनती करत होतो कीं, मी त्यांची क्षमा मागत आहे तरी त्याचा क्रोध कमी होत नव्हता. अखेरीस खर्या ब्राह्मणाप्रमाणे त्याला माझी दया आली, त्याला उमगले कीं, जे घडले ते अपघाताने झाले व अपघाताने घडलेले पाप क्षम्य असते तेव्हां, त्यांनी मला सांगितले कीं, त्याने दिलेला शाप उलटवणे शक्य नाही परंतु, तो उःशाप देतो कीं, त्या जन्मात जेव्हां मी एक मांस विकणारा व्याध होईन तेव्हां माझे त्या जन्मातील ज्ञान व पावित्र्य माझ्या जवळ शाबूत राहिल व मी माझी ज्ञानसाधना पुढे चालवू शकेन. त्या जन्मात मी माझ्या मातापित्यांची काळजी घेईन जशी एक ब्राह्मण त्याच्या मातापितरांची घेतो. त्याशिवाय मी माझा तो जन्म आठवू शकेन, आणि पुढे स्वर्गात जाईन असा मला त्याने आशिर्वाद दिला कारण त्याला माझ्यावर रागावण्याचा पश्चात्ताप झाला होता. त्याशिवाय ह्या शापाची मर्यादा संपली कां मी पुन्हा ब्राह्मण होईन. अशारितीने त्या महान ऋषीने दिलेल्या शापामुळे मी असा झालो आहे. ते माझे प्राक्तन आहे ते मला भोगावयाचेच आहे. त्यानंतर मी त्याच्या अंगात घुसलेला माझा बाण खेचून काढला व त्याला उचलून आश्रमात नेले. तेथे तो ऋषी त्या जखमेतून बरा झाला. अहो ब्राह्मणा, अशारितीने मी व्याध झालो, तुझा अंदाज चुकीचा नव्हता".

कौशिक ब्राह्मण त्याला बोलतो, "अहो ज्ञानी, प्रत्येक माणसाच्या भाग्यात जे सुख व दुःख लिहीले आहे ते त्याला भोगावेच लागते. म्हणून त्यावर काळजी करणे, त्रागा करणे हे व्यर्थ आहे. तू हा व्यवसाय करत आहेस तो करणारे सगळेच तुझ्याप्रमाणे शुद्ध बुद्धीने ती कामं करत नाहीत. म्हणून तुला जरी ते बाधत नसले तरी हा व्यवसाय बहुधा बाधकच आहे. तू ते काम त्या प्राण्यांबद्दलच्या सहानुभूतीने करत असलास तर ते काम तुला बाधत नाही. शुद्ध व निर्विकल्प बुद्धीने ते करत आहेस त्याचे कारण तू मुळात ब्राह्मण आहेस आणि नेहमी ब्राह्मणच रहाणार आहेस. तमोगुणी माणूस प्रायः शुद्र असतो, भले तो ब्राह्मण अथवा इतर द्विजांत जन्मला असेल. सात्त्विक माणूस ब्राह्मण असतो त्याच्या गुणकर्माने, भले

त्याचा जन्म शुद्रात झाला असेल. तसेंच रजोगुणी बहुधा क्षत्रिय अथवा वैश्य असतो जरी त्याचा जन्म ब्राह्मणात किंवा शुद्रात झाला असेल. तरीसुद्धा कोणताही इसम पूर्णतया सात्त्विक, रजोगुणी किंवा तमोगुणी नसतो. त्याची अध्यात्मिकता सुद्धा त्याच्या सगळ्या आयुष्यात सतत दोलायमान असते व त्या प्रमाणे त्याचे गुणसुद्धा बदलत असतात. ते स्थीर करण्यासाठी त्याला व्रतस्थता पाळावी लागते आणि ती त्याच्यात स्वभावतः असावी लागते. ती व्रतस्थता कोणी बळजबरीने आचरणात आणू शकत नाही. त्यासाठी पूर्व जन्माचे भाग्य असावे लागते. कारण सगळे जन्म एकाद्या शृंखले सारखे एकमेकांत अडकलेले असतात. अहो ज्ञानी, तुम्ही गुणकर्माने आतासुद्धा ब्राह्मण अहात. तुमची सगळी शेष पाप संपली आहेत असें मी समजतो".

व्याध बोलतो, "शरीराच्या आजारांना औषध द्यावयाचे असते. मनाच्या तक्रारींसाठी अध्यात्मिक शहाणपण वापरावे लागते. त्यालाच ज्ञानाची ताकद समजले जाते. अज्ञानी माणसें लहान मुलांप्रमाणे मना विरुद्ध कांहीं झाले तर दुःखी, कष्टी होतात व मनाप्रमाणे झाले कां एकदम खूष होतात. ज्ञानी माणसांवर अशा गोष्टींचा प्रभाव पडत नाही. त्यांची मति स्थीर असते. सगळ्याच जीवांना हे सुख दुःखाचे अनुभव घ्यावा लागतात. त्याची जाणीव असलेले त्याच्या बाबत जास्त चिंता करत नाहीत. ते आपली कर्तव्ये शांतचित्ताने करत रहातात. मनाप्रमाणे न झाल्यास अपेक्षा भंगाचे दुःख, असमाधान अथवा क्रोध त्याला अनुभवास येतात. अपेक्षे प्रमाणे झाले तर सुख व आणखीन अपेक्षा, असें ते भोगांचे चक्र सुरू होत असते. ते सुरू होणार नाही अशी मानसिकता असावी. असमाधानातून पुनः नवीन इच्छा सुरू होत असते. समाधानाचे सुख विलक्षण असते. शहाणे लोक त्यासाठी फार जास्त मोठ्या अपेक्षा वाढवत नाहीत व सावधपणे रहातात. औदासिन्य त्यात त्याला चांगली मदत करतात. तमोगुणी लोकांमध्ये, असमाधान एकाद्या ज्वालामुखी सारखे होते. त्याच्या उद्रेकामुळें कित्येक पापांची शृंखला सुरू होऊ शकते. विवेकाचा नाश होतो. त्यातून भय, चिंता, सुडबुद्धी, द्वेष, नैराश्य अशा भयंकर विकारांचे थैमान सुरू होत असते. त्यांतून उत्पन्न होणारे पाप कर्म त्या माणसाला बेभान करत असते. त्या प्रमाणे त्याच्या नंतरच्या हालचाली सुरू होतात त्या तो थांबवू शकत नाही. तमोगुणी औदासिन्य त्या माणसाला आळशी, कार्यहीन, व्यर्थ बनवते. म्हणून औदासिन्य सात्त्विक असावे लागते.

अशा परिस्थितीत जेव्हां विवेक संपलेला असतो त्याच्याच भावनिकता वाढू लागते. सगळ्या गोष्टी तो भावनाने पाहू लागतो. भावनेने तो निर्णय घेऊ लागतो जे प्रायः चुकीचे असतात. ज्याला ह्या वास्तविक जगाच्या मर्यादांचे भान आले आहे तो उगाचच जास्त अपेक्षा ठेवत नाही. तो कांहीं न अपेक्षा करता तसांच समाधानी असतो. कारण त्याला कांहींच अपेक्षाच नसतात. अशा माणसाला कांहीं मिळो अगर न मिळो तो शांत असतो".

ब्राह्मण व्याधाला सांगतो, "अहो ज्ञानी व्याधा, मी त्या शहाण्या माणसाच्या मनस्थितीत पोहोचलो आहे. मी आता गोंधळलेल्या मनस्थितीत नाही व पुढे कधी जाणार नाही. अपेक्षांच्या मर्यादांचे चांगले भान मला प्राप्त झाले आहे. माझ्या मनात कोणताही संशय उरलेला नाही. आपण ज्ञानी अहात आपले ज्ञान पूर्ण आहे, त्याकरतां, आपल्यात काहीं उणे पहाता येत नाही. अहो ज्ञानी आपण असेंच समृद्धीकडे जाणार अहात. आपले संरक्षण आपला चांगुलपणा (सत्त्वशिलता) करणार आहे. चोखंदळपणे आपण पुण्याच्या मार्गाने जाणार अहात".

मार्कंडेय त्यानंतर युधिष्ठीराला सांगतात कीं, ते ऐकल्यानंतर व्याध त्याला आशिर्वाद देतो. तो ब्राह्मण कौशिक नांवाचा, व्याधाला दोन प्रदक्षिणा घालतो जसें शिष्य गुरूला घालतात. त्यानंतर तो त्याचा निरोप घेऊन त्याच्या घरातून निघून जातो आपल्या घरी.

तो घरी जातो व पहातो कीं, त्याचे मातापिता अंध अवस्थेत मोठ्या हालाखीच्या परिस्थितीत रहात आहेत. तो त्यांची प्रथम क्षमा मागतो, ते त्याला क्षमा करतात. त्यानंतर तो ब्राह्मण आपल्या गृहस्थी कर्तव्यात प्रामाणिकपणे गुंतून जातो व त्याबरोबर व्याधाने सांगितल्या प्रमाणे तपस्या, संयमन, व्रतस्थता, मर्यादा, सत्त्वशिलता (चांगुलपणा), भोगांबद्दलची उदासिनता आणि मातापित्याबद्दलची (त्याच्यावर विसंबून असणार्यां बद्दलची) कर्तव्यदक्षता हे **गृहस्थी व्रत** प्रामाणिकपणे आचरण्यास सुरूवात करतो.

मार्कंडेय युधिष्ठीराला बोलतात, "अरे युधिष्ठीरा, मी तुला नैतिकतेच्या गोष्टी सांगितल्या आहेत सोदाहरण, त्यांतून तुला कांहीं बोध झाला असेल असें मी समजतो. त्यात बाईचे पतीबद्दलचे व कुटूंबाबद्दलचे कर्तव्य व पुत्राचे जन्मदात्यांबद्दलचे कर्तव्य काय असते ते तुला सांगितले. त्याशिवाय पाप व पुण्यांचे अन्योन्य संबंध सुद्धा पाहिले, गृहस्थी व्रत काय असते ते सुद्धा पाहिले आहे".

युधिष्ठीर मार्कंडेय ऋषींना बोलतो, "अहो महापुण्यवंत ब्राह्मणा, जे सर्वात श्रेष्ठ मुनी अहात, आपण मला ते सगळे सविस्तरपणे सांगून माझ्या मनातील सर्व संशय दूर केले आहेत. ते ऐकून माझे ज्ञान वाढले आहे. तरीसुद्धा, आपल्या मधूर वाणीतून आणखीन पुष्कळ कांही ज्ञानामृताचे बोल ऐकण्याची माझी इच्छा आहे.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा बासष्ठावा भाग संपला.

**- व्याध गीता समाप्त -**

**मार्कंडेय समस्या पर्व पुढे चालू**

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग त्रेसष्ठावा

वैशंपायन जनमेजयाला सांगत असतात, तो गुणी राजा, युधिष्ठीर ते नीति व धर्म शास्त्रावरील विवेचन ऐकल्यावर तो मार्कंडेयांना विचारतो, अहो ऋषी, मला समजत नाही, अग्नी देव स्वताला पाण्यात कां लपवून ठेवतो ते, आणि प्राचीन महान तेजस्वी ऋषी अंगीरस, स्वतः अग्नीदेवाचे काम कां करत होते"? "मला माहीत आहे, मुलतः अग्नी एकच आहे परंतु, तो विविध रुप घेऊन वावरत असतो? मला सांगा अहो महर्षी मांर्कंडेय, ह्या मागील सुत्र काय आहे. कुमार कसा जन्मला? त्याला अग्नीचा मुलगा असें कां समजले जाते ते सुद्धा मला समजून घ्यावयाचे आहे. कुमाराला रुद्रांने का त्याचा मुलगा म्हणून स्वीकारले, त्यात गंगा आणि कृत्तिक कसें येतात? मला ते समजून घेण्याची उत्सुकता आहे".

मार्कंडेय त्याला उत्तर देतात, "हे एका प्राचीन कथेच्या मदतीने मी तुला समजावून देऊ शकतो. त्या कथानुसार अग्नी रागाच्या भरात अर्घ्य म्हणून सागराचे पाणी वापरून त्याची पुजा करतो. त्यावेळी आदरणीय ऋषी अंगीरस अग्नीचे रुप घेऊन त्या तेजांनी ते जगातील अंधार नाहीसा करतात. हे सगळे फार प्राचीन काळी घडले होते. महान ऋषी अंगीरसांनी त्यांच्या मठात बसून मोठी तपस्या केली. त्या तपस्येमुळें ते अग्नीपेक्षा जास्त श्रेष्ठ झाले होते. त्या अवस्थेत ते सगळ्या जगाला प्रकाश देत होते. त्या सुमारास अग्नीदेवसुद्धा तपस्या करत होते. त्याला अंगीरसांच्या तेजामुळें अस्वस्थता प्राप्त झाली होती. अग्नीला समजत नव्हते काय करावे. तो अग्नीदेव मनाची समजूत करतो कीं, ब्राह्माने आणखीन एक अग्नीदेव उत्पन्न केला असावा. मी तपस्या करत असल्यामुळें तो दुसरा अग्नी माझ्या जागी त्यांनी नेमला असावा. तो समजतो कीं, आता माझी गरज उरलेली नाही. तरी तो ठरवतो किं, तो त्याचे अग्नीदेव म्हणून जे स्थान पुर्वापार चालू आहे ते सोडणार नाही. स्वतः ची योग्यता तो पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी कांहीं करणायाचा चंग बांघतो. अग्नीदेव अंगीरसांचे तेज पहात असतो. थोडे घाबरत तो अग्नीदेव अंगीरसाच्या जवळ जातो. त्याला पाहून अंगीरस त्याला बोलतात, "अरे हुताशनी, तू जितक्या लवकर तुझे प्रभुत्व सिद्ध

करशील तेवढे माला बरे वाटेल. तुला प्रथम ब्रह्मांने उत्पन्न केले आहे जीवसृष्टीला उर्जा देण्यासाठी तेव्हां तुझा अधिकार पहिला आहे हे मी मान्य करतो. ब्रह्माने तुला तिनही जगातील अंधार संपवण्यासाठी प्रथम उत्पन्न केले आहे हे सुद्धा मी जाणतो. म्हणून तू त्वरित तुझी तपस्या संपवून तुझे काम करण्यास सज्ज हो". त्यावर अग्नीदेव त्याला बोलतो, "माझे नांव आता तुझ्या येण्याने खराब झाले आहे. आता तूंच जगाचा अग्निदेव झाला आहेस. लोक तुला अग्नीदेव म्हणून समजतील व मला विसरून जातील. मी माझे देवत्वाचा त्याग करणार आहे. ह्यापुढे तू प्रमुख अग्नीदेव असशिल व मी तुझ्या नंतर प्रजापत्यक अग्नी म्हणून असेन". ते ऐकल्यावर अंगीरस त्याला बोलतात, "अहो अग्नीदेव आपणच सदैव जगाचे उर्जास्थान रहाणार अहात व मला तुमचा ज्येष्ठ मुलगा म्हणून स्थान द्यावे कारण, तेंच उचित ठरेल".

मार्कंडेय त्यानंतर सांगतात, ते अंगीरसाचे ऐकून अग्नीदेव त्याला त्याच्या मुलाचा दर्जा देतात. अंगीरसाला एक पुत्र असतो ज्याचे नांव वृहस्पती होते. त्याची माहिती सगळ्या देवांना होती. देवांनी त्या गोष्टींची चौकशी केली व त्यांच्या त्या नात्याला सगळ्यांनी मान्यता दिली. त्या नुसार कर्मकांडातील चार अग्नी कोणते त्याची माहीती मी तुला आता सांगतो. अग्नी देवांचे मुख झाले व सगळे विधी त्याच्या द्वारा करावयाचे म्हणून होम करणे तो प्रथम अग्नी, कुमार कार्तिकेय हा त्याचा मुलगा म्हणून तो दुसरा अग्नी आहे, तिसरा अग्नी देवांना वाहिलेले अर्घ्य त्यांच्याकडे पोहोचवणारा तिसरा, वेदांत असलेला चौथा असें ते चार अग्नी झाले.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा त्रेसष्ठावा भाग संपला.

## मार्कंडेय समस्या पर्व

## भाग चौसष्ठावा

मार्कंडेय ऋषी पुढे सागत असतात, अंगीरस जो ब्रह्माचा तिसरा मुलगा होता, त्याची एक पत्नी होती, तिचे नांव शुभा. तुला अरे राजा युधिष्ठीरा माहीत आहे कां त्यांना किती मुलं होती? त्यांचा एक मुलगा वृहस्पती, तो अतिशय प्रेमळ स्वभावाचा व बलशाली होता. त्याची प्रज्ञा विलक्षण होती. तो सल्लागार म्हणून फार ख्यातनाम होता. भानुमती ही त्याची पहिली मुलगी होती. ती त्याच्या सगळ्या मुलांत अतिशय सुंदर होती. अंगीरसाची दुसरी मुलगी होती तिचे नांव रागा होते, रागा म्हणजे प्रेम. तिला असें नांव ठेवले होते कारण ती सगळ्या प्राणिमात्राचे प्रेम होते. शिनीवली त्याच्या तिसर्या कन्येचे नांव होते. शिनीवलीचे शरीर असें सडपातळ होते किं, ती कधी दिसत असें व कधी दिसत नसे. त्यासाठी तिची तुलना नेहमी रुद्राच्या मुलीशी केली जात असें. अर्चिष्मती त्याच्या तिसर्या कन्येचे नांव होते. त्याच्या पांचव्या कन्येचे नांव होते हविष्मती. तसें नांव ठेवण्याचे कारण ती होमात दिलेले हवन स्वीकारत असें. अंगीरसाच्या सहाव्या कन्येचे नांव महीष्मती पवित्रा. सातवी मुलगी चतुर होती, तिचे नांव ठेवले होते मनमति. ती सगळ्या यज्ञात उपस्थित असें. तिला कुहू कुहू असें बोलले जात असें. ते तिचे दुसरे नांव झाले होते.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाची चौसष्ठावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग पासष्ठावा

मार्कंडेय पुढे सांगतात, वृहस्पतीला एक पत्नी होती. तिचे नांल तारा होते. ती चंद्रलोकातील होती. तिच्यापासून त्याला सहा मुलगे आणि एक मुलगी झाली. वृहस्पतीचा दुसरा मुलगा संजू, त्याचा नांवाने पौर्णमास्य यज्ञात लोण्याचे हवन केले जाते. तो अग्नीचे रुप मोठे वैराग्यपूर्ण होते. चातुर्मासातील अश्वमेध यज्ञात त्याच्यासाठी घोड्यांचे बळी चढवले जातात. त्या संजू अग्नीच्या ज्वाळा मोठ्या व अनेक असतात. संजूच्या बायकोचे नांव होते सत्य. ती अप्रतिम देखणी होती व ती धर्माच्या मधून उत्पन्न झाली होती केवळ चांगुलपणा वाढावा म्हणून. अंगिरसाचा एक मुलगा साक्षात हुताशनी होता. त्याला तीन अतिगुणवान अशा कन्या होत्या. यज्ञातील पहिले हवन ज्याला भारद्वाज असें म्हणतात तो त्याचा मुलगा असतो. तोच यज्ञातील हवन असतो जे श्रृकाच्या (एक प्रकारची लांब दांड्याची पळी) मदतीने होमात सोडले जाते पूर्णमास्येच्या दिवशी. त्याशिवाय त्याला एक मुलगा होता त्याचे नांव होते भारत व एक कन्या जिचे नांव होते भारती. भारत हा अग्नी प्रजापतिचा मुलगा मानला जातो. त्यातून भारत वंश उत्पन्न झाला आहे. भारद्वाजाच्या बायकोचे नांव आहे विरा. ती वीरची माता आहे. ब्राह्मण त्याची आराधना सोमासारखीच करतात. यज्ञात दुसर्यांदा जे हवन दिले जाते त्यात तो व सोम एकत्रच धरले जातात. त्याला राथप्रभू, राथध्वन आणि कुंभरेत अशा नांवानेसुद्धा म्हणतात . त्याला त्याच्या शरयू नांवाच्या बायकोपासून सिद्धी नांवाचा मुलगा झाला. त्यांने सूर्याला ग्रासले होते व त्याच्या स्तुतीसाठी अनेक कवन वेदांत आहेत. आणखीन एक अग्नी आहे ज्याला निश्च्यवन म्हणतात, तो पृथ्वीची स्तुती करत असतो. तो सदैव समृद्धी, प्रसिद्धी आणि सौंदर्यासाठी ओळखला जातो. पवित्र सत्य त्याचा मुलगा आहे. तो सगळ्या दोषांपासून मुक्त असतो. तो काळाचे नियंत्रण करत असतो. त्या अग्नीला आणखीन एक नांव आहे, निष्क्रिती. असें नांव देण्याचे कारण, त्यांने सगळ्या दृष्य जीवांना आराम दिला. जर त्याची योग्य प्रकारे पुजा केली तर तो समृद्धी प्रदान करतो. त्याच्या मुलाचे नाव आहे, श्वान. त्याच्यातून सगळे रोग उत्पन्न होत असतात. त्याची बाधा झालेले लोक मोठ्याने ओरडत फिरत रहातात.

वृहस्पतीचा तिसरा मुलगा विश्वजीत त्याची पुजा सगळे ज्ञानी लोक करतात. सगळ्या प्राण्यांच्या उदरात जो अग्नी असतो तो वृहस्पतीचा चौथा मुलगा आहे. त्याचे नांव विश्वभूक असें आहे. त्याला जठराग्नी म्हणूनसुद्धा ओळखतात. त्याचा स्वतःवर उत्तम संयम असतो त्यासाठी तो साधकांत ओळखला जातो. तो ब्रह्मचारी असून त्याची आराधना सगळे ब्राह्मण पाकसिद्धाच्या समयी करतात. पवित्र नदी गोमती त्याची पत्नी आहे. सगळे भाविक तिच्यातील वडवानलाची पुजा करतात. तो वडवानल वृहस्पतीचा पांचवा मुलगा. त्या ब्राह्मण अग्नीची गती वरच्या दिशेने असते म्हणून त्याला उर्ध्वभग असें नांव दिले आहे. त्याचे स्थान आहे प्राणात. वृहस्पतीच्या सहाव्या मुलाचे नांव आहे श्विष्तक्रीत. कारण त्याला दिलेल्या हवनामुळें स्विश्त म्हणजे चांगले होते. यज्ञातील उदग्धर हवन त्याच्या नांवाने केले जाते. त्या वेळी त्याची स्तुती केली जाते. मन्यौती हि वृहस्पतीची कन्या आहे जी फार रागीट असून ती सगळे भस्म करत असते. तिला स्वाहः असेंसुद्धा म्हणतात. स्वाहाचे तीन गुण आहेत त्यांना सत्त्व, रजस आणि तमस म्हणतात. स्वाहःची तीन मुलं आहेत. त्यातील पहिला उच्च दर्जाच्या गुणातून (सत्त्व गुण) अतिसुंदर आहे म्हणून त्याला देवांनी कामाग्नी (कामदेव) असें नांव दिले. दुसर्या गुणातून (रजोगुण) मुलगा अमोघ, जो प्रसन्न झाला कीं, युद्धात अजिंक्यपद मिळते. त्याच्या हातात तिरकमटा असतो व तो रथात बसलेला असतो. त्याला क्रोध नसतो. तो नेहमी फुलांनी नटलेला असतो. तिच्या तिसर्या गुणातून (तमोगुण) उख्थ झाला, आळस उत्पन्न झाला. त्याला समस्वस म्हणतात. अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा पासष्ठावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग सहासष्ठावा

मार्कंडेय पुढे सांगतात, उख्थ मोठी तपस्या करतो. जी अनेक वर्षे करत असतो. त्याचे कारण त्याला ब्रह्मासारखा तेजस्वी मुलगा हवा असतो. जेव्हां व्याह्रीती कवनं गाऊन पांच अग्नींच्या साक्षीने तो विधी केला गेला तेव्हां काश्यप, वसिष्ठ, प्राण, प्राणाचा मुलगा, च्यवन, अंगीरसाचा मुलगा आणि सुवर्चक ह्यांच्या मदतीने एक प्रचंड शक्ती निर्माण झाली. ज्यामध्ये सजीवता परिपूर्णतेने भरलेली होती. त्याला पांच अग्नींचे रंग होते. त्याचा माथा तप्त अग्नीसारखा होता, त्याचे हात सूर्यासारखे शुभ्र रंगाचे होते, त्याची त्वचा सोनेरी होती, त्याचे पाय काळ्या रंगाचे होते. ते पांच रंग त्याला त्या पांच ऋषींनी (काश्यप, वसिष्ठ, च्यवन, अंगीरस, सुवर्चक) त्यांच्या तपोसामर्थ्याने दिले होते. तो पांच घराण्यांचा पूर्वज झाला. दहा हजार वर्षे अशी तपस्या केल्यानंतर त्याच्यातून एक विलक्षण अग्नी उत्पन्न झाला ज्याच्यातून सजीव सृष्टीची सुरूवात झाली. त्याच्या डोक्या व तोंडातून वृहत आणि रथंतर (रात्र व दिवस) उत्पन्न झाले, जे जीवशक्ती पटकन लुप्त करत होते. त्याच्या नाभीतून शिव आले. इंद्र त्याच्या हिम्मतीतून उत्पन्न झाला, वारे आणि अग्नी त्याच्या स्वतःतून बाहेर आले, त्याच्या दोन हातांतून ऋग्वेदातील उदत्त व अनुदत्त ऋचा बाहेर आल्या. त्याच्यातून मन, पांच ज्ञानेंद्रिये आणि इतर प्राणी उत्पन्न झाले. अशारितीने सगळे उत्पन्न केल्यानंतर त्याने पांच मुख्य पितर तयार केले. त्यातील प्रनिधी वृहद्रथचा होता. वृहद्रथ काश्यपाचा मुलगा होता, भानु च्यवनाचा पुत्र होता, सुवर्चकाचा सौरभ होता. अनुदत्त प्राणाचा मुलगा होता. असें प्रसिद्ध पंचवीस त्याने उत्पन्न केले. तपातून आणखीन पंधरा देव तयार झाले. जे यज्ञाला विरोध करण्याच्या प्रवृत्तीचे होते. त्यांची नांवे अशी, सुभिम, भिम, अतिभिम, भिमवल, अवल, सुमित्र, मित्रवन, मितासिन, मित्रवर्धन, मित्रधर्मन, सुराप्रवीर, वीर, सुवेका, सुरवर्च, सुरहंत्री. त्या देवांची आणखीन तीन वर्गात विभागणी झाली. त्या प्रत्येकात आणखीन पांच उपभाग आहेत. ते पृथ्वीवर असतात व त्यांचे काम यज्ञ विधी आणि सर्वप्रकारचे कर्मकांड उद्ध्वस्त करावयाचे असें आहे. ते स्वर्गातसुद्धा होणारे देवांचे यज्ञ उद्ध्वस्त करण्याचे काम करत असतात. यज्ञात दिलेले अर्घ्य व हवन

ते खराब करत असतात. त्यामुळें ते देवांपर्यंत पोहोचत नाहीत. जे पुरोहित ह्या गोष्टींकडे सावधगिरीने पहातात ते प्रथम ह्यांच्यासाठीचा प्रसाद यज्ञगृहाबाहेर काढून ठेवतात. तसें केले तर त्यांचा त्रास होत नाही असें म्हणतात. ते त्यांना दिलेले हवन पक्षाच्या रुपाने येऊन घेतात. यज्ञ सुरू करतांना प्रथम त्यांचे नांव घेऊन त्याला सांगतात कीं, तुमचा वाटा बाहेर काढून ठेवला आहे तो घ्यावा. असें केले तर ते यज्ञात अडचण आणत नाहीत. वृहदुख्त, तपाचा आणखीन एक मुलगा, पृथ्वीशी निगडीत असतो. त्याची पुजा सात्त्विक माणसे अग्निहोत्र सांभाळून यज्ञ करून करत असतात. तपाचा दुसरा मुलगा, रथंतर त्याला द्यावयाचे हवन मित्रविंदाच्या नांवाने करण्याची प्रथा आहे. तप त्याच्या मुलांचे अशारितीने स्मरण करणार्यांवर प्रसन्न होतो.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा सहासष्ठावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग सदुसष्ठावा

मार्कंडेय पुढे सांगतात, "भरत नावांचा अग्नी अनेक नियमांनी व्रतस्थ होता. त्याच्या अग्नीचे आणखीन एक नांव आहे, पुश्तिमति. असें नांव देण्याचे कारण, जर तो संतुष्ट झाला तर तो याचकाच्या प्रगतीला पुष्टी देतो. म्हणून त्याला भरत म्हणजे आनंद देणारा असें नांव झाले. तो सगळ्या चराचरांचे सुख पहातो म्हणून त्याला शिव असें सुद्धा म्हणतात, शिव म्हणजे शुभ करणारा. तपाकडून वैराग्याचा (औदासिन्यपूर्वक जीवन) वारसा घेतलेला त्या मुलाचे नांव आहे पुरंद ज्याने तो वैराग्याचा वारसा जतन केला होता. तपाला उष्म म्हणून आणखीन एक मुलगा होता, त्याचा उष्मा सगळ्या पदार्थात जाणवतो. त्यानंतर तपाला तिसरा मुलगा झाला त्याचे नांव होते मनु. मनु प्रजापतीला मदत करत असें. वेदाचा अभ्यास असलेले ब्राह्मण शंभूदेवाची फार स्तुती करत असतात. त्यानंतर त्या महान अवस्थ्य अग्नीची पुजा ते करतात. तपातून उर्जास्कर अग्नी जो सोन्यासारखा चमकतो त्याला यज्ञात सोमरसाचा प्रसाद द्यावा लागतो तो आला. सूर्य दिवसभर काम करून थकल्यानंतर त्याचे जे रुप असते त्याला प्रशांत अग्नी असें बोलतात. त्याने पृथ्वीवर अनेक असुर व इतर कांही प्राणी निर्माण केले. अंगीरसाने प्रजापती भानुला तपाच्या मदतीने उत्पन्न केले. त्याला ब्राह्मण वृहद्भानु म्हणून म्हणतात. भानुचे लग्न सुप्रजाशी होते. जी सूर्याची कन्या आहे. त्यांना सहा मुले होतात. तुला त्यांची माहीता आहे कां? जो अग्नी अशक्तांना जोर देतो त्याला बलद म्हणतात. तो भानुचा पहिला मुलगा आहे. दुसरा अग्नी जो सगळे शांत असतांना भयंकर दिसतो त्याला मंजूमन म्हणतात. यज्ञात जो अग्नी केला जातो त्याला दर्श आणि पौर्नामस्य म्हणतात. अंगीरस किंवा ज्याला धृतिमन म्हणतात जो पृथ्वीवर विष्णू म्हणून ओळखतात तो तिसरा मुलगा आहे. त्या नंतर ज्या अग्नीला अग्रायन अर्घ्य दिले जाते त्याला अग्रायन अग्नी म्हणतात तो चौथा मुलगा आला. त्यानंतर पांचवा अग्रह जो सगळ्या अर्घ्यांचा मूळ समजला जातो चतुर्मासात दररोज ते दिले जातात. स्तुव हा सहावा मुलगा. निशा मनुच्या पत्नीचे नांव आहे. ज्या मनुला भानु असें सुद्धा म्हणतात. तिच्या पासून एक कन्या त्याला झाली व दोन अग्नीशोम आणि पांच दुसरे अग्नीदेव

ह्यांनासुद्धा तिने जन्म दिला. तो तेजस्वी अग्नीदेव ज्याची पुजा होते मुख्य देवतेसह पहिले अर्घ्य देऊन त्याचे नांव आहे विश्वानर. तो सर्वात मोठा अग्नीदेव ज्याला देवांचा राजा असें मानले जाते तो आहे विश्वपती तो मनुचा दुसरा मुलगा. मनुच्या कन्येचे नांव आहे स्वस्तिका कारण तिला अर्घ्य दिल्यामुळें यजमानाला मोठे श्रेय प्राप्त होते. ती असें सांगतात, हिरण्यकश्यपूची मुलगी होती. ती एक प्रजापती असें मानले जाते. (*ह्या ठिकाणी जी नाती सांगितली आहेत ती सांकेतिक आहेत कारण ह्यातील कोणीही माणसे नाहीत. त्या सगळ्या शक्ती आहेत म्हणून ते ध्यानात घेऊन वाचावे.*)
हिरण्यकश्यपू असुर होता. आणखीन एक अग्नी आहे ज्याचे स्थान असते प्रत्येक प्राणिमात्रांत ज्यामुळें ते जगत असतात, त्याचे नांव आहे संहिता. त्याच्यामुळें रचना, संकल्पना इत्यादि तयार होतात आणि विविध ध्वनी उत्पन्न होत असतात.
आता सांगतो त्या महान अग्नी बद्दल ज्याचे नांव आहे कपिल. त्याच्यामुळें कर्मसिद्धी होत असते. ज्याचा मार्ग काळ्या व पांढर्या डागांने दाखवला जातो. तो इतरांना जरी कर्मसिद्धी देत असला स्वतः मात्र निष्कर्म आहे. त्याला सगळे ऋषी कपिल मुनी म्हणून ओळखतात. असें समजतात कीं, त्याने सांख्य विचार मांडले व विश्वाचे कोडे सोडवण्याची दिशा दिली. ज्याच्या माध्यमातून सामान्य दैवी शक्ती अर्घ्य स्वीकारतात त्या अग्नीला अग्रणी असें म्हणतात.
यज्ञातील अग्निहोत्रात जे दोष वार्याच्या हालचालीमुळें निर्माण होतात त्यांचे निराकरण करण्यासाठी अष्टकपल विधी करतात. त्याची देवता असते सुची. जर दक्षिणेकडून वारा आला तर त्याच्या दोषाचे निराकरण करण्यासाठी जो विधी सांगितला आहे तो आहे विति. जर निवेश अग्नी देवाग्नीच्या मध्ये आला तर अष्टकपल विधी सुची करून करावा. त्यामुळें ते दोष नाहीसे होतात. जर नित्य अग्नीहोत्राला ऋतुस्नात स्त्रीने अनवधानाने स्पर्श केला तर पुनः अष्टकपल विधी करावा, अग्नी दस्युम्न चेतवून. जर ते विधी करत असतांना कोणाच्या मृत्यूची वार्ता सांगितली गेली तर अष्टकपल विधी सुरमन अग्नीला चेतवून करावा. जो अग्नीहोत्री कांहीं कारणामुळें अर्घ्य व हवन करू शकत नसेल, तर उत्तर दिशेचा अग्नी चेतवून प्रायश्चित्त करावे. ज्या ब्राह्मणानी दर्श व पौर्नामास्य विधी केले आहेत त्यांनी त्यातील चुकांच्या निराकरणार्थ अष्टकपल विधी पतिकृत अग्नी चेतवून करावा. जर

घरातील सामान्य अग्नीचा संबंध पवित्र अग्नीशी आला तर त्याच्या निराकरणार्थ अष्टकपल विधी अग्नीमन चेतवून करावा.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा सद्‌सष्ठावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग अडुसष्ठावा

मार्कंडेय सांगत असतात, अग्नी स्वाहाची लाडकी बायको मुदीता, पाण्यात रहात असते. स्वाहा जो आकाश व पृथ्वी ह्यांचा कार्यवाह आहे त्याला एक अतिशय पवित्र अग्नी मुदीता पासून होतो. त्याचे नांव आहे अदवंत. ज्ञानी ब्राह्मण असें धरतात कीं, हा अदवंत सगळ्या चराचराचा कारक आहे. तो सगळ्या पंचमहाभूतांचा स्वामी आहे. तो अग्नी गृहपती ह्या नावांनी सर्वत्र यज्ञांत पुजला जातो. अभूत अग्नी स्वाहाचा मुलगा, जो सर्वात श्रेष्ठ असून तो आकाश आणि पाणी ह्यांचा कार्यवाह आहे. त्याचा मुलगा भरत अग्नी, प्रेतांना भस्मीभूत करतो. त्याचे अग्नीस्तोम यज्ञातील कार्य नियत म्हणून ओळखले जाते. जेव्हां यज्ञात नियत येतो तेव्हां स्वाहः समुद्रात लपून बसतो कारण, त्याला नियताच्या स्पर्शाने भ्रष्ट व्हावयाचे नसते. एकदा सगळे देव त्याला शोधत होते सगळीकडे पण तो सांपडला नाही. परंतु, अथर्वनला अग्नी पहातो व सांगतो, "अरे मर्दा, तू देवांना अर्घ्य दे माझ्यावतीने कारण मी ते देऊ शकत नाही. माझी शक्ती कमी झाली आहे. माझ्यावर कृपा कर". असें सांगून अग्नी दुसरीकडे कोठे तरी निघून जातो. परंतु, त्याची लपण्याची जागा फिनीलोकांना संमजते. ते समजल्यावर अग्नी त्या लोकांना शाप देतो. तो बोलतो, "तुम्हाला सगळ्याप्रकारचे प्राणी भक्ष्य करतील".

त्यानंतर तो अर्घ्य वाहून नेणारा अग्नी अथर्वनास आधी सांगितल्या प्रमाणे म्हणतो. त्याप्रमाणे देव अथर्वनाकडून अर्घ्याची अपेक्षा करत असतात परंतु, तो ते न करतां त्याचे रुप टाकून देतो व पृथ्वीच्या पोटात घुसतो. पृथ्वीच्या संपर्कात आल्याने त्याच्या पासून विविध प्रकारचे धातू तयार होतात. त्याच्या पूंवातून अनेक प्रकारचे वास व उर्जा निर्माण होते. त्याच्या हाडांतून सुगंधी राळ देणारे वृक्ष उपजले. त्याच्या कफातून कांच तयार झाली. त्याच्या पित्तातून रत्न तयार झाले. त्याच्या यकृतातून लोह धातू तयार झाला. सगळे जग ह्या तीन गोष्टींचे बनले आहे, लाकूड, दगड आणि लोखंड. त्याच्या नखांतून ढगं निघाली. त्याच्या नसांतून प्रवाळ तयार झाले. इतर धातू त्याच्या शरीराच्या इतर भागांतून आले. अशारितीने त्याचे शरीर कामात आल्यामुळें तो सर्वस्वी अध्यात्मात मग्न झाला.

त्याच्या तपस्येची तुलना भृगु आणि अंगिरसांच्या तपस्येशीच करावी लागेल. त्या तपस्येमुळें तो आणखीनच भडकून निघाला. परंतु, पुन्हा जेव्हां तो अथर्वनाला पहातो त्याला त्याची पाण्यातील जागा आठवतो. त्याच्या पुनः पाण्यात जाण्याने सगळे जग हादरून जाते. ते जग पुन्हा अथर्वनाकडे संरक्षणासाठी पहाते. सगळे देव व इतर सगळे अथर्वनाची पुजा करू लागतात. अथर्वन सगळी दुनिया शोधतो अग्नीसाठी, पण तो सांपडत नाही. अखेरीस त्याला अग्नी सांपडतो व तो पुन्हा जग निर्माण करण्यास सुरूवात करतो. अशारितीने प्राचीन काळी अग्नी प्रथम नष्ट झाला व पुन्हा तयार झाला जेव्हां अथर्वनाने त्याला बोलावले. आता त्याला सगळ्या प्राण्यांकडून अर्घ्य, हवन मिळू लागले व तो सगळ्या जगात फिरून ठिकाठिकाणी निरनिराळ्या प्रकारचे अग्नी जे वेदांत सांगितले आहेत, उत्पन्न करू लागला. परंतु रहाण्यासाठी तो पाण्यातच जात होता. असें समजले जाते कीं, सिंधू, देविका, सरस्वती, गंगा, शतकुंभा , शरयू, गंडकी, चर्मंवती, मही, मेधा, मेधातिथी, तुम्रावती, वेत्रावती, कौशिकी, तामसा, नर्मदा, गोदावरी, वेणा, उपवेणा, भिमा, वदवा, भारती, सूप्रयोगा, कावेरी, मुरमुरा, तुंगवेणा, कृष्णनेणा, कपिला ह्या नद्यां अग्नीला जन्म देतात असें मानले जाते. अभूत नांवाच्या अग्नीची बायको आहे, प्रिया. विभू त्यांचा ज्येष्ठ मुलगा असतो. जेवढे विविध अग्नी आता पर्यंत मी सांगितले त्या प्रत्येकासाठी सोम यज्ञ करावयाचे असतात. ते सगळे अत्रीच्या कुळातील आहेत असें समजले जाते. असें समजतात कीं, ऋषी अत्रीनी त्यांना त्याच्या विचारांनी उत्पन्न केले. जगाच्या वाढीसाठी त्यांनी तसे केले. म्हणून अग्नीला ब्राह्मण समजले जाते. मी तुला अग्नीच्या जन्माची माहीती सागितली. ते सगळे विलक्षण शक्तिमान आहेत. त्यांच्या इतकी उर्जा कशातही नसते. अग्नी तमस (अंधार) संपवतो. त्यांची क्षमता अभूत अग्नीसारखी, ज्याचा उल्लेख वेदांत आहे असते. कारण तत्वतः ते सगळे अग्नी एकाच कुळाचे आहेत. अंगिरसांच्या अंगातून ज्योतिष्तोम यज्ञाप्रमाणे ते सगळे अग्नी प्रकार निघाले. हे सगळे अग्नी देवांकडे यज्ञात दिलेले हवन आणि अर्घ्य पोहोचवण्याचे काम करत असतात.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा अड्डुसष्ठावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग एकोणसत्तरावा

मार्कंडेय पुढे सांगतात, अरे कुरूवंशाच्या निष्पाप राजा, मी तुला अग्नीच्या विविध कुळांची माहीती सांगितली आहे. आता तुला सांगतो, कार्तिकेयाची उत्पत्ती कशी झाली. तो शक्तिमान विलक्षण प्रसिद्धी असलेला अभूता मुलगा, ज्याचा जन्म ब्रह्मर्षीच्या बायकांपासून झाला आहे. फार प्राचीन काळी, जेव्हां देव आणि असुर एकमेकांशी सतत लढत होते. त्या लढायांत देव नेहमी पराजित होत असतं. देवांचा राजा पुरंदर पहातो कीं, त्याच्या सैन्याची मोठी हानि होत आहे. तो ठरवतो कीं, असा बलाढ्य योद्धा मिळवला पाहिजे जो असुरांना पराजित करू शकेल. त्यासाठी तो मानस पर्वताकडे चिंतन करण्यासाठी जातो. तेथे एकचित्ताने चिंतन करत असतांना त्याला कोण्या बाईची किंकाळी ऐकू येते. ती ओरडून धावा करत असते कीं कोणी तिला त्या दानवाच्या तावडीतून सोडवेल कां. मला कोणी असा पती देईल कां, जो माझे अशा दानवांपासून संरक्षण करील. कोणी माझा पती होईल कां आणि माझे संरक्षण करील. ते ऐकून पुरंदर तिला विचारतो, अहो बाई, तेवढ्यात तो पहातो कीं, एक दानव ज्याचे नांव आहे केशी, त्याच्या डोक्यावर दानवांचा मुकूट होता. त्याच्या हातात गदा होती. तो आकाराने प्रचंड होता. त्यांने त्या बाईचा हात पकडलेला होता. इंद्र त्याला बोलतो, "अरे केशी, तू ह्या बाईला कां त्रास देत आहेस? तुला माहित आहे कीं मी देवांचा राजा आहे व मी तुला आज्ञा करतो कीं, तू तिला त्वरित सोडून दे. तुला माहित आहे, माझ्या कडे वज्र आहे ज्यापुढे कांहीं टिकत नाही". त्यावर छद्मीपणे हसत केशी त्याला बोलतो, "अरे वसवा, माझ्या वाटेत तू येऊ नकोस. मला ती पाहिजे व मी तिला घेऊन जाणार आहे. तुला काय वाटते मला आव्हान दिल्यानंतर तू सहिसलामत तुझ्या घरी जाऊ शकशिल कां"? असें बोलत केशी त्याच्या वर त्याची गदा भिरकावतो. इंद्र त्याच्या वज्राने त्या गदेचे बारीक तुकडे करून टाकतो. ते पाहिल्यावर केशी एक मोठा फत्तर उचलतो व इंद्राच्या दिशेने फेकतो. इंद्र त्याच्या वज्राने त्या फत्तराचे असंख्य तुकडे करतो व ते तुकडे केशीवर जाऊन पडतात. त्यामुळें त्याला खूप जखमा होतात. तेव्हां तो दानव त्या बाईला सोडून तेथून निघून जातो. दानव अशारितीने पळून गेल्यावर शक्र त्या

सुंदर महिलेला विचारतो, ती कोण, कोणाची मुलगी अथवा कोणाची पत्नी आहे त्याची चौकशी करतो. तिला विचारतो, ती त्या ठिकाणी कशी आली?

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा एकोणसत्तरावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग सत्तरावा

ते ऐकल्यावर ती बाई इंद्राला सांगते, "मी प्रजापतिची कन्या आहे. माझे नांव देवसेना आहे. माझी बहिण दैत्यसेना आहे. तिच्यावर केशीने बलात्कार केला आहे. आम्ही दोघी भगिनी आमच्या पित्याच्या परवनगीने ह्या मानस पर्वताच्या प्रदेशात आमच्या सगळ्या दास्यांबरोबर मनोरंजनासाठी नेहमी येत असतो. हा केशी दररोज आम्हाला पटवण्याचा प्रयत्न करत असें. माझी बहिण त्याच्या गोष्टी ऐकत असें पण मी त्याला दाद देत नव्हते. त्यानंतर तो माझ्या बहिणाला, दैत्यसेनेला घेऊन गेला. आपण मला वाचवले आहे. आता तुम्ही माझ्यासाठी एक चांगला पती शोधावा जो माझे अशाप्रकारे संरक्षण नेहमी करील".

इंद्र तिला सांगतो, "तू माझी मावस बहिण लागतेस. आपल्या माता बहिणी आहेत. माझ्या आईचे नांव दक्षायनी आहे. मला सांग तुला कसा पती पाहिजे"?

ती बाई सांगते, असा पुरुष ज्याचे हात लांब आहेत, मी अबला असले तरी माझा पती बलाढ्य असला पाहिजे, माझ्या पित्याच्या कृपेमुळें त्याला सगळे देव आणि दानव मान देतील".

इंद्र ते ऐकून तिला बोलतो, "मला सांग तुझ्या पतीकडे कोणत्या शक्ति असाव्यात अशी तुझी अपेक्षा आहेत"?

ती सांगते, "तो पुरूष ब्रह्माचा भक्त असला पाहिजे. जो देव, यक्ष, किन्नर, उरुग, नाग, राक्षस आणि असुरांचा पराभव करू शकणारा असला पाहिजे. सगळ्या पापी दैत्यांचा नाश करणारा असला पाहिजे. तुझ्यासह सगळ्या तिन्ही जगाचा पराभव करणारा असा तो असावा अशी माझी अपेक्षा आहे".

तिचे ते ऐकल्यावर इंद्राला काळजी वाटू लागते व तो विचार करू लागतो, तो तिला सांगतो आजपर्यंत असा कोणी असल्याचे मला वाटत नाही. तेवढ्यात तो पहातो कीं, सूर्य उदयन डोंगरा पलिकडून उगवत आहे. त्याच वेळी चंद्रसुद्धा पलिकडून उगवत होता. तो अमावास्येचा चंद्र उगवत होता. त्याच वेळी तो पहातो कीं, देव आणि असुर त्या उदयन डोंगराच्या भागात लढत होते. तो पहात होता कीं, सकाळचे संधी किरण तेथे असलेल्या

ढगांना लाल रंगाने रंगवत होते. त्याला दिसते कीं वरुणाची घर लाल रंगाने चमकत आहे. तो पहातो कीं, अग्नीदेव वेदातील कवने जी भृगु आणि अंगिरसांनी रचली आहेत, गात सूर्याला अर्घ्य देत सूर्याच्या मंडलात प्रवेश करत होता. तो पहातो, चोविस पर्व सूर्याची स्तुती करत आहेत. तेथे सोम सुद्धा उपस्थित होता. ती सोम आणि सूर्याची मिलन युती होणे म्हणजे एक भयंकर युद्ध लवकरच छेडले जाणार देव आणि असुरात हे निच्छित. त्याला दिसते कीं, सिंधू नदीच्या पाण्यात ताजे रक्त मिसळलेले होते. कोल्हे व इतर भयंकर प्राणी मोठ्याने ओरडत होती. तो असा योग होता कीं, त्या योगात जर सोमांने कोणाला जन्म दिला तर तो अशा विक्रमी वीर असेल जसा त्या देवसेनेला हवा आहे. त्या विचाराने प्रेरित असा तो शक्र ब्रह्माच्या लोकात जातो. तो त्याच्या बरोबर देवसेनेलासुद्धा घेऊन जातो. ब्रह्माला भेटल्यावर त्याला नमस्कार करतो व सांगतो, "अहो ब्रह्मदेवो, आपण आपल्या मुलीसाठी कोणी योग्य पती शोधत अहात कां"?

ब्रह्मदेव त्याला उत्तर देतात, "अरे शक्र, जसे तू ठरवशील तसे होईल". त्या तू पाहिलेल्या युतीतून जो जन्म घेईल तो देवसेनेचा पती असेल व तो तुझ्या बरोबर असेल. ते ऐकल्यावर इंद्र आणि देवसेना ब्रह्माला लवून नमस्कार करतात. तेथून ते दोघे त्या जागी जातात जेथे महर्षी वसिष्ठ, अत्री इत्यादि होते. त्यानंतर इंद्राला दुसरे देव सामील होतात कारण त्यांनासुद्धा सोमरस प्यावयाचा असतो. जेथे ते ऋषी यज्ञ करत होते तेथे जातात त्यांचा यज्ञातील वाटा घेण्यासाठी. यज्ञातील अग्नी पुरेसा चेतवला होता त्यात ते देवांचे अर्घ्य आणि हवन देतात. त्यावेळी योग्य मंत्रोच्चारण करत तो विधी संपन्न होतो. त्यावेळी ती युती मोकळी होते. कोणीही बोलत नाही असे मौन ते सांभाळतात. अरे राजा, तो विधीपूर्वक पुजलेला अग्नी ते स्वर्गातील देवांना अर्पण करतात. त्यासाठी अभूत अग्नी ते करण्यासाठी खास मंत्रोच्चार करून आमंत्रित केलेला असतो. तो सगळा विधी आटोपल्यावर तो अभूत अग्नी ऋषींच्या बायकां त्यांच्या घरात झोपलेल्या पहातो. त्यांचे सौंदर्य पाहून त्याची नियत बिघडते. त्याला माहित असते कीं, त्याच्या मनात असें विचार येणे योग्य नाही. तो स्वताशी बोलतो, त्या सगळ्या ऋषींच्या बायका शुद्ध आहेत. त्यांचा विचार करणे अयोग्य आहे. मी त्यांची अभिलाषा करणे उचित नाही. त्यांना स्पर्श करण्याचा विचार करणे हे सुद्धा अयोग्य आहे. परंतु, तो ठरवतो कीं, तो त्यांना सतत

पहाण्यासाठी अस्वस्थ झालेला आहे. त्यावर तो अभूत अग्नी ठरवतो कीं, तो त्यांच्या घरातील गृहपत्य अग्नी बनून त्यांच्या घरात राहील.
मार्कंडेय सांगतात, तो अशारितीने गृहपत्य अग्नी बनून त्यांना त्याच्या ज्वाळांनी स्पर्श करत असें त्यातच तो समाधान मानत होता. तसा तो बराच काळ त्यांच्यात रहात होता. त्यामुळें त्याची त्या बायकांबद्दलची वासना वाढत होती. त्यामुळे तो सतत अस्वस्थ रहात असें. शेवटी त्याला त्या वासनेचा नाश करण्यासाठी तो वनात जातो. त्याच सुमारास दक्षची मुलगी स्वाहः त्याच्या प्रेमात पडलेली असते. स्वाहः त्याला घेरण्यासाठी सतत प्रयत्न करत असते. ती त्यावेळेची वाट पहात असते जेव्हां ती त्याला तिचे प्रेम दाखवू शकेल. परंतु, ती निष्पाप कन्या तो क्षण पकडू शकत नव्हती. तिला कळते कीं आता अभूत वनात गेला आहे तेव्हां ती सुद्धा तेथे जाण्याचा विचार करते. तिला त्याच्या प्रेमभंगाची कल्पना असल्याने ती ठरवते कीं, तिने त्यांपैकी कोण्या ऋषीपत्नीचे सोंग घेऊन त्यास मागणी घालावी. ती समजते कीं, तसे केल्यांने दोघांचे काम होईल.
अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा सत्तरावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग एकाहत्तरावा

मार्कंडेय पुढे सांगत असतात, अरे माणसांच्या राजा, त्या सप्तर्षींपैकी एक अंगिरस ह्यांची पत्नी होती सिवा, अत्यंत सुस्वरुप आणि पुण्यवंत, गुणवंत, निष्कलंक चारित्र्य असलेली अशी ती होती. स्वाहाने प्रथम त्या सिवाचे रुप धारण केले आणि अभूताकडे जाते. त्याला पटवण्यासाठी. त्याला भेटल्यावर ती त्याला सांगते, "अहो अग्नी, मला तुमच्या बद्दल वासना उत्पन्न झाली आहे. जर तुम्ही माझा आदर केला नाही मला न स्वीकारून तर मी स्वतःला संपवीन. मी सिवा अंगिरसाची अर्धांगिनी आहे. मी येथे आपल्याला भेटण्यास आले आहे ते माझ्या इतर ऋषीपत्नींच्या सांगण्यावरून. पूर्ण विचार करून त्यांनी मला आपल्याला भेटण्यास सांगितले आहे". अभूत अग्नी तिला बोलतो, "मला तुमच्या बद्दल वासना उत्पन्न झाली आहे हे तुम्हा बायकांने कसे समजले"? स्वाहा सांगते, "तू नेहमीच आमचा लाडका होतास जरी आम्ही तसे दाखवत नव्हतो. कारण आम्ही तुला भित होतो. परंतु, आम्ही तुझे मन काय सांगते ते, तुझे मन वाचून ओळखले आहे. आता जास्त वेळ न दवडता तू माझी इच्छा पूर्ण करावीस. माझ्या इतर भगिनी त्यासाठी तुझी वाट पहात आहेत. मला लवकर परत गेले पाहिजे, असें फार काळ आम्ही तुझ्याकडे राहू शकत नाही. मार्कंडेय पुढे सांगतात, तो अभूत अग्नी ते ऐकल्यावर अत्यानंदाने फुलून जातो. तो तेथेच स्वाहाशी मिलन करतो जी सिवाच्या रुपात आली होती. अग्नीला वाटत होते कीं, त्याने सिवाशी मिलन केले आहे. स्वाहाला तेंच पाहिजे होते म्हणून तीसुद्धा फार खूष झाली होती. त्यावेळी तिच्या मनात एक शंका येते कीं, जर कोणी तिला सिवाच्या रुपात पाहिले तर त्या पवित्र खर्या सिवाची नाहक बदनामी होईल. ते होऊ नये म्हणून ती एका पक्षिणीचे रुप धारण करते व त्या जंगलातून निघून जाण्याचे ठरवते. तसे करून ती त्या वनातून बाहेर पडते व गोर्या डोंगराकडे पोहोचते. तेथे चिखल पसरलेला होता त्यात कांहीं झाडे वाढत होती. त्या भागाचे संरक्षण सात तोंडे असलेल्या विषारी सापांकडे होते. त्यांचे सर्वकडे चांगलेच लक्ष होते. त्या प्रदेशात राक्षस, नर आणि मादी पिशाच्चे, भयंकर भूतं वावरत होती, त्याप्रमाणें कांहीं श्वापदं व पक्षीसुद्धा तेथे होते. ती चतूर स्त्री चटकन त्या

पहाडावर चढते. तेथे ती त्या अभूताचे वीर्य तेथील एका सोनेरी तलावात टाकून देते. व पुन्हा अभूताकडे जाते असें ती सहा दररोज करून आपली वासना भागवत होती. प्रत्येक वेळी ती त्याचे वीर्य त्या तलावात टाकत होती. अशारितीने ती सहा ऋषींच्या बायकांची सहा रुपं घेऊन ते करत होती. ते होत असतांना अरुंधती जिचे तपोसामर्थ्य विलक्षण होते व जी ऋषी वसिष्ठची बायको होती, स्वाहाला अरुंधतीचे रुप घेता येईना. अरे कुरु वंशाच्या नरेशा, त्या स्वाहाने अभूताचे वीर्य सहा वेळा त्या तलावात त्या महिन्याच्या पहिल्या पक्षात टाकले होते. तेथे पडल्या स्थितीत त्या वीर्यांतून एक पुरूष बालक जन्मले जे अतिशक्तीमान होते. ते सहाजणांचे वीर्य एकत्र होऊन त्यातून ते बालक झाले होते म्हणून त्याला ऋषींनी स्कंद असें नांव दिले. स्कंदला सहा डोकी होती, बारा कान होते, तसेंच तेवढे नेत्र, तसेंच हात, पाय परंतु एकच मान, एकच पोट असा तो जन्मला होता. तो चंद्र मासातील द्वितीयेला जन्म घेतो. तिसर्या दिवशी तो बालक मोठा होतो. त्याचे अवयव चौथ्या दिवशी बाहेर आले. त्याच्या भोवती लाल रंगाची वलयं चमकत होती. जणूकाय प्रती सूर्य अगवत आहे. त्याच्या हातात एक भयंकर दिसणारे धनुष्य होते. ते त्रिपुरारीच्या धनुष्यासारखे वाटत होते. त्यांने एक घाबरवणारी आरोळी ठोकली जी ऐकल्यावर सगळे तिनही जग दचकून गेले. ती आरोळी ढगांच्या गडगडाटाप्रमाणे होती. अनेक नांग, जसें चित्र आणि ऐरावत त्या आवाजाने घाबरून गेले होते. ते पाहून त्या तेजस्वी बालकांने त्यांना त्याच्या अनेक हातांने पकडून ठेवले. त्याच्या अनेक हाताने तो भयंकर आवाज करत तेथे खेळू लागला. त्याच्या एका हातात तो एक शंखू पकडतो व वाजवू लागतो, त्या आवाजाने सगळे भयभीत होतात. त्या अविर्भावात तो तेथील डोंगराच्या माथ्यावर नाचू लागतो. त्या महासेनाचे ते रुप असें होते की जणूकाय तो आता तिनही जग पादाक्रांत करणार आहे. प्रतिसूर्य असा तो चमकत होता. त्याच्या अनेक डोळ्याने तो सगळ्या दिशा न्याहाळत होता. तो अधूनमधून डरकाळ्या फोडत होता. त्याच्या त्या डरकाळ्या ऐकून अनेक प्राणी लपून बसले होते. त्याला कांही शरण गेले व त्याच्या संरक्षणत रहाण्याचे सांगू लागले ते सगळे शक्तीमान ब्राह्मण होते. त्यानंतर तो उठतो व त्याच्या धनुष्यातून तो बाण त्या गोर्या पहाडाच्या दिशेने मारू लागतो. त्या बाणांमुळें हिमालयाचा मुलगा, क्रौंचगीरी छिन्नभिन्न होतो. म्हणून त्यानंतर राजहंस व गिधाडं आता सुमेरी पर्वताकडे जात असतात.

क्रौंचगीरी प्रचंड जखमी झालेल्या अवस्थेत कळवळू लागतो. त्याला पडलेला पाहून इतर पहाडसुद्धा विव्हळू लागतात. ते त्यांचे विव्हळणे ऐकून सुद्धा त्याचा परिणाम त्या महासेनावर अजिबात झालेला दिसला नाही. त्यानंतर तो त्याची गदा उंच धरतो. तो त्याची गदा जोरांनी गोर्या पहाडाच्या शिखराकडे फेकतो. त्याच्या फटक्याने त्यातील एक कोसळतो. असे झाल्यामुळें गोरा पहाड त्याला घाबरू लागतो. त्याला घाबरून सगळे पहाड पृथ्वी सोडून पळू लागतात. तसे झाल्यामुळे पृथ्वीला फार त्रास होतो. तिचे पहाड हे आभूषण होते, ते गेल्यामुळे ती नाराज होते. त्यानंतर पृथ्वी स्कंदला विनंती करते कीं त्यांने हे थांबवावे. त्यानंतर ते पळून गेलेले डोंगर परत येतात व पृथ्वीला चिकटून बसतात. त्या विजयानंतर सगळे प्राणी त्या स्कंदाची पुजा करू लागतात. ते चंद्र मासाच्या पाचव्या दिवशी होते.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा एकाहत्तरावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग बाहत्तरावा

मांर्कंडेय पुढे सांगत असतात, जेव्हां त्या प्रभावी मुलाचा जन्म झाला तेव्हां पासून घाबरवणार्या घटना होऊ लागल्या. माणसांचे स्वभाव बदलले, वातावरणातील उष्मा व थंडी ह्यातसुद्धा फरक झाला. पृथ्वीच्या गोल फिरण्याच्या दिशेत फरक झाला. आकाशांतून तेजस्वी प्रकाश जाणवू लागला. हे सगळे पाहून सृष्टीचे काम पहाणारे ऋषी भांबावून गेले. ते हा बदल कां झाला ते समजून घेण्याचा प्रयत्न करत होते. जे त्या चित्ररथ वनात रहात होते ते सांगू लागले कीं हे सगळे होण्याचे कारण अभूत अग्नीने सहा ऋषींच्या बायकांशी व्यभिचार केला आहे. ज्यानी त्या स्वाहाला पक्षिणीचे रुप घेऊन जातांना पाहिले ते बोलत होते, कोणी विश्वास ठेवणार नाही पण ह्या सगळ्यामागे ती स्वाहाच कारणीभूत आहे. ते ऐकत होते कीं, ते नवजात बालक तिचे आहे. ते समजल्यावर स्वाहा त्या अद्भूत दिसणार्या बालकाकडे जाते आणि सांगते कीं, ती त्याची माता आहे. दुसर्या बाजूला त्या सहा ऋषींना समजते कीं, त्या बालकाचे ते पिता आहेत तेव्हां त्यांना आश्चर्य वाटते. ते चिडतात व आपल्या बायकांना सोडून देण्याच्या गोष्टी करतात. फक्त वसिष्ठांची पत्नी अरुंधती त्यात येत नाही. त्या वनातील रहिवाशी पुनः पुन्हा सांगत असतात कीं, त्या बालकांचे ते सहा ऋषी पिता आहेत परंतु, स्वाहा सगळ्यांना सांगत असते कीं, ते बालक तिचे आहे व त्या सहा ऋषींच्या बायकांचा त्याच्याशी कांहींही संबंध नाही. विश्वामित्र मुनी त्यांच्या ध्यानात जाऊन पहातात तेव्हां त्याला समजते कीं, अभूत अग्नी त्या सात ऋषींच्या बायकांच्या वासनेत अडकला होता व त्याचा गैर फायदा स्वाहाने घेऊन त्या पैकी सहा बायकांचे सोंग घेऊन अभूत कडून स्वतःचे उपशमन करून घेतले होते. ते त्याला समजल्यावर तो ते सगळ्यांना सांगतो. ते बालक निष्पाप आहे व त्याचे संरक्षण झाले पाहिजे असें तो महर्षी ठरवतो व महासेनाला संरक्षण देण्याचे ठरवतो. त्या बालकाच्या संस्काराचे काम तो मुनी करतो व त्याचे स्थान अधिकृत करतो. असें कीं, त्याला कोणी त्रास देणार नाही. सगळ्यांच्या भल्यासाठी तो ऋषी त्याच्या उत्तम गुणांचे वाचन करतो व सगळ्यांना सांगतो कीं, ह्याच्या पुजनाने तो तुम्हाला उपयुक्त होऊ शकतो.

त्यानंतर ते बालक दैवी जगातील एक प्रिय बालक म्हणून राहू लागते. विश्वामित्र नंतर त्या सहा ऋषींना ते सगळे सांगतो व दाखवून देतो कीं, त्यांच्या अर्धांगिनी शुद्ध आहेत. तरीसुद्धा ते सहा ऋषी त्यांचा स्वीकार करत नाहीत. स्वर्गातील बुजूर्गांना जेव्हां समजते कीं, त्या बालकात विलक्षण सामर्थ्य आहे तेव्हां ते वासवाला सांगतात की, त्याने स्कंदाला मारून टाकावे. नाहीतर ते बालक इंद्राला भारी जाणारे आहे. जर वेळीच त्याला मारले नाही तर ते बालक सगळी सृष्टी त्याच्या अभूतपूर्वक ताकदीने जिंकून घेईल व आपल्याला बंदी करेल. इंद्र गोंधळून गेला होता. त्याला समजत नव्हते नेमके काय करावे. ते बालक इतके शक्तीमान आहे किं, त्याला नष्ट करणे वाटते तितके सोपे नाही आणि ऋषी विश्वामित्रा सारखे त्याच्या पाठीशी आहेत, हे सगळे सोपे प्रकरण नव्हते. ते इंद्राचे वागणे पाहून कांहीं त्याच्या पौरुष्याबद्दल शंका घेतात. ते अजून बालक आहे तेव्हां त्याची बाब जगदंबेकडे सोपवावी असें कांहीं सुचवतात. असें सांगून ते निघून जातात. परंतु, त्याच्या अफाट क्षमतेच्या कल्पनेने ते सगळे देव चिंतेत असतात. तो अजिंक्य आहे व जर इंद्राने त्याच्याशी दोन हात केले व त्यात तो हरला तर सगळेच संपेल, म्हणून तो मामला वरच्या देवांकडे सुपूर्द करणेच श्रेयस्कर आहे असे ठरते. आता ही बाब शक्तीने नाही तर युक्तीने हाताळली पाहिजे असें ठरते. इंद्रा त्याला बोलतो, "तू आमचा लाडका झाला आहेस तेव्हां तू माझा मानलेला मुलगा होण्यास तयार आहेस कां"? त्यानंतर ते त्याला विचारतात कीं, त्याला दूध प्यावयाचे आहे कां"? ते बालक दूध पिण्याची इच्छा दाखवते तेव्हां जगदंबा त्याला तिच्या पदरात घेते व तो महासेन तिचे दूध पिऊ लागतो. त्यानंतर मामला साधा झाला आहे व त्याच्या पासून कांहीं धोका नाही हे ते समजतात. त्यानंतर अभूत अग्नीला ते समजते व तो त्या स्कंदाला भेटण्यास येतो. त्याला सांगतो मी तुझा जन्मदाता आहे. स्कंद त्याला आपला बाप मानू लागतो. आता त्यातील एक माता जी क्रोधाचे रुप होते त्याच्यावर आईप्रमाणे लक्ष देऊ लागते. तिच्या हातात एक मोठा आकडा असतो जे तिचे चिन्ह असते. त्याच बरोबर सागराची कन्या जिचा रंग लाल आहे व जी रक्त पिऊन रहाते ती स्कंदावर विशेष प्रेम करू लागते, त्याला तिच्या उराशी धरूनच ती राहू लागते. त्याचा बाप बोकडाचे रुप घेऊन इतर शेळ्या बकर्या घेऊन त्या डोंगरात भटकत असतो तो स्कंदासाठी खेळणी आणण्याचे बोलतो. मार्कंडेय समस्या पर्वाचा बाहत्तरावा भाग संपला.

## मार्कंडेय समस्या पर्व

## भाग त्र्याहत्तरावा

मार्कंडेय पुढे सांगतात, सर्व ग्रह, तारे, ऋषी आणि त्याच्या माता ज्या त्याला दूध पाजण्यास आतूर होत्या, तसेंच इतर तेजस्वी दैवी लोक महासेनासाठी त्यांचा समय देत होते. तरीसुद्धा इंद्राला त्या स्कंदाला पराजित करूनच स्वताचे श्रेष्ठत्व सिद्ध करावयाचे असते. म्हणून तो त्याचा ऐरावतावर बसून स्कंदाकडे निघतो. त्याच्या बरोबर त्याचे विश्वासू देव होते व त्याचे खास आयुध वज्र त्याने बरोबर घेतले होते. इतर देव त्यांची आयुध घेऊन सज्ज होते. स्कंदने इंद्राला सर्व सज्ज असा येतांना पाहिले तेव्हां तो त्याला त्याच्या निष्पाप बुद्धीने भेटण्यास पुढे झाला. वसवाने मोठ्याने ओरडून युद्धाची ललकारी दिली. त्याचा उद्देश अग्नीच्या मुलास मारण्याचा होता. त्याच्या बाजूने कांहीं ऋषीसुद्धा होते. ते त्रिनेत्रचे स्मरण करून स्कंदाच्या घराकडे निघतात. त्यावेळी सगळे इंद्राचे साथीदार ज्यांत गुह्यक सुद्धा होते, युद्धाच्या आरोळ्या मारत तेथे पोहोचतात. सागराच्या गर्जने सारखा तो धीर गंभीर ध्वनी होता. स्कंदाला समजते कीं, हे त्याला मारण्यासाठी आले आहेत तेव्हां त्याला फार क्रोध होतो व त्याच्या तोंडातून ज्वाळा निघू लागतात. त्या लांबवर पसरणार्या ज्वाळांनी अनेक देव गारद होतात. ते पाहून ते देव इंद्राची साथ सोडतात आणि स्कंदाच्या बाजूला होतात. देवांनी शक्राला सोडल्यामुळें चिडलेल्या इंद्राने त्याचे आयुध वज्र महासेनावर फेकले. ते स्कंदाच्या उजव्या खाद्यात घूसते. ते वज्र त्याच्या अंगातून पार जाते व असें होते तेव्हां त्याच्या अंगातून एक युवक बाहेर येतो त्याच्या हातात गदा असते. त्याच्या अंगावर दैवी चिलखतं होती. तो स्कंदाच्या फाटलेल्या शरीरातून आला म्हणून त्लाला विशाख नांव प्राप्त झाले. जेव्हां इंद्राने विशाख आलेला पाहिले त्याची गाळण उडाली. त्याला कळेना आता काय करावयाचे? तो स्कंदाला हात जोडून त्याची करुणा भाकू लागतो. स्कंदाने त्याची प्रार्थना मान्य केली व त्यामुळे सगळे देव आनंदात जातात.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा त्र्याहत्तरावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग चौर्याहत्तरावा

मार्कंडेय पुढे सांगतात, मी तुला कार्तिकेयाच्या जन्माची कथा सांगितली. त्याला स्कंद, महासेन, कुमार अशी आणखीन बरीच नांव आहेत. आता मी तुला त्याच्या विचित्र दिसणार्या व भयंकर असलेल्या साथीदारांची माहिती सांगतो. जेव्हां इंद्राचे वज्र स्कंदाला लागले तेव्हां असंख्य मुलगे जे गर्भात होते अथवा नुकतेच जन्मले होते ते सगळे स्कंदाचे साथीदार झाले. लहान मुलांना घाबरवणार्या शक्ती आणि अनेक मुली ज्या त्या काळात जन्मल्या ते सगळे कार्तिकेयाचे साथीदार ठरले. त्या मुलांचा विशाख बाप ठरला. त्यात अग्नी ज्याला भद्रशाख म्हणतात तो येतो, त्याचे तोंड बोकडाचे होते. त्याच्या भोवती त्याची अनेक मुलं मुली जमली होती व तो त्यांचे इंद्रापासून संरक्षण करत होता. त्यांची महामाया ते सगळे पहात होती. म्हणून पृथ्वीचे रहिवाशी कुमाराला त्या सगळ्यांचा रक्षणकर्ता समजू लागले. ज्यांना पुत्र व्हावा असें वाटते ते अग्नीदेवाची, रुद्राची पिता म्हणून व उमाची स्वाहाच्या रुपात माता म्हणून पुजा करू लागले. त्यामुळें त्यांचे जीवन सुखकर झाले. अर्भक, बालपण, लहानपण, तरुणपण व वृद्धत्व अशा जीवनाच्या सगळ्या अवस्थात तो त्यांचे संरक्षण करतो असें समजले जाऊ लागले.

अग्नीदेवाच्या मुली ज्यांना तप म्हणतात त्या तप स्कंदाकडे गेल्या तेव्हां तो त्या मुलींना विचारतो, "मी तुमच्यासाठी काय करावे ते सांगा". त्या बोलल्या, "आमच्यावर एकच कृपा कर, तुझ्या मुळें आम्ही चांगल्या गृहीणी व माता बहिणी होऊ असें कर". तो त्यांना उत्तर देतो, "तथास्तु". तसे सारखे होत गेले. तुम्ही सिवा आणि असिवा अशा दोन रुपात असाल. त्यानंतर त्या निघून गेल्या. परंतु त्या आधी त्यानी स्कंदाचे मातृत्व स्वीकारलेले असते. त्यातील काकी, हलिमा, मलीनी, वृंहिला, आर्या, पलाला आणि वैमित्रा अशा त्या सात त्याच्या माता झाल्या होत्या त्यांच्या शिशु नांवाच्या मुलाच्या. जो स्कंदाच्या कृपेमुळें जन्मला होता. तो शिशु लालेलाल डोळे असलेला, वादळी वर्तणूक असलेला भयंकर दिसणारा फार शक्तीमान होता. तो स्कंदाच्या मातांना झालेला आठवा महानायक म्हणून प्रसिद्ध आहे. त्याचा आणखीन एक चेहरा आहे त्याच्या पित्यासारखा, बोकडाचा चेहरा.

त्यामुळें त्याला कांहीजण नववा महानायक असें सुद्धा मानतात. अरे राजा युधिष्ठीरा, भद्रशाखाचे डोक्यातून पवित्र तेज बाहेर येऊ लागले. म्हणून ते बोकडाचे डोके विशेष महत्वाचे समजले जाते. ते सगळे त्या थोड्या काळात झाले तो चंद्रमासाच्या शुक्लपक्षातील सहावा दिवस होता. ह्या सगळ्या घटना फार थोड्या काळात होत होत्या. कारण त्याच्या दुसर्या दिवशी एक महाभयंकर युद्ध तेथेच होणार असते.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा चौर्याहत्तरावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग पंच्याहत्तरावा

मार्कंडेय पुढे सांगतात, स्कंदला सोनेरी तावीज आणि हार घातला गेला. त्याच्या डोक्यावर सोन्याचा मुकूट घातला होता ज्यावर सोनेरी तुरा लावलेला होता. त्याचे डोळे सोन्याच्या रंगछट्याचे होते. त्याचे दात टोकेरी व धारदार होते. त्याच्या अगावर रक्तवर्णी कपडे होते एकंदर तो फारच सुंदर दिसत होता. सगळ्याना हवा हवासा वाटावा असें त्याचे ते रुप होते. तिन्ही जगाला तो प्रिय झाला होता. तो लोकांना आशिर्वाद देत होता जे त्याच्याकडे मागत होते. त्याच्या कानात चमकणार्या बाळ्या होत्या. तो जरी स्वतः लोकांशी बोलत होता, वैभवाची देवता त्याच्या बाजूला राहून त्याला त्याच्या कामात मदत करत होती. त्याच्यावर वैभवाची कृपा असल्याने तो छोटा बालक पौर्णिमेच्या चंद्रासारखा वाटत होता. ब्राह्मण त्याची आराधना करत होते आणि महर्षी स्कंदाला बोलतात, "आपण सोन्याच्या अंड्यातून आला अहात, आपल्या कृपेमुळें सगळ्या सृष्टीचे भले होईल. जरी तू फक्त सहा रात्री पूर्वी जन्मला असलात, तरी सगळे जग तुमच्याशी समझौता करत आहे हे मोठे भाग्याचे लक्षण आहे. तू सुद्धा त्यांना अभय दिले आहेस. म्हणून तू आता तिनही जगांचा इंद्र होऊ शकतोस. ते ऐकून स्कंद त्यांना विचारतो, "अहो, मला सांगा हा इंद्र त्या तीन जगांशी काय करत असतो"? तो दैवी राजा त्याच्या देवांचे कसे सदैव संरक्षण करतो, ते मला सांगा. महर्षी त्याला सांगतात, "इंद्रामुळें मुलं होतात. तो सगळ्यांना काम करण्याची उर्जा देतो. जर त्याची कोणी भक्ती केली तर तो त्या भक्ताच्या इच्छा पूर्ण करतो. त्याचप्रमाणें तो वाईट शक्तींचा नाश करतो. गुणीजनांचे कौतुक करतो व त्यांना उत्तेजन देतो. इंद्राने प्रत्येकाला त्यांची काम आखून दिली आहेत त्याप्रमाणें ते करत असतात त्यामुळें सर्व कांहीं व्यवस्थित चालत रहाते. तो चंद्र आणि सूर्य ह्यांच्या नेमणूका करतो जेथे ते नसतात तेथे त्यांना काम करण्यास सांगतो त्यामुळें उर्जेचे वितरण चांगले होत असते. जेथे जे पंचमहाभूत कमी पडते तेथे त्याची योजना करत असतो. अशा सगळ्या त्याच्या कामाच्या गोष्टी आहेत". ते पुढे सांगतात, "इंद्राची क्षमता अफाट आहे. आपण सुद्धा चांगले कार्यक्षम अहात. म्हणून आपण मनात आणले तर इंद्र होऊ शकता".

त्यावेळी, शक्र तेथे येतो व स्कंदाला विचारतो, "काय आपण देवांचे राजे होण्यास तयार अहात कां? आपण समर्थ अहात, मी स्वतः तुझ्यावर ते संस्कार करण्याल तयार आहे". ते ऐकून स्कंद त्याला बोलतो, "जर तू ते काम प्रामाणिकपणे करत आहेस तर तुला बदलण्याची काय गरज? मी तुझा सेवक म्हणून रहाण्यास तयार आहे. मला कोणत्याही अशा सत्तेची अभिलाषा अजिबात नाही". शक्र त्याला सांगतो, "तुझी हिम्मत मोठी आहे. म्हणून मी तुला देवांच्या शत्रूंना मारण्यासाठी सांगितले तर तू ते काम करशिल कां"?
"तुझी ताकद पाहून सगळे थक्क झाले आहेत. मीसुद्धा तुझ्याबद्दल गैरसमज करून राहीलो होतो. आता परिस्थिती अशी आहे कीं, तू मला पराजित केले आहेस अशा स्थितीत मी इंद्र रहाणे लोकांना आवडणार नाही, तसेंच मला तो सन्मान मिळणार नाही जरी मी इंद्र म्हणून राहीलो तरी, हे लक्षात घे. त्याचा फायदा देवांचे शत्रू घेतील देवांत दुफळी माजवून ते देवांचे नुकसान करू शकतात. त्या दुफळीमुळें लढाया होत रहाणार. देवांत आजवर दुफळी झालेली नाही. त्या परिस्थितीत तू व मी विरुद्ध बाजूस असणार व त्या लढाईत तू मला पुन्हा पराजित करशिल त्यापेक्षा आताच शांततेत निर्णय करणे चांगले असें मला वाटते". ते शक्राचे बोलणे ऐकल्यावर स्कंद शांतपणे त्याला सांगतो, "अहो पुरंदर, मी तुम्हाला माझा राजा मानतो आहे. त्यामुळें जर कांहीं दुफळी झाली तर त्यात आपण एकाच बाजूस असणार आहोत. आपण आपले काम चांगले करत अहात हे मला ऋषींनी सांगितले आहे तेव्हां त्या व्यवस्थेत कांहीं बदल करण्याची मला आवश्यकता वाटत नाही". ते ऐकल्यावर इंद्र त्याला विचारतो, "आपण मला इंद्र म्हणून रहाण्याची आज्ञा करत अहात असे समजून मी व सर्व देव ह्यापुढे आपापली कामं करत राहू. आता ज्याअर्थी, माझी नेमणूक इंद्र म्हणून पुन्हा झाली आहे, मला आपल्याला कांहीं काम देण्याचा अधिकार दिला आहे असें मी समजतो".
"त्याप्रमाणे आपण आपल्या फौजा घेऊन सकल सज्जनांच्या हितासाठी त्या सेनेचे नेतृत्व करावे अशी मी तुम्हाला आज्ञा करू शकतो".
मार्कंडेय पुढे सांगतात, अशारितीने इंद्राने स्कंदाची नेमणूक देवांच्या सैन्याचे सरसेनापती म्हणून केली. त्याला महर्षीनी आशिर्वाद दिले व तो आता त्या नव्या नेमणूकीमुळें जास्तच तेजस्वी दिसू लागला. सरसेनापतीचा गंडा स्वतः त्रिपुरारीने त्याला बांधला. रुद्र तेथे खुद्द

पार्वतीसह उपस्थित होते. जो गळ्यात घालावयाचा गंडा साक्षात विश्वकर्माने तयार केलेला होता. त्या गंड्यावर वृषभाची मुद्रा होती जे त्यांचे चिन्ह होते. अग्नीदेव ज्याचा उल्लेख ब्राह्मण रुद्र म्हणून करतात तो त्याच्यापाठी उभा होता. तेव्हां पासून स्कंदला सगळे रुद्राचा वारसदार म्हणून समजू लागले. अति प्राचीन काळी, रुद्राच्या वीर्य स्खलनाने तो गोरा पर्वत तयार झाला होता. त्याच ठिकाणी अग्नीदेव आणि कृत्तिका ह्याचे समागमाचे प्रसंग आधी घडलेले होते. सगळे देव जाणून होते कीं, रुद्र त्याची सगळी कृपादृष्टी गुहावर (स्कंद) टाकणार आहे. म्हणून तो शंकराचा मुलगा म्हणूनच ओळखला जाऊ लागला. अशाप्रकारे स्कंद त्या बालवयात एक आणखीन अग्नीदेव म्हणून गणला जाऊ लागला. तो अभूत अग्नी, स्वाहा आणि त्या निरपराध सहा ऋषीभार्या ह्यांच्यामुळें स्कंद तयार झाला होता. ते सगळे स्कंदचे जनक होते परंतु, जास्त करून त्याला रुद्राचाच वारस मानले जाऊ लागले कारण, तसें ऋषी समजत होते. तो रुद्राचा मुलगा रक्त वर्णी वस्त्र नेसला होता. त्या अवतारात तो उषःकाली क्षितिजातून वर येणार्या सूर्यबिंबासारखा वाटत होता. त्याचे चिन्ह होते लालरंगाचा कोंबडा. जेव्हां तो त्याच्या रथात चढला तेव्हां सर्व विध्वंसक अग्नी साक्षात उभा आहे असें वाटत होते. तो साक्षात विजयाची देवता वाटत होता. युद्धभूमीवर जात असतांना त्याच्या चेहर्यावर विलक्षण तेज चमकत होते. सौंदर्य, सामर्थ्य, पावित्र्य, शक्ती, हिम्मत, धाडस, प्रामाणिकपणा, चांगुलपणा हे उत्तम गुण त्यात प्रकर्षाने व्यक्त होत होते. त्याशिवाय त्याच्या मनात ब्राह्मणांबद्दल भक्ती होती. त्याची बुद्धी मोहात अडकणारी नव्हती, कोणताही गोंधळ त्याच्या मनात नव्हता. साथीदारांना संरक्षण आणि शत्रूचा बिमोड, सर्व निरपराध जीवांबद्दल सहिष्णूता असें उत्तम गुण स्कंदात स्वाभाविकपणे होते. सर्व देवांनी अभिषेक केल्यानंतर तो आणखीनच प्रसन्न व समाधानी दिसत होता. वेदांच्या कवनांचे गान, स्वर्गीय सुमधूर संगीत ह्यानी गंधर्व त्याचे गुणगान करत होते. त्याच्या सभोवार उत्कृष्ट पेहेराव केलेल्या अप्सरा वावरत होत्या. त्यावर मजेत फिरणारी पिशाच्च त्याच्यावर फुलांचा अभिषेक करत होती. स्वर्गात रहाणार्यांना तो महासेन सूर्य वाटत होता. ज्याच्यामुळें कांहीं तमस (अंधार) असेल तर तो निघून जावा. त्यानंतर देवांच्या फौजा त्यांच्या नवीन योजलेल्या सरसेनापतीला पहाण्यासाठी त्याच्या भोवती जमू लागले. ते त्याच्या नांवाचा घोष करत होते व स्कंद त्यांना दाद देत होता. हजार यज्ञ

करणार्याने त्याच्या देवसेनेला त्या आधी चांगले नेतृत्व दिले होते. तो विश्वास देतो कीं स्कंद त्यापेक्षा कांहीं कमी नसेल व तो ब्रह्माचा धनी होईल. इंद्राने तिला मुद्दाम तेथे आणले होते. ती नवोदित नवरी सारखी सजलेली होती. त्यानंतर तो वलांचा बिमोड करणारा शक्र स्कंदला सांगतो, "तुझ्या जन्मा आधी पासूनच हे ठरले होते कीं, ती तुझी पत्नी होणार आहे. असें स्वयंभूनेच ठरवले होते म्हणून तू आता तिला स्वीकार. त्या प्रमाणे त्यांचं लग्न वैदीक मंत्रांच्या उच्चारणात संपन्न होते. स्वतः बृहस्पती तो विधी करतात. त्या ब्रह्माची इतर नांवे अशी आहेत, शश्थी, लक्ष्मी, आशा, सुखप्रदा, शिनिवली, कुहू, सैवृत्ती, अपराजिता. ती देवांत देवसेना म्हणून ओळखली जाते. स्कंदाची बायको झाली होती व त्या वेळेनंतर सगळे देव स्कंदाला खर्या अर्थाने त्यांचा मानू लागले. त्यानंतर स्कंद चंद्रमासातील पांचव्या दिवशी वयात आला. त्या दिवसाला श्रीपंचमी म्हणतात. ज्या दिवशी तो त्याचा उद्देश सिद्ध करतो त्या दिवसाला महान दिवस असें समजले जाते तो सहावा दिवस आहे.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा पंचाहत्तरावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग श्याहत्तरावा

मार्कंडेय पुढे सांगत असतात, त्या सहा ऋषीभार्या ज्यांना त्यांच्या पतीनी कलंकिता समजून सोडले होते त्यांना स्कंदाची माहीती मिळते. तो बालक आता देवसेनेचा प्रमुख नेमला गेला आहे हे त्या लक्षात घेऊन त्याच्याकडे न्याय मिळावा म्हणून जातात. त्या सगळ्या मिळून स्कंदाला विनवणी करतात, "अरे आमच्या मुला, आमच्या देवासारख्या पवित्र पतींनी आम्हाला आमचा कांहीं दोष नसतांना सोडले आहे. कारण कांहीं लोकांनी त्यांच्या गैरसमजातून असा प्रचार केला कीं आम्ही तुझ्या माता आहोत. ते ऐकल्यानंतर आमचे पती आमच्यावर नाराज झाले व आम्हाला घरातून हाकलून दिले. आता आम्ही सगळ्या तुला आमचा दत्तक मुलगा म्हणून स्वीकारू इच्छितो तरी ते तू मान्य करावेस असें मला वाटते. तसे जर तू केलेस तर आम्हाला चिरशांती व चिरानंद प्राप्त होईल".

ते ऐकल्यावर स्कंद त्या सहाजणांना बोलतो, "अहो माझ्या मातांनो, तुम्ही पूर्णतया पवित्र आणि निष्पाप अहोत हे मी समजतो. मी तुम्हा सगळ्यांना माझ्या माता समान समजतो व मी तुमच्या कामना पूर्ण करण्यास सहाय्य करणार आहे".

मार्कंडेय ऋषी पुढे सांगत असतात, त्यामध्येच शक्र त्याच्या कामाच्या गोष्टी घेऊन आलेला त्याला बोलतो, अहो सरसेनापती श्रीमती अभिजीत, रोहीणीची लहान बहीण तिच्या मोठ्या बहीणीच्या यशामुळें नाराज होऊन वनात गेली आहे. तेथे ती घोर तपस्या करण्याचा विचार करत आहे. तिच्या जागी योग्य पर्यायी तारा कोणता घ्यावा ते विचारण्यासाठी आलो आहे. आपण ब्रह्माचा विचार घेऊन त्याबद्दल निर्णय घ्यावा. धनिष्ठ तारा अशा कारणासाठी ब्रह्माने उत्पन्न केला होता. रोहीणी तसेंच काम करत होती. त्यामुळें त्यांची संख्या पूर्ण झाली आहे. त्या जागी कृत्तिकाची नेमणूक इंद्राने पूर्वी केली होती. कृत्तिकावर अग्नीचे चालते त्यामुळें ती सात डोकी असल्यासारखी आकाशात चमकत असते. त्यानंतर विनता येते व स्कंदाला सांगू लागते, "अरे कुमारा, तू मला माझ्या मुलांसारखाच आहेस. माझ्यावर तू मुलासारखे प्रेम करावेस अशी माझी इच्छा आहे. मला

मृतांच्या पिंडात माझा हिस्सा असला पाहिजे असें कर आणि तू नेहमी माझ्या बरोबर रहावेस असें मला वाटते".
मार्कंडेय युधिष्ठीराला सांगत असतात, त्यानंतर त्या सगळ्या त्याच्या मानलेल्या मातांना तो स्कंद एकत्रितपणे सांगतो, "तुमच्या मनाप्रमाणे होईल. मी काय केले म्हणजे तुम्हाला संतोष होईल ते सांगा".
त्या माता त्याला सांगतात, "ब्रह्मी आणि महेश्वरी ह्या गेल्या कालखंडात जगाच्या माता म्हणून नेमल्या गेल्या होत्या. आमची इच्छा आहे कीं. आता त्यांना त्या जागेतून काढून टाकावे आणि आम्हाला त्यांच्या जागी नेमावेस". ह्या कालखंडातील लोक आमची पुजा करतील व आम्हाला अर्घ्य आणि हवन देतील असे करावे. त्याशिवाय आमची रद्द झालेली अपत्ये पुन्हा आम्हाला मिळावीत. हे तू करू शकतोस".
स्कंद त्यांना सांगतो, "जी तुमची अपत्ये रद्द झाली ती संपली, तरी त्याबद्दल मी कांहीं करू शकणार नाही. पाहिजे असेल तर दुसरी अपत्ये मी तुम्हाला देऊ शकतो".
ते ऐकल्यावर त्या सगळ्या माता त्याला बोलतात, "तुझ्या संरक्षणाखाली राहून आम्ही त्या सगळ्यांची अपत्ये खाऊन टाकू इच्छितो. त्यासाठी आम्हाला तुझ्या परवानगीची गरज आहे".
स्कंद त्या मातांना बोलतो, "मी तुम्हाला तशी परवानगी देऊ शकतो परंतु, हा सगळा प्रकार मला भयंकर वाटत आहे. तुमचे भलो हो, तुमची समृद्धी हो, तुम्ही सदैव सुरक्षित असाल. तुम्ही त्या सगळ्यांना संरक्षण दिले पाहिजे".
त्या माता त्याला उत्तर देतात, "आम्ही त्यांना संरक्षण देण्याचे आश्वासन देत आहोत. तुझे भले हो, आम्ही तुझ्याबरोबर राहू इच्छित आहोत".
स्कंद त्यांना बोलतो, "माणसाची मुलं सोळा वर्षाची होईस्तोवर तुम्ही त्यांना तुमच्या विविध रुपांनी सतावू शकता असा माझा आदेश आहे. माझ्या भयंकर शक्ती तुमच्या बरोबर असतील. त्या परिस्थितीत तुम्ही सुखाने राहू शकाल. तुमची जे पुजा करतील त्यांना मात्र तुम्हाला पूर्ण संरक्षण द्यावे लागेल. अशारितीने तुम्ही सुखांने राहू शकाल".
मार्कंडेय पुढे सांगतात, त्यानंतर एक भयंकर शक्तिमान जोर त्याच्या अंगातून बाहेर येतो व तो जोर मर्त्यांची मुलं खाऊ लागतो, केवळ त्या मातांच्यासाठी. ते झाल्याबरोबर तो बेहोष

होऊन जमिनीवर कोसळतो. त्यातून एक भयंकर स्वरुप असलेले, ज्याला स्कंदपस्मार असें नांव ज्ञानी ब्रह्मणांनी दिले, मूर्तरुपात अवतरते. विनताला शकुनी ग्रह (पाप शक्ती) म्हणतात. तिला पुतना राक्षसिण म्हणून सुद्धा समजतात. ती भयंकर रुप असलेली राक्षसा पिशाच्च म्हणूनसुद्धा ओळखली जाते. ती बायकांचे गर्भ पाडते. अदितीला रेवता म्हणून ओळखतात. तिच्या पाप शक्तीला रैवत म्हणून ओळखतात. रैवतसुद्धा लहान मुलांना घाबरवत असतो. दिती जी दैत्यांची माता आहे, तिला मुखमंडीका म्हणून ओळखतात. ती मुखमंडीका लहान मुलांचे मांस आवडीने खाते. अरे कौरवा, जी मुलं स्कंदाच्या पासून झाली ती सगळी पापशक्ती आहेत. ते गर्भाचा नाश करतात. ती त्या लहान मुलांना पकडतात व खातात. त्यांना शकुनी (विनता) लपण्यास मदत करत असते. सरमा जी कुत्री आहे तीसुद्धा लहान मुलांना पकडून खाते. जी सगळ्या वृक्षांची माता समजली जाते व जी करंज झाडाच्या फांद्यांवर बसलेली असते ती शांत स्वभावाची आहे व तिची पुजा करणार्यांना दुवा देते व सगळ्या प्राण्यांची मदत करत असते. ज्यांना मुलं हवी असतात ते त्यांची पुजा करतात. करंजाच्या झाडाकडे ती पुजा करावी लागते. ह्या अठरा देवता मांस फार आवडीने खातात. कद्रू गर्भवती बाईच्या उदरात हळूच प्रवेश करते व तो गर्भ खाऊन टाकते. गंधर्व सुद्धा माणसाच्या गर्भाला खातात. त्यामुळें त्या बायकांचे गर्भ पडतात. ती अप्सरांची आई गर्भाची वाढ होऊ देत नाही. लाल समुद्राच्या मुलीने स्कंदाला सांभाळले होते, तिची पुजा होते, तिचे नांव आहे लोहीता व ती कदंब वृक्षावर रहाते. आर्या ते काम करते बायकांत, जे काम रुद्र करतो पुरुषात. तिला सगळ्या अर्भकांची माता समजतात. जोवर ती मुलं त्याचे सोळावे वर्ष गाठत नाहीत तोवर त्या शक्तींचा त्यांच्यावर वाईट प्रभाव असतो परंतु, ते मोठे झाल्यावर ती त्यांच्यावर चांगला प्रभाव करून त्यांना मदत करते असें आहे. त्या सगळ्या देवींवर स्कंदाचे पुरुष देव नियंत्रण करत असतात. त्यांची पुजा सुगंधी द्रव्याने करतात. अर्घ्य, हवन, गंध, बळी असें देऊन त्यांची पुजा संपन्न होत असते. प्रसन्न झाले तर त्या देवता फार चांगले करतात त्यांची पुजा करणार्यांचे. आता मी सांगतो महेश्वराचे कार्य काय असते त्याबद्दल. माणसाच्या सोळाव्या वयानंतर त्यावर कोणत्या देवता काय प्रभाव टाकतात ते सांगतो. ज्या पुरूषाला झोपेत देवांचे दर्शन होते तो लवकरच भ्रमिष्ट होतो. ज्या देवतेच्या प्रभावामुळें ते भ्रम त्याला होतो त्या देवतेला स्वर्गीय

देवता असें समजतात. जर एकाद्याला त्याचे मृत पूर्वज दिसू लागले जेव्हां तो आरामात बसला आहे तर ते दर्शन देणार्या देवतेला पूर्वज देवता असें समजले जाते. जर कोणी सिद्धांचा अपमान करत असेल तर त्याचे चित्त अस्वस्थ होते व ते करणार्या देवतेला सिद्ध देवता असे म्हणतात. ज्या देवतेच्या प्रभावामुळें त्याला सुगंध जाणवतो व विविध रुचींचा अनुभव येतो जरी ते कांहीं तेथे नसतांना विशेष करून जर त्या अनुभवानंतर त्याला त्या गोष्टींमुळें त्रास होत असेल तर त्या देवतेला राक्षस देवता म्हणतात. जर स्वर्गीय गायक म्हणजे गंधर्व एकाद्याला धरतात त्याला विविध आवाज ऐकू येऊ लागतात त्यामुळें तो संत्रस्त होतो त्याला कारणीभूत असणार्या देवतांना गंधर्व देवता समजले जाते. कांहीं लोकांना वेगवेगळ्या आवाजांनी, जे प्रत्यक्ष तेथे नाहीत, त्रास होतो त्या देवतांना पिशाच्च देवता असें म्हणतात. जर अचानकपणे यक्ष देवता एकाद्याच्या अंगात शिरली तर त्याची बुद्धी काम करेनाशी होते. तेव्हा समजावे कीं, त्याला यक्षाने बाधले आहे. जो अचानकपणे व्यसनात अडकतो व त्यामुळें आजारी होतो, त्याचे जीवन अस्वस्थ होते, त्याला मंत्रविद्येने बरे करता येते. जेव्हां मनुष्य गोंधळलेल्या मनस्थितीत जातो, भीतीने व्याकूळ होतो, त्याला नको ती दृष्य दिसू लागतात, अशांना मन शांतीची आवश्यकता असते. देवतांचे तीन प्रकार आहेत. कांहीं गमतीशीर असतात त्या नेहमी खेळण्याच्या मनस्थितीत असतात. कांही हावरट असतात आणि तिसर्या प्रकारातील देवता भावूक असतात. मनुष्य सत्तर वर्षाचा होतो तो पर्यंत त्या देवता त्याला त्रास देत असतात. त्यात भावूक देवता जास्त त्रास देतात. परंतु, ज्यांचा विवेक शाबूत आहे व जो त्यामुळें भावूक होत नाही त्याला त्या देवता त्रास देऊ शकत नाहीत. संयम, मनाची शिस्त असे गुण असलेल्या माणसास त्यांचा कोणताही त्रास होत नाही. मी तुला अरे राजा सांगितले वाईट देवता माणसाला कशा व केव्हां त्रास देऊ शकतात. जे महेश्वराला मानतात व त्याच्यावर श्रद्धा ठेवतात ते अशा शक्तींपासून नेहमी सुरक्षित असतात.

अशारितीने मार्कंडेय समस्या पर्वाचा श्याहत्तरावा भाग संपला.

# मार्कंडेय समस्या पर्व

## भाग सत्याहत्तरावा

मार्कंडेय  पुढे सांगतात, जेव्हां स्कंदला ते अधिकार मिळाले त्यानंतर स्वाहा त्याला भेटते व सांगते, "अरें स्कदा तुझी मी खरोखरची माता आहे. म्हणून मला वाटते कीं, तू मला कांहीं खास आनंद द्यावयाला पाहिजेत". ते ऐकल्यावर स्कंद तिला विचारतो, मला सांग मी काय केले म्हणजे तुला तो आनंद मिळेल"?

स्वाहा त्याला बोलते, "हे बघ, मी माझ्या पित्याची दक्ष प्रजापतीची खास आवडती मुलगी आहे. मी अगदी पहिल्यापासून हुताशनीच्या प्रेमात पडली आहे. परंतु, अरे माझ्या मुला, तो अग्नीदेव, माझ्याकडे ढुमकूनही बघत नाही. तो माझे प्रेम समजू शकत नाही. मला त्याच्या बरोबर सर्वकाळ त्याची अर्धांगिनी म्हणून रहावेसे वाटते".

ते ऐकल्यावर स्कंद तिला सांगतो, अहो श्रीमती, आजपासून पुढे सगळे पुण्यवंत लोक जे हवन, अर्घ्य त्यांच्या देवांना व पितरांना देतील ते ब्राह्मणांकडून योग्य प्रकारेच करतील. ते अग्नीलाच देतील. त्या बरोबर तुझा उल्लेख, स्वाहा, म्हणून ते करतील. त्यामुळें आपण सदैव त्या हुताशनीच्या जवळ राहू शकाल. त्या आदेशामुळें स्वाहा व पावक ह्यांचे कायमचे नाते निश्चित झाले. त्यामुळें तिला फार आनंद होतो व ती स्कंदाला शुभाशिर्वाद देते.

त्यानंतर ब्रह्म, विश्वाचा कर्ता, महासेनाला बोलतात, तू आता जाऊन तुझ्या पित्याला भेटावेस असें वाटते. त्या त्रिपुरारीने उमा, अग्नीदेव आणि स्वाहा अशा चौघानी तुला सर्वशक्तिमान करण्याचे ठरवले आहे, ज्यामुळें तू सगळ्या सज्जन जीवांचे संरक्षण करू शकशिल. त्यानंतर रुद्राचे वीर्य उमाच्या अंड्यावर संस्कारीत झालेले असें तो, रुद्र एका डोंगरावर टाकतो. त्यातून यथावकाश मुजिक आणि मिंजिक असें दोन उत्पन्न होतात. त्याशिवाय त्याचे पांच भाग होऊन ते विविध ठिकाणी जाऊन पडतात. त्यात लाल सागर, सूर्याचे किरण, पृथ्वी अशा जागी ते पडतात. अशारितीने ते भयंकर दिसणारे कच्चे मांस खाणारे स्कंदाचे साथीदार शंकराच्याच वीर्यापासून उत्पन्न झाले होते. हे सगळे ज्ञानी जाणतात. त्या व्यवस्थेला मान्य करून स्कंद महादेवाचे दर्शन घेण्यासाठी येतो. तेथे महादेव महासेनाचे स्वागत करतो.

मार्कंडेय ऋषी पुढे सांगतात युधिष्ठीराला, ज्यांना सांपत्तिक वैभवाची वासना आहे ते ह्या पांच देवतांची आराधना करतील. ज्यांना धन संपत्तीची अभिलाषा आहे ते मुजिक आणि मिंजिकांची नेहमी भक्ती करतील. ते दोघे रुद्राचे मुलगे आहेत. आपल्या मुलांचे भले व्हावे असें चिंतीणारेसुद्धा त्यांची पुजा करतील. कारण ते त्यांची भक्ती करणार्यांना मदत करण्यास बांधलेले आहेत. त्याच प्रमाणे ज्यांना आपली मुलं जगावीत असें वाटते ते त्या कच्चे मांस खाणार्या स्त्री देवतांची आराधना करतील त्यांना कच्चे मांस प्रसाद म्हणून देतील. त्या स्त्री देवता झाडांवर रहात असतात. अशारितीने त्या पिशाच्च देवतांच्या असंख्य प्रजाती त्यातून उत्पन्न झाल्या ज्या महासेनाच्या आज्ञेनुसार काम करत असतात. आता राजा युधिष्ठीरा, मी तुला सांगतो त्या स्कंदाच्या घंटांबद्दल. त्याच्या विविध तर्हा आहेत. इंद्राने त्याच्या ऐरावतासाठी दोन घंटा दिल्या होत्या. त्यांची नांव वैजयंती आणि विजया, शक्राने त्या त्यांच्या साठी घेतलेल्या होत्या. त्यातील एक तो गुहाला देतो. त्यातील एक विषाख घेतो. दोनही घंटा रक्त वर्णी होत्या. त्यांना दिलेल्या ह्या घंटांची खेळणी त्या सगळ्यांना विशेषकरून महासेनाला ती देवांनी दिलेली फार आवडतात.

सर्व बाजूनी देव, पिशाच्च अशा शक्तीने वेढलेला, सोन्याच्या आसनावर बसलेला आसा महासेन फारच विलोभनीय दिसत होता. हिरवळीने सजलेला तो पहाड त्याच्या सानिध्यात विशेष खुलून दिसत होता. जसा मंदार पर्वत असावा. त्या पहाडावर सूर्याची किरणं चमकत होती. तो गोरा पहाड त्यावरील जंगलाच्या आच्छादनानी भरलेला होता. त्या वनात संतनक, करवीर, पारिजात, जांभूळ, अशोक अशा झाडांने गर्द झाला होता. त्याशिवाय चौफेर कदंब वृक्ष दिसत होते. त्या वनात स्वर्गीय हरणं आणि इतर पक्षी वावरत होते. आकाशात ढगं गर्जत होती व गंधर्व आणि अप्सरा त्याची मनोरंजनाची गाणी व नृत्य स्कंदाच्या पुढे पेश करत होते. सागराच्या खळखळणार्या पाण्याच्या आवाजा सारखे ते वाटत होते. जशा अप्सरा नाचू लागल्या व गंधर्व त्यांची वीणा वाजवू लागले सर्वदूरहून सगळे प्राणी आनंद झाल्यासारखे ओरडू लागले. इंद्रा सह सगळे जग त्या गोर्या पहाडावर गेले आहे असें वाटावे असें सगळे दिसत होते. तेथे जमलेले सगळे लोक त्या स्कदाकडे एकटक पहात होते, त्याना सारखे त्याच्याकडे पहात रहावे असें वाटत असावे असें दिसत होते.

मार्कंडेय पुढे सांगत असतात, जेव्हां अग्नीपुत्राचे आरोहण होत होते देवांच्या सैन्याचे सरसेनापतीपदी, त्यांचा मानलेला पिता त्याच्या अर्धांगिनी सह भद्रावतकडे त्याच्या वाहनाने जात होता. महादेवाचा रथ हजार सिंह खेचत होते त्याचा सारथी होता काळ. तो रथ आकाशाच्या पोकळीतून जात असतांना असें वाटत होते जणूकाय ते सबंध आकाश गिळून टाकतात कीं काय? चरांच्या जगात त्यामुळें घबराट पसरली होती. ते हजार सिंह त्यांच्या प्रचंड आयाळी जोरात हलवत तो रथ खेचत होते. त्या सगळ्या हालचाली आणि त्यांच्या डरकाळ्या कोणालाही भिववणार्या अशाच होत्या. शंकर पार्वती असें तेजस्वी होते जणूकाय सूर्यच तेथे चमकत होता. त्या प्रकाशामुळें आसपास असलेली ढगं इंद्रधनुष्या सारखी प्रज्वलित झालेली वाटत होती. त्या रथाच्या पुढून धनदेव (कुबेर) माणसांच्या पाठीवर बसून त्या हजार सिंहांच्या रथाला वाट करून देत होता. त्यांच्या मागून गुहा त्याच्या पुष्पक रथाने येत होता. इंद्रसुद्धा ऐरावतावरून जात होता. त्याच्या मागून त्यांचे देव साथीदार त्यांच्या रथातून येत होते. ते महादेवाच्या रथा पाठून येत होते. वारदाई देव अशारितीने त्याच्या यक्ष, राक्षस इत्यादि योद्ध्यांबरोबर येत होता. ते राक्षस व यक्ष गळ्यात पुलांच्या माळा घालून प्रसंग सुशोभित करत होते. महान यक्ष अमोघ व त्याचा सहाय्यक जंभक यक्ष त्या सैन्याचे नेतृत्व करत होते. अनेक देव त्यांच्या शक्तीशाली आयुधांसह त्यात सामील झालेले होते. त्यांत रुद्र, वसु होते. ते देवसेनेच्या उजव्या आघाडीत दिसत होते. त्यांत भयंकर दिसणारा मृत्यूदेव यम त्याच्या सैनिकांबरोबर तेथे होता. त्यांच्या बरोबर अनेक व्याधी देणार्या देवतांचे तांडे चालत होते. त्यांच्या मागून साक्षात त्रिशूळ येत होते. ते चांगल्या प्रकारे सजवलेले होते त्याचे नांव होते विजया. जलदेवता वरुण त्याच्या भयंकर आयुधाने सज्ज असा येत होता. त्या आयुधाचे नांव आहे पस (पू). त्या मागो माग येत होते अनेक जलचर त्यांच्या चिन्हाने सज्ज असें येत होते. त्या मागून पत्तिसा आयुध जे रुद्र वापरतात ते होते त्या बरोबर गदा, सोटे असें सगळे येत होते. पत्तिसाच्या मागोमाग रुद्रांची छत्री व महर्षींची कमंडलू येत होती. त्या बरोबर महर्षी भृगु, अंगिरस अणि दुसरे ऋषी येत होते. त्या सगळ्यांच्या मागून येत होता रुद्र त्याचे सामर्थ्य स्पष्टपणे दिसत होते. त्यानंतर विविध नद्या, तारे, नक्षत्र, ग्रह, समुद्र, अप्सरा, ऋषी, दैवी गंधर्व, नाग आणि बालकांची काळजी घेणार्या देवता, जात होत्या. त्या मागून स्त्रीया, पुरूष येत होते. त्या

सुंदर बायका हातातील फुलं उधळत मोठ्या आनंदाने नाचत नाचत येत होत्या. त्यांच्या मागून ढगं येत होती. महादेवाची आरती गातच ते सगळे येत होते. त्यांनी शुभ्र रंगाची छत्री पिनाक वर धरलेली होती. अग्नी, वायू, एकनिष्ठतेचे प्रतिक असलेली चिन्हे घेऊन येत होते. त्या मागून इंद्र वृषभासह राजर्षी असें येत होते. ते सगळे महादेवाची स्तुती असलेली गाणी गात होते. देवमाता, गौरी, विद्या, गांधारी, केशिणी, मित्रा आणि सावित्री ह्या पार्वतीच्या सानिध्यात दिसत होत्या. त्यात अनेक विज्ञानाच्या देवता ज्यांनासुद्धा विद्या असेंच म्हणतात त्या होत्या.
राक्षसांच्या फौजा ज्या इंद्राला व इतर देवांना आज्ञा देतात ते त्यात होते. त्यांची पथकं त्या मिरवणूकीच्या अग्रणी होते. एक महत्वाचा राक्षस पिंगल, जो रुद्राचा मित्र आहे व जो जेथे प्रेते जाळली जातात त्या स्मशानात असतो तो होता. त्याची आनंदात चालण्याची पद्धत विशेष वाटत होती कारण तो कधी सगळ्यांच्या पुढे दिसे व कधी मागे दिसे. ते सगळे त्या महादेवाची पुजाच करत होते असें जाणवत होते. कृत्तिकाचा मुलगा, जो त्या सोहळ्याचे कारण होता, शिवाच्या पुजनात सामील होता. त्यावेळी शंकर आपल्या मुलाला गंभीरपणे आज्ञा देतात किं, "तू ह्या देवसेनेचे नेतृत्व करणार आहेस".
स्कंद त्यांना बोलतो, "जशी आज्ञा, माझे नायक, मी आपल्या आज्ञेचे पालन करीन. आता मला सांगा, ह्यापुढे मी काय करावे". रुद्र त्याला बोलतात, तुला मी सदैव तुझ्या बरोबर असलेला दिसेन. माझाकडे लक्ष ठेवून व पूर्ण क्षमतेने तू तुझे दिलेले कार्य करणार आहेस. सगळ्या सज्जनांचे कल्याण तुला करावयाचे आहे. तेवढे बोलल्यावर महादेव त्या स्कंदला जवळ घेतात व मिठी मारतात. त्यानंतर तो महादेव त्याला बाजूला करतात. असें अचारकपणे बाजूला केल्यामुळें कांहीं चमत्कारीक गोष्टी देवांच्या सैन्यात घडतात. एकप्रकारची बेचैनी त्यांच्यात आढळते. महादेवांनी असें कां वागावे स्कंदाबरोबर असा प्रश्न त्यांना पडतो. आकाश चमकू लागले, सगळे विश्व गोंधळून गेल्यासारखे वाटले. पृथ्वीमध्ये घरणीकंप होऊ लागले. त्यानंतर अंधार वाढत गेला. तो सगळा प्रकार पाहून, शंकर त्याच्या अर्धांगिनी उमासह आणि महान महर्षी असें सगळे एकत्रपणे विचार करू लागले. त्यावेळी एक भयंकर शक्तीमान अनेक शस्त्रादिने सज्ज असे ढग अथवा फत्तर असावे असें, त्यांच्या पुढे उभे झाले. ते एक नव्हते तर अनेक होते, त्याने त्या देवसेनेवर बाण

फेकण्यास सुरूवात केली. त्यानंतर इतर आयुध फेकली जाऊ लागली. ते अचानक झाल्यामुळें सगळी देवसेना आणखीनच गोंधळून गेली. ती चांगली संधी आहे असें समजून दानव देवसेनेवर हल्ला करतात व त्यामुळें देवसेनेची दाणादाण उडवतात. अनेक देव त्यात मारले जातात. जसें एकाद्या जंगलाला आग लागावा व त्यातील मोठे वक्ष जळावेत असे वाटत होते. देवांची डोकी दानव उडवत होते. कोणी नेता नसल्यामुळें देवांची मोठी हानि होत होती. ते पाहून इंद्र समजतो कीं, त्याने नेतृत्व घेतले पाहीजे. तो उभा रहातो व सगळ्या देवांना उद्देशून बोलतो, "अरे देवांनो असें हार मानू नका. पुढे व्हा. आपली शस्त्र पाजरून पुढे व्हा. तुम्हाला हार मानणे शक्य नाही. पुढे व्हा व लढावयाला सुरूवात का. ह्या दानवांना अशी संधी मिळू देणे तुम्हाला शोभत नाही. असें देव वागत नाहीत. आपण दानवांवर प्रतिहल्ला करू या. मी तुमचे नेतृत्व करणार आहे. ते ऐकल्यावर देवांत जोर येतो व ते लढण्यास तयार होतात. ते इंद्राचे भाषण ऐकल्यावर मरुत, साध्य, वसु असें सगळे त्यांची आयुध घेऊन लढण्यास निघाले. देवांच्या सगळ्या आघाडींत नवे चैतन्य शिरते. ते दानवांना तोंड देण्यासाठी सरसावतात. त्यानंतर परिस्थिती उलटली व आता दैत्य आणि दानव ह्यांची मोठी हानि होऊ लागली. त्यांच्या रक्ताचे पाट वाहू लागले. देवांचे बाण दानवांच्या शरीरात घुसून बसत होते. मेलेल्या दैत्यांचे ढीग पडत होते. असें होऊ लागल्यामुळें दानव घाबरून गेले. ते सैरावैरा पळून जाऊ लागले. सगळी परिस्थिती पूर्णपणे उलडली गेली. अखेरीस युद्धात देवसेना जिंकते, त्यामुळें सगळे देव मोठ्या आनंदाने घोषणा करू लागतात. आता त्यांचा जोश आणखीन वाढला. दोनही बाजूचे घाबरलेले होते. असें होत असतांना पुन्हा दैत्य आणि दानवांनी प्रतिहल्ला केला व देवांना बेसावध अशा स्थितीत दाबण्यास सुरूवात केली. ते आता ऐकणारे नव्हते असें वाटत होते. दैत्यानी त्यांची युद्धाची वाद्ये वाजवण्यास सुरूवात केली. त्याचा मोठा गदारोळ सुरू झाला. त्यावेळी एक जबरदस्त दानव ज्याचे नांव होते महिष, एक भलामोठा दगड उचलून देवांवर फेकतो. दानव अशारितीने दगडांचा वर्षाव करत लढत असतात. तो काळ्याकुट्ट ढगा सारखा दिसत होता. देवांनी पाहिले कीं, तो दानव महिष तो डोंगरासारखा प्रचंड फत्तर त्यांच्यावर फेकणार हे पाहून सगळे इतस्ततः धावू लागले. तरी तो दानव तो मोठा डोंगरासारखा फत्तर त्यांच्या दिशेने फेकतो. महिष त्यांच्या मागे धावत जातो.

दहाहजाराहून जास्त देव सैनिक मरून पडतात. त्या मनिषाच्या ह्या कृत्यामुळें सर्व देवांत दहशत पसरते. महिष त्याच्या साथीदार दैत्यांच्या मदतीने देवसेनेवर जोराचा हल्ला करतो. जसें वाघाच्या टोळीने हरणांवर तुटून पडावे. इंद्र पहातो कीं, महिष जोराने मुसंडी मारत आहे, ते पाहिल्यावर इंद्रासकट सगळे देव आपापली आयुधं तेथेच टाकून सैरावैरा धावू लागतात. ते पाहून मस्त झालेला महिष रुद्रावर हल्ला करतो. रुद्राच्या रथाचा दांडा तो पकडतो, तसे समस्त पृथ्वी हादरू लागते. ध्यानस्थ बसलेले ऋषी खडबडून उठतात. ते पाहून सगळी दैत्य दानव सेना आनंदाने उचंबळून येते. त्यांच्या आनंदाला पारावार रहात नाही. त्यांना आता खात्री वाटते कीं अंतिम यश आता त्यांच्या हातात आले आहे. जरी रुद्राची अशी केविलवाणी अवस्था दैत्यांनी केली होती तरी तो त्या दैत्याला ठार मारण्याची गरज नाही असेंच समजत असतो. त्याला माहीत असते स्कंद शेवटचा प्रहार करणार आहे. तो असुर आणि महिष समजत असतात कीं, रुद्राचा रथ त्यांचा होणार आहे. ती मोठीच कमाई ठरणार होती त्यांची. तो रणगर्जना करू लागतो. सगळे देव काय होणार ह्या चिंतेत असतांना अचानकपणे महासेन रागात त्यांच्या मदतीसाठी पुढे सरसावला. त्याच्या सोन्याच्या रथातून जे रक्तवर्णी घोडे खेचत होते, तो देवांच्या मध्ये येतो. त्याचे तेज पाहून दैत्य दानव सेना घाबरून जाते. महासेन त्याचे शक्ती आयुध महिषावर फेकतो. त्या झटक्याने तो पराक्रमी दैत्य जमिनीवर ठार मरून कोसळतो. महिषाचे डोके एवढे मोठे होते कीं, त्यामुळें उत्तर कुरू देशाकडे जाणारा सोळा योजने एवढा रस्ता बंद होतो. देव आणि दानव दोघे पहात असतात, स्कंद त्याचे शक्ती आयुध सारखे त्या शत्रू सेनेवर फेकत असतो. ते आयुध दिलेले संहाराचे कार्य करून पुन्हा त्याच्याकडे परतत असते. हजारो शत्रूंचा संहार केल्यावर ज्यात दानवांची मोठी हानि झालेली असते, सगळीकडे हाहाकार उडालेला असतो. त्यानंतर स्कंदाचे खादाड साथीदार त्या मेलेल्या दानवांचे मांस खाऊ लागतात. त्यांचे रक्त जे जमिनीवर सांडलेले असते ते चाटून टाकत असतात. थोड्याच वेळांत सगळे दानव आणि दैत्या ते खाऊन टाकतात. जसे सूर्य अंधार संपवतो, वारा ढगांना पळवतो, आणि अग्नी जंगलं फस्त करतो तसे ते होत होते. अशारितीने स्कंद त्याच्या शत्रूंचा पराजय करतो.

सगळे देव स्कंदाचे अभिनंदन करण्यासाठी पुढे सरसावतात. महासेन त्या निमित्ताने महादेवाचे आभार मानतो. तो कृत्तिकेचा मुलगा, सूर्यासारखा चमकत होता. सगळे दानव आणि दैत्य पळून जातात तसें शंकर त्याच्या जामानिम्यासह तेथून निघून जातो. त्यानंतर पुरंदर पुढे होतो व कुमाराला आलिंगन देतो. त्याबरोबर महेश्वराचेसुद्धा आभार मानतो. तो पुढे सांगतो कीं, ह्या महिषाला ब्रह्माने अभय दिले होते व अजिंक्यत्वाचा आशिर्वाद दिला होता त्यांचा काळ संपल्यामुळें तू त्याचा निपाःत केला आहेस. तो आम्हा देवांना गवताच्या पात्या सारखे तुच्छ मानत होता. स्वर्गातील हे काट्या समान होते, त्यांचा बिमोड करून तू मोठे काम केले आहेस. तो त्याच्या दोस्तांसह आम्हा देवांना नेहमी सतावत असें. तुझ्या साथीदारांनी त्यांचा अशाप्रकारे फडशा पाडला आहे कीं, ते पुन्हा आम्हाला त्रास देण्यास येणार नाहीत. तू उमापति प्रमाणेच अजिंक्य आहेस. हा तुझा विजय तुझे पहिले यश म्हणून साजरा केला जाईल. तुझी ख्याती सगळ्या तिन्ही जगात दुंदुमत राहिल. सगळे देव तुझ्याबरोबर राहून ह्या जगाचे काम करतील. रुद्र सगळ्या देवांना आज्ञा देतो कीं, "ते ह्यापुढे स्कंदाला सर्वतोपरी सहाय्य करतील जसें ते त्याला आता करीत आहेत. पहा त्यांने एका दिवसांत तिन्ही जग जिंकली आहेत. त्याची आराधना ऋषीसुद्धा करत आहेत. जे ब्राह्मण त्याचे स्तवन करतील ते समृद्ध होतील. त्यांना स्कंदाचे सहाय्य मिळत राहिल". त्यानंतर तो साचीचा पति इंद्र, त्याच्या सगळ्या देवगणांबरोबर महादेवाची परवानगी घेऊन तेथून निघून जातो. रुद्र स्वतः भद्रावत कडे प्रयाण करतात. बाकीचे स्वर्गवासीसुद्धा त्याच्या घरी निघून जातात.

जनमेजय वैशंपायनांना विचारतो, "अहो पुण्यवंत, आदरणीय ब्राह्मणा, मला समजून घ्यावयाचे आहे कीं, स्कंदाची किती विविध नांवे प्रचलित आहेत".

वैशंपायन त्या ऋषीगणांच्या सम्मेलनात ती नांव सांगू लागतात. तो प्रथम मार्कंडेयांचे नांव घेऊन त्यांच्या वतीने नांव सांगू लागतो. "अग्नेय (अग्नीदेव), स्कंद (टाकलेला), दिप्तीकिर्ती (तळपणारा), अनामेय (सदानंदी), मयुरकेतु (मोराचे चिन्ह घेऊन), धर्मात्मा (पुण्यवंत), भूतेशा (सगळ्या चराचरांचा स्वामी), महिषार्दन (महिष दैत्याचा वध करणारा), कामजित (सर्व वासनांचा नाश करणारा), कामद (इच्छातृप्ती करणारा), कांत (देखणा), सत्यवाक (सत्य बोलणारा), भुवनेश्वर (जगाचा स्वामी), शिशू (बालक), शिघ्र (चपळ), सुची (पवित्र),

चंद (भयंकर), दिप्तवर्ण (तेजस्वी कांति असलेला), शुभानन (शुभ चेहरा असलेला), अमोघ (कधीही न गोंधळणारा), अनघ (निष्पाप), रुद्र (भितीप्रद), प्रिय (आवडेल असा), चंद्रानन (चंद्रासारखा दिसणारा), दिप्त शती (तपळती तलवार धारण केलेला), प्रसंन्नात्मन (स्थितप्रज्ञ), भद्रकृत (भले करणारा), कुटमहन (दुष्टांचा), शस्थीप्रिय (शस्थीचा पति), पवित्रा, मातृवत्सल (आईचा लाडका), कन्याभार्तृ (कुमारीकांचे संरक्षण करणारा), विभक्त (विश्वभर पसरलेला), स्वहेया (स्वाहाचा मुलगा), रेवतीसुत (रेवतीचा मुलगा), प्रभू (स्वामी), नेता, विशाख, नैगमेय (वेदातून उद्भवलेला), सुदूश्चर (पुजा करण्यास अवघड असा), सुव्रत (शब्दाचा पक्का), ललित (सुंदर), बलक्रिडानक प्रिय (ज्याला खेळणी आवडतात असा), खचरीन (आकाशात संचार करणारा), ब्रह्मचारीन, सुर (शूर), सर्वनोद्भव (वनात उद्भवलेला), विश्वामित्रप्रिय, देवसेना प्रिय, वसुदेव प्रिय, प्रियकृत (चांगले, भले करणारा), कार्तिकेय, कुमार, महासेन अशी त्याची ख्यातनाम विशेषणं आहेत. जो ती विशेषणं स्मरून त्यांचा जप करतो त्याला समृद्धी प्राप्त होते. त्याला मोक्ष मुक्ती मिळते".

मार्कंडेय पुढे सांगतात, "अरे कुरूकुलीन महायोद्ध्या, आता मी त्या महाबली, अतुलनीय, षडानन, गुहाची आराधना करणार आहे. त्याचे सगळे देव, ऋषी सदैव त्याच्या असंख्य नांवांचे स्मरण करतात. त्याचे श्रवण केल्याने कल्याण होईल. ब्रह्माची गुपित जाणणारा म्हणून त्याला कांहीं ब्रह्मसाय म्हणतात. तू ब्रह्मणांचा मुख्य आहेस. तू ब्रह्माचा भक्त आहेस. तुला ब्रह्माचे विलक्षण कार्य चांगले समजते. तू ब्रह्मणांसारखा वैराग्यपूर्ण आहेस. तू स्वाहा आहेस, तू स्वाध आहेस, तू शुद्धांत शुद्ध आहेस, तुला कवनाने आळवले जाते. तुला सहा ज्वाळांचा अग्नी म्हणून सगळे पुजतात. तूंच वर्ष आहेस, तूंच सहा मोसम आहेस, तूंच बारा महिने आहेस, तूंच अर्ध वर्ष आहेस, तूंच दाही दिशा आहेस, तूं कमलनयन आहेस, तुझे मुख फुलासारखे सुंदर आहे, तुला हजार तोंड आहेत, तुझे हजार हात आहेत, तूं ह्या विश्वाचा स्वामी आहेस, तूंच श्रेष्ठ अर्घ्य आहेस, तूंच देवांची शक्ती आहेस, तूंच असुरांचीसुद्धा देवता आहेस, तूं महासेनानी आहेस, तूं साक्षात क्रोध आहेस, तूं शत्रूंचा नाश करणारा आहेस, तूं सगळे भक्षण करणारा आहेस, तूं साक्षात संतुष्टता आहेस, तूं सहस्त्रपाद आहेस आणि तूंच पृथ्वी आहेस. तूं असंख्य रुप घेणारा आहेस, तुझ्या ताकदीला मर्यादा नाहीत. तुझ्या मर्जीने तू गंगेचा, स्वाहाचा, माहीचा, आणि कृत्तिकाचा मुलगा आहेस, अरे

फडानना, तू कोंबड्याशी अनेक रुप घेऊन तुझ्या मनाप्रमाणे खेळत असतोस, तूंच दक्ष आहेस, सोम आहेस, धर्म आहेस, वायू, पर्वतं, इंद्र आहेस सर्वदा. तू महाबली आहेस, तू अनंत आहेस, तूंच सत्य आहेस, तूंच दितीची मुलं मारणारा आहेस. तू स्वर्गाच्या शत्रूंना मारणारा आहेस. म्हणून तू सगळ्यांचा धनी आहेस. तू सत्याचे मूर्तरुप आहेस, तूं मोठा आणि त्याचवेळा सुक्ष्म सुद्धा आहेस. तू पुण्याची उच्चता व नीचता आहेस, विश्वाची सर्व गुपित तुला माहीत आहेत. सगळ्या विश्वावर तुझी छाया पडलेली आहे. अशारितीने मार्कंडेय महासेनाची आराधना करतात. मी तुझी प्रार्थना करतो ज्याला बारा नेत्र आहेत व बारा हात आहेत. परंतु, तुझ्या इतर विविध गुणांची मला कल्पना नाही कारण ते माझ्या समजण्याच्या पलिकडले आहेत. मी एक ब्राह्मण, तुला व सगळ्याच ब्राह्मणांना स्कंदाच्या उत्पत्तीची कथा सांगत आहे. द्विजांनी ते सांगावे व इतरांनी ऐकावे त्यामुळें जे ऐकतील ते समृद्ध होतील. त्यांना दीर्घ आयुष्य मिळेल, प्रसिद्धी प्राप्त होईल, त्याला इष्ट संतती होईल, विजय मिळेल, जीवनाचे समाधान मिळेल आणि त्याच्यावर स्कंदाची कृपा होईल.

## - महाभारत वनपर्व तेरावा खंड संपला -

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे २५ खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी

तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉंटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चांने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता,

जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

# ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद